

# रायगडची जीवनकथा

लेखक

**शांताराम विष्णु आवळसकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# रायगडची जीवनकथा

# रायगडची जीवनकथा

लेखक :
शां. वि. आवळसकर

महाराष्ट्र राज्य
साहित्य व संस्कृती मंडळ,
१९६२

प्रकाशक:
© महाराष्ट्र राज्य
साहित्य व संस्कृति मंडळ

मुद्रक :
व्यवस्थापक
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय
पुणे–१

फोटो व वेष्टन छपाई:
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय
पुणे–१

सजावट:
द. ग. गोडसे

पहिली आवृत्ती १९६२
दुसरी आवृत्ती १९७४
तिसरी आवृत्ती १९९५

# महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ

## काहीं भावी प्रकाशनें

### अन्तर्भारती माला

१. उर्दू मराठी कोश : ले. श्रीपाद जोशी.
२. गुजराती मराठी कोश : ले. भाऊ धर्माधिकारी.
३. बंगाली मराठी कोश : ले. अशोक शहाणे.
४. कानडी मराठी कोश : ले. पुंडलिकजी कातगडे.
५. तेलगु भाषा प्रवेश : ले. भालचंद्र आपटे.
६. तामिळ भाषा प्रवेश : ले. प्रा. आर्. बी. जोशी.

### विज्ञानमाला

१. प्राणिसृष्टि : ले. म. वि. आपटे.
२. मानवदेह : ,,
३. वनस्पति : ,,
४. संख्याशास्त्र :
५. ग्रहगतिसिद्धान्त : ले. शि. ग. पवार.

### विविधमाला

१. भावना कोश ( होमोपाथी ) : ले. डॉ. एस्. आर्. फाटक.
२. भावनानिघंटु : ,, ,,

# चित्रांची अनुक्रमणिका


१. महादरवाजा

२. महाद्वार नगारखाना

३. बाजार पेठ

४. दारूगोळ्याचे कोठार

५. टकमक टोक

६. महाराजांच्या सिंहासनाची जागा

७. जगदीश्वराचे देऊळ

८. हिरकणी बुरुज

९. शिर्काइचे देऊळ

१०. राणी महाल

११. महाराजांची समाधी

१२. शिवाजी महाराजांची समाधी
(बाजूला राखण करीत असलेला महाराजांचा आवडता कुत्रा वाघ्या समाधी रुपात)

१३. चित्त दरवाजा

१४. गंगासागर

१५. [illegible]ध्याचे मनोरे

१६. [illegible]

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना... | दहा |
| १. | रायगडचे दर्शन | १ |
| २. | रायगडचा पूर्वेतिहास | १४ |
| ३. | रायगडचे चढते वैभव | २१ |
| ४. | रायगडवरील वैभवाची मध्यान्ह | २५ |
| ५. | ऑक्झेंडनची ऐतिहासिक वकिली | ३२ |
| ६. | रायगडावरील पहिला राज्याभिषेक | ४१ |
| ७. | राज्याभिषेकाने घडलेली स्थित्यंतरें | ५० |
| ८. | भूषण कवीने पाहिलेला रायगड | ५७ |
| ९. | शिवरायांचा दुसरा राज्याभिषेक | ६१ |
| १०. | ऑस्टिनची रायगडवरील वकिली | ६७ |
| ११. | राजे निजधामास गेले | ७१ |
| १२. | संभाजीच्या कारकीर्दीचे स्वरूप | ७५ |
| १३. | रायगडावर शाक्तांचा वरचष्मा | ८२ |
| १४. | संभाजीच्या रायगडावरून स्वाऱ्या | ८९ |
| १५. | रायगडचे वैभव ओसरले | ९३ |
| १६. | रायगडचे पहिले पारतंत्र्य | ९९ |
| १७. | रायगड शाहूने घेतला | १०३ |

१८. रायगडावर पेशव्यांची सत्ता स्थापन झाली ... ११४
१९. रायगडावरील वार्षिक उत्सव ... ... १२४
२०. रायगडची दुरूस्ती, शाकारणी, राखण व गस्त... १३२
२१. रायगडावरील कैदी... ... ... ... १४०
२२. रायगडवरील शिबंदी व तिचे कामकाज ... १४९
२३. रायगडची व्यवस्था व आयव्यय ... ... १५६
२४. नाना फडणीस व रायगड ... ... ... १७०
२५. पारतंत्र्याच्या अंधाराची चोरपावले ... ... १७३
२६. रायगडवरील स्वातंत्र्यसूर्य मावळला ... ... १८२
२७. रायगड - इतस्ततः ... ... ... १८९
२८. १८१८ नंतरचा रायगड ... ... ... १९२
ग्रंथनाम संक्षेपसूचि... ... . .. दोन
संदर्भ ग्रंथसूचि ... ... . ... नऊ
व्यक्तिस्थलविषयसूचि ... ... ... पंधरा

# प्रस्तावना

इ. स. १९५१ मध्ये पुणे येथील श्रीशिवाजी–रायगड–स्मारकमंडळाच्या कार्यवाहांनी मला रायगडचा इतिहास लिहिण्यास सुचविले. ते म्हणाले 'तुम्ही रायगडच्या परिसरात राहून इतिहाससंशोधन करीत आहात; तुम्हीच रायगडचा इतिहास लिहा, श्रीशिवाजी–रायगड–स्मारकमंडळ तुम्हांला ग्रंथनिर्मितीबद्दल मान-धन देईल. स्मारकमंडळाने नुकतेच श्रीछत्रपतींचे चरित्र लिहवून घेतले आहे; रायगडचा इतिहास लिहवून घेणे हा स्मारकमंडळाच्या कर्तव्याचा एक भाग आहे.' मी होकार दिला. स्मारकमंडळानेही आपल्या कार्यकारिणीच्या बैठकीत एकमताने ठराव करून ग्रंथलेखनाचे काम प्रत्यक्षांत मजवर सोपविले व त्याकरिता पाचशे रुपये मानधन व पुरस्कार देणार असल्याचे कळविले.

मी अभ्यासास प्रारंभ केला व १८ सप्टेंबर १९५६, अनंत चतुर्दशीच्या दिवशी लेखनास सुरुवात केली. इ. स. १९५६ च्या अखेरीस 'रायगड'चे लेखन पूर्ण झाले व मी हस्तलिखित श्रीशिवाजी–रायगड–स्मारकमंडळाच्या स्वाधीन केले.

स्मारकमंडळांतील जाणकार मंडळींनी ते पाहिले व मंडळाने ठरविलेले मानधन व पुरस्कार माझ्या सुपूर्त केला.

त्यावेळी माझी अशी इच्छा होती की हे पुस्तक स्मारकमंडळाने प्रसिद्ध करावे. बराच काल सदर हस्तलिखित मंडळाजवळ राहिले, पण ते प्रसिद्ध होण्याचा योग येईना; कारण आर्थिक प्रश्न जसा मजपुढे उभा होता, तसाच तो मंडळा-पुढेही होता. पुस्तक प्रकाशित करण्याची जबाबदारी वस्तुतः माझीच होती.

लवकरच महाराष्ट्रराज्य निर्माण झाले व साहित्य–संस्कृति–मंडळाची स्थापना होऊन अनुदान देण्याची नवी प्रथा सरकारने सुरू केली. मला वाटू लागले की साहित्य–संस्कृतिमंडळाकडे या पुंस्तकासाठी अनुदान मागावे. तद-

नुसार काही महिन्यांपूर्वी मी मंडळाकडे अर्ज केला, हस्तलिखित पाठवून दिले व निर्णयाची वाट पहात राहिलो.

श्रीशिवछत्रपति व रायगड हे महाराष्ट्राचे मानबिंदु आहेत. रायगड हे तर सर्व तीर्थांत पवित्र असे धारातीर्थ आहे. त्यासंबंधी माझे पुस्तक लिहून झाले असल्याचे साहित्यसंस्कृतिमंडळाच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावर मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्यवाह श्री. सेतुमाधवराव, इतिहासज्ञ सभासद प्रा. न. र. फाटक यांना व इतर सभासदांना असे वाटू लागले की हे पुस्तक काळजीपूर्वक वाचून साहित्यसंस्कृतिमंडळाचे पहिले प्रकाशन म्हणून घेता आले तर पहावे. मंडळाचे वतीने प्रा. न. र. फाटक यांनी त्याचे वाचन केले व काही दुरुस्त्या सुचविल्या; त्या मला मान्य झाल्या. श्री. सेतुमाधवरावांचा फार्शी ऐतिहासिक साहित्याशी प्रदीर्घ संबंध असल्यामुळे त्यांनीही आपल्या अवलोकनानंतर काही सूचना केल्या; त्या सर्व मी विचारात घेतल्या. आता हे पुस्तक साहित्यसंस्कृतिमंडळाचे प्रथम प्रकाशन म्हणून वाचकांपुढे येण्याचा योग येत आहे. मी अनुदानाचा आशीर्वाद मागत होतो; मला वरदान मिळाले याचा आनंद होतो.

इ. स. १८६० ते १९६० या शंभर वर्षांत 'रायगड' या विषयावर सुमारे दहा पुस्तके प्रसिद्ध झाली; सामान्यपणे दर दहा वर्षांनी एक पुस्तक प्रसिद्ध होत आले आहे. तरी या अकराव्या पुस्तकाची जरुरी होती. कारण, सदर दहा पुस्तकांपैकी कै. जोशी यांचे 'राजधानी रायगड' हे एकच पुस्तक बरे आहे; बाकीची जुजबी आहेत. त्या पुस्तकांना रायगडचा इतिहास म्हणण्यापेक्षा रायगडचे वाटाडये म्हणणेच शोभेल. जोशी यांनी मात्र तीस वर्षांपूर्वी आपले पुस्तक अद्ययावत् करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याला आगळे स्वरूप आले होते. जोशी यांनी रायगडच्या परिसरांत राहून या विषयाचा बराच अभ्यास केला होता; पण त्यास काही मर्यादा होत्या. प्राथमिक शाळेतील या शिक्षकाला इंग्रजी व संस्कृत ग्रंथांतील मजकुराचा आपल्या पुस्तकांत पूर्ण उपयोग करून घेणे अवघड होते. शिवाय, कै. शिवरामपंत परांजपे यांच्या लेखनपद्धतीची मोहिनी त्यांच्या मनावर पडल्यामुळे, कटाक्षाने समतोल लिहिणे त्यांना जमले नाही. 'राजधानी रायगड'

प्रसिद्ध झाल्यानंतर मराठ्यांच्या इतिहासाचे जे संशोधन झाले, ते या पुस्तकात नाही, हे कालपरत्वे निर्माण झालेले मुख्य वैगुण्य होय.

गेल्या तीस वर्षात इतिहाससंशोधकांस पेशवेदप्तर खुले झाले. त्यांतून रायगडविषयक काही माहिती साधनांच्या रूपाने पुढे आली. शिवचरित्र-साहित्याचे अनेक खंड प्रसिद्ध झाले. यामुळे रायगडसंबंधी नव्याने लेखन होण्याची आवश्यकता उत्पन्न झाली होती. अशा स्थितींत मी हे काम पत्करले, तेव्हां इंग्रजी, संस्कृत व मराठींतून प्रकाशित झालेल्या साधनग्रंथांतील माहितीचे संकलन करण्याची जबाबदारी मजवर आपाततः पडली. शिवाय, रियासतकार सरदेसाई, सर जदुनाथ सरकार यांची संकलनात्मक पुस्तके मी पाहिली. असे आढळून आले की त्यांच्यासारखे दीर्घोद्योगी ग्रंथकार संकलनात अनेक जागीं चुका करून ठेवतात व त्या निस्तरणे हेही आपले काम आहेच ! अशी काही स्थले मी टीपांच्या रूपाने ग्रंथांत नमूद केलीं आहेत. माहितीच्या दृष्टीने पुस्तक निर्दोष व्हावे, म्हणून जरूर ती खबरदारी मी घेतली आहे. लेखक या नात्याने माझी जबाबदारी येथे संपते.

पण रायगडच्या परिसरांत हिंडून, दप्तरें पाहून त्यांतील अप्रसिद्ध माहिती आपण नकलून घ्यावी; पेशवेदप्तराच्या अथांग सागरात बुड्या मारून रायगड-विषयक माहितीची काही तेजस्वी मौक्तिके जमवून येथे ग्रथित करावीत व माहितीचे दृष्टीने पूर्वीच्या ग्रंथकारांच्या शक्य तर पुढे जावे, असा विचार माझ्या मनांत बळावला. म्हणून, रायगडच्या परिसरांतील जवळजवळ प्रत्येक गावीं जाऊन मी ऐतिहासिक साधनें शोधण्याचा क्रम काही काल आरंभिला. नातें येथे मला एक शकावलि मिळाली; तीत रायगडसंबंधीच्या काही नोंदी आढळल्या; त्यांचा मी येथे उपयोग केला आहे.

पोलादपूर येथे चित्रे आडनावाचे एक ऐतिहासिक घराणे नांदत आहे. हे घराणे प्रसिद्ध बाळाजी आवजी चिटणिसांच्या वंशाची एक शाखा होय. कै. रावजी गोविंद चित्रे यांजकडे बरेच मोठे दप्तर होते; ते सर्व मी पाहिले व त्यांतून बरेच कागद नकलले. त्यामुळे काफीखानासारख्या मराठ्यांच्या शत्रपक्षीय ग्रंथकाराच्या लेखनाला मराठी ऐतिहासिक साहित्याचा दुजोरा आणि पाठपुरावा मिळाला ही

महत्त्वाची गोष्ट झाली. इतिहासलेखनांत पुराव्यास फार महत्त्व असते व एक हकीकत दोन लेखकांनी वेगळया ठिकाणांवरून एकाच वेळी नोंदली, म्हणजे ती ऐतिहासिक सिद्ध गोष्ट मानण्यास हरकत उरत नाही. न्यायनिर्णयात परस्परसंबंध नसलेले दोन स्वतंत्र साक्षीदार एकादी गोष्ट घडल्याचे सांगू लागले म्हणजे त्या धटनेस पुरेसा पुरावा मिळाला, असे मानले जाते. शिवकालीन लाखो कागद नष्ट झाल्यामुळे प्रत्यक्ष पुरावा या दृष्टीने उपयोगी पडण्यासारखी साधने फारशी उरली नाहीत. या दप्तरातून रायगडच्या इतिहासाची अशी जी साधने उपलब्ध झाली, ती या पुस्तकात वापरली आहेत.

चित्रे-दप्तरामुळे रायगडचा अनेक वर्षांचा अज्ञात इतिहास प्रथमच उपलब्ध होत आहे, हे या दप्तराचे विशेष होय. इ. स. १६८९ ते १७०७ ही अठरा वर्षे रायगड प्रत्यक्ष बादशाही अंमलाखाली होता; पण तेथे काय घडत होते, याची आजवर आपणास कल्पना नव्हती. रियासतकारांनी तर, इ. स. १६८९त रायगड मोगलांनी घेतला, येथपर्यंतची हकीकत सांगितल्यावर इ. स. १७३३ पर्यंतच्या चव्वेचाळीस वर्षांच्या इतिहासाचा संक्षेप केला ! यात सरदेसाई यांस दूषण देण्याचा हेतु नाही, वस्तुस्थिति दाखविण्याचा आहे. सरदेसाई तरी उपलब्ध साधनांवरूनच आपल्या रियासती सजविणार व वाचकांपुढे ठेवणार होते. त्यांना जी माहिती उपलब्ध झाली नाही, पण मला झाली, ती एका स्वतंत्र प्रकरणांत, मी चित्रे-दप्तराच्या आधाराने दिली आहे.

इतिहासाच्या अपुऱ्या साधनांमुळे संकलनकाराला अनेक वर्षांच्या काल-खंडावरून उड्या टाकीत जावे लागते. इ. स. १७०८ ते १७३३ पर्यंतच्या पंचवीस वर्षांत रायगडच्या परिसरात कोणती परिस्थिति होती व स्वतंत्र राज्य पुन्हा निर्माण करणाऱ्या छत्रपति शाहूस आणि पहिल्या पेशव्यास रायगड सोडवून तेथे आपली सत्ता प्रस्थापित करण्याची शक्यता लवकर कां झाली नाही, या प्रश्नाची उकल आजवर इतिहासकार करू शकत नव्हते. चित्रे-दप्तरामुळे मला हे कोडे सहज सुटले. शिवछत्रपतींच्या वेळचे ' स्वराज्य ' बादशहाने शाहूच्या स्वाधीन केले होते; पण ते केवळ कागदावरचे दान होते. प्रत्यक्षात ते शाहूने व मराठे सरदारांनी आपल्या मनगटाच्या जोरावरच स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या हातून

हिसकावून घ्यावयाचे होते. रायगडच्या परिसरांत, अंजिऱ्याच्या शिद्दीच्या आसऱ्याने एक लहानसे दुसरे मुसलमानी राज्य कसे निर्माण झाले होते व ते मोडून काढण्याचे काम पहिल्या पेशव्यास कसे करावे लागले, याची हकीकत चित्रे-दप्तरात प्रथमच उपलब्ध झाली. तिचा रायगडच्या इतिहासाशी प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळे येथे दिली नाही; अन्यत्र प्रसिद्ध करीत आहे. पण चित्रे-दप्तरामुळे या पुस्तकात अधिक माहितीची, तपशिलाची व दुरुस्तीची भर पडत आहे.

पेशवेदप्तरांत काम करून मी रायगडच्या इतिहासाच्या उत्तरार्धाची बरीच हकीकत येथे संकलित केली आहे. इ. स. १७३४ ते १७७२ या कालात यशवंत महादेव आणि नंतर विठ्ठल यशवंत पोतनीस यांच्या ताब्यात रायगड होता. पेशव्यांस त्यांचेवर स्वारी करून तो जिंकून घ्यावा लागला. ही स्वारी थोरल्या माधवरावाने आरंभिली, पण ती नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दीत पूर्ण झाली. नारायणरावांवर प्रभु मंडळींचा सामाजिक कारणांनी रोष होता. त्यांच्या रोषाचे आणखी एक कारण या स्वारीमुळे आपणांस कळते. पोतनिसांचे घराणे प्रभुमंडळीत मान्यता पावलेले होते. त्यांच्यावर स्वारी करून त्यांची सत्ता मोडून काढणारा पेशवा त्यांस अधिक अप्रिय होणार हे निश्चितच होय. या स्वारीचे स्वतंत्र प्रकरण नवीन संशोधनाचे आधारे या पुस्तकात दिले आहे.

रायगडच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी पेशवे दप्तरांतील बरीच माहिती संशोधक श्री. शं. ना. जोशी यांनी श्री भारत इतिहास संशोधन मंडळाच्या एका पुस्तकांत [ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३ रा. भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ५४, इ. स. १९४१ ] प्रसिद्ध केली आहे. पण त्यांनी पाहिलेल्या रुमालांचे अनुक्रम दिले नसल्यामुळे मला जवळजवळ सर्व रुमाल पुन्हा पहावे लागले. या मजकुराच्या आधाराने सात प्रकरणे स्वतंत्रपणे लिहून या पुस्तकात समाविष्ट केली आहेत.

श्री भारत इतिहास संशोधक मंडळांत असलेल्या स. ग. जोशी व चंद्रचूड यांच्या दप्तरांतून थोडी माहिती उपलब्ध झाली, ती येथे घेतली आहे.

यावरून वाचकांच्या ध्यानी येईल की प्रस्तुत पुस्तकांतील सुमारे दहा प्रकरणांचा मजकूर हे स्वतंत्र संशोधन असून बाकीचे संकलन आहे. या संशोधन-संक-

लनाच्या योगाने रायगडसंबंधीच्या आपल्या पूर्वीच्या माहितीत भरीव भर टाकण्याचा कसोशीचा प्रयत्न मी केला आहे.

या पुस्तकांत काही जुने अपसमज दूर करण्याचा व काही ऐतिहासिक व्यक्तींवरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. इ. स. १६८९ मध्ये बादशाही सरदार झुलफिकारखान याने रायगडास वेढा घातला. त्याबाबत इतिहास-कारांच्या कथनाचे स्वरूप असे की वेढा आठ महिने चालला. मराठ्यांनी शर्थ केली; पण शेवटी रायगड सूर्याजी पिसाळाच्या फितुरीमुळे मोगलांच्या हाती गेला. इतिहासलेखकांचे या स्वरूपाचे लेखन अत्यंत भ्रामक असून त्यांतील ढळढळीत सत्य पुढे मांडण्याची नितांत आवश्यकता होती. माझे म्हणणे सूत्ररूपाने असे– ( १ ) आकड्यांनी आठ महिने मोजून दाखविता येतील; पण ज्याला पक्का वेढा म्हणावयाचे, तो फार थोडा काल होता. आरंभी तर तो इतका सैल होता की छत्रपति राजाराम, त्याची भार्या, खंडो बल्लाळ, रामचंद्रपंत अमात्य इत्यादि अनेक नामवंत माणसें ‘ वेढयातून ’ निसटून गेलीं ! त्यांतला एकही मोगलांच्या हाती लागला नाही. असला कसला वेढा हा ! हे झाले आरंभींच्या सुमारे दोन महि-न्यांच्या वेढ्याबद्दल ! रायगडच्या खोऱ्यांत श्रावण, भाद्रपद व अश्विन या महिन्यांत पाऊस इतका कोसळतो की ‘ पक्षांच्या पंखांवर शेवाळ उगवते ’ व वारा इतका सुटतो की त्यावेळी वेढा घालणाऱ्या सैनिकांना नुसते उभे राहणे देखील अशक्य ! मोगली सैन्याचा या महिन्यांतील वेढा नाममात्रच असणार. सारांश, वेढ्याच्या सांगितल्या जाणाऱ्या मुदतीला काही अर्थ नाही. एकदा रायगडचे नुसते दर्शन घेतल्यास असे ध्यानीं येईल की रायगडला वेढा घालणे प्राय: अशक्यच आहे. नाकेबंदी केव्हाही शक्य आहे. ( २ ) या काळात रायगडच्या परिसरात लढाई झाली असेल असे वाटत नाही; तसे भौतिक पुरावे नाहीत; मराठ्यांनी शर्थीची झुंज दिली असती, तर काही शेकडे मुसलमान सैनिक मरण पावते व त्यांचे एकादे स्मशान रायगडच्या परिसरांत निर्माण झाले असते. तसे एकही स्मशान रायगडच्या परिसरात नाही. मराठ्यांनी अशी स्मशाने नष्ट करून टाकली असे तर म्हणता यावयाचे नाही; तो मराठ्यांचा स्वभाव नव्हे. ( ३ ) सूर्याजी पिसाळाच्या रायगडबाबतच्या फितुरीचा हा गवगवा कालविपर्या

साचा प्रकार होय. सूर्याजी फितूर झाला ही गोष्ट खरी; पण तो इ. स. १७०४ मध्ये, १६८९ मध्ये नव्हे ! इ. स. १७०० मध्ये छत्रपति राजाराम सिंहगडावर मरण पावल्यावर मराठ्यांस छत्रपति नाही, अशी स्थिति प्राप्त झाली. तेव्हा, मराठ्यांचा पराभव करण्यास ही संधी योग्य समजून बादशहाने मराठ्यांचे किल्ले पुन्हा जिंकून घेण्याची मोहीम काढली. वाई प्रांतात वैराटगड, पांडवगड वगैरे चार किल्ले जिंकण्याचे काम बादशाही सरदार इस्माईल मका यास करावयाचे होते. इस्माईल मका यास या कामी सूर्याजीची खूप मदत झाली. मराठ्यांच्या दृष्टीने हीच त्याची फितुरी होय. सूर्याजीचा व रायगडचा काहीच संबंध नव्हता. सूर्याजी हा वाई प्रांतातील ओझर्डे येथील देशमुख होय. तो रायगडवर कशासाठी जाणार ? तो काही मराठा सरदार अगर किल्लेदार नव्हे. वेढ्याच्या दिवसात त्याचे अस्तित्व रायगडवर कसे असणार ? त्याला 'रायगडचा' फितुरी ठरविण्यास भक्कम, अस्सल, समकालीन आधार पुढे यावयास पाहिजेत. याबाबत आणखी एक गोष्ट ध्यानी घेतली पाहिजे. छत्रपति राजारामाची दासीपुत्री व सूर्याजी पिसाळाचा दासीपुत्र याचा विवाह होऊन सूर्याजी राजारामाचा व्याही झाला होता, ही गोष्ट इतिहासज्ञांस माहीत आहे. हा विवाह इ. स. १६८९ नंतर व १७०० च्या पूर्वी झाला आहे. दासीपुत्री अनौरस असल्यामुळे तिचा विवाह कोणाशीही झाला तरी चालेल, अशी समाजनीति इतिहासकालात नव्हती; उलट, 'समसमासंयोग' साधण्याचीच प्रवृत्ति असे. त्या कालात अशी संतती शिष्टसंमत होती. छत्रपति राजाराम सूर्याजीशी असे नाते जोडतो, याचाच स्पष्ट अर्थ असा की सूर्याजी इ. स. १७०० पर्यंत तरी फितूर नव्हता. फितुऱ्याच्या मुलास स्वातंत्र्याची किंमत जाणणारा राजाराम आपली मुलगी कदापि देता ना ! सारांश, सूर्याजी पिसाळ रायगडप्रकरणी निर्दोष आहे, असे स्पष्ट वाटते.

(४) इ. स. १८१८ मध्ये रायनाक इंग्रजास फितूर झाल्याने रायगड पडला, असे आजवर इतिहासकार सांगत आले आहेत. त्यामुळे रायनाकावर 'फितूर फितूर' म्हणून गहजब होतो; तो योग्य नव्हे. तसे म्हणण्यास स्पष्ट आधार नाही. या प्रकरणीं डॉक्टर आंबेडकरांच्या संग्रही काही कागद आहेत; ते मिळवण्याचा माझा प्रयत्न चालला असता डॉक्टरांचे निधन झाले व कागद मिळणे राहिले. पण कागदी पुराव्याइतकाच महत्त्वाचा दुसरा पुरावा असा की रायनाकाचे टाक

करून टिपणीस, कारखानीस इत्यादि रायगडशी संबद्ध असणाऱ्या प्रभु घराण्यांनी पूजेत ठेविले आहेत, याचा काय अर्थ करायाचा ? नातें येथे रायनाकाचे एक 'मंदिर' आहे. शेतीस प्रारंभ करण्यापूर्वी रायनाकापुढे काही बळी देण्याचा रिवाज आहे. रायगडचा रायनाईक व मंदिरातील रायनाईक एकच आहेत. ही देशद्रोह्याची पूजा मानणे सर्वथा चूक होईल, या प्रकरणी संशोधनाने सिद्ध होईपर्यंत रायनाकास देशद्रोही मानणे योग्य नव्हे, असे मत मी मांडले आहे. मनुष्य स्वार्थी आणि लोभी असतो, स्वहित साधण्यासाठी राष्ट्रहितावर तिलांजली देणारे लोक प्रत्येक देशात उत्पन्न झाले व प्रत्येक राष्ट्राने त्यांची खंत मानली आहे पण त्यांची अपक्ष भूमिकेवरून चौकशी करूनच त्यांना दोषी ठरविले पाहिजे. रायगडप्रकरणी सूर्याजी पिसाळ व रायनाक संशयातीत आहेत, निर्दोष आहेत, असे-माझे मत झाले आहे.

आणखी एक गोष्ट माझ्या ध्यानी आली. दुसऱ्या बाजीरावाच्या दीर्घ कारकीर्दीवर बरीच साधने उपलब्ध असली, तरी त्याने दिलेल्या अंतिम लढ्या-संबंधी अधिक संशोधन व्हावयास पाहिजे. रायगडच्या अखेरच्या युद्धाबद्दल मराठी साधने नाहीत; त्यामुळे मला इंग्रजी साधनांवरूनच ते प्रकरण लिहावे लागले. मराठेशाहीचा अंत कसा झाला, याचे दीर्घ संशोधन झाले पाहिजे. इंग्रजी साधने भरपूर असली, तरी तो पुरावा शत्रुपक्षाचा आहे हे ध्यानी असले पाहिजे. सत्याचे अधिष्ठान एकपक्षीय पुराव्याने सिद्ध होत नाही.

मराठीतून प्रसिद्ध झालेली इतिहासाची साधने अव्वल दर्जाची असल्यामुळे, महाराष्ट्राच्या इतिहासाच्या एकाद्या विषयावर लेखन करताना त्यांचा उपयोग करणे आवश्यक आहे. पण ही साधने वापरताना प्रत्येक पत्राची तारीख ठरवणे अगर पारखून घेणे जरूर झाले आहे. पूर्वी पत्रे लिहिताना पूर्ण काल देत नसत. बहुतेक सर्व चिटणिशी पत्रांतून 'आज छ २६ जाखर' किंवा 'आज मार्गशीर्ष शु॥ अष्टमी मंगलवारपावेतो' अशा स्वरूपाचा कालाचा अपुरा उल्लेख येतो. त्यामुळे पत्राचे वर्ष ठरविणे अवघड होऊन बसते; म्हणूनच, पत्रांचा अचूक कालनिर्णय करण्यात संशोधकाची कसोटी लागते. जसजसे संशोधन प्रगत होईल, तसतशा अनेक पत्रांच्या तारखा निश्चित होत जातील व मागील संशोधकांनी दिलेल्या चुकीच्या मिरया दुरुस्त होतील. मागील पिढीतल्या सर्व संशोधकांनी तशा चुका

करून ठेविल्या. त्यांच्या पश्चात् आम्ही पुढील पिढीतले संशोधक त्यांच्या मित्या दुरुस्त करीत आहोत व अजाणता नवीन चुकीच्या मित्या नवीन पत्रांस देत आहोत ! मितिशुद्धीबद्दलचा हा प्रकार असाच बराच काल अखंड चालणार आहे.

आतापर्यंत सुमारे पाऊण लाख ऐतिहासिक पत्रे मराटीतून प्रसिद्ध झाली आहेत; इंग्रजी, फारशी व इतर भाषांतून प्रसिद्ध झाली ती वेगळी ! या सर्व पत्रांचे आधारे मराठ्यांच्या इतिहासाची एक प्रदीर्घ शकावली तयार करण्याचे कार्य जर अनेक संशोधक एकत्र येऊन करतील, तर मितिशुद्धीबाबतचा गोंधळ बराच कमी होईल व संकलनकारास आपले ग्रंथलेखन बरेच सुलभतेने करता येईल. पण हे काम एवढे प्रचंड आहे की दहा संशोधक सतत दहा वर्षे एकत्र बसून हे काम करतील, तरच त्याचा अंत दिसेल. नानासाहेब पेशव्यापुरते हे काम श्री भारत इतिहास संशोधक मंडळाने जवळ जवळ पूर्ण करीत आणले आहे.

ही मितिशुद्धीची सूचना येथे मांडण्याचे कारण असे की इ. स. १७३३ मधील रायगड-मोहिमेच्या निमित्ताने मला, अनेक प्रसिद्ध झालेल्या पत्रांच्या मित्या दुरुस्त करून वापराव्या लागल्या आहेत; त्यांची संख्या ३०।४० भरेल. मितिशुद्धी-प्रमाणे, अन्य संशोधकांच्या मोडी वाचनातील काही चुका मी दुरुस्त करून घेतल्या आहेत.

हे पुस्तक तयार करण्याच्या कामीं मानधन व पुरस्कार देऊन उपकृत केल्याबद्दल मी श्री शिवाजी–रायगड–स्मारकमंडळाचा ऋणी आहे. पुस्तकाचा ‘ आपलें ’ म्हणून स्वीकार करून व माझा परामर्ष घेऊन प्रसिद्ध केल्याबद्दल मी महाराष्ट्रराज्य साहित्य व संस्कृति मंडळाचा अत्यंत ऋणी आहे. रायगडचे स्थान असे आहे की त्याचा अखिल महाराष्ट्रासच काय, भारतासही अभिमान वाटावा. ‘ श्रीशिवाजी रायगड स्मारक मंडळ ’ या नावांत ‘ रायगड ’ आहे; तेव्हा त्याबाबत आपले काही कर्तव्य आहे असे स्मारकमंडळास वाटले. या विषयावर संशोधन-पूर्वक लिहिलेले पुस्तक अप्रकाशित रहाणे अयोग्य आहे; ते आपण आपले म्हणून प्रकाशित केलेच पाहिजे, असे साहित्यसंस्कृति मंडळास म्हणजे पर्यायाने महाराष्ट्र सरकारला वाटले, हा सुयोग मला अभिमानास्पद वाटतो.

महाडचे तरुण चित्रकार, माझे मित्र श्री. वसंत विष्णू चांदे जी. डी. ए. यांनी घेतलेली छायाचित्रे पुस्तकात दिली आहेत. महाड आणि रायगड काही दूर नाहीत ! त्यांची चित्रे या पुस्तकांत येण्यात वैशिष्ट्य आहे असे मला वाटते. मी त्यांचा आभारी आहे.

पोलादपूरचे चित्रेदप्तर; नातें येथील देशमुखदप्तर, श्री भारत इतिहास संशोधक मंडळातील दप्तरे पहावयास दिल्याबद्दल मी त्या त्या दप्तरांशीं संबंधित असलेल्या व्यक्तींचा व चालकांचा फार आभारी आहे. पेशवेदप्तर पहावयास व त्यांतील मजकुराचा उपयोग करावयास परवानगी दिल्याबद्दल तत्संबंधी अधिकारी वर्गाचा मी ऋणी आहे.

गवर्मेंट सेंट्रल प्रेसचे व्यवस्थापक श्री. बापूराव नाईक यांनी मला बहु-मोल मदत दिली आहे. रायगडच्या चित्रांचे ब्लाकस् त्यांनी तत्परतेने व चांगल्या तऱ्हेने करून दिले; त्याचे मनःपूर्वक आभार मानतो. चित्रकार श्री. द. ग. गोडसे यांनी पुस्तकाची सजावट केली आहे; त्यामुळे पुस्तकास गोंडस-पणा आला. मी त्यांचा आभारी आहे.

प्राज्ञप्रेसचे व्यवस्थापक श्री. म. शं. साठे, श्री. दि. के. बेडेकर, महाड येथील श्री. सु. मे. बुटाला, श्री. सु. गो. टिपणीस इत्यादि अनेकांनी मला या पुस्तकाचे कामी जे साह्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आभारांची यादी वाढणे अप्रस्तुत होईल हे जाणून अनेकांचे आभार मी मनोमन मानतो.

पुणें ता. ५ मे १९६२ — शां. वि. आवळसकर


# रायगडची जीवनकथा



महादरवाजा



महाद्वार नगारखाना



बाजार पेठ


दारूगोळ्याचे कोठार






टकमक टोक

महाराजांच्या सिंहासनाची जागा





जगदीश्वराचे देऊळ


हिरकणी बुरुज







शिर्काइचे देऊळ

राणी महाल





महाराजांची समाधी





शिवाजी महाराजांची समाधी
(बाजूला राखण करीत असलेला महाराजांचा आवडता कुत्रा वाघ्या समाधी रुपात)



चित्त दरवाजा


गंगासागर







राजवाड्याचे मनोरे

अष्टप्रधानांचे वाडे




घोसाळगड
घोसाळें
मुरूड
कांसा
जंजिरा
राजापुरी
दांडा
तळगड
तळें
इंदापूर
रायगडच्या घेरा,
पायवाट
गाडीरस्ता


वारंगी
निजामपूर
वाडी
टकमक
मीर
महादरवाजा
तलाव
हिरकणी
खुबलढा बुरुज
पाचाडकडून



# १ रायगडचें दर्शन

रायगडचें इतिहासप्रसिद्ध स्थान माहीत नाही, असा मनुष्य महाराष्ट्रांत सापडावयाचा नाही. इंग्रज, पोर्तुगीझ, फ्रेंच या परकीयांस आणि भारतांतील सुशिक्षितांस रायगडच्या इतिहासाची कल्पना निश्चित आहे; कारण, तो रोमांचकारी व स्फुरण देणारा आहे. एका कालीं मुसलमानी सत्तांना रायगडचा विलक्षण दरारा वाटत होता आणि तेथे नांदू लागलेली स्वकीयांची निर्भय, दृढ सत्ता त्यांच्या डोळ्यांत कुसळासारखी सलत होती.

रायगडचें प्राचीन नाव रायरी असें होते व युरोपचे लोक त्यास 'पूर्वेकडील जिब्राल्टर' म्हणून संबोधीत. जिब्राल्टरचें ठाणें जितकें अभेद्य, दुर्गम, तितका रायगड अजिंक्य असें स्पष्ट मत इंग्रज ग्रंथकारांनी नमूद करून ठेविलें आहे. पाचशें वर्षांपूर्वी रायगडास जेव्हा गडाचें स्वरूप नव्हतें व जेव्हा 'तो नुसता एक डोंगर होता, तेव्हा त्यास तणस व रासिवटा अशीं दोन नांवें होती. त्याचा आकार, उंची व भोंवतालच्या दऱ्या या सर्वांचें स्वरूप ध्यानीं घेऊन त्यास नंदादीप असेंही एक नाव पडलें. अगदी आरंभीं तेथे घडशी कोळी रहात. आज आपण याच कोळी जमातीस डोंगरकोळी म्हणून संबोधितों. निजामशाहींत रायगडचा उपयोग कैदी ठेवण्यापुरताच होई व त्यावर पहारा ठेवण्यासाठी पहारेकरी तेवढे रहात. येथील 'घळकीच्या पहाऱ्या'चा उल्लेख जुन्या कागदपत्रांतून आढळतो.

रायरी हें नाव बदलून त्यास रायगड हें नाव शिवाजी महाराजांनी दिलें. हा नामकरणविधि केव्हा झाला असावा, हें आपणास शिवचरित्रप्रदीप पृ. ५० वरून स्पष्ट कळतें. " गडाची नावे ठेविले " अशी नोंद तेथे आढळते. या नोंदीचें वाचन आमचे मतें 'गडासी नाव ठेविले' असें पाहिजे. रियासतकारांनी या नोंदीच्या आधारें केवढें काव्यमय भाष्य केलें आहे! ते म्हणतात, " शिवाजीने पुष्कळशा किल्ल्यांचीं जुनीं नावें बदलून संस्कृत वळणावर नवीन सुंदर नावें ठेवलीं. रायरी घेतल्यावर शके १५७८ भाद्र० वा॥ ११ रोजीं [ इ. स. १६५६ सप्टें. ४ ] गडांचीं नावें ठेविलीं असा उल्लेख शकावलींत आहे. " यावर आमचें म्हणणें एवढेंच की शिवाजीने गडांस नवीं, सुंदर नावें दिल्याचा प्रकार खरा असला, तरी तो नंतरचा आहे. इ. स. १६५६ सप्टें. ४ नंतर जिंकलेल्या व बांधलेल्या किल्ल्यांस शिवाजीने अगोदरच नवीं नावें दिलीं, असें मानणें योग्य होणार नाही. असो. झुल्फिकार खानाने इ. स. १६८९ त रायगड जिंकल्यानंतर औरंगजेबाने त्यास इस्लामगड असें नवें नाव दिलें व तें कागदोंपत्रीं अनेक वर्षे रूढ राहिलें.[१]

प्रथमदर्शनीं रायगड अगदी बाजूस असल्यासारखें वाटतें. पण रायगडपासून मुंबई, पुणें व सातारा हीं शहरें सारख्याच अंतरांवर आहेत. महाडच्या त्यावेळच्या बंदरापासून रायगड केवळ सोळा मैलांवर आहे. अरबी समुद्रापासून रायगड फक्त अठेचाळीस मैलांवर, सह्याद्रींतील किल्ल्यांच्या रांगांतील एक दुवा आहे. रायगडची भूमि शिवराज्याभिषेकापर्यंत तरी रक्तलांछित नव्हती. सिंहगड, पुरंदर, लोहगड, प्रतापगड, राजगड इत्यादि शिवकालीन किल्ल्यांबद्दल तसें म्हणता येणार नाही. मानवी रक्त सांडलेल्या भूमीवर आपल्या राज्याभिषेकाचा समारंभ न झाला तर बरा, असें शिवाजीस वाटत असावें. शिवाय, रायगडच्या नैसर्गिक रचनेमुळे त्याचें वैशिष्ट्य ध्यानीं येतें. यासाठीच शिवाजीने तो राजधानीसाठीं पसंत केला असावा. मोंगलांच्या हल्ल्यापासून आपला बचाव व्हावा, यासाठीच पुणें सोडून पश्चिम डोंगरांत रायगड राजधानी केली असावी.[२] सुरतेचा जुना रस्ता रायगड जवळूनच जात असून खुष्कीने रायगड ते सुरत हें अंतर १०।१२ मजलांचें होतें. तेथून शिवाजीची पहिली राजधानी राजगड केवळ ४।५ मुक्कामांवर आहे.[३]

केळदिनृपविजयम् या ऐतिहासिक कानडी काव्यांत रायगडचें वर्णन करतांना, 'भूतलांत आश्चर्यकारक म्हणून गणला जाणारा रायरी' असें वर्णन कवीने केलें

१. शिचसाखं १० ले. ३८; शिचप्र पृ. ५०; शशि पृ. २३७.

२. BBD. पृ. ४१३–४१५.

३. शिचवृसं. खं. ३ रा. फार्शी विभाग पृ. ८५, ८६.

आहे.[१] तेथे लिहिलें आहे की रायगड १८ अक्षांश, कला १३ व ७३ रेखांश, कला ३० वर आहे. पण कुलाबा गॅझेटियरकार लिहितात की, रायगड उत्तर अक्षांश १८°–१४′ आणि पूर्व रेखांश ७३°-२०′ वर असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची २८५१ फूट आहे. तो किल्ले महरुसा ऊर्फ जंजिरापासून पूर्वेस चाळीस मैलांवर आहे. तुटलेल्या कड्यांमुळे सह्याद्रीच्या रांगांपासून तो अलग झाला असून भोवतीं सुमारें एक मैल रुंदीची दरी निर्माण झाली आहे. या दरींतून काळ व गांधारी या दोन नद्या पर्जन्यकालांत पावसाचें गदळ पाणी महाडजवळ खाडींत आणून मारल्या ओतीत असतात. सह्याद्रीच्या रांगांनीं, जवळ जवळ सर्व बाजूंनीं वेढल्यामुळे आणि झाकल्यामुळे रायगड ठळकपणे आढळांत येत नाही. रायगडपासून पश्चिमेस १६ मैलांवर माणगाव हें तालुक्याचें ठिकाण आहे; तेथून रायगडवरचीं टकमक टोक व हिरकणी बुरुज हीं ठिकाणें दिसतात व ओळखता येतात. तेथून रायगडचा आकार घोड्याच्या नालाप्रमाणे वाटतो. दक्षिणेकडून नजर टाकल्यास कालकाईचा व गुइरीचा डोंगर रायगडच्या अगदी सन्निध असल्यासारखे भासतात; त्यामुळें रायगडचें स्पष्ट दर्शन त्या बाजूने होत नाही. कालकाईच्या डोंगरावरूनच, इ. स. १८१८ मध्ये तोफा डागून रायगड इंग्रजांनीं जेर केला. महाबळेश्वरावरून रायगडचें दर्शन होणें दुर्घट आहे; कारण, तेथून रायगडच्या आसमंतांतील सह्याद्रीचा बराच भाग इतका ठळकपणे नजरेसमोर येतो, कीं त्यांतून नेमका रायगड तेवढा ओळखणे जाणत्या माणसासही मुष्किलीचें होतें. डग्लसने बुक ऑफ बॉम्बे मध्ये म्हटलें आहे की रायगडचें अचूक आणि स्पष्ट दर्शन तोरणा किल्ल्यावरून होतें, कारण तोरणा रायगडच्या पूर्वेस वीस मैलांवर असून हजार फुटांनीं जास्त उंच असल्यामुळे हें दर्शन सहजसुलभ होतें. रायगडपासून केवळ दोनच मैलांवर असलेल्या, सह्याद्रीच्या पश्चिम रांगेतील लिंगाण्याच्या शिखरावरून रायगड चांगला दृष्टिक्षेपांत येतो. तोरण्यावरून रायगडचे उध्वस्त अवशेष दिसत नाहीत; पण लिंगाण्यावरून तेही आढळांत येतात. तेथून अगदी समोर पूर्वेस, रायगडचें भवानी टोक दिसतें व रायगडचा वायव्येकडील टकमक टोकाचा तुटलेला कडा दिसतो. या टोकावरून गुन्हेगारांचा कडेलोट होई.

येथेच लिंगाणा किल्ल्याचा परिचय करून देणे योग्य होईल. लिंगाच्या आकारचा हा किल्ला महाडपासून ईशान्येस सोळा मैलांवर असून सह्याद्रीच्या मुख्य रांगेत तोरणा व रायगड यांचे दरम्यान आहे. लिंगाण्याचा खडक समुद्रसपाटीपासून २९६९ फूट उंच असून त्याची चढण चार मैल लांबीची आहे. या चढणींतील अर्धे

---

१. शिचवृ सं. खं. १ पृ. ६०.

अंतर चढावयास बरेंच सोपें असून वरचा अर्धा मार्ग एकदम उंच, अवघड झाला आहे. पूर्वी या चढावांत पायऱ्या होत्या; पण त्या आता नष्ट झाल्या आहेत. लिंगाण्याचा लिंगाकृति भाग पठाराच्या भागापासून म्हणजे माचीपासून वर आहे. त्याला तट व बुरूज होते व या तटबंदीचें आंतील क्षेत्रफळ अवघें २५०० चौरस फूट होतें. आता तटबंदी व इमारती नष्ट झाल्या असून काही हौद व धान्याच्या कोठारांच्या खुणा तेवढ्या शिल्लक आहेत [कुर्ग पृ. ३४३]. मोऱ्यांचा पराभव केल्यावर शिवाजीने रायगडजवळ हा किल्ला बांधला [९१ कलमी बखर कलम ३० सानेप्रत पृ. ६१]. त्याचा उपयोग केवळ कैदी ठेवण्यासाठीं करीत. खडकांत असलेल्या अंधारी खोल्यांतून हे कैदी ठेवीत. या खोल्यांपैकी एक खोली पन्नास कैदी राहू शकतील एवढी मोठी आहे. इ. स. १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरने हा किल्ला मराठ्यांकडून घेतला [कुर्ग पृ. ३४३].

कुलाबा जिल्ह्यांत रहाणारांना रायगडावर जावयाचें असल्यास अनेक मार्गांनीं जाता येईल. (१) निजामपूरपासून रायगड १६ मैलांवर असून वायव्य दिशेने डोंगरांतून गेलेल्या पायवाटेने, नागमोडी वळणें घेत, डोंगर चढत–उतरत, रम्य वनश्रीचें सौंदर्य हृदयांत आणि नेत्रांत साठवीत जाता येईल. पण हा प्रवास पायीं करावा लागेल. (२) माणगावपासून हा प्रवास डोंगरांतील पायवाटेने करता येईल; पण त्यांत प्रेक्षणीय निसर्गस्थलें थोडीं आहेत. (३) रायगडाच्या पूर्वेस केवळ सोळा मैलांवर बिरवाडी हें शिवपूर्वकालीन गाव असून तेथून ईशान्य दिशेने रायगडावर जाता येतें. बिरवाडीपासून बारा मैलपर्यंत बैलगाडीने, अगर जपून गेल्यास मोटारने जाता येतें. हा रस्ता काळनदीच्या तीरालगत्याने गेला असून नदी दोन ठिकाणीं ओलांडावी लागते. छत्री निजामपूरपर्यंत वाहनाने जाता येतें व पुढील चार मैलांचा प्रवास पायीं करावा लागतो. या मार्गाने जात असता, डावीकडे गुइरीचा डोंगर व त्याचेंच जवळ असलेल्या रायगडाचें आपणांस दर्शन घडत असतें. वाटेंत वाळणकुंड नावाचा काळनदींतील एक डोह लागतो. डोहाची लांबी सुमारें तीनशे फूट असून रुंदी अवघी तीस फूट आहे. डोहांत वर्षभर मासे विहरत असतात व कुंड पवित्र स्थान मानलेलें असल्यामुळे त्यास कोणी उपद्रव देत नाही. छत्रनिजामपूरपासून वाडी किंवा रायगडवाडी हें ठिकाण दीड मैल अंतरावर आहे. तेथून रायगडाची चढण सुरू होते. येथेच, ९ मे १८१८ या दिवशीं घडून आलेल्या शरणागतीच्या तहाने रायगड इंग्रजांच्या ताब्यांत गेला. रायगडाचे अठरा कारखाने वाडी येथेच असून मराठेशाहींत या गावास फार महत्त्व होतें. मराठ्यांच्या स्वातंत्र्यकालांत हा मार्ग विशेष रहदारीचा होता. (४) ज्याला रायगडची नीटशी माहिती

नाही, अशा प्रवाशाने महाड येथून मोटारने जाणें सोयींचें आहे. महाड ते रायगड हें अंतर १४ मैलांचें असून गांधारी नदीच्या काठाने कोंझरपर्यंत जाता येतें; तेथून पायीं प्रवासास सुरवात होते. एक अवघड टप्पा ओलांडून पाचाड येथे पोहोचल्यावर, रायगडच्या प्रत्यक्ष चढावास प्रारंभ होतो. पाचाडपर्यंत बैलगाडीही जाऊ शकते.

वाडी आणि पाचाड हीं रायगडच्या परिसरांत असलेलीं ठिकाणें रायगडच्या अगदी पायथ्याशीं असून त्यांमधील अंतर फक्त दीड मैलाचें आहे. दोहोंचे दरम्यान डोंगराची निरुंद दरड आहे. कोंझरहून पाचाडास जाऊ लागलें म्हणजे सावंताची चौकी म्हणून पाचाडचें एक चौकीचें ठिकाण लागतें; त्याचें फक्त जोतें तेवढें शिल्लक आहे. जोत्याची लांबी रुंदी २०×१५ फूट आहे. रायगडच्या डोंगराच्या कडसरीसच पाचाड गाव वसला आहे [राकिव पृ. ३२]. पाचाड येथे पूर्वी रायगडची पेठ असून गडास लागणाऱ्या वस्तू येथील दुकानदार पुरवीत. पूर्वी पाचाड येथे दहा हजार घोडेस्वारांची शिबंदी असे [ BBD पृ. ४०३]. येथे शिवाजीने आपल्या मातुश्री जिजाबाई यांच्याकरिता एक वाडा बांधला होता. वाड्याचें जोतें २००×४० फूट लांबी रुंदीचें आहे. त्या वाड्यासच कोट म्हणत. आंत हत्ती, घोडे बांधण्याच्या जागांचीं जोतीं आहेत. तटाची भिंत ६ फूट जाड असून उंची ८ ते १२ फूट आहे [ राकिव पृ. ३२ ]. वाड्याचें जोतें व तटबंदी आजही दृष्टीस पडते. चिरेबंद पायऱ्या असलेली एक विहीर आंत आहे. इ. स. १७७३ मध्ये नारायणराव पेशव्याने रायगड आपल्या ताब्यांत घेतला, त्यावेळीं आप्पाजी हरि या पेशव्यांच्या सरदाराने कोट हस्तगत केला व मोडला [शिचसा खं १० ले. ३८]. जिजाबाईचें देहावसान याच वाड्यांत झालें व पाचाड येथेच तिचें स्मारक उभारलेलें आहे. सध्या रायगडावर जाण्याची मुख्य वाट पाचाड येथूनच आहे. किल्ल्याकडे जाताना शिद्दीच्या कारकीर्दीतील चौक्यांचीं दोन जोतीं लागतात.

रायगडावर चढून जाण्याचा मार्ग गेल्या तीस वर्षांत काहीसा बदलला आहे. वाडी ते रायगड हें अंतर चार मैलांचें असून तेथून रायगडची उंची २२५० फूट आहे. वाडी समुद्रसपाटीपासून ६०० फूट उंचावर आहे. रायगडावर जाण्याची पूर्वीची वाट पाचाडकडून नसून वाडीकडून होती. म्हणजे, पाचाडच्या मनुष्याला खूबलढा बुरूजाजवळची दरड ओलांडून, वाडी गाव डाव्या हातास टाकून रायगडच्या वाटेस मिळावें लागे. वाडीकडून रायगडच्या चढास जेथे प्रारंभ होतो, तेथे रस्ता निरुंद असून बराच अडचणीचा असल्याने पायीं जावें लागतें. वाडीपासून पाव मैल अंतर चढून आल्यावर रायगडच्या चढास प्रारंभ होतो. या चढांत, आरंभींच, जो झाडीचा भाग लागतो, तेथे पूर्वी शिवछत्रपतींचा बाग होता. या

रस्त्यालगत वाडी येथील घरांचीं काही जोतीं अद्याप दृष्टीस पडतात. झुडुपें वाढल्यामुळे आंत दडलेलीं व भंगलेलीं हीं जोतीं, गडास पुरविल्या जाणाऱ्या धान्याचीं कोठारें होत. इ. स. १८८३ पर्यंत ह्या जोत्यांवरील पडकीं भिंताडें उभीं होतीं आणि कोठारांच्या सभोवार चार फूट उंचीची भिंत होती.

वाडीकडील या मार्गानें गड चढू लागलें, म्हणजे उजव्या बाजूस वायव्य कोपऱ्यांत एका बुरुजाचें ठिकाण दिसतें; तोच प्रसिद्ध खूबलढा बुरूज होय. सध्याचा पाचाडचा मार्ग या बुरुजापाशीं येऊन पोहोचतो व आपण पायऱ्या चढून बुरुजावर जातो. बुरुजाशेजारीं पूर्वी एक दरवाजा असे; त्यास चित् दरवाजा म्हणत. हा दरवाजा कोसळला असून बुरूज मात्र अस्तित्वांत आहे. त्याची उंची २७ फूट व घेर ५० फूट आहे [ राकित्र पृष्ठ ३२,३३ ]. खुद्द रायगडपासून हा बुरूज काहीसा विलग झाल्यासारखा दिसतो. हा तुटकपणा डोंगराच्या निरुंद दरडीमुळे आणि वाळसुरें गांवाकडील एका खिंडीमुळे आला आहे. ही खिंड व खूबलढा बुरूज यांचे दरम्यान असलेला मार्ग एखाद्या भिंताडावरील वाटेसारखा निरुंद आहे. खूबलढा बुरुजापासून ' नाना दरवाजा ' सुमारे तीन फर्लांग अंतरावर आहे. हा मार्ग एका निरुंद दरडीवरूनच आहे.

रायगडवाडी येथील, वर निर्दिष्ट केलेल्या धान्याच्या कोठारांपासून ' नाना दरवाजा ' सुमारें एक मैल अंतरावर आहे. या एक मैलांत एकूण चढ ६०० फुटांचा असून नाना दरवाजापाशी रायगडची उंची १२०० फूट भरते. स्थानिक लोकांची समजूत अशी आहे की ' नाना दरवाजा ' या शब्दांचा संबंध नाना फडणिसांशी असून इ. स. १७९६ मध्ये नानांनीं रायगडची डागडुजी, दुरुस्ती केली, तेव्हापासून हें नाव प्रचलित झालें असावें; पण हा गैरसमजुतीचा प्रकार होय. इ. स. १६७४ च्या मे मध्ये शिवराज्याभिषेकाच्या निमित्ताने मुंबईकर इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झेंडन रायगडावर याच वाटेने आला होता. त्याने आपल्या रोजनिशींत रायगडच्या दोन दरवाजांचा उल्लेख केला असून, या दरवाजास त्यावेळीं लहान दरवाजा म्हणत, असे त्याने सूचित केलें आहे. भाषा बदलते व शब्दांचीं स्वरूपें बदलतात; त्यास अनुसरून लहाना, नान्हा, नाना अशा क्रमाने या दरवाजाचें नाव बदलत गेलें असें मानणे उचित होईल. किल्ल्याच्या मुख्य दरवाजास महादरवाजा असें नाव दिल्यावर दुसऱ्यास लहाना दरवाजा हेंच नाव ओघाने प्राप्त व्हावयाचें ! दिलें हें विवेचन गॅझेटियरकारांचें आहे. पेशवे दप्तरांतील अप्रसिद्ध कागदांतून या दरवाजाचा उल्लेख नाणें दरवाजा असा आहे; तेव्हा हें विवेचन बरोबर नाही, हें उघडच आहे.

नाणें दरवाजास दोन कमानी आहेत. कमानींतील अंतर दहा फूट असून कमानींची उंची अनुक्रमे बारा व चौदा फूट आहे. या दोन कमानींच्या दरम्यान सतरा पायऱ्या आहेत. दरवाजाच्या दर्शनी भागीं एक बुरूज लागतो; त्याची उंची वीस फूट आहे. दरवाजाच्या आतील बाजूस, खडकांत, पहारेकऱ्यांसाठी दोन लहान खोल्या तयार केलेल्या आहेत. दरवाजास आडसर घालण्यासाठी खोबणी आहेत; पण इ. स. १८८३ पासून दरवाजे नष्ट झाले आहेत. नाणें दरवाजापासून महादरवाजा आणखी एक हजार फूट उंचावर आहे. महादरवाजाची उंची समुद्रसपाटीपासून २२०० फूट आहे.

दरवाज्यांतून आत शिरल्यावर, कुठें पूर्वेकडे तर कुठें पश्चिमेकडे नागमोडी वळणें घेत असलेल्या रस्त्यानें पाऊण मैल सपाटी तुडवावी लागते. या मोकळ्या जागेंत, टोकाशीं, दोन पडक्या इमारती आहेत. त्यांपैकी एक जागा पहारेकऱ्याची खोली असून दुसरी धान्याचें कोठार आहे. या खोल्यांची लांबीरुंदी अनुक्रमे ३९×२५॥ व ७५×२० फूट आहे. या इमारतींपासून थोड्या अंतरावर नाणें दरवाजाचे वर ३०० फुटांवर तोफेचा एक मोर्चा आहे. लेफ्टनंट रेमन् यानें इ. स. १८१८ मध्यें ज्याचा मस्जिद मोर्चा म्हणून उल्लेख केलेला आहे तोच हा असावा. शिवाजीनें रायगडावर मुसलमानांसाठी एक मशीद बांधविली होती [ NHM I Pages 264-265 ] ती येथे असावी. येथें मदनशहा नावाच्या एका साधूची कबर आहे. जवळच सुमारें चारशें यार्डांवर सपाट जागीं, खडकांत खोदलेल्या तीन गुहा असून त्या धान्य साठविण्यास वापरीत असत. त्यांची लांबीरुंदी अनुक्रमे २०×८; १८×८ व ३३×८ फूट असून तिसऱ्या गुहेस दोन दगडी, चौकोनी खांब आहेत. या खोल्यांची उंची आठ ते दहा फूट आहे. येथे रस्ता एकदम उजवीकडे वळतो व एक मोठी चढण लागते. येथून मोठा दरवाजा अर्ध्या-मैलावर असून एकूण चढ तीनशें फुटांचा आहे. प्रत्यक्ष मोठ्या दरवाजाशी पोहोचताना एकदम चढ लागतो. दरवाजाशीं पोहोचावयास बत्तीस पायऱ्या चढाव्या लागतात. हा अर्ध्या मैलाचा रस्ता प्रवाशास तापदायक होतो; कारण, एकतर, चढ एकदम लागतो आणि दुसरें, यांतील बऱ्याच पायऱ्या खडकांत, साधलें तशा खोदलेल्या असल्यानें त्या कमी अधिक उंचीच्या आहेत. महादरवाजांत शिरण्यापूर्वी किंचित् उजवीकडे वळावें लागतें.

महादरवाजाला दोन भव्य बुरूज असून एक ७५ फूट व दुसरा ६५ फूट उंच आहे. त्यांमध्ये असलेला दरवाजा वायव्य दिशेस आहे. दोन बुरुजांतील अंतर ८॥ ते १६॥ फूट भरतें, महादरवाजापासून हिरकणी टोक ४०० फूट उंचीवर राहतें

व किल्ल्याचा अत्युच्च भाग ६०० फूट उंचीचा उरतो. महाद्वाराच्या डाव्या उजव्या बाजूस, किंबहुना सबंध वायव्येस रायगडास भक्कम तटबंदी आहे. गडास सर्व बाजूंनी तटबंदी नाही. अन्यत्र, वर चढून जाण्यासारख्या जागीं मात्र तटबंदी असून, आंत बालेकिल्ल्यास सर्व बाजूंनी तटाची भक्कम भिंत आहे. एकूण, गडाची तटबंदी तुटक आहे.

महादरवाजाच्या आंत प्रवेश केल्यावर, खडकांत खोदलेली पहारेकऱ्याची जागा प्रथम दृष्टोत्पत्तीस येते उजव्या बाजूस संरक्षकांच्या रहाण्याच्या खोल्या आहेत.

किल्ल्यांत जाण्याचा हा एकच मार्ग आहे व प्रत्येकास या महाद्वारांतूनच आंत जावें लागतें. दक्षिणेस आणखी एक दरवाजा आहे; त्यास चोर-दरवाजा असें म्हणतात. अकस्मात् एकादा वहिमी आल्यास, त्याला गाठण्यासाठी या दरवाजाचा उपयोग केला जात असावा. चोर-दरवाजाशीं जाण्यास वाट नाही. महादरवाजाने आंत गेल्यावर टकमक टोक व हिरकणी बुरुज थोडी उंचावर बाजूस असलेलीं दिसू लागतात; बालेकिल्लाही दिसू लागतो.

महादरवाजापासून पाऊण मैलाच्या वाटचालीनंतर आपण रायगडच्या अत्युच्च भागीं येऊन पोहोचतों. आरंभीं, प्रसिद्ध मदारशहाची कबर लागते. तिचेच शेजारीं एक लोखंडी मलखांब दिसतो. "रायगड किल्ल्याचें वर्णन" या पुस्तकांत या कबरी-बद्दल संशय प्रकट केला आहे. हा मुसलमानी दर्गा कोणी नवीन स्थापिलेला आहे, असें लेखक म्हणतो [पृ. ३७]. पण हा संशय उपलब्ध साधनांवरून चुकीचा वाटतो. शिवाजीच्या शय्यागारावरील सेवक फरास मदारशहा, ज्याने आग्र्यास शिवाजीचे प्राण वाचविले त्याचा हा दर्गा होय [ शशि पृ. २२३ ].

रायगडची अवघड चढण येथे संपते व चढून तर आलो, असा समाधानाचा सुस्कारा, प्रवासी येथे टाकतो. शिवाजीने रायगड बांधला, तेव्हा त्याने वर जाण्यास पायऱ्या बांधल्या. हें काम पुरें करण्यास त्यास अनेक वर्षे लागलीं. काही ठिकाणीं खडकांस सुरुंग लावून, खडक फोडून त्यांत पायऱ्या खोदल्या होत्या. उंट, हत्ती, घोडे यांना रायगडवर चढविण्यांत आलें होते. सर्वांत वरच्या पायऱ्या अजून शाबूत आहेत; पण बाकीच्या, दोनशें वर्षांत नैसर्गिक घडामोडींनीं आणि कर्नल प्रॉथरच्या दारुगोळयाने नष्ट झाल्या [ BBD. पृ. ४०४ ते ४०६ ]. आतां आवश्यक जागीं नव्याने पायऱ्या बसविल्या आहेत.

मदारशहाच्या कबरेजवळ, खडकांत खोदलेलें अंडाकृति तळें लागतें. तें १२०×७५ फुटांचें असून त्याचा तळ सर्वत्र सारखा नाही. यासच हत्ती तलाव असें म्हणतात. तेथन सुमारें १०० यार्ड अंतरावर गंगासागर तलाव असून तो

१२० X १०० यार्ड आकाराचा आहे. पूर्व आणि पश्चिम बाजूंस खडक खोदून आणि पूर्व व दक्षिण बाजूंस बांधकाम करून गंगासागर तलाव बनविला आहे. त्याचें पाणी चांगलें असून शिवकालांत शिबंदीसाठी तेंच वापरण्यांत येई. शिवाजी व राजकुटुंबांतील मंडळींसाठी बालेकिल्ल्यांत पाण्याची व्यवस्था स्वतंत्र होती.

गंगासागराच्या दक्षिणेस दोन उंच मनोरे असून त्यांचा वरचा भाग ढासळ-ल्यामुळे ते आता भग्नावस्थेंत आहेत. पूर्वी ते पांच मजली होते असें म्हणतात. त्यांच्या बांधकामांत नक्षीकाम केलेलें आढळतें. त्यांचा पाया द्वादश कोनी असून प्रत्येक बाजूस खिडक्या ठेवलेल्या आहेत. हें सर्वच बांधकाम, विशेषतः खिडक्यांची रचना मुसलमानी शिल्पशास्त्रास धरून आहे. या मनोऱ्यांत चवदा फूट व्यासाच्या खोल्या असून त्यांना घुमटाकृति छत आहे.

मनोऱ्यांच्या पश्चिमेस, भिंत असलेल्या भागांतून एकतीस पायऱ्या बांधलेल्या आहेत. या पायऱ्या चढून गेल्यावर बालेकिल्ल्याचा पालखी दरवाजा लागतो. हा दरवाजा दहा फूट उंचीचा आहे.

बालेकिल्ल्याची पूर्वपश्चिम लांबी ३०० यार्ड असून दक्षिणोत्तर रुंदी १५० यार्ड आहे. पालखी दरवाजांतून आंत गेल्यावर तटबंदीच्या पश्चिम बाजूने जाऊ लागल्यास, १५० यार्डांच्या अंतरांत दोन्ही बाजूंस, कोसळून पडलेल्या इमारतींचे अवशेष आहेत. उजव्या बाजूस सात वाड्यांचे अवशेष लागतात; त्यांस शिवाजीच्या राण्यांचे महाल म्हणतात. या वाड्यांच्या समोरच संरक्षकांच्या खोल्यांची रांग होती.

बालेकिल्ल्याच्या दक्षिणेकडील तटबंदींत एक दार होतें. त्यांतून संध्याकाळच्या वेळीं राणिवशांतील स्त्रिया सहल करण्यास बाहेर पडत.

पालखी दरवाजांतून आंत शिरल्यावर डाव्या बाजूस सिंहासनाकडे जाण्याचा एक मार्ग आहे; पण त्यास स्वतंत्र दरवाजा नाही किंवा नव्हताही. या वाटेने राजकीय कचेऱ्यांकडे जात असत. पूर्वेकडील तटबंदींत तीस फूट रुंदीची एक जागा आहे; तींत पूर्वी एक दरवाजा असावा. तटबंदीच्या या भिंती अजून उभ्या असून त्यांचे दरम्यान १२०X५० फुटांची मोकळी जागा आहे.

बालेकिल्ल्यांत मध्यभागीं, गंगासागराच्या पूर्वेस सिंहासनाची जागा आहे. सिंहासनाभोंवतीं बांधीव चौथरा आहे. तो सुस्थितींत असून, मराठे मंडळी तेथे पादत्राणें बाजूस ठेऊन जातात. महार मंडळी त्या चौथऱ्यावर चढत नाहीत. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंच्या इमारतींत पेशवेकालांत धान्य सांठवीत. कचेरीच्या टोकांच्या दोन खोल्या जामदारखान्याच्या जागा होत. या खोल्यांची रुंदी पंधरा फूट आहे. सिंहासनासमोर पांच फूट रुंदीचा एक मोकळा मार्ग ठेविलेला असे.

सिंहासनासमोर, अगर बालेकिल्ल्याच्या पूर्वेकडील तटांत बारा कमानदार खिडक्या आहेत; त्यांचें मोजमाप ३॥×१॥ फूट आहे. सिंहासनासमोरच्या मोकळ्या जागेंत शिवकालांत कारंजें फवारत असे; त्याचे अवशेष अजून शिल्लक आहेत. या कारंज्याशेजारी नगारखाना आणि बालेकिल्ल्याचें मुख्य प्रवेशद्वार आहे.

नगारखान्याच्या आंतील बाजूस, दक्षिणेकडे, पूर्वी जेथे दरवाजा होता, त्याच्या डावीकडे रंगमहालाची इमारत होती असें म्हणतात.

सिंहासनाचे उत्तरेस, रंगमहालाच्या समोर जे भग्न अवशेष आहेत, तेथे शिवाजी महाराजांचा वाडा होता असे म्हणतात. बालेकिल्ल्यांतल्या उरलेल्या सगळ्या अवशेषात्मक इमारती म्हणजे गडावरील कचेऱ्या होत.

पूर्वेकडील तटबंदींत मुख्यप्रवेशद्वाराचे वरच्या बाजूस, सिंहासनाचे अगदी समोर नगारखाना आहे. प्रवेशद्वार बत्तीस फूट उंच व आठ फूट रुंद आहे. नगारखान्याच्या कमानीची उंची जमिनीपासून साठ फट असून बाजू बारा फूट जाड आहेत. मधून जाणाऱ्या रस्त्याची रुंदी चोवीस फूट आहे. समोरच असलेल्या दरबारच्या जागेची लांबी १५० फूट व रुंदी ७० फूट आहे. ही जागा सदैव मोकळी असे. या मोकळ्या जागेंत एक विहीर होती व ती दगडमातीने बुजविली आहे [BBD. पृ. 410]. एकोणतीस पायऱ्यांच्या दगडी जिन्याने नगारखान्यांत जाता येतें. नगारखान्याची एकुण उंची पन्नास फूट असून रुंदी तीस फूट आहे. नगारखाना म्हणजे एक बंदिस्त जागा आणखी दहा पायऱ्या चढून गेल्यावर आपण किल्ल्यावर जास्तीत जास्त उंचीवर जातो. येथून दिसणारें आसमंत नेहमींच भव्य असतें.

किल्ल्यावरील मनोऱ्यांचें व नगारखान्याचें शिल्प सारासीन पद्धतीचें असल्यामुळे, मि. केनेडी यांस वाटतें कीं त्या इमारती शिवपूर्वकालीन असाव्यात. किंवा हेंही शक्य आहे की शिवाजीनेच त्या इमारती मुसलमान शिल्पकाराकडून घडविल्या असाव्यात. डग्लसने आपल्या बुक ऑफ बाँबे मध्ये हाच अभिप्राय व्यक्त केला आहे. तो म्हणतो की रायगडवरील, मुख्यतः नगारखान्याचें शिल्प कायरो अगर दमास्कस येथील शिल्पाचें स्मरण करून देतें [पृ. ४०९].

नगारखान्याच्या पूर्वेस थोड्या अंतरावर एक कोरडा तलाव आहे; त्याचें नाव कुशावर्त. येथून जवळच श्रीगोंदे टोक आहे. कुशावर्त व श्रीगोंदे टोक यांच्या दरम्यानच्या जागेंत शिवाजी महाराजांच्या प्रधानांचे वाडे होते. शिवोत्तर कालांत पोतनिसांचा वाडा याच भागांत होता. या टोकांच्या पूर्वेस, थोडें खालच्या पातळीवर, भग्न इमारतीचें एक ठिकाण दिसतें; हें ठिकाण दारूखान्याचें कोठार होय. त्याची लांबी नव्वद फूट, रुंदी वीस फूट व त्याच्या भिंती साडेतीन फूट जाडीच्या

होत्या. इ. स. १८१८ मध्ये कालकाईच्या टेकडीवरून, इंग्रज गोलंदाजांनी या कोठारावर गोळे टाकले; त्यायोगे हा दारूखाना उध्वस्त झाला. जवळच खडकांत खोदलेलीं बारा टाकीं आहेत; त्यांत नेहमी पाणी असतें.

बालेकिल्ल्याच्या वायव्यभागीं, पीलखान्याची इमारत कोसळण्यापूर्वीच्या सावरलेल्या स्थितींत उभी आहे. उत्तरेस गडावरील बाजारपेठेचे अवशेष जोत्याच्या रूपाने शिल्लक आहेत. पेठेच्या दोन रांगांत मिळून चव्वेचाळीस दुकानें होतीं. मधून चाळीस फूट रुंदीचा रस्ता अजून आवल्यागत आहे.

बाजारपेठेच्या खालच्या बाजूस, पूर्वेकडील उतारावर ब्राह्मणवस्ती, ब्राह्मणतळें व एका मनोऱ्याचे भग्न अवशेष आहेत. तेथून ईशान्येस एक तटबंदीची जागा असून आंत महादेवाचें मंदिर आहे. त्याच्या पश्चिमभागीं प्रवेशद्वारापाशी, तीन फूट उंचीची, दीड फूट रुंदीची, उत्कृष्ट खोदकाम केलेली मारुतीची पाषाणमूर्ति आहे. महादेवाच्या मंदिराभोवतीं नृत्यांगनांच्या रहाण्याच्या जागा असून, जवळच खोदलेलें एक तळें आहे.

महादेवाच्या मंदिराच्या पूर्वदरवाजापासून थोडया अंतरावर एक अष्टकोनी चौथरा असून तेथे शिवछत्रपतींचें दहन झालें. आतां त्यावर घुमटाकृति स्मारक उभारलें आहे.

या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतीवर पुढील शिलालेख आहे--

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया
श्रीमच्छत्रपतेः शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः ।
शाके षण्णवबाणभूमिगणनादानन्दसंवत्सरे
ज्योतीराजमुहूर्तकीर्तिमहिते शुक्लेशसार्पे तिथौ ॥ १ ॥
वापीकूपतडागराजिरुचिरं रम्यं वनं वीतिकौ
स्तम्भैः कुम्भिगृहे नरेन्द्रसदनैरभ्रंलिहे मीहिते ।
श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो
यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते ॥ २ ॥

[ सभासद परिशिष्ट १ पृ. ८५ ]

येथे पायरींत हिरोजी इटलकराचे नावाचा दुसरा एक लेख आहे. इमारतींच्या खात्यावरील हिरोजी ' इंदलकर ' तो हाच असावा.

दहनभूमीपलीकडे भग्न इमारतींच्या अवशेषांची एक रांग आहे; तें शिबंदीचें निवासस्थान असावें. हे अवशेष बालेकिल्ल्यापासून सुमारें एक मैल अंतरावर आहेत.

त्यांचे पलीकडे, सदर वस्तीपासून विलग असें एक घर होतें. इ. स. १६७४ मध्ये इंग्रज वकील ऑक्झेंडन यास रहावयास दिलेलें घर तेंच असावें.

या अवशेषांच्या पूर्वेस माथ्यावरील भागाच्या टोंकास, कालाकुंड नावाचें एक कुंड आहे.

रायगडचा माथा पूर्वपश्चिम दीड मैल लांबीचा असून त्यांची उत्तरदक्षिण रुंदी सुमारें एक मैल असावी. माथ्यावरचा आकार वेडावाकडा आहे. हिरकणी टोक माथ्याच्या पश्चिमेस असून टकमक उत्तरेस, भवानी टोक पूर्वेस आणि श्रीगोंदे टोक आग्नेयेस आहे. किल्ल्यास हीं चारच टोकें आहेत. हिरकणी टोक बालेकिल्ल्यापासून दोनशें फूट खाली आहे. त्यास बुरूज व तटबंदी आहे.

दंतकथा अशी की हिरकणी नावाची एक गवळण गडावर दूध विकण्यासाठी आली असता, रात्र झाल्यामुळे महादरवाजा बंद झाला. आपल्या तान्ह्या मुलासाठी तिला वाडी येथे घरीं जाणे तर आवश्यक होते; आणि दरवाजा उघडला जाऊन वाट मिळणे तर शक्यच नव्हतें ! अपत्यप्रेमाच्या ओढीने ती या टोकावरून खाली उतरली. दुसऱ्या दिवशी शिवाजीमहाराजांस ही हकीकत समजताच त्यांनी तिला बोलावून आणलें व स्वतः याबद्दल चौकशी केली. ती जागा दुर्गम करणे जरूर, हें जाणून त्यांनी तेथे तटबंदी करविली. हिरकणीची हकीकत ही सत्यकथा की दंत-कथा, हें ठरविण्यास कागदोंपत्रीं पुरावा नाही; म्हणून इतिहासलेखकास या कथेबद्दल मुग्ध रहावें लागतें. पण कवींचें तसें नाही. त्यांनी तिला काव्यांतून अमर करण्याचा प्रयत्न केला आहे. कै. कवि विनायक, व कै. गणेश टिपणीस [ कवि भालचन्द्र ] यांचीं हिरकणीबद्दलचीं काव्यें विशेष प्रसिद्ध आहेत.


टकमक टोकाबद्दल अशीच दंतकथा आहे. एकदा शिवाजी महाराज काही निमित्ताने दुपारचे वेळीं टकमक टोकापाशीं उभे होते. उन्हाची वेळ, म्हणून त्यांच्या मस्तकावर एका नोकराने छत्र धरलें. वारा सुटला आणि शिडांत भरावा तसा छत्रींत भरला. नोकराचे पाय जमिनीपासून सुटले आणि तो टकमक टोकावरून बाजूस झाला ! पण उघडी छत्री हातांतून न सोडल्यामुळे, वारा कमी होतांच, काही क्षणांनी तो जमिनीवर टेकला. ज्या जागीं तो जमिनीवर सुखरूप उतरला, तेथे जें गाव वसलें त्यास छत्रीनिजमापूर असें नाव प्राप्त झालें.

रायगडच्या माथ्यावर झाडी नाही; कारण तेथील जमीन खडक आणि मुरूम यांची बनली आहे. पण बालेकिल्ल्याच्या पूर्व उतरणीवर थोडीं झाडें वाढलीं असून तींतून इमारतींचे अर्धावृत भग्न अवशेष दिसतात. माथ्यावरच्या या भागांत काही

बांधीव हौद असून त्यांत काही महिने पाणी असतें. पश्चिम, दक्षिण व पूर्वभाग तुटलेल्या कड्यांसारखे असल्याने त्या बाजूस रायगडास तटबंदी नाही.[1]

---

१. प्रस्तुत प्रकरणांत जेथें आधार दिले नाहींत, तेथे कुलाबा गॅझेटियरचा आधार समजावा. पृष्ठें ३५७ ते ३६२ वरील जरूर त्या मजकुराचें, या प्रकरणांत संकलन केलें आहे. 'रायगड किल्ल्याचें वर्णन' मधील मजकूर व गॅझेटिअरचा मजकूर यांत बिलक्षण साम्य आहे.



# २ रायगडचा पूर्वेतिहास

इसवी सनाच्या १२ व्या शतकांत रायरी उर्फ रायगिरी एका मराठे पाळेगाराचें निवासस्थान होतें. कोंकणच्या प्रदेशांत सत्ता कोणाचीही असली, तरी ती नाममात्र होती व राजधानीपासून दूर असल्यामुळे, या प्रदेशास राजसत्तेचा फायदा अगर तोटा कधी जाणवत नसे. ठिकठिकाणीं दाट झाडी, त्या झाडींत खेडीं, असें वस्तीचें स्वरूप होतें. १४ व्या शतकांत रायरीच्या मराठा पाळेगाराने अनागोंदी ऊर्फ विजयनगरच्या सम्राटाचें स्वामित्व पत्करलें. इ. स. १४३६ मध्ये अल्लाउद्दीन शाह बहमनी २ रा याने रायरीवरील अधिकाऱ्यास आपलें स्वामित्व मान्य करावयास लाविलें. बहमनींची ही सत्ता इ. स. १४७९ पर्यंत टिकली. नंतर अहमदनगरच्या निजामशहाने रायरी आपल्या ताब्यांत घेतला [ कुरॉ पृ. २६३ ].

निजामशाहीच्या अमलांत जावळी सुभा होता. त्यांत परगणे महाड, तपे बिरवाडी, तपे तुडिल, तपे नातें, तपे विन्हेरें हा रायरीच्या आसपासचा भाग, रायरीचा किल्ला व मावळांतील कानदखोरें मोडत होतें [ पेद ४५ पृ. २ ]. इ. स. १६१७ मध्ये मामले रायरीचा हवालदार आगा हाजी याकुद इस्तंबोली[1] नावाचा निजामशाही अधिकारी होता. इ. स १६१८ मध्ये आदिलशहाचे वतीने हैबतखानाने मामले रायरीवर हल्ला केला, लूट केली व सबंध कानदखोरें काबीज केलें [ राखं. १६. ले. ६, ७ ]. याचा स्पष्ट अर्थ की निजामशहा व आदिलशहा या दोघांत या वेळी जावळी सुभ्यावरील अधिसत्तेबद्दल चुरस उत्पन्न झाली होती. युद्धानंतर आदिलशहाने मामले रायरीस कौल दिला व तेथील हवालदारी राजे पतंगराव

१. राजवाडे यांचें ' आगा अजी याकुद इस्तंबेली ' हें वाचन चूक.

यास दिली [ पेद. ३१ ले. ८ ]. हवालदारांच्या म्हणजे प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या बदल्या होत. इ. स. १६२१ मध्ये राजे पतंगराव याची बदली होऊन मलिक अमरूत रायगडचा हवालदार झाला [ पसासं. २३९६ ].

पण इ. स. १६२४ मध्ये रायरी व बारा मावळांचा हवालदार म्हणून इब्राहीमखान नावाचा निजामशाही अधिकारी कारभार करीत असलेला दिसतो ! [ पसासं. २०७, २१६ ]. इ. स. १६२८ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये निजामशाही सेनेने दाभोळ काबीज करून आदिलशहाचा पराभव करण्याचा चंग बांधला. तळ-कोकणचा हवालदार हबसखान याने मावळच्या कान्होजी जेधे व खोपडे या जमीदारांस व सरदारांस लिहिलें की, आम्ही दाभोळच्या मसलतीसाठीं जात आहोत; महाडास येऊन थांबतो; तुम्ही आम्हास येऊन सामील व्हा. त्याप्रमाणे कान्होजी जेधे व खोपडे महाडास येऊन दाभोळकडे गेल्याचीं पत्रें आहेत [ पसासं. २६५; शिचसाखं. २ ले. २२८ पृ. २२५[1] ]. सारांश, या वर्षी मावळ व दाभोळपर्यंतचें कोकण निजामशहाच्या ताब्यांत होतें.

पण इ. स. १६३६ मध्ये बादशहा शहाजहान याने अकबराचें अपुरें काम पूर्ण करण्याच्या हेतूने निजामशाहीवर स्वारी केली आणि सबंध राज्य जिंकून घेतलें. मोगली राजधानीपासून दूर असलेला हा प्रांत आपल्या ताब्यांत ठेवणे अवघड, असें जाणून बादशहाने इ. स. १६३६ मे ६ या दिवशी आदिलशहाबरोबर तह केला. त्यांत ठरलें की मामले रायरी व निजामशहाचें कोकण विजापूरच्या आदिलशहास द्यावें व त्याबद्दल आदिलशहाने वीस लक्ष होन किंवा ऐशीं लक्ष रुपये शहाजहानास द्यावेत. या तहामुळे रायगडवर आदिलशहाची सत्ता सुरू झाली [ पसासं ४०७ ].

कोकण प्रांत विजापूरकरांच्या ताब्यांत गेल्यामुळे जंजिरा किल्ल्याचा धनीपणा विजापूरकरास प्राप्त झाला व शिद्दी त्यांचा एक सरदार झाला. आदिलशहाने शिद्दी अंबर यास वजीर म्हणून किताब देऊन गौरविल्यामुळे त्याच्या मनांत नवीन धन्या-बद्दल निष्ठा उत्पन्न झाली.

इ. स. १६३६ ते १६४४ च्या दरम्यान शेख इब्राहीम, सय्यद कबीर लष्करी व शेख अली असे तिघे रायगडाच्या हवालदारीचें काम करून गेले, त्यांपैकी शेख इब्राहीम व सय्यद कबीर लष्करी यांनी बदअमल केल्यामुळे ते मारले गेले. १६४४ रहीमखान हवालदार झाला; पण त्याच्या वाईट वागणुकीबद्दल आदिलशहाकडे

१. शिचसा खं. २ ले. २२८ मध्ये कालोल्लेख नाही. पसासं २६५ च्या योगाने तो कळतो. पसासं पृ. ६१ वरील टीप पहा.

तक्रारी होऊ लागल्या. चंद्रराव मोऱ्याने जालो रुद्र या आपल्या जासुदास शहाकडे पाठवून अनेक तक्रारी गुदरल्या. त्यामुळे त्याची हवालदारी काढून शहानें पुन्हा शेख अलीस हवालदार नेमिलें. रायगडाच्या पायथ्याचे गावची प्रजा असंतुष्ट झाली होती; संचणी होईना. इ. स. १६४५–४६ मध्ये फतहमुल्क हवालदार झाला [ शिचसा खं. १० ले. २ व ७; फासा खं. १ ले. ३१, ३२; पसासं २४९९, २५०५ ]. सारांश, रायगड व आसमंत आदिलशहाच्या ताब्यांत असला, तरी तेथे सुव्यवस्था नांदू शकत नव्हती. ही परिस्थिति शिवाजीच्या फायद्याची ठरणारी होती. प्रत्येक तप्यांत म्हणजे तालुकेवजा विभागांत पाटील हेच वसुली करणारे सरकारी अधिकारी होते. रायगडच्या बेगमीस नेमून दिलेल्या गावच्या पाटलांनी गडाच्या हवालदाराच्या आज्ञेंत राहून आपलें काम करावयाचें, अशी कारभाराची पद्धति होती. शिवाय प्रत्येक गावचा कोणीतरी खोत असे व त्याचे काही अधिकार असत. सदर अधिकारांची व्याप्ती मोठी असावी. रायगडच्या परिसरांत दाट अरण्यें होतीं; तेथे रयत पारध करी. या पारधींतही खोताचा हक्क लाझिमा असे [ शिचसा खं. १० ले. ८ ].

वर सांगितलेल्या सर्व हवालदारांची बदली प्रत्यक्ष विजापूर दरबाराकडून झाली आहे; त्यावरून असें दिसतें की रायगड किल्ल्यावर आदिलशहाचें प्रत्यक्ष नियंत्रण होतें.

शिवाजी आणि जावळीकर 'चंद्रराव' मोरे यांचा प्रथम संबंध इ. स. १६४८ मध्ये आला. या वर्षीच मोऱ्यांतील प्रमुख दौलतराव मोरे निपुत्रिक मरण पावला. शिवाजीच्या सल्ल्यावरून त्याच्या बायकोने 'यशवंतराव' नावाचा मुलगा दत्तक घेतला आणि हणमंतराव मोरे याच्या मदतीने विस्तृत जहागिरीचा कारभार चालविला. याच वेळीं अफझलखान वाईच्या सुभेदारीवर येऊन जावळीची जहागीर आपल्या ताब्यांत घेण्याचा विचार करीत होता. पण शिवाजीच्या सान्निध्यामुळे त्याचें उद्दिष्ट साध्य झालें नाही. जावळीचा प्रदेश दुर्गम होता. हणमंतराव व 'चंद्रराव' मोरे हीं माणसें कर्तबगार होतीं व शिवाजी त्यांच्या पाठीशीं होता [ शिचनि; इ. सं. ]. इ. स. १६५४ मध्यें अफझलखानाची वाईहून कनकगिरीस सुभेदार म्हणून बदली झाली. अफझलखान जातांच मोरे व शिवाजी यांत संघर्ष निर्माण झाला.

दौलतराव मोरे आपल्या प्रदेशांत व अन्यत्र कसा दटाईने वागत असे, हें सांगणारा मजकूर उपलब्ध आहे. रामोजी वाडकर व चंद्रराव मोरे यांचें बिनसल्यामुळे त्यास चंद्ररावाने चिखली येथे ठार केलें. त्याचा मुलगा लुमाजी याचाही एका लढाईत मृत्यु होण्यास मोरेच कारणीभूत झाले होते [ राखे २० ले. २८८; पसासं

७०७ ]. रायगडपासून सुमारे सोळा मैलांवर असलेल्या बिरवाडीच्या माल पाटलाचें व दौलतराव मोऱ्यांचें वैमनस्य उत्पन्न झालें. मोरे बलवान; पाटील बिचारा दुबळा! त्यामुळे पाटलाच्या प्रदेशांतील पाटलाचें वतनी उत्पन्न मोरे खात होते, पण पाटील प्रतिकार करू शकत नव्हता. उलट, रायरीच्या हवालदारास निमूटपणे वसूल देणे व संचणी करणे, हे वतनदार पाटलास सरकारी सनदी नोकर म्हणून करणे भाग होते. पाटलाच्या उत्पन्नाचा प्रदेश दौलतराव मोऱ्याने कांगोरी किल्ल्याच्या तैनातास कायमचा लाऊन दिल्याने तर, या अन्यायावर कळस चढला! यामुळे मोऱ्यांचें पारिपत्य हा प्रकार बिरवाडी टप्प्यांतील पाटलास वरदानासारखा वाटला. शिवाजी व मोरे यांच्या प्रकरणीं वतनदारांची मदत मोऱ्यांस का मिळू शकली नाही, याचा अजमास या उदाहरणाने आपणास करता येतो. उलट, शिवाजीचें सामर्थ्य व न्यायी-पण लक्षांत घेऊन माल पाटलाने आपली तक्रार शिवाजीकडे गुदरली व शिवाजीनेही त्याचें वतन त्यास परत दिलें; पण अट घातली की त्याने, प्रसंगीं, दहा माणसांसह शिवाजीची चाकरी करावी! [ पसासं. ६१५; सं. ३ पृ: १६७ ]. आदिलशाही मुलुखांतील माणसांस अनुकूल करून आपल्या उद्योगीं आणण्याचा प्रकार शिवाजीने कसा केला असेल, याची कल्पना आपणास अशा उदाहरणांवरून होते. मोऱ्यांवरील मोहीम सुरू करण्यापूर्वी शिवाजीने गोळे नावाच्या मातबर घराण्यांतील कर्तबगार माणसास कौल दिला व त्यांस मोऱ्यांपासून वेगळे केले. गोळ्यांचें मुख्य ठिकाण गोळगणी हें असून, त्यांस अनुकूल करून घेतल्यावर शिवाजी रायगडच्या रोखाने निघाला [ शिवसा. खं. १० ले. ४१ ].

शिवाजीने जावळी घेतल्याचे प्रकरणाची तपशीलवार हकीकत आपणास शिवचरित्रप्रदीपमध्ये वाचावयास मिळते. मावळांतील ज्या देशमुखांस शिवाजीने आपणाकडे वळवून घेतले होते, त्यांत कान्होजी जेधे, हैबतराव सिलीमकर व बांदल देशमुख प्रमुख होते. त्यांनी व शिवाजीच्या सरदार संभाजी कावजी यांनी मोऱ्यांचें मुख्य ठिकाण जें जावळी, त्यावर प्रथम हल्ला केला; पण त्यांत त्यांना अपयश आलें [ NHM I पृ. ११२ ]. मग पुण्याहून शिवाजीने दुसरें सैन्य धाडलें, जोर येथे हणमंतराव मोरे याजबरोबर एक लढाई झाली; तीत हणमंतराव मोरे पडला व जोरचें ठिकाण शिवाजीच्या ताब्यांत आलें. जांभळी हें मोऱ्यांचें दुसरें ठिकाण जेध्यांनी काबीज केलें. मोऱ्यांचें जावळी हें ठिकाण शके १५७७ मन्मथ नाम संवत्सर, पौष शु॥ १४ रोजीं शिवाजीच्या हातीं आलें [ ११ डिसें. १६५५ ] अशी हकीकत

रायगड अति उंच व चढण्यास कठीण; वर्षांतून पाच महिने तेथे मुसळधार पाऊस पडतो. तो ताब्यांत घेतल्यावर आपल्या विशिष्ट दृष्टिकोनांतून तो बांधण्यास शिवाजीने प्रारंभ केला. मोरेप्रकरणांत गुंतला असता, त्या सुमारासच कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी शिवाजीस समजली. त्याने तो खजिना लुटून रायगडावर नेला. रायगडच्या बांधकामास तो उपयोगी पडला. उंच उंच दरवाजे, तट व बुरुज तयार झाल्यावर, तोफा वर नेल्यावर व जागा सुरक्षित केल्यावर, त्याने एका मार्गाशिवाय बाकीचे सर्व मार्ग कायमचे बंद केले. एके दिवशी त्याने लोकांस जमविलें व सोन्याने भरलेली एक पिशवी व शंभर होनांचें कडें पुढे ठेऊन जाहीर केले की शिडी किंवा दोर यांच्या साहाय्याशिवाय व ठेवलेल्या मार्गाखेरीज किल्ल्यावर चढून जो कोणी निशाण लावील, त्यास बक्षीस मिळेल. एका अस्पृश्याने गड चढून व निशाण लाऊन राजांपुढे येऊन रामराम केला. राजाने त्यास बक्षीस दिलें व तो चढून आल्याचा मार्ग कायमचा बंद करून टाकिला [ शशि. पृ. २३८; NHM I पृ. ११५; शिचसूसं ३ पृ. ८५,८६; ईलिडॉ. भाग ७ पृ. २८८ ].

रायगडप्रकरणीं बखरकाराने म्हटले आहे, " मिळाले बारभाई, बुडाली चंदरराई ! " किती समर्पक आहेत हे शब्द !

---

टीप-शिवचरित्रप्रदीप पृ. २१८ वर पुढील नोंद आहे- ' शके १५७५ विजय संवत्सर-रायगडी देवीची स्थापना ' ही नोंद चूक; कारण, त्यावर्षी रायगड ताब्यांतच नाही, मग शिवाजी देवीची स्थापना कशी करणार !



# ३ रायगडचें चढतें वैभव

रायगड घेतल्यामुळे शिवाजीला कोकणप्रांतांत राज्य–विस्ताराचा मार्ग मोकळा झाला. त्याचा जंजीऱ्याच्या शिद्दी, राजापूरचे इंग्रज व्यापारी आणि वाडीकर सावंत याजबरोबर संबंध आला. कोकणांत मोऱ्यांचा चंद्रगड नावाचा एक किल्ला होता. तसेच, पोलादपूरजवळ कोंढवी नावाचें एक डोंगरप्रदेशांत गाव आहे, तेथे एक किल्ला होता; हे दोन्ही किल्ले शिवाजीने घेतले. यामुळे शिवाजीचे पारिपत्य करण्याची तीव्रता आदिलशहाचे मनांत उत्पन्न झाली. त्यांतूनच अफझलखानाच्या स्वारीचा म्हणजे प्रतापगडच्या युद्धाचा इतिहास उत्पन्न झाला. 'शिवाजीने निजामशाही कोकणांतील किल्ले हस्तगत केले आहेत; त्याच्या पराभवासाठी आम्ही अफझलखान महंमदशाही यास धाडले आहे शिवाजीचा पराभव करून त्याचा समूळ फडशा करावा,' असें पत्र इ. स. १६५९ जून १६ रोजी अदिलशहाने कान्होजी जेध्यास धाडले आहे [ पसास. ७७४; साधनचिकित्सा पृ. २८७,२८८ ]. या पत्रामुळे अफझलखानाचे हेतु आपणास पूर्ण समजतात.

याचवेळी महाराष्ट्राच्या इतिहासाचे दृष्टीने एक महत्त्वाची गोष्ट घडली. शहाजहानने औरंगजेबास दक्षिणचा सुभेदार नेमले होते. इ. स. १६५७ मध्ये औरंगजेबाने अदिलशहास नेट लावला की, शहाने शिवाजीचा पराभव करावा आगस्टमध्ये विजापूरकर व मोगल बादशहा यांचेमध्ये एक तह घडून आला त्यांतील मुख्य त्याची कलमें अशी–( १ ) अदिलशहाने शहाजहानास एक कोट रुपये खंडणी द्यावी. ( २ ) बेदर, कल्याण, परिंडा हे किल्ले आणि त्याखालील सर्व मुलूख व निजामशाही


वरून शिवाजीने दाखविलेला हा पहिला नमस्कार आहे. आणि झालेला हा प्रकार किंवा केलेलें हें शासन निवळ काही व्यापाऱ्यास नसून एका कंपनीस -- जिने सर्व हिंदुस्थानची सत्ता पुढ आपल्याकडे घेतली, तीस आहे.

दिलेरखान व मिर्झा राजा जयसिंग हे दोन शूर सेनापति शिवाजीशी युद्ध करून त्यास समूळ उखडून काढण्यासाठीच आले होते. औरंगजब व शिवाजी यांचा राजनैतिक रागरंग इ. स. १६५६ पासूनच वैमनस्याचा होता व शिवाजींचे निर्माण होऊ घातलेलें स्वतंत्र राज्य बादशहास नको होते; कारण तें बादशहाच्या राज्यविस्ताराच्या धोरणाच्या मुळावर जन्मास येत होते. प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टीस तात्कालिक परिणामकारक अशा कारणाची गरज असतेच. अशी दोन कारणें यावेळी शिवाजीचे हातून हेतुतः घडली होती. पहिलें, शाहिस्तेखानावरील रात्रीचा भयानक हल्ला आणि दुसरें, सुरतेची बेसुरत. शिवाय, त्याने आपल्या नावाचे स्वतंत्र नाणं पाडण्यास सुरुवात केली होती [ कु. गॅ. पृ. ३६४ ]. नाण पाडणे यांचा अर्थ स्वतंत्र सत्ता जाहीर करणे हाच होय. शिवाजी कोणाचाच ताबेदार नव्हता !

इ. स. १६६५ च्या मार्चमध्ये दिलेरखान व जयसिंग याच्या स्वारीस सुरुवात झाली. ही स्वारी आपल्या लष्करी सामर्थ्यास झेपणारी नाही; हें ध्यानांत आल्यामुळे १२ जून १६६५ रोजी शिवाजीने जयसिंगाशी पुरंदर येथे तह केला. त्यांत ठरले की, ‘ शिवाजीचे २३ किल्ले, आणि निजामशाही तळकोकण मिळून चार लक्ष होनाचा मुलुख शिवाजीकडून घेऊन मोगली साम्राज्याला जोडण्यात यावा.’ जयसिंगाने ठरविलेला हा तह इ. स. १६६५ सप्टें. ५ च्या फर्मानाने औरंगजेबाने मान्य केला. त्यामुळ शिवाजीकडे फक्त १२ किल्ले राहिले; त्यांत रायगड राहिला. राहिलेला मुलुख सामान्यपणे राजगड व रायगड याच्या परिसरांत होता शिवाजीने मोऱ्यापासून जिंकलेला जावळीचा प्रदेश शिवाजीच्याच ताब्यांत राहिला. रायगड, लिंगाणा व बाणकोट खाडीच्या टोकावरील महाड त्याच्याचकडे राहिलें, [ शशि. पृ. १०५, ११५ : कु. गॅ. पृ. ३६४; राखं. ८ ले. १४ पृ. १३; पसासं. १०७७, १०८३; प्रभात ले. ८; मॉ. रि. भाग २० पृ. १० ]. शिवाजीने बादशहाची भेट घ्यावी हे जयसिंगाचें म्हणणें शिवाजीस मान्य करावें लागलें.

इ. स. १६६७ एप्रिलपर्यंतचे रायगडच्या इतिहासाचें स्वरूप आपण पाहिलें. राजापूरप्रकरणीं रायगडला महत्त्व असले, तरी पुढील ३।४ वर्षे राजगड हेंच महाराजांचे राजधानीचें ठिकाण होतें. पुढील काळांत रायगडला महत्त्व प्राप्त होऊ लागलें व तेथे महाराष्ट्राची विशिष्ट राजनीति व संस्कृति याचा विकास होऊ लागला.

---



# ४ रायगडवरील वैभवाची मध्याह्न

शिवाजीराजे आग्याहून सुटून आले, ही घटना हिंदुस्थानांतील परकीयास आश्चर्याचा धक्का देणारी होती. गोव्याच्या व्हाइसरॉयने तर आपला वकील शिवाजीचे अभिनंदन करण्यासाठी रायगडावर धाडला. मोगल बादशहाच्या दहशतीने पोर्तुगीज इतके दिवस शिवाजीशी सलोखा ठेवीत नसत. तहाच्या वाटाघाटीस १५ मे १६६७ रोजी सुरुवात झाली. शिवाजीनेहि आपला वकील सखोपंत यास गोव्यास धाडले होते. त्याचेबरोबर पोर्तुगीझ वकील गोंझालो मार्टिन रायगडास आला. ५ जुलै रोजी शिवाजी व पोर्तुगीझ यामधील तहाच्या अटी ठरल्या आणि ११ डिसें. १६६७ रोजी शिवाजीने तो रायगडवरच पूर्ण करून दिला [ पिसुर्लेकर शि. पृ. १६ पसासं. ११६०; शशि. पृ. १३६ ].

इ. स. १६६८ व १६६९ मध्ये बरेच दिवस रायगडावर राहून शिवाजीने मराठी राज्याचे परराष्ट्रीय धोरण व अंतर्गत व्यवस्था ठरविली [ कु. गॅ. पृ. ३६५]. त्यावेळीं महाराज अनेक वेळा महाड येथे असत. त्यांनी महाडास एक वाडा बांधला होता. त्यास समुद्रस्नानाची अतिशय आवड होती. व ते बाणकोटच्या खाडीवर सुमारे चार वर्षे मुद्दाम येऊन राहिले होते [ शशि. पृ. २९२; BBD पृ. १३० ]. तो काल हाच असला पाहिजे.

रायगडावर राहून निरनिराळ्या प्रदेशांत लूट करून पैसा गोळा करण्याचा धूमधडाका शिवाजीने चालविला. इ. स. १६७० च्या मध्यास त्याने मोगलांचे

बांधला व व्यवस्था लावली. याच द्रव्याच्या जोरावर त्याने सातारा व परळी हे किल्ले घेतले [ NHM I पृ. २०२; शशि. पृ. १५३; शिवप्रपृ. २६ ].


१६७२ मध्ये घोडबंदरवर स्वारी करून पोर्तुगीझांची वसाहत काबीज करण्याचा शिवाजीने धाडसी प्रयत्न केला. त्यामुळे मुंबईकर इंग्रज घाबरून शिवाजीची मर्जी संपादण्याच्या उद्योगास लागले. सख्य जोडण्यासाठी मिस्टर उस्टिक यास रायगडावर पाठविण्याचे कंपनीने ठरविले. राजापूरलुटीची भरपाई करून घेणे, हा तहाचा एक हेतु होता. २२ फेब्रुवारी रोजी मुंबईकरांनी ठरविले की शिवाजीस नजराणा देण्यासाठी ६०० रु. व शिवाजीच्या सरकारकुनांसाठी १५० रु. खर्च करावेत. उस्टिकने आपल्याबरोबर दहा भंडारी. दोन इंग्रज, दोन घोडे, पालखीचे भोई व दोनशे रुपये रोकड घ्यावी. उस्टिक रायगडावर का जात आहे, या बाबत गुप्तपणा राखावा; जाहीर करणेच झाले, तर राजापूरच्या वखारीची व गलबतांची नुकसानभरपाई करून घण्यासाठी त्यास पाठवीत आहोत, एवढेच सांगावे असे कपनीने ठरविले उस्टिकने ६ मार्च १६७२ रोजी रायगडवर जाण्यास मुंबईहून निघावयाचे ठरल. शिवाजीचा मुक्काम रायगडवर होता व त्याचा वकील मुंबईस होता. त्या वकिलाबरोबर उस्टिक १० मार्च रोजी निघाला. तो प्रथम चौल येथे गेला व १५ एप्रिलपर्यंत शिवाजीच्या परवानगीच्या पत्राची वाट पहात थांबला; नंतर रायगडवर येऊन पोहोचला. शिवाजीने त्याची भेट मेच्या आरंभी घेतली. राजापूरच्या लुटीचे बोलणें शिवाजीने साफ नाकारलें. उस्टिचे म्हणणें असें होतें की शिवाजीने या लुटीबद्दल ३२ हजार पॅगोडा कंपनीस द्यावेत. त्यावर, लुटीच्या भरपाईचा नीट विचार करण्यासाठी शिवाजीने आपला वकील मुंबईस पाठविण्याचे कबूल केले. याबाबत शिवाजीने सुदरजी व पिलांजी नावाचे वकील पूर्वीच धाडले होते. आता शिवाजीनेच उलट उस्टिकजवळ अट घातली की कंपनीने जजिरेकरांविरुद्ध शिवाजीस मदत करावी; अर्थात् ही अट कंपनीस मान्य होण्यातली न हती ! ही मुलाखत फक्त अर्धा तास चालली शेवटी शिवाजीने राजापूरच्या वखारीची नुकसानभरपाई म्हणून कंपनीस ५ हजार होन देण्याचे मान्य केले व आश्वासन दिलें की कंपनीने राजापूरास पुन्हा वखार उघडल्यास आपण कंपनीस सर्व प्रकारे सहानुभूति दाखवू. सारांश, या वकिलीतून काही निष्पन्न झाल नाही. १६७२च्या १४ मे रोजी उस्टिक मुंबईस जाऊन पोहोचला [ हिंसावि पृ. १००; राखं. ८ ले २९; पसासं. १४५०, १४५१, १४५२, १४५३, १४६४, १४६९ ].

पण मुंबईकरांनी तहाचा हेतु सोडला नाही. इ स. १६७३ एप्रिल २८ रोजी कंपनीच्या मुंबईच्या अधिकाऱ्यांनी ठरविले की शिवाजीच्या मुलखांत युरोपांती

कोणत्या मालाला मागणी आहे, व त्याच्या मुलुखांतील कोणता माल युरोपला धाडता येईल, हें पहाण्यासाठी व त्याच्या प्रदेशांतील शहरें, पेठा, मुंबईपासून त्या ठिकाणाची अंतरें, मार्ग, दळणवळणाची साधनें याची माहिती मिळविण्यासाठी टॉमस निकल्स यास पाठवावे. १ मे १६७३ रोजी निकल्सला सूचना देण्यांत आल्या– ( १ ) त्याने शिवाजीच्या मुलुखाची व्यापारी दृष्टया पहाणी करावी ( २ ) मुंबईहून गलबतांत बसून नागोठणें येथे उतरावे. तेथील भौगोलिक परिस्थिति, नदीच्या पात्राची रुंदी, खोली, तेथे जाणाऱ्या होड्यांचा आकार, भरती ओहटीची कमाल आणि किमान मर्यादा, धक्याची सोय, या गोष्टी पहाव्यात ( ३ ) जवळच्या पैण, भट्टी इत्यादि गावांची माहिती मिळवावी जुन्नरबद्दल सर्वविध माहिती मिळवावी ( ४ ) त्याने रोजनिशी ठेवावी व घडत असलेल्या सर्व गोष्टींची नोंद करावी.

निकल्स हा खाजगी व्यापारी असल्याने त्याला परिस्थितीची कल्पना होती. त्याने मे १०, १६७३ रोजी कळविले की सध्याची वेळ शिवाजीशी तह करण्याचे दृष्टीने अतिशय अनुकूल आहे. त्यावरून प्रथम ठरले की वाघजी नावाच्या मनुष्यास शिवाजीकडे धाडावे. पण ता. १६ मे रोजी फेरविचारांत ठरले की शिवाजीशी बोलणें करण्यास जाणारा मनुष्य स्पष्टवक्ता पाहिजे; म्हणून निकल्स यालाच वकील म्हणून धाडण्याचे ठरले. ता. १७ मे रोजी निकल्सला शेवटच्या सूचना देण्यात आल्या. त्यांत कंपनीने म्हटले की ‘ शिवाजीशी तह करून कित्येक महत्त्वाच्या मुद्यांची उत्तरें मिळविण्यासाठी आम्ही तुम्हांस धाडीत आहोत. शिवाजीने आमच्या व्यापाराची वेळोवेळ नुकसानी केली आहे. ती भरून पावण्यासाठी आम्ही तुमची योजना केली आहे. शिवाजी, आण्णाजी पंडित व शिवाजीचा वकील पिलाजी यांस देण्यासाठी पत्रें तुमचे स्वाधीन केलीं आहेत; तीं त्यास पोहोचती करावीत. शिवाजीची भेट न झाल्यास त्याचा मुलगा अगर जो महत्त्वाचा अधिकारी भेटेल, त्यास भेटून पावसाळ्यापूर्वी परत यावे. ’

टॉमस निकल्स सोमवार ता. १९ मे १६७३ रोजी ३७ लोकांसह मुंबईहून निघाला. मध्यरात्री त्याचे गलबत नागोठाण्यास येऊन पोहोचले. त्याचे बरोबर शामजी नावाचा एक व्यापारी होता. ता. २० रोजी दुपारी २ च्या सुमारास तो कुलुक म्हणजे कोलाड येथे येऊन पोहोचला. ता. २१ रोजी संध्याकाळी तो रायगड-वाडी येथे येऊन वस्तीस राहिला. रायगडवाडी ऊर्फ वाडी यास त्याने एक भिकार खेडें म्हणून हिणविले आहे. रायगड ते नागोठणें हा प्रवास ३० मैलांचा झाला. ता० २२ मे रोजी, शिवाजी रायगडावर नसल्यामुळे त्याने संभाजीच्या भेटीची परवानगी मागितली; तीं मिळाली, पण पाऊस पडल्यामुळे त्यास भेटीसाठी गडावर



# ५ ऑक्झेंडनची ऐतिहासिक वकिली

मुंबईकरांची तहाची बोलणीं इ. स. १६७४ मध्येहि चालू राहिली. शिवाजीच्या कोकणच्या प्रदेशांत व्यापार वाढवणे, राजापूरचें झालेलें नुकसान भरून काढणे व नव्या सवलती मिळवणे, पूर्वी झालेल्या तहावर शिवाजीने शिक्कामोर्तब करून तो कायम केला नव्हता, त्यास कराराचे स्वरूप आणणे, हें इंग्रजांचे उद्दिष्ट होतें. इ. स. १६७४ च्या मार्चमध्ये मुंबईच्या सल्लागार मंडळाने एक ठराव केला, की पूर्वी शिवाजीबरोबर झालेला तह पुरा करण्यासाठी नारायण शेणवी यास पाठवावे व त्याचेबरोबर मुखत्यार वकील म्हणून हेन्री ऑक्झेंडन यास रायगडावर धाडावे [ पसासं. १६१८ ].

तहाची बोलणीं पुरी करण्यास आरंभी नारायण शेणवी रायगडकडे निघाला. ता. २४ मार्च १६७४ रोजी तो निराजीपंताची भेट घेण्यासाठी पाचाड येथे थांबला. पण निराजी रायगडावर होता; म्हणून त्याने आपल्या आगमनाची वर्दी गडावर धाडली. त्यावर निराजीने गडावरून निरोप धाडला की, शिवाजीराजे यांची एक भार्या नुकतीच निवर्तली असल्यामुळे राजे सुतकांत आहेत. सुतक फिटेपर्यंत गडावर न येता ( पाचाडास ) माझे घरी रहा. नारायण शेणवीने पाच दिवस पाचाड येथे रिकामटेकडेपणात घालविले. २८ मार्च रोजी पाडव्याच्या निमित्ताने निराजी गडावरून पाचाड येथे आला. २९ मार्च रोजी निराजीने नारायण शेणव्याची एका स्वतंत्र, प्रशस्त घरांत व्यवस्था केली. तेथे शेणवी आणखी पाच दिवस राहिला. मग एप्रिल ३ रोजी दुपारी शेणवी गडावर जाऊन दरबारांत शिवाजीस भेटला. निराजीपंत हजर होता. राजापूरच्या वखारीची लूट केल्याने इंग्रजांचें जें नुकसान झालें, त्यावर प्रामु-

ख्याने बोलणी झाली. यावेळी निराजीपंताने इंग्रजांच्या या मुद्यावर अपेक्षेबाहेर तरफदारी केली. शिवाजीच्या मनावर निराजीच्या विचारांचा परिणाम होऊन त्याने ताबडतोब कारकुनास हुकूम लिहिण्यास सांगितले. राजापूरच्या नुकसानीची भरपाई शिवाजीने तीन हप्त्यांनी करावयाची. नुकसानीच्या रकमेदाखल २५०० होन राजापूरच्या जकातींतून; २५०० होन १ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या १ ल्या वर्षी व उरलेले एकूण ५ हजार होन शिवाजीने पुढील दोन वर्षांत इंग्रजांस पोहोचते होण्याची व्यवस्था करावी, असें या कलमाचें स्वरूप होतें. या कलमाने इंग्रजांचें झालेलें नुकसान भरून दिलें पाहिजे, ही गोष्ट तत्त्वतः व प्रत्यक्षतः शिवाजीने स्पष्टपणे मान्य केली.

नारायण शेणव्याचा हा मोठा विजय होता. त्याने ४ एप्रिल रोजी मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला उद्देशून लिहिलेल्या पत्रांत कळविलें, 'येत्या जूनमध्ये राज्याभिषेक करून घेण्याच्या उद्देशाने शिवाजी तयारी करीत आहे. सोनें, हिरे यांनी जडवलेले भव्य सिंहासन तयार होत आहे. असंख्य विद्वानांना बोलावणीं जातील. रायगडावर फार मोठ्या प्रमाणांत दानधर्म होईल. आता ऑक्झेंडनबरोबर शिवाजीकरिता चांगला नजराणा पाठवा. आरबी घोडा वगैरे न धाडता मूल्यवान् रत्नें, राज्याभिषेकसमयी धारण करण्याजोगी पाठवावीत. नजराणा हजार बाराशे रुपयांचा पाठवावा.'

हें पत्र ता. ८ एप्रिल रोजी मुंबईस पोहोचलें. ता. ९ रोजी सल्लागार मंडळाच्या सभेंत ठरले की, हेन्री ऑक्झेंडनने रायगडावर जाण्याची तयारी करावी. ऑक्झेंडन व उस्टिक यांनी विचार करून तहनाम्यांत अधिक काही गोष्टी घालावयाच्या असल्यास सुचवाव्यात. ता. ९ रोजी मुंबईहून सुरतेस पत्र रवाना झालें; त्यात ३।४ हजार रुपयांचीं रत्नें खरेदी करण्याची जबाबदार अधिकाऱ्यास विनंति करण्यात आली. [ पसासं. १६२५, १६२७, १६२८; आर्मे ११४–३ पृ. ९८ ].

मुंबईकराचें पत्र सुरतेस पोहोचल्यावर तेथील कौन्सिलच्या सभासदांचे मत झालें की नारायण शेणवी यास अपेक्षेबाहेर यश आलें आहे; तेव्हा शिवाजीस प्रसन्न करण्यासाठी भरीव नजराणा द्यावा, म्हणून ६ मोत्यें, ३ अंगठ्या, १ शिरपेंच, २ सलकडी अशा सुमारे ३३१४. रुपये किंमतीच्या वस्तु खरेदी करून मुंबईस धाडण्यात आल्या [ पसासं. १६२९; त्रै. ८ पृ. ३०-३१ ].

कालिकतहून सुरत येथे एप्रिल २५ चे जें पत्र रवाना झालें, त्यांत कालिकतकरांनी कळविलें की ' शिवाजी एक मूल्यवान सिंहासन बनवीत असून येत्या जूनमध्ये तो स्वतःस राज्याभिषेक करून घेणार आहे [ पसासं. १६३२ ]. शिद्दीच्या आरमारी सत्तेचा उपहास करून रायगडावर शिवाजी महाराजापद स्वीकारण्याच्या तयारीत

आहे; आपण इंग्रजांनी आपल्या हक्काच्या संरक्षणासाठी वकील धाडला पाहिजे; [ पसासं. १६४६; फ्रायर भाग १ पृ. १९५ ].

४ मेच्या सभेंत मुंबईच्या कौन्सिलसनी पुन्हा या गोष्टीवर खल केला. नारायण शेणवी याने ऑक्झेंडनचें नाव सुचविलें आहे; तेव्हा त्यानेच जावें असा पक्का निर्णय घेण्यांत आला. चाइल्ड, उस्टिक व ऑक्झेंडन यानी नजराण्याची व्यवस्था करवावी. जॉर्ज रॉबिन्सन व टॉमस मिचेल यांनी ऑक्झेंडनबरोबर त्याचे मदतनीस म्हणून जावें, असेंहि या बैठकीत निश्चित झालें [ पसासं. १६३८ ].

दरम्यान, रायगडहून नारायण शेणवी याने शिवाजीकडून तहाच्या कलमाचे कागद घेऊन सुरतेस धाडले. त्यावर तेथील कौन्सिलने विचार केला व दुरुस्त्या सुचविल्या. शिवाजीनें तहाच्या मसुद्याचे जे कागद धाडले, त्यांत प्रामुख्याने दोन गोष्टी होत्या. पहिली, राजापूरच्या वखारलुटीची भरपाई आणि दुसरी, राजापूर, दाभोळ, चौल, कल्याण इत्यादि शिवाजीच्या मुलुखांतील कोणत्याहि ठिकाणी वखार घालण्यास इंग्रजास स्वातंत्र्य असावें व त्यास आयात व निर्यात जकात फक्त शेकडा अडीच टक्के असावी. मात्र कंपनीने खरेदी आणि विक्री बंदरांतच करावी आणि आंतील वहातुक करू नये [ पसासं. १६४० ].

इ. स. १६७४ मे ११ या दिवशी ऑक्झेंडन यास ज्या सूचना कंपनीने दिल्या, त्यांचा आशय पुढीलप्रमाणे — ऑक्झेंडनने शिवाजी, संभाजी, जिजाबाई इत्यादीस योग्य वेळी सढळ हाताने नजराणे द्यावेत. राजापूरचा व्यापार, मुंबई बेटाची सोय व सुरक्षितता यांच्या दृष्टीने जरूर त्या गोष्टी उरकाव्यात. शिवाजीने पाठविलेल्या तहाच्या मसुद्यांत जें कमीअधिक झालें आहे, तें दुरुस्त व सोयीचें करून द्यावें. इंग्रज व्यापाऱ्यांनी बंदराबाहेर व्यापार करू नये, ही अट अवश्य दुरुस्त करून घ्यावी. निराजीपंत कंपनीस अनुकूल आहे; त्याचा सल्ला घ्यावा. पंतप्रधानाचा सन्मान ठेवावा. आण्णाजीपंताशी परिचय वाढवावा. बालाघाट, आंतील प्रदेशांतल्या पेठा, नागोठणें व मुंबईचा आसमंत प्रदेश इंग्रजांच्या व्यापारासाठी खुला करवून घ्यावा [ पसासं. १६४२ ]. सूचना घेतल्यानंतर ऑक्झेंडन रायगडकडील प्रवासास निघाला.

मुंबईचा पहिला गव्हर्नर जिरॉल्ड अँजीर याने मुंबईच्या उत्कर्षाचा पाया घातला. मुंबईचें शिवाजीपासून संरक्षण व्हावें, आपला व्यापार वाढावा व कंपनीची भरभराट व्हावी या दृष्टीनें शिवाजीशी भलेपणाने संबंध ठेवण्याचा हेतु त्याचें मनांत सतत वागत असे. त्याने एकूण तीन वेळा शिवाजीकडे तहासाठी वकील धाडलें. राज्याभिषेकसमयी ऑक्झेंडन यास त्याने रायगडावर धाडले, हा तहाचा तिसरा प्रयत्न होय. मुंबई व मराठी राज्य यांतील व्यापार सुरळीत चालण्याच्या दृष्टीने काही प्रतिबंध होते.

इ. स. १६६४,१६६५ व १६७० या तीन वर्षी शिवाजीचा व इंग्रज कंपनीचा सुरत, कारवार व राजापूर येथे आलेला संबंध स्नेहाचा होता असें म्हणता येणार नाही. राजापूर व कारवार येथील इंग्लिश वखारीस जो अपाय झाला होता, त्याची भरपाई या राज्याभिषेकाच्या निमित्ताने आपल्या प्रतिनिधीस शक्य होईल, असा त्याचा कयास होता. आपलें राज्याभिषेकप्रसंगीचें अस्तित्व लाभदायक होईल असा त्यास भरवसा होता [ BBD. पृ. ८६; कु. गॅ. पृ. ३६५ ].

सुरतेचा प्रेसिडेंट जॉर्ज ऑक्झेंडन याचा हेन्री हा नातलग होता. हेन्रीचा जन्म इंग्लंडमधल्या एका सरदारघराण्यांत झाला. हेन्रीचे भाऊ सर जॉर्ज व क्रिस्टोफर दोघांचीं थडीं सुरत येथे आहेत. वकील म्हणून त्याची निवड अगदी योग्य वेळी झाली होती. पूर्वी ह्याने कारवारच्या वखारीवरील मुख्य म्हणून कामाचा अनुभव घेतला होता. तें ठिकाण शिवाजीने आपल्या ताब्यांत घेतलें, त्यावेळी हेन्रीस शिवाजीच्या कर्तृत्वाची आणि स्वभावाची ओळख झाली होती. पुढे इ. स. १६७६ मध्ये हेन्री ऑक्झेंडन मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर झाला. इ. स. १६७९ मध्ये त्याला इंग्लंडच्या राजाने सरदार ( Baronet ) केलें. रायगडवर आला तेव्हा हेन्री ५६ वर्षांचा होता [ BBD. पृ. ४१६ ].

चौल म्हणजेच रेवदंडा. येथे बुधवार ता. १३ मे रोजी रात्रीं ऑक्झेंडन एका गलबतांतून येऊन पोहोचला. तेथील वेशी शिवाजीच्या भीतीने रात्री आठ वाजताच बंद होत. हेन्री आला तेव्हा वेशी बंद झाल्या होत्या. रेवदंड्यास हेन्रीला कळलें की शिवाजी रायगडावर परत आला आहे; म्हणून, चौलच्या सुभेदाराची भेट घेण्यापुरतें थांबून हेन्री जलद निघाला. सुभेदार व हेन्री यांची भेट ता. १४ रोजी झाली. पेण, नागोठणें इ. शहरांवर चौलच्या या अधिकाऱ्याची देखरेख असे. तेव्हा, आपलेविषयीं बरेपणा वाटावा म्हणून हेन्रीने त्यास, भेटीचे वेळी दोन पामऱ्या नारायण शेणवीच्या सांगण्यावरून नजर केल्या. ता. १६ मे रोजी एका लहान गलबतांतून हेन्री अष्टमीस गेला. तेथून निजामपूर, गांगवली, या मार्गाने ता. १९ मे रोजी सकाळी ९ वाजता तो पाचाड येथे पोहोचला. निराजीपंत रायगडवर असल्यामुळे हेन्रीची व त्याची भेट ता. २० रोजी झाली. भेटीत हेन्रीने त्याला एक अंगठी नजर केली व त्याचा थोरला मुलगा प्रल्हाद निराजी यास त्याने पामऱ्यांची एक जोडी दिली. शिवाजी रायगडावर नसल्यामुळे हेन्रीस पायथ्याशीच मुक्काम करावा लागला; पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे ता. २१ रोजी, शिवाजी प्रतापगडच्या भवानीस सुवर्णछत्र अर्पण करून रायगडास परत आल्याचें त्यास कळलें. दोन दिवसांच्या पाचाडच्या मुक्कामांत नारायण शेणवी, निराजी रावजी व हेन्री

ऑक्झेंडन बराच काल एकत्र असल्यामुळे त्यांची चांगली जानपछान झाली. हेन्रीने शिवाजीसाठी आणलेला नजराणा निराजीपंताने पाहिला. निराजीपंताचे मत झाले की भेटीच्या वस्तूतील हिऱ्यांच्या किंमती फुगवून लावल्या आहेत. शिद्दी आणि शिवाजी यांचेमध्ये सख्य नसल्यामुळे इंग्रजांच्या व्यापारास धोका उत्पन्न होतो व वेळी प्रतिबंध होतो, याबद्दलही हेन्रीचे निराजीपंताशीं बोलणें झालें. आमच्या व्यापाराचे दृष्टीने शिद्दी व शिवाजी यांचे सख्य असावे असे हेन्रीने म्हटले. हेन्रीच्या या बोलण्याचा निराजीपंताच्या मनावर काही परिणाम झाल्याचे हेन्रीस दिसून आले नाही. त्याने विषय बदलून म्हटले की, शिवाजीच्या ताब्यांत बालाघाटपासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत विस्तृत प्रदेश आहे; हा प्रदेश इंग्रजास व्यापाराचे दृष्टीने मोकळा असावा व तेथे व्यापार करण्यास त्यास उत्तेजन मिळावें. या मुद्यावर निराजीने म्हटले की हें तुमचे म्हणणे अंमलात येऊ शकेल असें आहे. त्या दृष्टीने शिवाजीशी सलोख्याचे संबंध ठेवण्यांत इंग्रजांचा फायदा आहे.

ता. २२ मे रोजी शिवाजीच्या सूचनेप्रमाणे हेन्री ऑक्झेंडन व त्याचे दोघे अनुयायी रायगडावर जाऊन पोहोचले. एका स्वतंत्र घरांत रहाण्याची व्यवस्था केलेली आहे, असें पाहून ऑक्झेंडन यास समाधान वाटलें. गड चढत असताना ऑक्झेंडनची नजर संचारत असून गडाबाबत अनेक गोष्टी मनांत साठवीत होती. फितुरीखेरीज हा गड अभेद्य असून कोणाचे ताब्यांत जाण्याचा संभव नाही; गडावरील राजमहाल, दरबार, घरें, मिळून सुमारे तीनशे इमारती आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें [ पसासं. १६४३, १६४४, १६४५, १६४९ ].

२३ मे रोजी ऑक्झेंडनने निराजीस विनंति केली की माझी व राजाची भेट करून द्या. निराजीनेही तसा प्रयत्न करून पाहिला; पण राज्याभिषेकाची पूर्वतयारी, दोन भार्यांबरोबर विवाह इत्यादि कार्यांत तो गुंतलेला असल्यामुळे भेट होऊ शकली नाही. ता. २६ रोजी रायगडावर शिवाजी आणि ऑक्झेंडन यांची पहिली ऐतिहासिक भेट झाली. ऑक्झेंडनने राजा व संभाजी यांस नजराणा दिला. शिवाजीनेही तो आदरपूर्वक स्वीकारला व म्हटलें, 'आता तह झाला आहे; तेव्हा तुम्ही खुशाल, बिनधोक, व्यापार करा.' हेन्रीनें म्हटले, 'इतर देशांत ज्या सवलती आम्हाला मिळतात, त्या आम्हाला या राज्यांत मिळाव्यात.' शिवाजीने मोरोपंताचा हवाला दिला व त्याकडून तह पुरा करून घ्या असें सांगितलें. शिवाजीच्या भेटीस जाण्यापूर्वी केवळ अर्धा तासच मुंबईहून आलेली दरबारी खुर्ची या प्रसंगी ऑक्झेंडनने शिवाजीस नजर केली. ऑक्झेंडनने नजर केलेल्या वस्तूंची यादी पुढीलप्रमाणे—

| | | | |
|---|---|---|---|
| शिवाजीराजे यास— | १ हिरेजडित शिरपेच | किंमत | ६९० रुपये |
| | २ हिरेजडित सलकडी | ,, | ४५० ,, |
| | २ मोती | ,, | ५१० ,, |
| | | | १६५० रुपये |
| संभाजीस— | २ सलकडी | किंमत | १२५ रुपये |
| | १ कंठी ८ हिऱ्यांची | ,, | २५० रुपये |
| | | | ३७५ रुपये |
| मोरोपंतास— | २ मोत्ये | किंमत | ४०० रुपये |
| अण्णाजी पंडितास— | २ सोन्याचे गोफ ७ तोळे | ,, | १२५ रुपये |
| निराजी पंडितास— | २ पामऱ्या | ,, | ७० रुपये |
| रावजी सोमनाथ शिवाजीचा चिटणीस | २ पामऱ्या | ,, | ७० रुपये |
| | | एकूण | २६९० रुपये |

शिवाजी व संभाजी फार वेळ थांबले नाहीत. मोरोपंताचा हवाला देऊन राजे उठून महालांत गेले. ते व ब्रह्मवृंद अनेक धार्मिक विधि उरकण्यांत गुंतले. ऑक्झेंडन लिहितो, ‘आजउद्या मी प्रधानांना नजराणे देऊन तहाचे कलमावर वाटाघाटी करीन. मुंबईहून नेलेल्या मसुद्याच भाषांतर मी प्रधानाकडे दिलें आहे. मुंबईचीं नाणीं शिवाजीच्या प्रदेशांत चालू करण्याच्या कलमावर आक्षेप घेतला जाईल. राज्याभिषेकानंतर शिवाजीच स्वतः एक टांकसाळ काढणार असल्याने या कलमास संमति मिळणार नाही, असें निराजीपंताने सांगितलें. तसेंच, वादळामुळे किनाऱ्यास लागणाऱ्या आपल्या गलबतांबद्दलचें कलम आक्षेपार्ह ठरेल’ [ पसासं. १६४०, १६४३, १६४९ ].

वर दिलेल्या कलमांचे स्पष्टीकरण होणे जरूर आहे. इ. स. १६७० मध्ये मुंबईस इंग्रजांनी आपली नाणी पाडण्यास सुरुवात केली. इ. स. १६७६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीस नाणी पाडण्याचा मक्ता इंग्लंडच्या राजाने दिला. आपण जेथे जेथे व्यापार करू, तेथे तेथे नाणीं रूढ व्हावींत हा कंपनीचा हेतु होता. इ. स. १६७२–७३ मध्ये कंपनीस कोणीतरी सुचविले की मुंबईच्या सोन्याच्या नाण्यास कॅरोलिना, रुप्याच्या नाण्यास अँजेलिना, तांब्याच्या नाण्यास कॉपेरून व जस्ताच्या नाण्यास टिनी अशीं नावें द्यावींत. शिवाजीच्या राज्याभिषेकाचे वेळी कंपनी चार धातूंचीं चार प्रकारचीं नाणी पाडू लागलीं होतीं. इंग्रज–मराठे तहाने कंपनीच्या नाण्यांस शिवाजीच्या प्रदेशांत कायदेशीर चलन म्हणून मान्यता मिळावी असा

मुंबईकर इंग्रजांचा आग्रह होता [ BBD. पृ. ८३ ]. दुसरें कलम गलबतां संबंधाचें होतें. ज्या राज्याशी कंपनीचा व्यापार व्हावयाचा, त्यांतील सत्तेचीं गलबतें असणार. अशीं गलबतें वादळांत सापडून फुटलीं व कंपनीच्या बंदरांत लागलीं, अगर कंपनीच्या हातीं आलीं, तर तीं गलबतें परत करण्यास कंपनी तयार होतीं; आणि कंपनीचीं गलबतें वादळांत सापडून त्याची तीच गत झाल्यास शिवाजीने तीं परत करावींत असें कंपनीचें म्हणणें होतें. मोगली व आदिलशाही किनाऱ्यावर तशी सवलत कंपनीने मिळविली होती. शिवाजीचें म्हणणें असें होतें की ही सवलत आम्ही तहाने कंपनीस दिली, तर तीच सवलत आम्हास पोर्तुगीस व फ्रेंचांसही द्यावी लागेल. निराजीने ऑक्झेंडन यास सांगितलें की या बाबत शिवाजीचें मन कधीतरी वळवता येईल. एवढें खरें की इंग्लिशांची अशी गलबतें परत करण्याचें शिवाजीने मान्य केलें नाही [ BBD. पृ. १३२; पसासं. १६४३, १६५०; कु गॅ पृ. ३६७; हिंसावि. पृ. १००; शशि. पृ. २५४ ]. या वेळीं मुंबईस असलेल्या फ्रायरने राज्याभिषेक व तह यावर बरेंच लिहिलें असलें, तरी गलबतांच्या कलमांचा निर्देश त्याने केलेला नाही [ कु. गॅ. पृ. ३६७ टीप ].

ज्या तहाबद्दल आतापर्यंत विवेचन केलें, त्याचीं सर्व कलमें खुलासेवार पहावयाची असल्यास, ती फॅक्टरी रेकॉर्डस् , मुंबई, भाग ६ वा, पृ. १२४ ते १२८ वर अगर शिवकालीन पत्रसारसंग्रह पत्र १६४१ मध्ये वाचकास पहाता येतील. एकूण कलमें अशीं– ( १ ) आजपासून शिवाजी राजे व ईस्ट इंडिया कंपनी यांचा पक्का व अभंग सलोखा असावा ( २ ) उभयतांत शत्रुत्व नसावें. उभयपक्षी कोठल्याही भागांत लूट करणें, छापे घालणें इत्यादि प्रकारचें नुकसान करू नये ( ३ ) शिवाजीच्या राज्यांत इंग्रजांस संचार, रहाणें व व्यापारास पूर्ण स्वातंत्र्य असावें. इंग्रजांनी नित्याच्या जकाती द्याव्यात. शिवाजीच्या प्रजेस मुंबई बेटावर त्याच सवलती असाव्यात ( ४ ) अडचणींमुळे आश्रयास आलेलीं एकमेकांचीं गलबतें एकमेकांस जकात घेतल्याशिवाय परत द्यावींत. फुटून किनाऱ्यास लागलेलीं एकमेकांची गलबतें एकमेकांस परत द्यावींत ( ५ ) जकातदारांनी एकमेकास बक्षिसें इत्यादि प्रकारे लुबाडू नये ( ६ ) शिवाजीच्या प्रदेशांत इंग्रजांवर अन्याय झाल्यास त्वरित न्याय मिळावा. तसाच त्वरित न्याय शिवाजीच्या प्रजेस इंग्रज प्रदेशांत मिळेल ( ७ ) खाजगी व्यक्तींच्या आगळिकीमुळे सलोखा बिघडू नये. गुन्हेगारास शिक्षा व्हावी. जप्तीसारखा प्रकार होऊ नये ( ८ ) मोगल वगैरेच्या प्रदेशांतील इंग्रजी वखारी शिवाजीने लुटू नयेत, उलट वाचवाव्यात ( ९ ) समुद्रांत पकडलेला एकमेकांचा माल एकमेकांनी परत द्यावा ( १० ) इंग्रजानी राजापुरास वाटेल तेव्हा रहावें. राजाने त्यास स्वखर्चाने वखारी-

साठी घर द्यावें. एकदा जकात दिल्यावर पुन्हा अन्यत्र त्याच मालावर जकात घेऊ नये ( ११ ) आयात मालावर इंग्रजास २॥ टक्के जकात असावी. लाकडावर जकात असू नये ( १२ ) इंग्रजास खरेदीविक्रीवर बंधनें नसावींत ( १३ ) देशी व्यापाऱ्यास खरेदीविक्रीच्या बाबतींत इंग्रजाशी केलेले करार पाळण्यास शिवाजीच्या अधिकाऱ्यांनी भाग पाडावें. तसें न केल्यास कर्जफेड व करारपूर्ति होईपर्यंत इंग्रजांनी देशी गुन्हेगारास आपल्या घरांत अडकवून ठेवावें ( १४ ) राजापूरच्या वखारीच्या दुरुस्तीचा खर्च शिवाजीस मिळणाऱ्या जकातीतून इंग्रजांनी करावा ( १५ ) इंग्रजाचें युरोपियन शत्रूशी युद्ध जुंपल्यास शिवाजीने त्यास मदत करू नये. त्याचेपासून इंग्रजी मालमत्तेचे व लोकांचें त्याने संरक्षण करावें. त्यांची इस्टेट जप्त होऊ देऊ नये व शिवाजीच्या प्रदेशांत तसें होऊन नुकसान झाल्यास शिवाजीने भरपाई करावी ( १६ ) इंग्रजवखारीत शिवाजीच्या कोणाही अधिकाऱ्याने जबरदस्तीने शिरू नये. देशी गुन्हेगारास शिवाजीने शिक्षा करावी. इंग्रज गुन्हेगारास गव्हर्नरच्या स्वाधीन करावें ( १७ ) शिवाजीचे इंग्रजप्रदेशांत पळून गेलेले नोकर इंग्रजांनी परत द्यावेत ( १८ ) मुंबईजवळच्या मराठी प्रदेशांतून इंग्रजास सर्पण मिळावें ( १९ ) परस्परांची नाणीं परस्परांच्या प्रदेशांत चालावींत ( २० ) इंग्रज मुंबईच्या लोकास ज्या सवलती देतील, त्या शिवाजीनेही द्याव्यात.

या तहनाम्यांत वीस कलमें असलीं तरी तीं सर्व मिळून चारच कलमें आहेत असा रियासतकाराचा अभिप्राय आहे. चार कलमांपैकी दोन कलमें शिवाजीने मान्य केलीं व दोन फेटाळून लावलीं. शिवाजीने मान्य केलेलीं कलमें ( १ ) महाराजांच्या राज्यांत इंग्रजानी व्यापार करावा ( २ ) व्यापारी मालावर त्यास जकात माफ असावी. बाकी दोन कलमें शिवाजीने फेटाळली; तीं नाणीं व किनाऱ्यावरील वादळांत सापडलेलीं गलबतें याबद्दची होत. [ शशि. पृ. २५४; हिंसावि पृ. १००; पसासं. १७३७; राखं. ८ ले. २९ ]. नाण्याच्या बाबतींतही शिवाजीने प्रत्यक्ष विरोध केला नाही, ही गोष्ट इंग्रजांनी समाधानाची मानावी, असें निराजीने ऑक्झेंडन यास सांगितलें [ पसासं. १६४३ ]. शिवाजीचें म्हणणें असें होतें की, इंग्लिशांचीं नाणीं चांगलीं असलीं, म्हणजे त्यांतील धातूची किंमत व नाण्याची छापील किंमत ही योग्य प्रमाणांत असली, तर लोक आपखुशीनेंच तीं घेतील; त्यास आपण उत्तेजन न दिलें तरी विरोध करणार नाही. बंदराशिवाय इतरत्र विनाजकातीने व्यापार करण्याची सवलत इंग्रज मागत होते, ती शिवाजीस पसंत नव्हती. आदिलशहाने राजापूर येथे वखार घालताना ज्या सवलती कंपनीस दिल्या, तेवढ्या सवलती देण्यास शिवाजी तयार होता. शिवाजीच्या मतें त्या सवलती थोड्या नव्हत्या. इंग्रजांच्या व्यापाराच्या वस्तु मिरी,

सुपारी, नारळ यांचा पुरवठा त्यास बंदरांत पुरेसा आहे, असें शिवाजीचें म्हणणें होतें [ पसासं. १६५० ].

तह पुरा करून घेण्याबद्दल ऑक्झेंडनने नारायण शेणवी आणि निराजी पंडित यांचेमागे निकड लावली. निराजी आपणास अनुकूल आहे, असें पाहून ऑक्झेंडनने त्यास एक आंगठी भेट म्हणून दिली. तहाचें काम लवकर उरकावें, म्हणून कोणास काय नजराणे द्यावेत, याबद्दल त्याने निराजीजवळ चर्चा केली. निराजीने सांगितलें की ऑक्झेंडनने मोरोपंताकडे स्वतः जाऊन नजराणा द्यावा. इतर प्रधानांकडे नारायण शेणवी याचेमार्फत नजराणे धाडून भागेल. मोरोपंतास चार पामऱ्या, दत्ताजीपंत वाकेनिविस यास १२५ रुपयांची आंगठी, डबीर यास चार पामऱ्या, शामजी नाईक मुद्राधिकारी व आण्णाजी पंडित यास प्रत्येकी चार पामऱ्या दिल्यास बरें, असें निराजीने ऑक्झेंडन यास सांगितलें; त्याप्रमाणे ऑक्झेंडनने केले. प्रल्हाद निराजी बरोबर जाऊन त्याने मोरोपंताची भेट घेतली व त्यास नजराणा दिला [ कु. गॅ. पृ. ३६७; पसासं. १६४३, १६४९ ].

राज्याभिषेक झाल्यावर ऑक्झेंडनने निराजी पंडिताच्या पाठीशी लकडा लावला की आता यावर राजाची संमतिदर्शक सही घ्या. तहाच्या कलमांचे कागद त्याने सतत आपल्याजवळ बाळगले होते. ता. ११ जून रोजी शिवाजीने तहावर आपल्या मान्यतेची निदर्शक म्हणून सही केली. ता. १२ जून रोजी त्यावर सर्व प्रधानांच्या सह्या झाल्या. ऑक्झेंडन निराजी पंडिताच्या घरी गेला; निराजी व ऑक्झेंडन यांचें जें भाषण झालें, तें स्नेहपूर्ण होतें. कलमाचे उतारे करणे इत्यादि कामगिरी निराजीच्या पुतण्याने केली असल्याने ऑक्झेंडनने त्याला एक पामरी दिली.

प्रसन्न मनाने, ता. १३ जून रोजी ऑक्झेंडन रायगडवरून निघाला व ता. १६ रोजी मुंबईस येऊन दाखल झाला [ पसासं. १६४३ ]. शिवाजीसारख्या स्वातंत्र्य जाहीर करणाऱ्या राजाबरोबर स्वतंत्र रीतीने, बरोबरीचा तह करण्यांत ऑक्झेंडनचा मोठा राजनैतिक विजय होय !

# ६ रायगडवरील पहिला राज्याभिषेक

महाराष्ट्रांत पैठण हें १४ व्या व १५ व्या शतकांत विद्वानांचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध होतें. भट्ट आणि शेष हीं तेथील दोन घराणीं तत्कालीन विद्वानांत विशेष मान्यता पावलीं होतीं. भट्ट घराण्यांतील गोविंदभट्ट १६ व्या शतकाच्या आरंभी पैठणहून काशीस जाऊन राहिला. त्याचेपासून ५ वा पुरुष गागाभट्ट जन्मला. गागाभट्टाने धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. राजपुतान्यांत अभिषेकसमारंभ होत, ते भट्ट घराण्यांतील विद्वानांचे हातून करविण्याचा प्रघात होता. काशींत धर्मसभा भरत; त्यांत अग्रपूजेचा मान भट्ट घराण्यास मिळे. या घराण्याने काशी येथे एक विद्यापीठ चालविलें व शिवाजीचे काळांत या विद्यापीठाचें कुलगुरुपद गागाभट्टाकडे आलें; त्यामुळे एक गुरुशिष्यपरंपरा उत्पन्न झाली.

अकबरच्या कारकीर्दीत कृष्ण नरसिंह शेष या ग्रंथकाराने काशी येथे शूद्राचारशिरोमणी हा ग्रंथ परिश्रमपूर्वक तयार केला. त्यांत त्याने सिद्धांत मांडला की कलियुगांत क्षत्रिय उरले नाहीत; परशुरामाने सर्व पृथ्वी निःक्षत्रिय केली असल्याने भारतांत हिंदूमध्ये चातुर्वर्ण्यापैकी ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्वांत आहेत. सामान्य लोकांची भावनाही तशीच होती. त्यामुळे शिवाजीचें क्षात्रियत्व पुराणमतवादी ब्राह्मणांस मान्य नव्हतें. वस्तुतः शिवाजीने आपल्या कृतीने आपलें क्षत्रियत्व सिद्ध केलें असताही तें गतानुगतिकत्वामुळे मान्य होण्यातलें नव्हतें. महाराष्ट्रांत अनेक शतकांत राज्याभिषेक झाला नव्हता व अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणभारतांतील आक्रमणानंतर असा राज्याभिषेक करण्याची पात्रता असलेलीं विद्वान्, धर्मविद् माणसेंहि उरलीं

नव्हतीं. पैठण, पंढरपूर इत्यादि जागीं असलेलीं विद्यापीठें नाहीशी होऊन विद्वान् लोक काशीक्षेत्रीं जाऊन रहावयाची प्रथा व परंपरा उत्पन्न झाली होती. देव, धर्माधिकारी, शेष, भट्ट, मौनी हीं घराणीं मूळ महाराष्ट्रांतील; पण ती मान्यतेने काशीक्षेत्रीं नांदत असून वेदविद्या महाराष्ट्रांत लुप्त झाल्यासारखें झालें. सारांश, महाराष्ट्रांत नुसती घटपटादि खटपट राहून गंगेच्या काठीं मात्र, तिला नवें प्रागतिक जीवन प्राप्त झालें होतें.

शिवाजीच्या मनाला शेषांचें तत्त्वज्ञान मानवणारे नव्हते; एवढेच नव्हे तर असलें पुराणें, एकांगी, अप्रागतिक तत्त्वज्ञान जाहीररीत्या निषिद्ध मानलें पाहिजे, असा त्याचा ठाम ग्रह झाला होता. श्रीकृष्णाने भगवद्गीतेच्या रूपाने सांगितलेलें चातुर्वर्ण्य पुन्हा प्रस्थापित करण्याची शिवाजीची भावना होती; म्हणून त्यानें आपलें क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठी राजपूतांपासूनची आपली वंशावळ प्रथम तयार केली. भारतांत जर क्षत्रियच नाहीत, तर भारतीय राज्यच करू शकत नाहीत; पर्यायाने, भारतांतील लोक स्वतंत्र नांदू शकत नाहीत; त्यांनी क्षत्रियांभावी परतंत्र, गुलामच राहिलें पाहिजे, हा व्यामोह शिवाजीस नाहीसा करावयाचा होता व शूद्राचारशिरोमणीमधील तत्त्वज्ञानास कायमची मूठमाती द्यावयाची होती.

गागाभट्ट व त्याच्या शिष्यपरंपरेने नेमकें हेंच कार्य केलें होतें. त्यांनी कृष्णशेषाच्या मतांचें पूर्ण खंडन केलें. नीलकंठभट्टकृत व्यवहारमयूख, कमलाकरभट्टकृत निर्णयकमलाकर ऊर्फ निर्णयसिंधु, दिनकरभट्टकृत दिनकरोद्योत इत्यादि अनेक ग्रंथ गागाच्या विद्वत्परंपरेंत तयार झाले व त्यांनी कृष्णशेषाच्या मतांचें अत्यंत मार्मिक खंडन केलें.

शिवाजीच्या मनांत राज्याभिषेकाची इच्छा इ. स. १६७३ पासून तीव्रतेने येत होती. त्याने बाळाजी आवजी चिटणिस, केशवभट्ट पुरोहित, भालचंद्रभट्ट, सोमनाथभट्ट कात्रे यांस उदेपूर येथे व जेथे जेथे अजून क्षत्रियवंश धुगधुगी धरून होता, तेथे तेथे धाडलें. यांत त्याचा स्पष्ट हेतु असा होता की, महाराष्ट्रांत क्षत्रिय वंश नष्ट झाला नसून तो अजून कायम आहे, हें सिद्ध करता यावें. सदर ब्राह्मण मंडळी बाळाजीपंत चिटणीसाच्या प्रमुखत्वाखाली उत्तर हिंदुस्थानांत हिंडली. बाळाजीपंत मुत्सुद्दी तर होताच; पण लोकांतील धर्मविषयक अज्ञान नष्ट करून क्षत्रियत्वाला उज्ज्वल स्वरूप द्यावें या कल्पनेला उठाव देण्याची शिवाजीची जी कल्पना होती, तिचा तो मोठा पुरस्कर्ता होता. तेव्हा, या मंडळाला विश्वेश्वर ऊर्फ गागाभट्ट याची भेट घेणे क्रमप्राप्तच होतें. शिवाय, गागाच्या परंपरेंत तयार झालेल्या पांडित्यपूर्ण प्रगत ग्रंथांतील विचारांनी अनेक विद्वानांच्या मनाची त्यावेळी पकड

घेतली होती. आजही हिंदु कायद्याचा सखोल अभ्यास करणारा विद्यार्थी या ग्रंथांतील विचारप्रणाली समजून घेतल्याशिवाय अभ्यासु ठरू शकत नाही.

गागाने कायस्थधर्मप्रदीप नावाचा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्याने शूद्राचारशिरोमणि या ग्रंथांतील मतांचा पुन्हा एकदा समाचार घेतला असून कायस्थ हे क्षत्रिय होत, असा निर्वाळा दिला आहे. बाळाजीपंत कायस्थ असल्याने, त्याच्या मनाने गागाकडे का ओढ घेतली हें स्पष्ट ध्यानी येईल. शिवाजीने गागाभट्टाशी राज्याभिषेकाबाबत विचारविनिमय केला व त्यास अभिषेकार्थ रायगडावर बोलाविलें. गागास शिवाजीचा लौकिक व पराक्रम ठाऊक होता. त्याने दक्षिणेंत येऊन ठिकठिकाणच्या विद्वानांचे अनुमतीने हा राज्याभिषेक सिद्धीस न्यावयाचें निश्चित केलें.

प्राचीन काळच्या राजधान्या देवगिरि, विजयनगर वगैरे दुर्भेद्य ठिकाणी करण्यात आल्या. त्या प्रथातीस अनुसरून शिवाजीने रायगड राजधानीसाठी पसंत केला. हिंदुराजांची जुन्या काळची राज्यारोहणाची पद्धति नष्ट झाली होती; तिचा शिवाजीने पुनरुद्धार करून भारतांतील एक स्वतंत्र हिंदु राजा म्हणून स्वतःस राज्याभिषेकाने जाहीर करण्याचें ठरविलें. शिवाजीपूर्वी अनेकांनी राजा ही पदवी घेतली होती व मुसलमान सत्तांनी तशी दिली होती. पण त्या पदव्या स्वातंत्र्यनिदर्शक नव्हत्या. पदवीधर राजे बरोबरीच्या भूमिकेवरून तह करू शकत नव्हते. आपण स्वयमेव नरेंद्रता अशा स्वरूपाचे राजे आहोत, असें शिवाजीस जाहीर करावयाचें होतें. मराठा सरदारास 'स्वतंत्र' या शब्दांतील अर्थाची कल्पनाच त्या काळी नव्हती. ते विजापूरकरांच्या अधिसत्तेखाली नांदत असूनही आपणास स्वतंत्र समजत व त्याचे हुकूम पाळीत! स्वतंत्र म्हणजे दुसऱ्याचे हुकूम पाळणारा नव्हे, ही कल्पना त्यास शिवाजी शिकविणार होता. स्वतंत्र राजा सैन्य जमा करतो, कर लादतो, स्वाऱ्या करतो, बरोबरीच्या नात्याने तह करतों, न्यायनिवाडे देतो; या सर्व गोष्टींचा मूलभूत हक्क प्राप्त होतो, तो राज्याभिषेकाने, हें त्यास तत्कालीन मांडलिकास शिकवावयाचें होतें आणि 'सिंहराशीत'* सूर्याचें परिभ्रमण चालू झालें, त्यावेळी इ. स. १६७४ जून ५ या दिवशी ती कल्पना प्रत्यक्षांत आणली [ शशि. पृ. १५९, १६०, १६२; NHM I पृ. २०७ ते २११ ].

शिवचरित्राचे तत्कालीन महत्त्वाचे आधार दोन. ( १ ) सभासदाची बखर ( २ ) एक्याण्णव कलमी बखर-यांतून या प्रसंगाची वर्णनें आलीं आहेत. सभा-

* राज्याभिषेक शनिवारीं झाला. त्या दिवशीं ६ जून ही तारीख होती. त्यावेळी सूर्य सिंहराशींत नसून मिथून राशींत होता. तेव्हा सरदेसायांचें विधान सर्वस्वी चूक. पहा जेधे शकावलि व पिले जंत्री.

सदाचें लेखन असें - 'वेदमूर्ति राजेश्री गागाभट्ट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोसावी थोर पंडित; चार वेद, सहा शास्त्रें, योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येने निपुण, कलियुगींचा ब्रह्मदेव असे पंडित; यांस राजे व सरकारकून सामोरे जाऊन भेट घेऊन सन्माने आणिले. त्यांची पूजा नानाप्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन, द्रव्यहि उदंड देऊन पूजिलें. गागाभट्ट बहुत संतुष्ट जाहले. भट गोसावी यांचे मतें मुसलमान बादशाहा तख्तीं बसून, छत्र धरून पातशाही करितात आणि शिवाजीराजे यांणींही चार पातशाही दबविल्या आणि पाऊण लाख घोडा, लष्कर, गड, कोट असें असता त्यांस तख्त नाही; याकरिता मऱ्हाटा राजा छत्रपति व्हावा असें चित्तांत आणिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करिता सर्वांचे मनास आलें तेव्हां भट गोसावी म्हणू लागले की तख्तीं बसावें. शिसोदे उत्तरेकडून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियाचें घराणें शोधिलें. शुद्ध क्षत्रिय आर्षी केला. अपार द्रव्यधर्म केला. कुल् आपले देशांतून, परदेशांतून वैदिक ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्वही समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले' [ पृष्ठ ६४ ].

एक्याण्णव कलमी बखरींत पुढील मजकूर आला आहे — 'रायगडास इमारती, सरकारकुनांचे वाडे, दुकानांची चिरेबंदी करविली. आपणांस महालाचे अष्टकोनी, बिछाने बसावयाचे व विवेकसभा व कल्याण महाल व प्रगटसभा व दप्तर महाल व खासे मंदिर व अष्ट महाल व अष्टकुल वधस व राजकुंवरास राजकन्येस महाल बांधून दिले. सिंहासनारूढ झाल्यावर छत्र धरिलें. दानधर्म बहुत केला. नितळपुरी गोसावी बाराणसीहून आले; त्यांचा उपदेश घेऊन संगमेश्वरी ठेविले. परमानंद गोसावी पोलादपुरी ठेविले. ते बावा बहुत सिद्ध होते व मोहनी बावा, त्रिंबक नारायणाश्रम असे थोर सत्पुरुष होते; त्यांची मर्यादा राखून ज्याचेप्रमाणे साहित्य करून देऊन समाधान करून ठेविलें'[1] [ एक्याण्णव कलमी बखर कलम ५७ साने व सरकार प्रत पृ. १०५, १०६ ].

इ. स. १६७३-७४ मध्ये रामाजी दत्तो हा रायगडवरील रत्नशाळेचा अधिकारी होता. त्यास सांगून शिवाजीने सिंहासन तयार करविलें [ शिचसाखं. १० लेख ४१ ].

---

१ हा मजकूर एक्याण्णव कलमी बखरीच्या बाकीच्या प्रतीत नाहीं.

राज्याभिषेकापूर्वी ६ मार्च १६७४ रोजी शिवाजी एकदा कोकणांतून हिंडून रायगडास परत आला. [ पसासं. ले. १६१८ ]* त्याने आपलें बरेंच सैन्य यावेळी चिपळूण येथे ठेविलें. सैन्यावरील अधिकाऱ्यास सक्त सूचना दिल्या. त्याने एकदा लष्कराची नीट पहाणीही केली. नंतर परशरामक्षेत्रीं जाऊन पूजा करून शिवाजी ता. १४ मे रोजी[1] रायगडावर आला. प्रतापराव गुजर नुकताच मरण पावला होता. त्याचें सेनापतिपद त्याने हंबीरराव मोहित्यास दिलें. अनाजी रंगनाथ मलकरे हा पुरंदर किल्ल्यावर सबनीस होता. त्याला हंबीरराव मोहित्याची मजमू रायगडवर सांगितली. सालेरच्या रणांगणावर हंबीररावाने विजय मिळविला होता; त्याबद्दल प्रसन्न होऊन शिवाजीने त्यास वस्त्रेंभूषणें दिलीं [ पसासं. १६४३; शशि. पृ. १६०; एक्याण्णव कलमी बखर कलम ७१ व ८६ भारतवर्ष व राजवाडे प्रती; NHM I पृ. २११ ].

ता. १९ मे रोजी, राज्याभिषेकादि विधिपूर्वी, प्रतापगडच्या भवानीचें दर्शन घेण्यासाठी शिवाजी रायगडावरून निघाला. त्याने तीन मण सोन्याचें म्हणजे ५६ हजार रुपये किमतीचें छत्र तिला अर्पण केलें. ता. २१ रोजी तो प्रतापगडावरून रायगडास परत आला [ पसासं. १६४५, १६४९; NHM I पृ. २११ ].

ता. २९ मे पूर्वी शिवाजीने राज्याभिषेकाची तयारी सूक्ष्म तपशिलासह परिपूर्ण केली. ब्राह्मण व विद्वान भट्ट सहकुटुंब, सुमारे ११ हजार लोक, यावेळी रायगडावर जमा झाले होते. शिवाजीने मुख्य विद्वान् गृहस्थांना आपला हेतु सांगितला. क्षत्रिय वर्णांत प्रवेश केल्याशिवाय आपणास मुकुट धारण करता येणार नाही असें त्यांनी सांगितलें. मग शिवाजीने त्यास, मला क्षत्रियत्व द्यावें म्हणून विनंति केली. भोसले क्षत्रियवंशज आहेत असें शिवाजीचें म्हणणें होतें. आपण जुलुमाने राज्यकारभार करणार नाही, असें त्याने वचन दिलें. मग ज्येष्ठ शुद्ध ४, घटि ५, आनंदनाम संवत्सर शके १५९६, म्हणजे २९ मे १६७४ रोजी शिवाजीची समंत्रक मुंज झाली. जन्मापासून जे जे संस्कार लुप्त झाले होते, त्याबद्दल त्यास प्रायश्चित्त देण्यांत आलें. नंतर पुण्याहवाचन, होम, शांति, इत्यादि विधि झाले. ता. २९ रोजी प्रथम एक उंबराचें लाकूड कोरून, त्यांत तूप घालून त्यायोगे त्याचा पुनर्जन्मसंस्कार करण्यांत आला. मग त्याला समारंभपूर्वक क्षत्रिय करून घेतलें. आपणास ब्राह्मणाचा आचार ( म्हणजे गायित्री मंत्र ) शिकवावा, अशी इच्छा त्याने प्रदर्शित केली. एका मुख्य ब्राह्मणाने

* १८ मार्च १६७४ रोजीं त्याची भार्या [ काशीबाई ] रायगडावर मरण पावली; त्यास झालेलें दुःख त्याने आवरलें [ पसासं. ले. १६२५ ].

१ सरदेसायांची ११ मे ही तारीख चूक; तिला आधार नाही.

( गागाभट्ट ) त्यास संमति दिली. शिवाजीने त्यास ७ हजार होनाची देणगी दिली. मौंजीबंधनाच्या संस्काराप्रीत्यर्थ १७ हजार होन दक्षिणा इत्यादीच्या स्वरूपाने अर्पण केलें. यावेळी शिवाजीचें वय ४५ वर्षांचें होतें. [ पसासं. १६८४; शि. च. प्र. पृ. २७, ५२, ६४; शि.च.सा. खं. १० ले. ४१; एक्याण्णव कलमी बखर कलम ८७ पृ. १४९, १५० भारतवर्ष व फॉरेस्ट प्रती; स. ग. जोशी अप्रकाशित कागद–भा. इ. सं. मं. २०।५१७६; शशि. पृ. १६०; NHM I पृ. २११; भा.इ.सं.मं. वार्षिक इतिवृत्त शके १८३६ पृ. २४ ]. त्याच दिवशी शिवाजीची सुवर्ण–तुला झाली. राजाचें वजन १६००० होन झालें. त्यात एक लक्ष होनाची भर घालून राज्याभिषेका-निमित्त जमणाऱ्या ब्राह्मणास दान करावयाचें त्याने ठरविलें. [ पसासं. १६४३ ] *

ता. ३० मे, ज्येष्ठ शु॥ ६ शनिवार या दिवशी शिवाजीने सोयराबाईशी समंत्रक विवाह केला. त्यायोगे राज्याभिषेकाचे वेळी पट्टराणी म्हणून अभिषिक्त होण्याचा अधिकार तिला प्राप्त झाला[1] [ शि.च.प्र. पृ. २७, ५२; ६४; शशि. पृ. १६०; NHM I पृ. २११; एक्याण्णव कलमी बखर कलम ८७ पृ. १४९, १५०; भारतवर्ष व फॉरेस्ट प्रती ].

---

* जूनमध्ये झालेल्या राज्याभिषेकाची हकीकत डच कंपनीने वेंगुर्ल्याहून आक्टोबरमध्ये बटेव्हियास कळविली. ( पत्र उशीरा पोहोचलें असावें. ) त्या हकीक-तींत सुवर्णतुलेची तारीख ४ जून दिली पण ती चूक होय. ऑक्झेंडनने गडावरच प्रत्यक्ष राहून लिहिलेली हकीकत चक्षुर्वैसत्यम् असणार. तेव्हा त्याची २९ मे हीच तारीख ग्राह्य आहे. शिवाय, डच कंपनी त्याचें वजन १७ हजार होन सांगत आहे; येथेही तपशिलांत तफावत आहे. पण डच कंपनीचा पुढील मजकूर ध्यानी घेण्या-सारखा आहे—

शिवाजीने स्वतःची सुवर्णतुला केली. त्याचप्रमाणे चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसें, लोखंड, ताग, कापूर, मीठ, खिळे, जायफळें, जायपत्री, मसाले, लोणी, साखर, सर्व प्रकारची फळें, खाद्यें, ताडीसुद्धा नानाविध वस्तूंच्या तुला करून त्या सर्वांचा धर्म करून टाकला. शिवाजीने जाळपोळ केली; त्यांत स्त्रिया, मुलें, पशु, ब्राह्मण यांची हत्या झाली असण्याचा संभव होता. त्या पापाच्या क्षालनार्थ दोघा ब्राह्मणाच्या सूचने-वरून आणखी १६०० होनाचें दान करण्यात आलें [ पसासं. १६८४; कु. गॅ. पृ. ३६७].

१ सरदेसाई ता. ३१ मे १६७४ देतात पण ज्येष्ठ शु॥ ६ शनिवार या दिवशी खरे जंत्रीप्रमाणे ३० मे ही तारीख येते. त्यादिवशी पंचमीसह षष्ठी आहे, तेव्हा वार प्रमुख धरून ३० मे हीच तारीख पाहिजे.

५ जून १६७४ रोजी निराजीपंताने ऑक्झेंडन यास सांगितलें की उद्या सिंहासनारोहण होईल व दरबार भरेल. त्यावेळी शिवाजीला मुजरा करण्यास व नजराणा अर्पण करण्यास तुला जावयास पाहिजे. त्याप्रमाणे ज्येष्ठ शु॥ १३ उजाडता शनिवार या दिवशी ३ घटका रात्र उरली असता पहाटेस राज्याभिषेकाचा विधि सुरू झाला. मुसलमानी कालगणनेप्रमाणे १० रबिलवल, खमस सबैन आलफ हा दिवस होता. घटी २१, पळें ३४, विकला ३८।४० सी ४२ हा समय होता. आरंभींचे सर्व संस्कार होऊन गेले होते. राजा सिंहासनाधिष्ठित झाला. त्याचे मस्तकावर छत्र धारण करण्यांत आलें. त्याने उंची वस्त्रें व अलंकार धारण केले होते. त्याचे कुलगुरु प्रभाकरभट्ट यांचे पुत्र बाळंभट्ट यांनी या प्रसंगीं महत्त्वाचीं धार्मिक कृत्यें त्याजकडून करवून घेतलीं. सभोवार अष्टप्रधान आपापल्या चिन्हांनीं युक्त होऊन अष्ट दिक्‌भागीं विराजमान झाले. आसमंतभागीं कोशशालांचे अधिकारी, सुहृज्जन, सेनाधिकारी वगैरे नियुक्त स्थलीं उभे होते.

सभासदाने या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे– तख्त सुवर्णाचें बत्तीस मणांचें सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं, त्यामध्ये शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें जडाव केलीं. सप्त महानदीयांचीं उदकें व थोर थोर नदीयांचीं उदकें व समुद्राचीं उदकें, तीर्थक्षेत्रें नामांकित तेथील तीर्थोदकें आणलीं. सुवर्णाचे कलश केले. सुवर्णाचे तांब्रे केले. आठ कलश व आठ तांब्रे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियांस अभिषेक करावा, असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला.

ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्रीमहादेव व भवानी कुलस्वामी, उपाध्ये प्रभाकरभटाचे पुत्र बाळंभट कुलगुरु व भट गोसावी ( गागा ), वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची सर्वांची पूजा यथाविधि अलंकार वस्त्रें देऊन, सर्वांस नमन करून अभिषेकाचे सुवर्ण चौकीवर बैसले. वेदमूर्ति गागाभट्ट यानी बाळकृष्ण भट क्रमवंत ( अलीबाग तालुक्यांतील नागाव येथे रहाणारे ) यांचा वाराणशी क्षेत्रीं विवाह केला; तेही महाराज शिवछत्रपति यांच्या सिंहासनप्रसंगीं व महानुष्ठानप्रसंगीं रायगडावर हजर होते [अष्टा. क्र. घ. इति. पृ. ५]. अष्ट प्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळांचीं उदकेंकरून सुवर्ण कलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बैसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्णकमळें व नाना सुवर्णपुष्पें, वस्त्रें, उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणे षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्टखांब जडित केले, त्या स्थानीं

अष्ट प्रधानांनीं उभें रहावें' [ पसासं. १६४३, १६८४; कासंपया. पृ. ४५५, ४७५; शि.च.प्र. पृ. २७, ५२, ६४; NHM. I पृ. २११; शशि. पृ. १६०, सभासद पृ. ६४, ६५ ].

ता. ६ जून रोजी पहाटे ५ वाजता[1] शिवाजीने सिंहासनावर आरोहण केलें. जमलेल्या सर्व लोकांनी शिवराय हें नामाभिधान दिलें. त्यानंतर मुख्यप्रधान मोरो पंडित याने मुजरा करून आठ हजार होन राजाच्या शिरावर ओतले. मुख्य हिशेबनीस निळो पंडित याने सात हजार होन, आणखी दोघा प्रधानांनी प्रत्येकी पाच हजार होनांनी त्यास सुवर्णस्नान करविलें. राहिलेल्या प्रधानांनी मुजरे केले व ते सिंहासनाच्या उभय बाजूंस रांगा करून उभे राहिले. संभाजी सिंहासनाच्या पायरीवर बसला. राज्यारोहण व सुवर्णस्नानापूर्वी ता. ५ च्या उत्तररात्रीं त्याने गंगोदकाने स्नान करून प्रत्येक ब्राह्मणाला १०० होन दक्षिणा दिली. मुख्य पुरोहिताला (प्रभाकर भट्ट) पाच हजार होन व दोन हजार होनांचें वर्षासन करून दिलें [ पसासं. १६८४ ]. या प्रसंगी दक्षिणेच्या रूपाने २ लक्ष होन त्याने वाटले [ पसासं. १६५८ ]. या उत्सवाकरितां निदान २० हजार ब्राह्मण व त्याचे सर्व अंमलदार हजर होते [ पसासं. १६६१ ].

त्या इतिहासप्रसिद्ध दिवशी सकाळी ७।८ चा सुमार असताना इंग्रज कंपनीचा वकील हेन्री ऑक्झेंडन दरबारांत आला व त्याने छत्रपतीस, लवून, मानाचा मुजरा केला. त्याचेबरोबर दुभाषा नारायण शेणवीही दरबारांत प्रविष्ट झाला. नारायण शेणव्याने हिरेजडित आंगठी वर धरली व तिच्यावरून सूर्यकिरण परावर्तित झाल्याने छत्रपतींचें चित्त ऑक्झेंडनकडे वेधलें. शिवाजीने त्यास सिंहासनाच्या पायरीपाशी बोलावून घेतलें. त्याने ती आंगठी छत्रपतीस नजर केली. मग शिवाजीने पोशाख देऊन त्याची पाठवणी केली. ऑक्झेंडन थोडाच वेळ सिंहासनाजवळ होता. त्यावेळचे वर्णन करताना तो लिहितो, 'सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर अनेक अधिकार-निदर्शक व राजसत्तेचीं द्योतक चिन्हें मी पाहिलीं. उजव्या हाताला दोन मोठी, मोठ्या दाताच्या मत्स्याची सुवर्णाचीं शिरें होतीं. डाव्या हातास अनेक अश्वपुच्छें व एका मूल्यवान् भाल्याच्या टोकावर, समपातळीत लोंबणारीं सोन्याच्या तराजूचीं पारडी न्यायचिन्ह म्हणून तळपत होतीं. राजवाड्याच्या प्रवेशद्वारीं आम्ही परत आलो, तो दोन लहान हत्ती दरवाज्याच्या दोन्ही बाजूला

---

१ सरदेसाई राज्याभिषेकाची तारीख ५ जून देतात; ती ६ जून पाहिजे. वर दिलेले कासंपया, पसासं १६८४, शिचप्र. पृ. २७ इ. पहा.

झुलत होते. दोन देखणे [ पांढरे ] अश्व शृंगारलेल्या स्थितीत तेथे आणलेले दिसले. गडाचा मार्ग इतका बिकट की हे प्राणी कोठून वर आणले असावेत याचा तर्कच आम्हास करवेना ' [ पसासं. १६४३ ]. दरबार बरखास्त झाल्यावर छत्रपतींची हत्तीवरून मिरवणूक निघाली. जगदीश्वराच्या प्रासादाकडे ही मिरवणूक जात असता रस्त्याच्या कडांनी जमलेल्या प्रेक्षकांनी त्यांच्यावर सुवर्णरौप्य पुष्पवृष्टी केली व त्यांच्या नावाचा जयजयकार केला. सभासद लिहितो की या समारंभाप्रीत्यर्थ छत्रपतींनी ५ कोट रुपये खर्च केला. पण जदुनाथ सरकार यास वाटते की तो ५० लक्ष रुपये असावा.

हा सर्व समारंभ आणि सोहळा पहाण्यास वृद्ध जिजामाता हजर होती. आपला पुत्र सिंहासनाधीश्वर झालेला पहाण्याचे तिचें सुखस्वप्न साकार झालेलें पाहून तिला अनिर्वचनीय आनंद झाला. [ शशि. पृ. १६१; NHM I. २१२, २१३. ]



# ७ राज्याभिषेकानें घडविलेलीं स्थित्यंतरें

शिवछत्रपतींचा राज्याभिषेक हा एक मोठा यज्ञ होता व यज्ञापासून काही फलनिष्पत्तीची अपेक्षा असते. या महान् यज्ञांतून कोणकोणती फलनिष्पत्ति झाली, याचा आपण विचार करणार आहोत.

राज्याभिषेकाच्या पूर्वी शिवाजीने दिल्लीस आजवर झालेल्या पातशाह्यांच्या जमाखर्चाचा जाबता रायगडावर आणविला त्याचा सारांश —

दिल्लीच्या पातशाहीचे एकूण सुभे २२. त्यांचा जमाखर्च शतकोटींचा होत आला.

रु. ८९८०४६२३१ सुभे सुमार २२, एकूण जमा.

पैकीं ३३८०४६२३१ ऐन जमा.

रसदीचे ४६००००००० जकाती, समुद्रकिनारा – बंदर गलबत सुद्धा.

१००००००००० मोहतर्फा इत्यादि.

११००००००० नजराण्याचे सर्व सुभ्यांचे जमा.

खर्च ५ कोटी देवस्थानें, मशिदी इ. साठी.

६ ,, देशक, मोकदम इ. स इनाम.

३३ ,, जमीदार, गांव इ. चा खर्च.

२३ ,, वजीर, खासे उमराव यांचा खर्च. [पेद. ३१ ले. ३३]

हा जाबता दृष्टीसमोर ठेवून शिवाजीने आपल्या जमाखर्चाचीं ठळक खातीं ठरविलीं.

प्रत्यक्ष पाहून ऑक्सेंडनने शिवाजीचें शब्दचित्र रेखाटलें आहे. तो लिहितो– ' शिवाजी ४७ वर्षांचा असून देखणा होता. त्याच्या चर्येवरून त्याची बुद्धिमत्ता व चाणाक्षपणा सहज ध्यानांत येई. त्याचा वर्ण इतर मराठ्यांपेक्षा पुष्कळच गौर होता. त्याची दृष्टी तीक्ष्ण असून नाक सरळ व टोकाशी बाकदार होते. त्याच्या दाढीस निमुळतेपणा असून मिशी बारीक म्हणजे विरळ होती. त्याचे भाषण निश्चयात्मक, स्पष्ट, पण जलद होते. ' [ षष्ठसंमेलनवृत्त पृष्ठें ५७ ते ६२ ].

राज्याभिषेकाच्या वेळी मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याचा भगवा ध्वज फडकत होता. त्याला सोनेरी कापडाचा काठ लावला होता. छत्रपतींच्या मस्तकावर छत्र हें राजचिन्ह विराजत होते. फार मोठा नगारा दुमदुमत होता. मराठ्यांचा भगवा झेंडा रामदासांमुळे शिवरायांनी स्वीकारला ही कल्पना हृद्य असली, तरी सत्य नव्हे; कारण राज्याभिषेकापूर्वी शिवाजीचा ध्वज भगवाच होता. शिवाजीने आग्र्यास जाताना आपले भगवे निशाण बरोबर घेतले होते. जरीकिनारी भगवा ध्वज राष्ट्रीय उत्सवाच्या वेळी लावण्याचा ध्वज ठरला. राज्याभिषेकापूर्वी पंडितांनी जुने ग्रंथ कसोशीने पाहिले होते. उदेपूर व जोधपूर येथील परंपरा नीट लक्षांत घेतल्या होत्या. त्या ज्ञानाचा उचित उपयोग राज्याभिषेकाच्या वेळी करण्यात आला होता [ HS पृ. १६६; NHM I पृ. २१३–१४ ].

इ. स. १६४५ पासून शिवाजीच्या पत्रावर पुढील मुद्रा दिसते–

प्रतिपच्चंद्र रेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।

शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते । " राज्याभिषेकानंतरही ती कायम राहिली. त्याचप्रमाणे, ' छत्रपति ' ही किताबत शिवाजीस राज्याभिषेकापूर्वीही लाव-लेली दिसते. अर्थात् शिक्का व छत्रपतीत्व या दोन्ही गोष्टी राज्यसंस्थापनेस सुरुवात केल्यापासूनच निर्माण झाल्या असाव्यात [ NHM I पृ. १०५ ].

राज्याभिषेकापूर्वीचा शिक्का बदलून नवीन शिक्का वापरावा असे वाटत होते. त्यासाठी खालील सुंदर श्लोक कवींद्र परमानंदाने तयार केला.

श्रीशिवरूपेणोर्वीमवतीर्णोऽयं स्वयंप्रभुर्विष्णुः ।

एषा तदीय मुद्रा भूवलयस्याऽभयप्रदा जयति ॥ १ ॥

पण या मजकुराचा शिक्का तयार करून वापरण्यांत आल्याचें मात्र दिसत नाही [ ऐसंसाखं. २ रा. पृ. ६६ ].

राज्याभिषेकसमयी शिवाजीने अनेक मुलकी, लष्करी, धर्माधिकरणी, न्याया-धिकरणी कायदे केले; त्यांना पद्धति म्हणून म्हणत. जुने व प्रचलित रीतीरिवाज पाहून

या पद्धति तयार केल्या. अशा पद्धतींपैकीच लेखनप्रशस्ति म्हणून एक पद्धति शिवछत्रपतींच्या आज्ञेवरून बाळाजी आवजी चिटणीस व इतर मुत्सद्दी मंडळींच्या विचाराने रचली गेली. मुसलमानी लेखनप्रशस्तीचा शिरकाव पूर्वीच्या कारभारांत झाला होता. शिवाजीच्या राज्याभिषेकापर्यंत ही यवनभाषामय प्रशस्ति चालूच होती. यावनी पद्धति आस्ते आस्ते मोडून शुद्ध मराठी पद्धति चालू करण्याला राज्यव्यवहार कोश व लेखनप्रशस्ति हीं दोन साधनें शिवाजीनें निर्माण केली [ भाइसंमंअश. १८३२ पृ. ६०,६१ ]. या बाबत संस्कृत परिभाषा वापरण्याचा कटाक्ष शिवाजीने ठेवला व रघुनाथ पंडितास राज्यव्यवहारकोश रचण्याचा आदेश दिला. त्याने अनेक पंडित व मुख्यतः धुंडीराज लक्ष्मण व्यास यांच्या मदतीने तो कोश पुरा केला. राजव्यवहारकोशाच्या द्वारे संस्कृत शब्द प्रचारांत येऊन उर्दू व फारसी शब्द मागे पडू लागले. "सोयं शिवच्छत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निधाय मूर्ध्नि । अमात्यवर्यो रघुनाथनामा करोति राजव्यवहारकोशम् ॥ असें रघुनाथ पंडिताने स्पष्ट म्हटलेच आहे [ शशि. पृ. १६३; NHM I पृ. २१४ ते २१६ ].

राज्याभिषेकापूर्वीपासून घडत असलेल्या अनेक गोष्टींवर शिवाजीने यावेळी शिक्कामोर्तब केले. त्याचे अनेक प्रधान पूर्वी काम करीत होतेच. यावेळी अष्टप्रधानात्मक राज्यपद्धतीस त्याने कायम रूप दिले. इ. स. १६५३ मध्येच शिवाजीने स्वराज्याची कल्पना आपल्या ताब्यांतील प्रदेशात मूर्त स्वरूपांत आणली होती. नंतर स्वराज्याच्या विस्तारास प्रारंभ केला व त्यांतून राज्याभिषेकाच्या वेळचें विस्तारलेलें स्वराज्य निर्माण झालें. इ. स. १६७५ पासून १६८० च्या आरंभापर्यंत दक्षिण दिग्विजयाने, स्वराज्याच्या आणखी विस्ताराचें काम शिवाजीने तडीस नेले. म्हणजे शिवकालीन स्वराज्य एकूण तीन हप्त्यांनी सिद्धीस गेले. राज्यविस्तार होऊ लागताच शिवाजीचें प्रधानमंडळ मोठे होऊ लागले. इ. स. १६५३ मध्ये राज्यकारभारासाठी काही प्रधान शिवाजीने निर्माण केले होते. त्यांत जरूर त्या त्या प्रमाणांत वेळोवेळी वाढ होऊन यावेळी अष्ट ही संख्या त्याने कायम केली. अष्टप्रधानांनी कारभार कसा करावयाचा, हें ठरविण्यासाठी कानुजाबता शिवाजीने तयार केला. राज्याभिषेकाच्या वेळी पुढीलप्रमाणे अष्टप्रधान होते.

| सिंहासनाच्या डावीकडे | सिंहासनाच्या उजवीकडे |
|---|---|
| हंबीरराव मोहिते सरनोबत–सेनापति. | मोरोपंत पिंगळे–पेशवा–मुख्य प्रधान. |
| रामचंद्र त्रिंबक–डबीर सुमंत. | रामचंद नीलकंठ–मुज्मुदार अमात्य. |
| रावजी निराजी–न्यायाधीश. | अण्णाजी दत्तो–सुरनिस सचिव. |
| रघुनाथराव पंडितराव. | दत्ताजी त्रिंबक–वाकनीस–मंत्री. |

शके १५८४ चैत्र वा। १० पासून राज्याभिषेक होईपर्यंत मोरोपंत मुख्य प्रधान म्हणून काम करीत होता. त्यास राज्याभिषेकसमयी पंतप्रधान म्हणून कायम केले [ भाइसंमंअश. १८३४ पृ. २१४ ]. रामचंद्र त्रिंबक हा सोनोपंताचा नातु रघुनाथ पंडितराव याचे पुत्रास दानाध्यक्ष असें पद दिलें. ही अष्टप्रधानपरंपरा सामान्यपणे शाहूचे अखेरपर्यंत प्रत्यक्षांत राहिली [ NHM I पृ. १०६,१०७; शशि पृ. १६३–१६४, पसासं. १६५७; सपृ. १२२ ले. १६; सभासद पृ. ६५ ] अष्टप्रधानांचें वेतन त्याने ठरवून दिले. पंतप्रधानांचा वार्षिक पगार १५ हजार होन, पंतअमात्य यांस १२ हजार होन व इतर प्रधानांस १० हजार होन.वार्षिक वेतन कायम केलें [ NHM I पृ. २१४ ते २१६ ].

यावेळी बाळाजी आवजी चिटणीस यास महाराजांनी सांगितले की तुम्ही स्वामीसेवा केलीत; राज्याभिवृद्धीचें काम केलेंत. तुमचे श्रम फार मोलाचे आहेत. तुम्हास अष्टप्रधानांत पद देतो. पण चिटणिसांनी तें मान्य केलें नाही. त्यांनी छत्रपतींच्या घराण्याची चिटणिशी वंशपरंपरागत रहावी अशी मागणी केली. मग महाराजांनी त्यास मराठी राज्याची कारखानिशी, जमेनिशी वंशपरंपरा करून दिली. बाळाजीचा भाऊ चिमणाजी आवजी यास फडनिशी म्हणजे दप्तरचें काम सांगितलें, बाळाजीचा तिसरा भाऊ शामजी आवजी यास त्यांनी रायगडची कारखानिशी सांगितली [ पसासं. १६५४; काप्रसा. पृ. १३ ले. १; शशि. पृ. ५६; सभासद पृ. ६५ ].

राज्याभिषेकाच्या दिवशी जेधे, बांदल व मावळचे देशमुख व लोक यांनी शिवाजीस अर्ज केला की आमची सफराजी करावी. स्वामी बोलले की आधी पान मावळचें. तुमची वतनें आमचे वंशाने चालवावीं. तुमचा अन्याय झाला तरी क्षमा करून तुमचें चालवावें [ शिचप्र. पृ. २७ जेधे शकावलि ].

राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजीने ठरविलें की ब्राह्मणांपासून नीच सेवा घेऊ नये; याकरिता कारखान्यांतील ब्राह्मण दूर करून प्रभु कारकून नेमले [ ९१ कलमी बखर कलम ८७ पृ. १४९, १५० साने प्रत ].

राजाने आपल्या पुत्रास युवराजपद देताना अगर एखाद्या व्यक्तीस प्रधानमंडळांत जागा देताना कोणतीं वस्त्रें व वस्तु द्यावयाच्या, याचा रिवाज राज्याभिषेकप्रसंगी शिवाजीने ठरविला. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे–

( १ ) युवराज, पंतप्रधान व सेनापति यांस—

वस्त्रें भरगच्ची – १ मंदिल, १ चादर, १ पटका, १ किनखा पान, १ महमुदी पान – एकूण ५ वस्त्रें.

दागिने – १ शिरपेच, १ कंठी मोत्यांची, १ चौकडा, १ मोत्यांचा तुरा, १ जगा – एकूण ५ दागिने.

शिवाय - १ शिक्केकटार, १ चौघडा, १ हत्ती, १ चवरी सोन्याचा दांडा असलेली, १ ढालतरवार, १ जरीपटका, १ घोडा १ चोबदार.

( २ ) पंतअमात्य व पंतसचिव यांस—

वस्त्रें– १ मंदिल, १ चादर, १ किनखाप पान, १ महमुदी पान; एकूण ४ वस्त्रें.

दागिने– १ चौकडा, १ मोत्यांचा तुरा, १ मोत्यांची कंठी, १ शिरपेंच; एकूण ४ दागिने.

शिवाय- १ शिक्केकटार, १ चवरी सोन्याच्या दांडीची, १ ढालतरवार, १ कमलदान रुप्याच्या दांडीचें, १ हत्ती, १ घोडा.

( ३ ) सुमंत, मंत्री, न्यायाधीश, राजाज्ञा यांसही वरीलप्रमाणेच वस्त्रें ३॥ द्यावयाचें.

( ४ ) पंडितराव यांस ढालतलवारखेरीज सर्व वरीलप्रमाणे.

( ५ ) उपपंतप्रधानांस वस्त्रें साडेतीन- १ तिवट, १ दुपेटा, ॥ किनखाप, १ महमुदी पान– एकूण ३॥. याप्रमाणे सर्व उपप्रधानांस.

( ६ ) चिटणीस– वस्त्रें– १ मंदील, १ झगा, १ इजार, १ दुपेटा, १ दुमजन; एकूण ५ वस्त्रें.

दागिने– १ कंठी मोत्यांची, १ चौकडा, १ शिरपेच एकूण ३ दागिने.

शिवाय– १ कमलदान रुप्याच्या पेटीचें, १ चवरी रुप्याच्या दांडीची, १ घोडा.

( ७ ) फडणीस– वस्त्रें ३॥ वरीलप्रमाणे व कमलदान रुप्याच्या दांडीचें.

( ८ ) पोतदार– वस्त्रें ३॥ व कमलदान रुप्याच्या दांडीचें.

[ कासंपया. पृ. ३२–३३ ].

छत्रपति पद धारण करताच शिवाजीने राज्याभिषेक शक चालू केला; तो मराठी राज्याच्या सामान्यपणे अखेरपर्यंत चालू राहिला [ NHM I पृ. २१४ ते २१६ ]. सरदेसाई लिहितात, ' हा शक १०४ वर्षे चालला व इ. स. १७७७ मध्ये दुसरा शाहू गादीवर आला, त्याप्रसंगी सखाराम बापू व नाना फडणीस यांना तो गैरसोयीचा वाटला आणि त्यांनी हुकूम काढून तो बंद केला [ धडफळे यादी; शशि. पृ. १६३ ]. पण सरदेसाई यांचें हें म्हणणें सत्याच्या निकषावर टिकत नाही. रा भि. शक ११८ मधील पत्रेंही उपलब्ध आहेत. पेशव्यांचें हातीं सत्ता गेल्यावर छत्रपतींचा पत्रव्यवहार उत्तरोत्तर कमी झाला

व काही जमिनी इनाम देणे, मकरसंक्रमणाच्या तिळगुळाचीं पत्रें धाडणे, इत्यादि जुजबी स्वरूपाचीं पत्रें छत्रपति लिहू लागले व त्या पत्रांवर हा शक प्रचलित होता.

'क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर महाराज छत्रपति अशी बिरुदावली राज्यारोहणप्रसंगी शिवाजीने धारण केली. यामुळे शिवाजीचें महत्त्व राजपूतांत वाढलें; कारण ब्राह्मणांनी त्याचा जन्म राजपूत घराण्यांत झाल्याचें जाहीर केले होते [ कुगॉपृ. ३६८–३६९ ].

सभासद म्हणतो, 'पन्नास सहस्र ब्राह्मण वैदिक मिळाले. यावेगळे तपोनिधि, सत्पुरुष, संन्यासी, अतिथि, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नानाजाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न, उनफे ( शिधे ) चालविले. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट्ट अध्वर्यु; त्यास अपरिमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेतालिस लक्ष होन झाले. अष्टप्रधानांस लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्याखेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें अलंकार असें देणें दिलें. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाह. मऱ्हाटा पातशाह येवढा छत्रपति झाला; ही गोष्ट सामान्य झाली नाही' [ सभासद पृ. ६६ ].

७ जून रोजी रायगडावर सार्वत्रिक देकार सुरू झाला. योग्यतेप्रमाणे प्रत्येक ब्राह्मणास ३, ४, ५ रुपये आणि बायकामुलांना सरसकट १ किंवा २ रुपये दिले. हा दानधर्म १२ दिवस चालू राहिला व तितके दिवस भोजनें चालू होतीं. समारंभ व दानधर्म यांचा खर्च एकूण दीडलक्ष होन इतका झाला [ पसासं. १६८४ ]. या दोन उताऱ्यांवरून खर्चाचा अंदाज वाचकांनीच बांधण्याची सोय झाली आहे.


इंग्लिश वकील ऑक्झेंडन रायगडावरच, राजवाड्यापासून सुमोरे एक मैलावर रहात होता. त्याच्या भोजनादींची हकीकत फ्रायरने आपल्या पुस्तकांत दिली आहे. तो लिहितो, 'रायगडावर जे अन्न लोक खात असत, तें ऑक्झेंडन यास उल्लेखनीय वाटले. डाळ आणि तांदूळ याची खिचडी हें लोकांचें मुख्य अन्न होते. ही खिचडी लोण्यांत तयार करून लोणी घालून लोक खात होते. त्यायोगे अंगांत चरबी वाढते, असे इंग्लिश वकीलाचे म्हणणे शिवाजीच्या कानी गेलें. त्याने तात्काळ त्यास बकऱ्याचें मांस देण्याची व्यवस्था केली. एक वकील व दोघे सोबती या तिघांस दर दिवशी अर्ध्या बकऱ्याचें मांस लागे. ज्याचेकडे सागुती पुरविण्याचें काम होतें. तो यामुळे बऱ्याच फायद्याचा वाटेकरी झाला. आपलीं गिऱ्हाइकें पहाण्यासाठीं तो मुद्दाम गडावर येऊन गेला ! [ कुगॉपृ. ३६८ टीप ]

राज्याभिषेक उरकल्यानंतर ८ जून रोजी शिवाजीने रायगडावर चवथ्या भार्येशी लग्न केले [ पसासं. १६४३ ]. सोयराबाईस पट्टराणीपद मिळावे व तिला राज्याभिषे-

कार्य भाग घेता यावा, या दृष्टीने तिच्या क्षत्रियत्वासाठी झालेल्या विवाहाचा अर्थ समजतो; पण या नोंदीचा अर्थ लागत नाही.

राज्याभिषेकासाठी कोणत्या महत्त्वाच्या व्यक्ती रायगडावर येऊन गेल्या, याचा विचार करू लागल्यास गागाभट्ट व ऑक्झेंडन यांचे नंतर निश्चलपुरी गोसावी आणि भूषण कवी यांचें स्मरण होतें. निश्चलपुरी व परमानंद रायगडावर त्यावेळी असल्याचा पुरावा सापडतो. भूषण कवी त्यावेळी होताच, असा पुरावा नाही; पण त्याचें काव्य हाच पुरावा मानला, तर तो यावेळी गडावर होता, ही गोष्ट संभवनीय वाटते. त्याने आपल्या काव्यांतून रायगडचें वर्णन केले आहे.

---



# ८ भूषण कवीनें पाहिलेला रायगड

हिंदी साहित्यांत भूषण कवीचें नाव सुप्रसिद्ध आहे. त्याचें आडनाव त्रिपाठी; गोत्र काश्यप. तो कान्यकुब्ज ब्राह्मण असून त्याच्या पित्याचें नाव रत्नाकर. त्याच्या गावाचें नाव त्रिविक्रमपूर. तें यमुना नदीच्या कांठी असून सध्या त्यास टिकमापूर म्हणतात. राजा बिरबल हा टिकमापूरचाच रहाणारा. काशीविश्वेश्वरसदृश बिहारीश्वर ही तेथील ग्रामदेवता.

भूषणाने आपला प्रसिद्ध काव्यग्रंथ शिवराजभूषण यांत आरंभीच आपली जी माहिती दिली आहे, तीवरून कळते की रत्नाकरास चार पुत्र झाले– चिंतामणि, भूषण, मतिराय व नीलकंठ ऊर्फ जटाशंकर अशीं त्यांचीं नावें होत. चित्रकूट संस्थानचा सोळंखी राजा हृदयराम याचा पुत्र रुद्र याचेजवळ भूषण आरंभी आश्रयास राहिला. तेथेच त्यास भूषण हें नाव प्राप्त झालें.

शिवाजी आग्र्याहून निसटून गेल्याची बातमी कळताच भूषणच्या वृत्ति थरारल्या. त्याच्या अंतःकरणांत शिवाजीबद्दल विशेष भावभक्ती उत्पन्न झाली. या लोकोत्तर पुषारुचे दर्शन आपण घेतलेंच पाहिजे, असा ध्यास त्याच्या मनाने घेतला व चित्रकूट सोडून भूषण रायगडावर आला.

भूषणकवीने शिवचरितावर दोन काव्यें लिहिलीं आहेत. ( १ ) शिवाबावनी, ( २ ) शिवराजभूषण. शिवाबावनी हें स्फुटकाव्य असून त्यांत ५२ छंद आहेत. शिवराजभूषणमध्ये ३८२ छंद आहेत. भूषणाच्या काव्यांत उच्चप्रतीचे काव्यगुण असून त्यांत इतिहासाचा विपर्यास बहुधा नाही. शिवाजीने त्यास लाखो होन बक्षीस दिले. संपूर्णभूषण या ग्रंथांतील निवेदनाच्या भागांत संपादक श्री. काटे म्हणतात की त्याच्या

जन्म इ. स. १६३६ मध्ये झाला असावा. त्याचा अंतकाळही अनिश्चितच आहे. इ. स १६६७ ते १६७४ पर्यंत भूषण शिवाजीजवळ होता. राज्याभिषेकसमारंभ पाहून तो परत स्वदेशीं गेला. इ. स. १७०८ व १७१५ या सालांत तो पुन्हा शाहूचे भेटीस महाराष्ट्रांत आला होता.

शिवराजभूषण काव्यांतील दोहा १४ ते २४ यांचा साकल्याने विचार केला असता आपणास समजून येते की, दक्षिणेचे महत्त्वाचे किल्ले जिंकून शिवराज रायगडावर राहू लागले; रायगडास राजधानी स्थापन केली. इच्छित दान देण्याबद्दल सर्वत्र शिवरायाची कीर्ति झाली. ही कीर्ति ऐकून भूषण शिवाजीकडे आला.

भूषण रायगडावर आले व संध्याकाळच्या वेळी संध्येकरिता म्हणून एका देवळांत ( महादेव, जगदीश्वर ) उतरले. देवदर्शनाकरिता शिवराय आले, तेव्हा त्यांस समजले की हा पान्थस्थ कवि असून राजाश्रयाकरिता उत्तरेकडून दक्षिणेंत आला आहे. शिवरायाने त्याच्या काव्याचा पहिला नमुना तेथे मंदिरांतच चाखला व तेव्हापासून भूषण शिवाजीचा दरबारी कवी झाला [ शशि. पृ. २२२; संभू निवेदन पृ. १३ ते १६ ].

शिवराजभूषण काव्याच्या समाप्तीच्या ओळींवरून हें काव्य शके १५९६ मध्ये रचल्याचें स्पष्ट होत आहे. " सम सत्रहसे तीस पर सुचि वदि तेरसि भान । भूषण शिवभूषन कियो पढियो सकल सुजान ॥ १ ॥ " संवत् १७३० ज्येष्ठ व॥ १३ रविवार ही काव्यसमाप्तीची वेळ कवीने सांगितली आहे [ संभू- ( अलंकार प्रस्तावना पृ. २ ) ].

भूषणने रायगडचें वर्णन केलें आहे. दोहा १४ ते २५ मधील भाग थोडक्यांत असा —' शिवाजीने सर्व किल्ल्यांचा आधार व विलासस्थान अशा रायगड किल्ल्यास आपलें वसतिस्थान केलें. या किल्ल्यावरील शिवाजीचा दरबार व तेथील ऐश्वर्य पाहून कुबेर लाजू लागला. हा किल्ला एवढा प्रचंड आणि विशाल आहे, की त्यांत तीनही लोकींचें वैभव साठविलें आहे. किल्ल्याखाली भूभाग जलमय पाताळाप्रमाणे, माची म्हणजे पायथ्याचा उंचवट्याचा भाग पृथ्वीप्रमाणे व वरील प्रदेश इंद्रपुरीप्रमाणे शोभतो. रायगडावर शिवरायाचे रत्नखचित महाल शोभत आहेत. गडावर विहिरी, सरोवरें व कूप विराजत आहेत. चारही दिशांकडे चंपा, चमेली, चंदन, रायआवळा, लवंगा, वेलदोडे, केळी यांची झाडें व वेल आहेत. अमृतापेक्षाहि मधुर व रसाळ फळें देणारे आम्रवृक्ष आहेत. वसंतादि सहाही ऋतु येथे सुवासिक फलपुष्पादि सामग्रीसह नेहमी रहातात; असा तो सुंदर व सुखदायी राजदुर्ग शिवरायाच्या निवासस्थानाने शोभू लागला. सर्व यवनांना जिंकून रायगडावर राजा शिवाजीने राजधानी केली आणि लोकांचें इच्छित पुरवून जगतांत श्रेष्ठ यश संपादन केलें. त्या यशामुळे देशांतराहून

गुणी लोक त्याजकडे याचना करण्याकरिता येऊ लागले; त्यांतच भूषण म्हणविला जाणारा एक कवी आला ! [ संभू. पृ. ५ ते ९ ].

'हे शिवराज ! तुझ्या दारावर दानाच्या दुंदुभि अहर्निश झडत आहेत. आकंठ भोजन झाल्यामुळे भिक्षुकांच्या झुंडींची मोठी मौज दिसत आहे. हे राजन् आज पृथ्वीवर तुझ्यासारखा दीनवत्सल तूच आहेस' [ दोहा ४० ]. हें वर्णन राज्याभिषेकप्रसंगीच्या ५० हजार आमंत्रितांच्या भोजनाचे नव्हे काय ? [ संभू. पृ. १४ ]. 'हे दानशूर शिवराज तुझ्या सुयशाशी मी आता कोणाची तुलना करू ? [ दोहा ५० पृ. १७ ]. तुझा हात कल्पवृक्षाप्रमाणे शोभतो; किंबहुना कल्पवृक्षच तुझ्या हातामुळे शोभा पावतो' [ दोहा ५४ पृ. १९ ]. हें वर्णन सार्वत्रिक देकार किंवा गागाभट्ट वगैरेंना दिलेल्या दानाचें असावें.

'शहाजीपुत्र शिवाजीची रायगडावरील सभा मेरु पर्वतावरील देवसभेला तुच्छ लेखणारी अशी आहे.' भूषण म्हणतो, 'ह्या रायगडाच्या एकेका शिखरापासून कित्येक नदीनदांचे प्रवाह धो धो वहात आहेत. किल्ल्यावरील मंदिरांतील हिरे माणकादि रत्नांची प्रभा चंद्रप्रकाशास लाजविणारी आहे; कारण या प्रभेने गडावरील व भोवतालच्या दऱ्याखोऱ्यांतील अमावास्येचा अंधार पार घालवून दिला आहे. महाबलिष्ठ शिवरायाचा रायगड इतका उंच आहे की तारांगणामुळे त्यावर नेहमी दीपावलीची शोभा विराजत आहे' [ संभू. पृ. २० दोहा ५९ ]. पावसाळ्याचे दिवसांत रायगडचें दृश्य पाहिल्यास हें वर्णन यथावत् वाटतें. या दोह्यांत अलंकार अतिशयोक्ति नसून स्वभावोक्ति आहे.

'सर्जा शिवाजीने जगतास शोभायमान अशा दोन गोष्टी केल्या. एक बादशहाचे भय न बाळगता मानाने रहाणे व दुसरी अभिमानरहित दान करणे' [ दोहा १५२ ].

'शिवाजीचा कवी' म्हटल्यावाचून कोण कविशिरोमणि होऊ शकेल ? सर्जा शिवाजीचें गुणवर्णन केल्यावाचून कोण कवी सभाजित होईल ? भोसल्यांच्या मनाला आवडल्यावाचून कोण कवी राजप्रिय होऊ शकेल ? पृथ्वीवर शिवाजीची कृपा संपादन केल्यावाचून कोण कवी हत्तीघोड्यांवर बसू शकेल ? [ दोहा १५३; संभू. पृ. ५४ ]. भूषण कवीचा आदरसत्कार शिवाजीने कसा केला असेल, याची आपणास येथे भूषण स्वतःच कल्पना करून देत आहे असे वाटतें.

'ज्या रायगडावर शिवाजी महाराज राहतात, त्याच्या आजूबाजूस पंपा, मानस इत्यादि सरोवरांसारखीं इतिहासप्रसिद्ध व अवर्णनीय अशीं सरोवरें आहेत. तेथील राजमार्ग पाहून देव देखील थक्क होतात. आकाशास इतर कोठेच आधार

नसल्यामुळे त्रस्त झालेले चंद्रसूर्य येथेच विसावा घेतात. मण्यांची प्रभा अति उंच फाकल्यामुळे सूर्याच्या रथावर पडून रथाचीं चाकें रंगीबेरंगी दिसत आहेत ' [ दोहा २८८ संभू. पृ. १०२ ]. येथें सांगितलेलीं पंपा व मानस सरोवरें म्हणजे कुशावर्त व गंगासागर होत. रायगडावरून उगवत्या सूर्याची शोभा पाहून हें वर्णन वाचावें, म्हणजे वस्तुस्थिति व काव्यवर्णन याचा पडताळा मनांत अनुभवता येतो. ' ज्यांच्या दाराशीं हत्ती झुलताना दिसत आहेत, अंगणांत घोडे खिंकाळत आहेत. बंदीजन वारंवार यशोगान करून आशीर्वाद देत आहेत, ज्यांच्या भरजरीच्या ताणलेल्या तंबूंतून मोत्यांच्या झालरी रुळत आहेत, अशा शिवाजी महाराजांच्या कृपेला पात्र झालेले श्रेष्ठ कवी त्या ( समारंभाच्या ) ठिकाणीं वावरत आहेत आणि सर्जा शिवाजीचें वर्णन करीत असताना म्हणत आहेत की येथे माणकांच्या योगाने प्रातःकाल व नीलमण्यांच्या योगाने सायंकाल होतो ( अशी या शिवरायाची संपत्ति अपार आहे ) ' [ दोहा ३३६ संभू. पृ. ११९ ] अनेक शहरांची लूट करून रायगडावर आणलेल्या संपत्तीचें हें वर्णन असावें.

' सर्व राजांमध्ये श्रेष्ठ व बादशहांमध्ये वरिष्ठ अशा शिवरायांनी आज राजा होण्याची इच्छा प्रकट केली आहे. त्यामुळे फिरंगी काळजीने व हबशी भीतीने घटकाभर देखील झोप घेईनात [ संभू - शिवबावनी दोहा ३३ पृ. १५६ ].

भूषण कवीने राज्याभिषेकाचें सार सांगितलें आहे. ' शिवाजीने आपल्या तरवारीच्या जोरावर वेद आणि पुराणे यांचे संरक्षण केलें. सर्वस्वाचे सार जें रामनाम तें हिंदूंच्या जिव्हेवर कायम ठेवलें. हिंदूंची शेंडी राखली आणि शिपायांची रोटी चालविली. खांद्यावरील जानवीं आणि गळयांतील माळा सुरक्षित ठेवल्या. मोंगलांचें यथास्थित मर्दन केलें, बादशहास मरगळून टाकिलें, शत्रूंचें चूर्ण केलें. इतकें करून आपल्या हातीं वर देण्याचा अधिकार ठेवला. देवळांत देव व घरांत कुलधर्म, कुलाचार कायम ठेविले [ शिवाबावनी दोहा ५१ संभू. पृ. १६५ ].

भूषण कवीचे शिवकाव्य ग्रंथ रायगड प्रत्यक्ष पाहून लिहिले असल्याचे वरील मजकुरावरून ध्यानांत येईल. शिवकालीन रायगडचें वर्णन या दृष्टीने त्या वर्णनास मोठीच किंमत, म्हणून सबंध ग्रंथाचे सार येथे सादर केलें आहे.

# ९ शिवरायांचा दुसरा राज्याभिषेक

श्रीशिवराज्यभिषेककल्पतरु या नावाचा एक संस्कृत पद्यात्मक ग्रंथ भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक वर्ष १० अंक १ मध्ये प्रसिद्ध झाला असून काव्यदृष्ट्या तो सामान्य प्रतीचा आहे. 'एनस्यातिरथः पुत्रौ राजारामेति यं विदुः। उत्साद्य यवनान् सर्वान् सार्वभौमो भविष्यति ॥' असे भविष्यकथन त्यांत केलें आहे. त्यावरून असें वाटतें कीं जिंजीच्या वेढ्यांतून सुटून राजाराम महाराष्ट्रांत परत आला, त्यावेळी या ग्रंथाचें लेखन पूर्ण झालें असावें.

या ग्रंथाची सध्यातरी एकच प्रत उपलब्ध असून ती कलकत्यास बंगाल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयांत आहे. कै. का. ना. दीक्षित व कै. द. वि. आपटे या संशोधकांनी तिची नक्कल मिळवून ती त्रैमासिकांत प्रसिद्ध केली.

ग्रंथाचीं तेरा पृष्ठें असून तींत २३६।। श्लोक आहेत. मूळ पोथीचें हस्ताक्षर शिवकालीन असलें, तरी ती पोथी तिघांच्या हस्ताक्षरांत आहे. श्लोकांपैकी ४३ श्लोक समासांत लिहिलेले असून त्यांची रचना बहुधा नंतर झालेली, म्हणजे ते प्रक्षिप्त असावेत.

या कल्पतरूच्या आठ शाखा कल्पिलेल्या असून पहिल्या शाखेंत निश्चल-पुरीचें तीर्थाटन, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या शाखांत गागाभट्टाने केलेल्या शिव-राज्याभिषेकांतील दोषदिग्दर्शन व त्यापुढील तीन शाखांत निश्चलपुरीने तांत्रिक विधीने केलेला राज्याभिषेक सांगितला आहे. शेवटच्या म्हणजे आठव्या शाखेंत राजसभावर्णन व भविष्यमंथन आहे. या ग्रंथावरून आपणास शिवछत्रपतींच्या पहिल्या व दुसऱ्या राज्याभिषेकाची हकीकत कळते.

निश्चलपुरी गोसावी नावाचा एक साधु रायगडावर गागाभट्टाने केलेल्या शिवराज्याभिषेकसमयी आमंत्रित म्हणून उपस्थित होता. नंतर तो कोकणांत तीर्थक्षेत्रें पहात हिंडत असता दाभोळ, पंचनद, परशुराम, संगमेश्वर, निर्वैरकाजवळील (पुळ्याचा) गणपती, धूतपापेश्वर, राजापूरची गंगा, सप्तकोटीश्वर, पंचगंगा यांचें दर्शन घेऊन कुडाळेश्वरास गेला. तेथे गोविंद नावाच्या एका विद्वान् ब्राह्मणाची व त्याची भेट झाली. काशीक्षेत्रीं दोघांचा परिचय आलेला असल्याने ते एकमेकास क्षेम विचारू लागले. त्यावर निश्चलपुरीने सांगितले की शिवछत्रपति साक्षात् शिवावतार असून मी त्यांचेजवळ असतो. त्यांचा राज्याभिषेक गागाभट्टाने नुकताच उरकला. गोविंद राज्याभिषेकास उपस्थित नसल्यामुळे, मोठ्या उत्सुकतेने त्याने म्हटले राज्याभिषेक कसा झाला, ते मला आपण सांगावेत. त्यावर निश्चलपुरी म्हणाला, 'गागा नाशिक येथे आले होते. त्यांस सन्मानपूर्वक बोलावून आणून शिवाजीने हा राज्याभिषेक उरकला. पण गागाच्या आगमनापासूनच महाराष्ट्रांत अनेक अनिष्ट गोष्टी घडू लागल्या. राजपत्नी काशीबाई निवर्तली. एका लहानशा लढाईत प्रतापराव गुजरासारखा शिवाजीचा सेनापति मरण पावला, हे राज्याभिषेकाला अपशकून झाले. शिवाजीराजांना ज्या दिवशी गायत्र्युपदेश झाला, त्याच्या आदल्या दिवशी उल्कापात होऊ लागला. पण मी हनुमन्मन्त्राच्या योगे तो प्रकार थांबविला. त्यांचें मौंजीबंधन कुमूहूर्तावर झालें. राज्याभिषेकापूर्वी शिवाजीने पूर्वीच्याच स्त्रियांशीं पुन्हा समंत्रक विवाह केला, हेंही अपशकुनाचेंच झालें. गागाने आपल्या वशिल्याच्या ब्राह्मणांस दक्षिणा देवविली व मी पाठविलेल्या सत्पात्र ब्राह्मणांचा अव्हेर झाला, हें अनुचित घडलें. गागाने शिवाजीस सांगितलें की निश्चल हा नमस्कारास पात्र नाहीं; कारण ब्राम्हण तेवढेच नमस्कारास पात्र असतात, हेंही त्याज्यच होय. सुवर्णतुलेनंतर मोठा अपघात होऊन एक लाकूड पडलें व तें गागाच्या नाकास लागलें. राजपुरोहित बाळंभट्टाच्या मस्तकावर लाकडी स्तंभावरील लाकडी कमळ पडलें. कुमुहूर्तावर अभिषेक केल्यामुळे आणि स्थानिक देवतांचें पूजन व बलिदान न केल्यामुळे अनिष्ट गोष्टी घडल्या.' असो.

गागाने केलेल्या राज्याभिषेकांत दोष घडल्यामुळे पुढे कशा अनिष्ट गोष्टी घडतील, हेंही निश्चलपुरीने सांगितले. त्याप्रमाणे राज्याभिषेकानंतर राजमाता जिजाबाई मरण पावली. प्रतापगडावरील घोड्यांची पागा जळाली. हे ठोकताळे आल्यानंतर शिवाजीने तांत्रिक म्हणजे पुराणोक्त पद्धतीने राज्याभिषेक करण्याचे मान्य केलें व जपास ब्राह्मण बसविले. निश्चलपुरीने शिवाजीस सांगितलें की पंधराव्या दिवशी शत्रु हस्तगत होईल. या सांगण्याचा प्रत्यय शिवाजीस आला. मग शिवाजीने

निश्चलपुरीकडून राज्याभिषेक करून घेण्याचें व त्याचा मन्त्रोपदेश स्वीकारण्याचें निश्चित केलें.

इ. स. १६७४ मध्ये सप्टेंबर २४ रोजी ललिता पंचमी म्हणजे अश्विन शु ॥ ५ स हा दुसरा राज्याभिषेक झाला. सिंहासनाचे सिंह, सिंहासन, महाद्वार यांना व अनेक स्थानिक देवतांना बलिदानें दिल्याची हकीकत सहाव्या शाखेंत दिली आहे. निराळ्या रौप्यासनांवर अभिषेक केल्याचें व शिवाजीने निश्चलपासून मंत्र घेतल्याचें सातव्या शाखेंत आलें असून आठव्या म्हणजे शेवटच्या शाखेंत राजसभावर्णन व भविष्यकथन करून हें काव्य पूर्ण करण्यांत आलें आहे.

प्रस्तुत ग्रंथावरून शिवकालीन अनेक गोष्टी आपणास समजतात. इ. स. १८ मार्च १६७४ रोजी शिवाजीची जी भार्या रायगडावर वारली, तिचें नांव काशीबाई होतें, हें आपणास येथेच समजतें. ३० मे १६७४ रोजी शिवाजीने नूतन विवाह केला नसून पूर्वस्त्रियांशीच पुन्हा समंत्रक विवाह केल्याचें समजूत येऊन डॉ. बाळकृष्ण यांच्या शिवचरित्रांतील एक चूक दुरुस्त होते. [ शिवाजी दि ग्रेट भाग २ रा पृ. ५६३ पहा ]. गागाभट्टाने केलेला राज्याभिषेक वेदोक्त पद्धतीचा की पुराणोक्त, याचा निर्णय आपणास येथे लागतो. चिटणीस बखरींत गागास पैठणहून बोलावून आणलें, असें विधान आहे; त्याची दुरुस्ती होते. सभासदबखर व चित्रगुप्त बखरींत लिहिलें आहे की गागा स्वतःच शिवाजी महाराजांच्या भेटीस रायगडावर आला; याही विधानाची दुरुस्ती होते.

" शिवाजी आणि गागाभट्ट " या आपल्या निबंधांत म. म. काणे यांनी म्हटलें आहे की निश्चलपुरीने केलेला विधि राज्याभिषेक नसून एखादी अरिष्ट शमनार्थ शांति असावी. तें मत मान्य करवत नाही; कारण त्यायोगे प्रस्तुत ग्रंथ एक कल्पितकथा मानावी लागेल व श्रीशिवराज्याभिषेककल्पतरु या नावास अर्थ रहाणार नाही. मग शिवापुरकर देशपांडे यांच्या शकावलीत [ शिवप्र. पृ. ५२ ] पुन्हा राज्यारोहण केल्याची नोंद आहे; तिची वाट काय ? हा कल्पतरु व सदर शकावली हे दोन्ही स्वतंत्र शिवकालीन पुरावे त्याज्य कसे मानावयाचे ? हे परस्परनिरपेक्ष समकालीन पुरावे दुसऱ्या राज्याभिषेकाची तिथि एकच देतात. शिवाजीला मंचकारोहण करण्याचें कारणच नसल्याने या राज्याभिषेकाची, एक मंचकारोहण म्हणून वासलात लावता येत नाही.

तेव्हा, ज्येष्ठ शु ॥ १३ स राज्याभिषेक झाल्यावर जे अनिष्ट प्रकार घडून आले, ते वैदिक विधीने राज्याभिषेक घडला, पुराणोक्त पद्धतीने झाला नाही म्हणून घडले, अशी सामान्य लोकांची समजूत झाली असावी. शिवाय, संतति झाल्या-

वर मुंज, त्याच स्त्रियांशी पुन्हा विवाह इत्यादि सामान्य जनांच्या बुद्धीस न पटणाऱ्या गोष्टी घडल्या होत्या; त्या सर्वांच्या निराकरणाच्या दृष्टीने हा पुराणोक्त राज्याभिषेक शिवाजीने केला असावा, अशी या प्रकारची उपपत्ति श्री. य. गो. फफे यांनी लावली आहे. या श्रीशिवराज्याभिषेककल्पतरूचा कर्ता गोविंद नारायण बर्वे होय असे त्यांनी सिद्ध केले आहे [ ऐसंसा. निबंध खंड ६ वा पृ. ७५ ते ८४ ].

निश्चलपुरीने केलेला राज्याभिषेक तांत्रिक विधीने उरकला. तांत्रिकाचा दिवस संध्याकाळी सुरू होतो, ही गोष्ट येथे ध्यानी घेतली पाहिजे. शिवनिधनशकावलींत ललिता पंचमी बुधवारी सांगितली आहे. सदर ग्रंथ गुरुवार हा दिवस देतो; त्याची संगती वरील उपपत्तीने सहज लागते. या ग्रंथांतील चुका दाखवावयाच्या झाल्या, तर ठळक चूक अशी की प्रतापगडावर आग लावून शिवाजीची घोड्यांची पागा जळून गेल्याचा अपशकुन अगर हानी या ग्रंथांत सांगितली आहे; हा प्रसंग, राज्याभिषेककल्पतरूंत सांगितल्याप्रमाणे, दुसऱ्या राज्याभिषेकापूर्वीचा नसून तो शिवापुरकर यादीप्रमाणे २५ सप्टें. १६७५ चा म्हणजे नंतरचा आहे.

श्रीशिवराज्याभिषेककल्पतरूच्या लेखनारंभी गणेशाला अभिवादन केलें असून नंतर श्रीशंकर व पार्वती यांचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

गागाभट्टाच्या आगमनानंतर शिवभार्या काशीबाई हिचें निधन झालें व प्रतापराव गुजर नेसरीच्या लढाईत पडला. अशा स्थितींत भार्गवक्षेत्रीं भार्गवास प्रसन्न करण्यासाठी बरेच द्रव्य खर्च करून शिवाजी रायगडास परत आला. मग राज्याभिषेकाच्या अनुसंधानाने शिवाजीने गोदानें व द्रव्यदानें केली; त्यांत त्यांचा हेतु असा होता की पूर्वी घडलेल्या ज्ञाताज्ञात पापांपासून आपली मुक्तता व्हावी.

राज्याभिषेकाच्या विधीस प्रारंभ झाल्यावर दुसऱ्या दिवशी आकाशांतून एक उल्का पडली. पण त्यायोगे काही अशुभ घडू नये म्हणून निश्चलपुरीने आपल्या मंत्रसामर्थ्याचा उपयोग केला. मौंजीबंधन जरी कुमुहूर्तावर झालें, तरी शिवाजीने गायत्रीमंत्र भक्तीपूर्वक स्वीकारला. शिवाजीच्या विवाहास पुष्कळ निमंत्रित हजर होते. या प्रसंगी पुष्कळ ब्राह्मणांचे आर्थिक ऋण त्याने नाहीसें केलें.

सिंहासनावर अधिष्ठित होण्यापूर्वी सिंहासनास बली देण्यात आला नाही. गडावरील शिर्काईची पूजा करण्यात आली नाही. कोकणचा संहारकर्ता, भार्गव याची पूजा बांधण्यात आली नाही. वेताळ व हनुमान यांची पूजा झाली नाही. सिंहासनास आधार देण्यासाठी मंत्रविद्येचा आश्रय घेण्यात आला नाही. गडाच्या महाद्वाराचें संरक्षण करणाऱ्या देवतांचें पूजन झालें नाही. भूतपिशाच्चांना संतुष्ट करण्यात आलें नाही. गागाभट्टाच्या उद्धटपणामुळे आणखी कितीतरी अनिष्ट गोष्टी

घडल्या. सिंहासनारोहणाचा विधि चालला असता संभाजीच्या मस्तकावरून दोन मोत्यें ओघळलीं राजाजवळील कट्यार म्यानबद्ध नाही असें आढळून आलें, लक्ष न जातें, तर अपघात निश्चित झाला असता. सुवर्णादींनी सजविलेला रथ मिरवणुकीसाठी गडावर तयार ठेवला होता. अभिषेकानंतर गागाने राजास रथारूढ होण्यास विनंति केली. राजा रथारूढ होताना म्हणाला, या रथावर आरूढ होऊन मी भूभाग जिंकण्याची इच्छा करतो; पण सर्व लोक पहात असता रथाचा आस वाकला. मग राजा गजारूढ झाला. धनुष्याची प्रत्यंचा ओढीत असता राजाच्या बोटांतील आंगठी गळून पडली; पण ती त्याला परत मिळाली.

राज्याभिषेकाचा समारंभ उरकल्यावर राजा वाड्यांत गेला. निश्चलपुरीने आपल्या शिष्यास राजवाडयांत शिवाजीकडे धाडिले आणि निरोप सांगितला. मग राजाने निश्चलपुरीस बोलावून घेतले व त्याचेपुढे एक फल ठेऊन त्यास साष्टांग नमस्कार घातला. निश्चलने त्यास आशीर्वाद देऊन पुढे काय घडेल तें सांगितलें त्याने म्हटले, ' राजा, तेराव्या, बाविसाव्या, पंचावन्नाव्या आणि पासष्टाव्या दिवशी अशुभ, खेददायक गोष्टी घडतील, हें ऐकून राजा विस्मित झाला.

निश्चलपुरी निघून गेल्यावर तेराव्या दिवशी राजमाता इहलोक सोडून गेली [ बाराव्या दिवशी उत्तररात्री जिजाबाई मृत्यु पावली; म्हणजे तेराव्या दिवसापासून सुतक ]. रायगडावर हत्ती निधन पावला व आणखी काही दुश्चिन्हें घडलीं. हे प्रकार घडल्यावर राजा निश्चलपुरीस भेटला व त्यास म्हणाला, ' तुमच्या बोलण्याचा पडताळा आला. आता तांत्रिक विधीने मला अभिषेक करा. '

निश्चलपुरी म्हणतो, ' मी मंत्र म्हणणारे ब्राह्मण निवडले. ते लाल आसनांवर, लाल वस्त्रें परिधान करून मंत्रपठण करू लागले. शुभ दिवस पाहून हें कार्य सुरू झालें. आश्विन शु॥ ५ स मी त्यास राज्याभिषेक केला. राजाने त्या दिवशी सकाळी कुंभपूजा केली. सिंहासनापाशी समंत्रक भूमि शुद्ध केली. नवें सिंहासन मांडलें. सिंहासनाच्या सिंहांची पूजा केली. राजा हातांत तरवार घेऊन सिंहासनापाशी गेला. अनेक देवतांची शांति केली. सिंहासनाच्या सिंहांस बली दिले. पूर्वेकडील सिंहास प्रथम बली दिला. आग्नेयेकडील हर्यक्ष या सिंहास, दक्षिणेकडील पंचास्य या सिंहास, नैर्ऋत्येकडील केसरी नावाच्या सिंहास, पश्चिमेकडील मृगेन्द्र या सिंहास, मग वायव्येकडील शार्दूल नावाच्या सिंहास, नंतर उत्तरेकडील गजेंद्र या सिंहास, ईशान्येकडील हरि या सिंहास राजाने बली दिले. या आठ सिंहाच्या पाठीवर राजाचें राज्याभिषेकाचें आसन होतें. आसनावर निश्चलने ' यंत्र ' ठेविलें व त्या आसनास एक बली दिला.

एका रत्नखचित उच्च आसनावर निश्चलने रौप्य आसन ठेवलें. त्यावर राजास बसवून राज्याभिषेकाचें कार्य सुरू झालें. आसनाभोवती असलेल्या अष्ट कलशां-

वर चंद्रकिरणांच्या धारा ओघळत होत्या. त्या अष्टकलशांत पांच पानांचे तुरे ठेवलेले होते व कलशांना लाल रेशमी वस्त्रें गुंडाळलीं होतीं. पडदे लाऊन शोभा आणली होती. धूप दरवळत होता. दिवे तेवत होते. नंतर मस्तकावर अभिषेकाचें जलसिंचन होऊन राज्याभिषेक उरकला. यावेळी सामवेदगायन चाललें होतें.

मग निश्चलने राजास सांगितलें, 'राजा, शिजवलेल्या अन्नाचा प्रचंड ढीग या रायरी पर्वतास अर्पण कर.' राजानें तसे केल्यानंतर राजाचें भोजन झालें.

नंतर निश्चलने म्हटले, 'शिवाजीचा मुलगा राजाराम ( रामराजा ) छत्रपती होईल. त्याच्यामुळे जगांत सद्गुणांचा उत्कर्ष होईल. शिवछत्रपतीच्या घराण्यांत तीनशे वर्षें राजसत्ता चालेल. या अवधींत यवनांचा सतत नाश होत राहील.'

'हा राज्याभिषेक कुंभ लग्नावर, आयुष्मन् योग असताना, अनुराधा नक्षत्र व बुधवार, आश्विन शु॥ ५, आनंद संवत्सर, शके १५९६ या दिवशी झाला, शुभं भवतु।'

निश्चलपुरीने केलेल्या राज्याभिषेकाचें थोडक्यांत वर्णन हें असें आहे [ पोत. गौ. ग्रंथ पृ. ३५३ ते ३६८ ले. प्रो. व्ही. डी. राव ].

पिले जंत्रीप्रमाणे कुंभलग्न, नक्षत्र, वार, तिथि यांचा मेळ आहे. बुधवार आणि अनुराधा नक्षत्र असलें, म्हणजे तो अमृतसिद्धियोग होतो; तसा योग वरील दिवशी आहे. पण शिवराजराज्याभिषेककल्पतरूंत आलेल्या मजकुराच्या सन्दर्भात जुळते अन्य पुरावे संशोधकांच्या हातीं आलेले नाहीत.

या दुसऱ्या राज्याभिषेकासंबंधी लिहितांना सरदेसाई लिहितात की जिजाबाईचा पाचाड येथे राज्याभिषेकानंतर बाराव्या दिवशी झालेला मृत्यु [ १७ जून १६७४—शकाशिवप्र. पृ. ५२; पसासं. ले. १६८४; शशि. पृ. १६१; NHM I पृ. २१३, शिचप्र. पृ. २७ शिचप्र. पृ. ६४[२] ] व घडलेले कित्येक प्रकार पाहून, विरोधी पक्षाच्या समजुतीसाठी पुन्हा लहानसा राज्याभिषेक शिवाजीने निश्चलपुरीकडून करविला. ६ जून १६७४ हा दिवस अशुभ नक्षत्रांच्या खालचा, म्हणजे शुभदिवस नव्हता. राज्याभिषेकास तर पूर्ण शुभदिवस पाहिजे. या गागा-विरोधी पक्षाच्या सांगण्यावरून हा दुसरा राज्याभिषेक घडून आला. राजा प्रकृति-रञ्जनात् या सूत्राप्रमाणे दुसरा राज्याभिषेक उरकून घेण्यात शिवाजीला विरोधक अनुकूल होणार होते; मग त्याने मान्यता दिली यांत नवल तें कसलें !

१ जेधे शकावलींत महिना चैत्र दिला आहे, तो ज्येष्ठ पाहिजे.

२ शिचप्र. पृ. ६४ वर मृत्यूची वेळ दोन प्रहर रात्री दिली आहे, ती तर कल्पतरूस अत्यंत पोषक आहे.

# १० ऑस्टिनची रायगडवरील वकिली

राज्याभिषेकसमारंभ चालू असता औरंगजेबाने दख्खनचा सुभेदार बहादुरखान यास शिवाजीच्या मुलखावर चालून जाण्यास हुकूम सोडले. त्याच्या हालचालींच्या बातमी सर्वही शिवाजीस रायगडावर कळत होत्या. राज्याभिषेकानंतर जोरदार पाऊस कोसळ असता शिवाजी बहादुरखानावर चालून गेला [ NHM I पृ. २१७ ]. या स्वारींत शिवाजीने दख्खनच्या सुभेदाराची बाकी ठेवायची नाही, असा निश्चय केल्यामुळे इ. स. १६७५ मध्येही ही लढाई चालूच राहिली. यावेळी शिवाजीने ङ्गमगाव ऊर्फ धरणगाव [ शशि. पृ. २५५ ] यथेच्छ लुटलें. त्यांत तेथे असलेली इंग्रजांची वखार लुटली, ऑक्झेंडनने शिवाजीबरोबर केलेल्या तहांत शिवाजीने आपल्या मुलुखांतील इंग्रजांच्या व्यापारास संरक्षण दिलें होतें, पण तो मोगली मुलखांतील इंग्रजांच्या व्यापाराच्या संरक्षणास बांधला गेला नव्हता, असें शिवाजीने मानले असावे.

इ. स. १६७५ मार्च १३ या दिवशी मुंबईकरांनी ठरविलें की या वखारलुटीबाबत बोलणें करण्याकरितां सॅम्युअल ऑस्टिन यास रायगडावर पाठवावे. जुलै ७ व ऑगस्ट ९ च्या बैठकींत ऑस्टिन याने गडावर जाऊन शिवाजीकडून वखारीबाबत कौल घेण्याचे निश्चित झालें व त्याबद्दल शिवाजीस सुमारे ५०० रुपयाचा नजराणा द्यावयाचें ठरलें [ पसासं. १७३२, १७६४, १७७२ ]. ऑगस्ट २० च्या सभेने नजराण्याच्या वस्तूंची यादी कायम केली, ती पुढीलप्रमाणे—

| | किंमत |
|---|---|
| शिवाजीसाठी लहान पितळी तोफ गाड्यासह— | ३०० रु. |
| मोरोपंताकरिता १२ वार कापड— | १५० रु. |
| अण्णाजीपंताकरिता ७ वार— कापड— | ८७ : १६ |
| एक आरसा व एक तोळा कस्तुरी— | २५ |
| सेनापति ( चिटणीस ? ) यजकरिता कापड ३ वार | २७ : १६ |
| किरकोळ वस्तु | १४० |
| [ पसासं १७७५ ] | ७४० रु. |

हा नजराणा घेऊन सॅम्युअल ऑस्टिन ता. २४ ऑगस्ट रोजी मुंबईहून निघाला. त्याचा मार्ग भट्टी–चौल–निजामपूर हा होता. सप्टेंबर २ रोजी ऑस्टिन निजामपुरास असताना त्याची व मोरोपंत आणि आण्णाजी पंडित यांची भेट झाली. ते दोघेही आठ हजार सैन्यासह जुन्नरकडे निघाले होते. त्यांस नजराणा अर्पण करून ऑस्टिनने त्यांचें पत्र शिवाजीस देण्याकरिता घेतलें. सप्टें. ६ रोजी ऑस्टिन रायगडास पोहोचला व ७ रोजी त्याची व शिवाजीची भेट झाली. भेटींत ऑस्टिनने नजराणा अर्पण करून डुमगावच्या वखारलुटीची हकीकत शिवाजीच्या कानावर घातली. १५ सप्टेंबर या दिवशी शिवाजीची व त्याची पुन्हा भेट झाली. या भेटींत शिवाजीने इंग्रजांच्या सर्व वखारीस कौल देण्याचें ठरवून ऑस्टिनसमक्षच चिटणिसास कौल पाठविण्याचा हुकूम दिला [ पसासं. १७७६ ]. तेव्हा, ऑस्टिन याच्या गडावर येण्याचा मुख्य हेतु साध्य झाला. पण, वखारलुटीची भरपाई ऑस्टिनने शिवाजीजवळ मागितली असल्यास, ती शिवाजीने मान्य केली नाही [ शशि. पृ. २५५; FB ].

येथेच, रायगडवर इंग्लिश वकील येण्याचे सगळे प्रसंग सांगून टाकणे उचित होईल. इ. स. १६७६ च्या पावसाळ्याचे अखेरीस मिस्टर मौल्वेअर नावाचा वकील इंग्रजांनी शिवाजीकडे धाडला. या सुमारास शिवाजी कल्याणवर वराती देणार होता. त्या त्याने दिल्या असत्या, तर त्याचा परिणाम इंग्लिश व्यापारावर होणार होता. मौल्वेअरबरोबर नारायण शेणवी दुभाषा म्हणून रायगडावर रवाना झाला होता. मौल्वेअरला हात हाल्वीत परत यावे लागले. त्याचे मागोमाग नारायण शेणवीही ६ ऑक्टोबर रोजी मुंबईस परतला [ पसासं १८७३, १८७४, आर्म ११४-५ पृ. ६१ ]. इ. स. १६७७ च्या जूनमध्ये मराठ्यांचे सैन्य साल्हेर व सुरतजवळ होतें या सैन्याने सुरत लुटण्याचे ठरवल्यास इंग्लिश वखारीस उपद्रव होण्याचा दाट संभव जाणून कंपनीने असे ठरविले की, मोरोपंताचीं पत्रें घेऊन रायगडावर खवासखान मोदी यास धाडावा व वखारीच्या सुरक्षिततेचा प्रयत्न करावा. जून २७ रोजी मोरोपंत सैन्यशिबंदीची पहाणी करून रायगडकडे परतला होता. त्यास गाठण्यासाठी केग्विन व कृष्ण शेणवी यांस धाडण्याचे मुंबईकरांनी ठरविले. त्याप्रमाणे प्रेसिडेंट ऑंजिअर याच्या सहीचीं पत्रेंही तयार झालीं. पण ३० जून रोजी ऑंजिअर मरण पावला. त्यामुळे कंपनीच्या वकीलाचें जाणें रहित झालें. यावर्षी ऑगस्ट-मध्ये शिवाजी कर्नाटकचे स्वारीस निघून गेला असल्याने मोरोपंत व आण्णाजी पंडित रायगडावरून मराठेशाहीचा कारभार करीत राहून गुजराथच्या प्रदेशावर दाब टाकीत होते. सन १६७७ हें वर्ष मराठी सैन्य गणदेवीजवळ असल्याचें आहे. आण्णाजी पंडित रायगडावर राहून कारभार करीत होता व मोरोपंत मोहीम

चालवीत होता. त्यामुळे इंग्रज वर्षभर वकील धाडण्याच्या तयारीत राहिले. त्यांना मराठ्यांचा उपद्रव झाला नाही [ पसासं. १९४१, १९४७, १९५०, १९५२, १९६३, १९७०; आर्म ११४ – ६ पृ. ३७, ४३, ४५ ].

इ. स. १६७८ मध्ये जंजिरेकर शिद्दीने मुंबईजवळ माजगाव बंदरांत आपलें ठाणें दिलें, शिद्दीने माजगाव येथे रहाणे व इंग्रजांनी त्यास राहू देणे हें मराठयांस मानवणारें नव्हतें. यावेळी शिद्दीने मराठी मुलखास खूपच उपद्रव दिला होता. तेव्हा मराठी सैन्य व आरमार घेऊन दर्यासारंग दौलतखान कल्याणपर्यंत जाऊन आला. पण माजगावपर्यंत जाता न आल्यामुळे सुरतेच्या आजूबाजूची लूट मिळवून तो रायगडास परत आला [ हिंसावि पृ. ९५, ९६ ]. शिद्दीमुळे मराठे माझगावकडे पाहू लागले, ही गोष्ट इंग्रजांस बेचैन करणारी होती. तसेच, इ. स. १६७८ च्या ऑक्टोबरमध्ये चौलचा सुभेदार रायगडास गेला असता त्याच्या अधिकारक्षेत्रांत वाढ होऊन तो परतल्यामुळेही मुंबईकर इंग्रजांस भीती उत्पन्न झाली [ पसासं. २०७७ ]. पण मराठे व मुंबईकर यांचे संबंध निकरावर आले नाहीत.

इ. स. १६८० जूनच्या सुमारास संभाजी रायगडावर आल्यावर इंग्रज वकील त्याचें अभिनंदन करण्यास आला. संभाजीशी आपले स्नेहसंबंध दृढ करणे हा इंग्रज वकिलाचा हेतु होता [ त्रै. वर्ष ९ अंक १ पृ. १४; संपसासं, पृ. १०३ ]. हा वकील तीन महिने रायगडावर राहिला. संभाजी यावेळी इंग्रजांवर नाराज होता. त्याने वकिलास म्हटले की तुम्ही आमचा शत्रू जंजिऱ्याचा हबशी यास मुंबईस आश्रय देता; त्याला आमच्या विरूद्ध दारूगोळा पुरविता; ही तुमची कृती शिवाजीबरोबर झालेल्या तहाच्या सर्वस्वी विरूद्ध आहे. तेव्हा शिद्दीस मुंबईबाहेर घालवून द्या व तुमच्या प्रदेशांत सैन्य जमा करण्यास त्यास बंदी करा; मग सलोख्याच्या गोष्टी बोला [ पसासं. २२९२; त्रै. व. ९ अंक १ पृ. १५; संपसासं. पृ. १०५ ]. संभाजीच्या या धोरणामुळे इंग्रज वकिलास अयशस्वी स्वरूपांत रायगडवरून निघून जावे लागले. त्याचे मागोमाग संभाजीने आवजी पंडित यास रायगडवरून १६८० च्या नोव्हेंबरमध्ये मुंबईस पाठविले. आवजी पंडित बुद्धिमान व चाणाक्ष होता. त्याने इंग्रज अधिकाऱ्यांची शिद्दीस दाखविल्या जाणाऱ्या सहानुभूतीबद्दल कानउघडणी करणारीं संभाजीचीं पत्रें मुंबईस नेलीं होतीं. त्याने मुंबईस राहून मुंबईकरांचें आरमान व सैन्य यांची माहिती मिळविली [ ऑर्म पृ. १२४; HS पृ. २१८ ]. या माहितीचा पूर्ण उपयोग करून घेण्याची संधी मराठयांस आली नाही, हें इंग्रजांचें सुदैव होय [ उग्रप्र. संभाजी पृ. ८६ ].

इ. स. १६८२ च्या आरंभी बाळाजी हा संभाजीचा वकील रायगडवरून इंग्रजांकडे तहाबाबत गेला होता [ HS पृ. २२६ ]; या वर्षाच्या अखेरीस डिसेंबर

२० रोजी इंग्रजांचा एक वकील संभाजीच्या वकिलाबरोबर रायगडास आला होता. त्याची व संभाजीची भेट झाली. इंग्रजांची मागणी अशी होती की, शिवाजीनें जिंकलेल्या जिंजी प्रांतांत इंग्रजांस व्यापार करण्याची परवानगी असावी. ही मागणी संभाजीने मान्य केली. पण तहास कायमपणा येण्यापूर्वीच इंग्रज वकील रायगडावरून मुंबईस परतला [ उग्र. प्र. संभाजी पृ. ४१; ऑर्मे पृ. ११५ ते १२१ ]. १६८३ च्या आरंभी संगमेश्वरजवळ प्रेसिडेंट या नावाचें एक इंग्रजी गलबत मराठयांनी गाठलें व तें चकमकींत नादुरूस्त झालें. या गलबताच्या निमित्ताने इंग्रज वकील रायगडास आला होता. कंपनीस व्यापारी सवलती देण्याचें संभाजीने या वकिलाजवळ मान्य केलें होतें [ ऑर्मे पृ. १५४ ]. इ. स. १६८४ च्या एप्रिलमध्ये मुंबईचा गव्हर्नर केग्विन याने आपले दोन वकील कॅप्टन गेरी व ले. विल्किन्स यांस संभाजीकडे रायगडावर धाडलें होतें. राम शेणवी हा दुभाषा त्यांचेबरोबर होता. या वकिलीचा सुपरिणाम होऊन संभाजी व इंग्रज यांमध्ये दोन कलमी करार ठरला. त्यायोगे पुढे ५० वर्षेपर्यंत इंग्रज व मराठे एकमेकांच्या वाटेस गेले नाहीत [ उग्र. प्र. सं. पृ. ४१ ].

रायगडवर आणखी एकदा इ. स. १६८४ मध्ये वकील येऊन गेल्याचा उल्लेख सापडतो. या वकिलाशी संभाजी अत्यंत समजूतदारपणे वागला. शिवाजीच्या वेळचें राजापूर वखारीबाबतचें २६०० पॅगोडांचें कंपनीचें देणें संभाजीने मान्य केलें व जिंजीकडील देवनापट्टम् आणि कडलोर येथे वखारी घालण्यास व पोर्टोनोव्हो येथे खुला व्यापार करण्याची परवानगी दिली. या तहावर कंपनीतर्फे केग्विन याची सही आहे[1] [ ऑर्मे पृ. १७३–१७४ ].

वेरिंग नावाच्या ग्रंथकाराने सांगितलें आहे कीं 'संभाजीच्या कारकीर्दीत मुंबईच्या कौन्सिलचा एक सभासद रायगडवर येऊन गेला.' वर सांगितलेला वकील व कौन्सिलचा सभासद एकच असावेत. रायगडावरून परत जाताना तो नागोठण्यास येऊन मुंबईस परतला [ कुर्ग. पृ. ३६८ टीप ].

इ. स. १६८४ मध्ये संभाजीबरोबर तह करण्यासाठी गोवे सरकारनेहि आपला एक वकील रायगडावर पाठविला. हा वकील गोव्याहून वसईस व तेथून रायगडास आला, असें आर्मस लिहितो. संभाजीने पोर्तुगीझांकडून प्रारंभींच ५ लाख रुपयांची मागणी केली व मग तहाचें बोला, म्हणून सांगितल्याने तह होऊ शकला नाही.

औरंगजेबाच्या अलोट सैन्याची आगेकूच चालू असता, शांततेच्या काळांत करावयाच्या तहादि मुत्सद्देगिरीला आणि कागदी घोडे नाचवायला आता वेळच उरला नव्हता.

---

१. उग्र. प्र. संभाजी पृ. ४१ वर सांगितलेली वकिली व आर्मस् पृ. १७३–१७४ वरील वकिलीचा प्रसंग बहुधा एकच असावा.



# ११ राजे निजधामास गेले

राज्याभिषेकानंतर रायगडवर काही सुखसोहळे झाले. इ. स. १६७५ फेब्रुवारी ४, शके १५९६ आनंद संवत्सर माघ व॥ ५ गुरुवार या दिवशी मराठयांचा भावी राजा संभाजी याची मुंज झाली [ शिचप्र. पृ. ५२, ६४, २७ ]. संभाजीची मुंज शिवराज्याभिषेकाच्या वेळींच झाली, असें सांगणारा एक आधार आहे [ शिच-साखं. १० ले. ४१ ] व तो आधार फारसा दुबळा मानता येणार नाही. रायगडा-वर सिंहासन करण्यांत गुंतलेल्या रामाजी दत्तो या जामदारखान्यावरच्या गृहस्थाच्या घराण्यांतील नोंदीवरून ती घेतली आहे.

तदनंतरचा प्रसंग राजारामाच्या मुंजीचा आहे. इ. स. १६८० मध्ये दिलेरखानाकडून पळून संभाजी पन्हाळगडावर आला. शिवाजीने त्याची भेट घेतली व त्याची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. त्याने संभाजीस सांगितलें की आम्ही रायगडावर राजारामाचें लग्न उरकण्यास जातो [ एक्याण्णव कलमी बखर कलम ६१– भारतवर्ष व राजवाडे प्रती पृ. १०९ वाकसकर आवृत्ति; सभासद पृ. ८१, ८२ ]. रायगडास येण्यापूर्वी त्याने समर्थांची भेट घेतली. समर्थ व छत्रपति एक महिना एकत्र राहिले. नंतर राजे १६८० फेब्रु० ४, माघ शु॥ १४ रोजी रायगडावर आले [ शशि. पृ. २०८, सांप्रदायिक वि. वि. खं. १ ले. २१ ]. शके १६०१ सिद्धार्थी संवत्सर फाल्गुन व॥ २, १६८०, मार्च ७ रोजी रायगडावर राजारामाची मुंज झाली [ शिचप्र. पृ. ३० ]. लगेच आठ दिवसांनी त्याने राजारामाचें लग्न उरकलें. प्रतापराव गुजर याची मुलगी वधू म्हणून पसंत करून हें लग्न फाल्गुन वद्य १० रोजी शिवा-

जीत उरकले. सभासद लिहितो, ' धाकटा पुत्र राजाराम यास वधू पहाता प्रतापराव यांची कन्या वधू नेमस्त केली. लग्न सिद्धीते पावविले. वधूचें नाव जानकीबाई असें ठेविलें. मोठा महोत्साह केला. दानधर्म अपार केला' [ शिचप्र. पृ. ३०,५३; सभासद पृ ८२; भाइसमं. वा. इ. श. १८३६ पृ. २४]. राजांच्या हातचें हें शेवटचे कौटुंबिक कार्य होय.

रायगडवरील अतिशय महत्त्वाचा प्रसंग शिवाजीराजांचें महाप्रस्थान हा होय. इ. स. १६८० मार्च २४ रोजी त्यांस प्रथम ताप आला; तो न निघता तसेच दिवस जाऊ लागले [ पसासं. २२५३ ]. राजेस्वामीस नवज्वर प्राप्त जाहला. शके १६०२ रुद्रनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध १५ दोन प्रहरा राजेस्वामी कैलासवासी जाहले. अंतकाल-समयीं धर्म बहुत केला. सहस्ररुद्राक्षपरिधान, भागीरथी उदकस्नान, विभूतींचें चर्चन, सावधपणे संस्कार करून हरिकीर्तन करीत असता देह ठेविला. आयुष्याची मर्यादा झाली, असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते, त्यांमध्ये भले लोक बोलावून आणिले बितपसील—

( १ ) निळोपंत पिंगळे प्रधानपुत्र ( २ ) प्रल्हाद निराजी ( ३ ) गंगाधरपंत, जनार्दनपंताचे पुत्र ( ४ ) रामचंद्र नीलकंठ ( ५ ) रावजी सोमनाथ ( ६ ) आबाजी महादेव ( ७ ) ज्योतिराव ( ८ ) बाळाजी आवजी ऊर्फ बालप्रभु चिटणीस ( ९ ) हिरोजी फर्जंद ( १० ) बाबाजी घाटगे ( ११ ) बाजी कदम ( १२ ) मुधोजी सरखवास ( १३ ) सूर्याजी मालुसरे ( १४ ) महादजी नाईक पानसंबळ [ सभासद पृ. ८२ ]. अंतकाली राजाराम समीप होता [ ९१ क. बखर कलम ९० पृ. १५३, १५४ भारतवर्ष, राजवाडे, फॉरेस्ट प्रती—वाकसकर संपादित ]. शिवाजीने मृत्यूपूर्वी असे म्हटले की राजारामास गादीवर बसवावे [ वेरिंग पृ. ११०; कुगॅ. पृ. ३७३ टीप ]. एक्याण्णव कलमींची राजवाडे व फॉरेस्टप्रत सांगते की तहपत्रें देऊन सावध-पणे देह ठेविला [ पृ. १५२, १५३ ]. ' सगळ्यांस बाहेर घालविले. योगाभ्यास करून आत्मा ब्रह्मरंध्रास नेऊन दशमद्वारं फोडून प्राणप्रयाण केलें ' [ सभासद पृ. ८४ ]. सिवाजीराजे यांनी सिव सिव राम उच्चार करून समाप्ति जाले [ शिचप्र. पृ० ७० ]. सभासद व घोडगांवकर शकावली मृत्युदिन रविवार देतात, पण जेधे शकावली, जेधे करीना, यांत शनिवार दिला असून तोच जंत्रीशी सुसंगत आहे. [ शिचप्र. पृ. ३०,४७,५३,७०; कासंपया. पृ. ३८४, ४५५; भाइसंमं. वा. इ. श. १८३६ पृ. २५,६० ].

१. सरदेसाई उग्रप्रकृति संभाजी पृ. २० वर शनिवार मान्य करतात व रवि-वारची तारीख देतात, तें चूक. ३ एप्रिल तारीख पाहिजे.

शिवाजीच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या तीन भार्या जिवंत असून त्या रायगडावर होत्या. ( १ ) सोयराबाई ( २ ) पुतळाबाई ( ३ ) सकवारबाई. त्याशिवाय राजाराम व त्याची बायकोही गडावरच होती. शिवाजीस या तीन राण्यांशिवाय दोन उपस्त्रिया होत्या. आपल्या पाठीमागे राज्यकारभार कोणी करावा हें त्याने सांगितलें नाही [ NHM I पृ. २५७, २९३ ]. शिवदिग्विजय पृ. ३७३ च्या आधाराने सरदेसाई लिहितांत की आपली आयुर्मर्यादा संपली असे ध्यानीं येताच शिवाजीने पन्हाळ्यावर संभाजीस निरोप धाडला की राज्य दोघामध्ये वाटून देतो. संभाजीने तें मानलें नाही. महाराजांच्या मृत्यूचे वेळी मोरोपंत पिंगळे प्रधान व आण्णाजी दत्तो सचिव जवळ नव्हते [ शशि. पृ. २०८ २०९ ].

'राजियाचे कलेवर चंदनकाष्टें व बेलकाष्टें आणून दग्ध केलें. राजारामाने क्रिया केली ' [ सभासद पृ. ८४ ]. एक्याण्णव कलमी बखर सांगते की कान्होजी भांडवलकर हवालदार व सरकारकून यांनी श्री महादेवाच्या देवळापुढे महाराजांच्या कलेवरास अग्नि दिला. परसोजी भोसल्याचे नावहि एक्याण्णव कलमी बखरीच्या एका प्रतींत येतें [ सानेप्रत, सरकारप्रतकलम ८९ पृ. १५२, १५३ ].

कुलाबा गॅझेटियरमध्ये थोडी वेगळी हकीगत आली आहे. ' वयाच्या ५३ व्या वर्षी शिवाजीने जालना या गावावर झडप टाकली. नंतर रायगडावर येऊन तो आजारी झाला. कोणी म्हणतात की गुडघा सुजून त्यास ताप आला. कोणी म्हणतात की, अतिश्रमाने त्याची रक्तवाहिनी फुटून त्यास मरण ओढवले. कोणी म्हणतात की, मुसलमान साधूनी दिलेल्या शापामुळे तो मरण पावला. थोड्या दिवसाच्या आजाराने तो ५ एप्रिल १६८० [१] मध्ये रायगडावर मरण पावला ' [ पृ. ३७२ ]. या मजकुरांतील निधनाच्या तारखेची चूक वाचक आता दुरुस्त करतीलच. गुडघी रोग होऊन मेला, हाही गैरसमजुतीचा प्रकार होय.

२८ एप्रिल १६८० च्या पत्राने मुंबईकरांनी सुरतेस कळविले, ' आम्हास खात्रीलायक कळते की तेवीस दिवसांपूर्वी शिवराज मरण पावले. तत्पूर्वी शिवाजी १२ दिवस आजारी होता. रक्तातिसाराने त्याचें मरण ओढविलें [ पसासं. २२५३ HS पृ. २१६ ]. या हकीकतींत सत्य जाहीर झालें आहे. राजापूरच्या वखारीवरील इंग्रज अधिकारी क्लेमंट याने फ्रेंच गव्हर्नर मार्टीन यास ता २९ एप्रिल रोजी लिहिलेल्या पत्रांत कळविले, ' १२ दिवसांपूर्वी शिवाजीचा मृत्यू ओढवला ' [ पसासं. २२४९, २७६७; मॉडर्न रिव्ह्यू १९५४ व्हॉ. ३४ पृ. १५३ ते १५५ ].

१. शिवचरित्र वृत्तसंग्रह खंड २ रा [ फार्सी विभाग ] पृ. १११ वर बसातीनुस्सलातीन या ग्रंथांतील भागाचें भाषांतर दिलें आहे. तेथें शिवाजीच्या मृत्यूचा ' सु । १०९१ ' असा सन दिला आहे; तो हिजरी १०९१ पाहिजे.

यावरून शिवाजीचा मृत्यू नैसर्गिक होता व तोच मान्य करणे समजूतदारपणाचे होईल; ' विषप्रयोगाने मृत्यू ' ही कल्पना नंतरची आहे.

या कल्पनेचा सुगावा आपणास दोन ठिकाणी लागतो. इ. स. १६८० ऑक्टो. २३ च्या पत्रांत पुढील मजकूर आला आहे. ' शिवाजीला त्याच्या दुसऱ्या नायकोकडून विषप्रयोग झाला असावा ! त्याचा कनिष्ठ पुत्र गादीवर बसावयाचे वाटत होते ' [ पसासं २२८६ ]. ' संभाजीने सोयराबाईस पकडले. त्याने तिच्यावर, शिवाजीस विष घातल्याचा आरोप केला ' [ कुगॅपृ. ३७३ ]. कुलाबा गॅझेटियर हा साधनग्रंथ नसल्यामुळे पुराव्यादाखल त्यावर अवलंबून राहणे योग्य होणार नाही. आणि आक्टोबरमधील पत्र बरेच नंतरचे व महाराष्ट्राबाहेरील, ऐकीव बातमीच्या आधाराने लिहिलेले होय; म्हणून सोयराबाईवर विषप्रयोगाचा आरोप करणे अन्याय होईल. सारांश, शिवछत्रपतींचें देहावसान नैसर्गिक होय याबद्दल संशय रहात नाही.

शिवाजीच्या मरणाबद्दल खाफीखानाने आनंद मानला आहे. ' काफीर बजहान्नम् रफ्त ' म्हणजे काफर नरकांत गेला, असे त्याने शिवाजीबद्दल लिहून ठेवलें आहे [ कुगॅपृ. ३७२ ]. फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याने लिहून ठेवलें आहे, ' हिंदुस्थानातील नाव घेण्यासारख्या अशा थोर विभूतींमध्ये शिवाजीला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे, हे निस्संशय ! ' [ पसासं. २७६७; मॉडर्न रिव्ह्यू १९२४ व्हॉ. ३४ पृ. १५३-१५५ ]. शिवाजीच्या मृत्यूचें वर्तमान कानीं पडताच औरंगजेब आनंदाच्या भराने बेहोष झाला. या प्रसंगी त्याने म्हटलें " शिवाजी हा फार मोठा सेनापती होऊन गेला. नवीन स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचें सामर्थ्य त्याच्यांतच होतें. हिंदुस्थानांतील जुन्या सत्ता मोडून टाकण्याचे माझे प्रयत्न सारखे चालले आहेत. सतत १९ वर्षे माझें सैन्य त्याच्याशी लढा देत असूनही त्याचें राज्य वाढतच आहे, " [ आर्मे पृ. ११९-१२० ].

शिवाजीची भार्या पुतळाबाई सती गेली. पण तिची सती जाण्याची तारीख १३८० जून २७, शके १६०२ आषाढ शु ।। ११ अशी आहे [ शिचप्रपृ. ५३; भाइसंमं. इ. वृ. १८३६ पृ. २४ ]. पुतळाबाई इतके दिवस मागे का राहिली, याचा काहीच उलगडा होत नाही.

इतिहासाच्या दृष्टीने रायगडचें महत्त्वाचें पर्व येथे संपलें. सामान्यपणे, इ. स. १६७० ते १६८० हा रायगडच्या चढत्या वैभवाचा काल होय. या काळांत महाराष्ट्राचें स्वतंत्र राज्य रायगडावर निर्माण झालें आणि शिवरायांच्या पश्चात् अनेक आपत्तींस तोंड देऊन तें अटकेपर्यंत विस्तारलें आणि म्हणूनच रायगड हें ठिकाण महाराष्ट्रांतील एक धारातीर्थ, संस्कृतीचें माहेरघर व महाराष्ट्राचें मानबिंदु बनलें.



# १२ संभाजीच्या कारकिर्दीचें स्वरूप

शिवाजीच्या मरणसमयी संभाजी बावीस वर्षांचा असून राजाराम केवळ दहा वर्षांचा होता. संभाजी पन्हाळगडावर नजरकैदेत असल्याचा फायदा घेण्याचें राजारामाची आई सोयराबाई हिने ठरविलें. आण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळें गडावर नव्हते; त्यांस बोलावून तिने शिवाजीची मरणसमयीची इच्छा सांगितली. राजारामास गादीवर बसवून पालकव्यवस्थेस ते दोघेही तयार झाल्याने बाकीच्या प्रधानांनीही या गोष्टीस अनुमति दिली. बाळाजी आवजी चिटणीसही तिला अनुकूल झाला. पन्हाळयावर पत्रें पाठवून शिवाजीच्या मृत्यूची बातमी संभाजीस कळू नये असा तिने प्रयत्न केला. प्रथम तिने रायगडावरचा बंदोबस्त केला. दहा हजार घोडेस्वार पाचाड येथे सज्ज ठेवण्यात आले. जनार्दनपंताच्या हाताखाली सैन्य पाठवून पन्हाळयाचा ज्यास्त कडक बंदोबस्त करण्याची सिद्धता झाली. सेनापति हंबीरराव मोहिते यास सातारा जिल्ह्यांत कऱ्हाडजवळ मोठया सैन्यानिशी ठेवण्यांत आले.

पण संभाजीस शिवाजीच्या मृत्यूची बातमी समजली. सोयराबाईच्या हेतूची कल्पना येताच संभाजीने पन्हाळयावरून आपली सुटका करून घेतली. विठ्ठल त्रिंबक महाडकर हा पन्हाळयावरील किल्लेदार होता, त्यास संभाजीने कैद केले. सेनापती

---

१. संभाजीने किल्लेदारास ठार केलें, असें सरदेसाई NHM I पृ. २९३–२९४ वर म्हणतात; उप्रसं पृ. २२ वर मात्र तसें म्हणत नाहींत.

हंबीररावावर संभाजीच्या चढाऊ धोरणाचा अनुकूल परिणाम होऊन तो संभाजीस मिळाला. संभाजीने जनार्दनपंताचा पराभव केला व त्यास पन्हाळ्यावर कैद केले तेव्हा, रायगडावरून निघालेल्या मोरोपंताने संभाजीस मिळण्याचे ठरविले. आण्णाजी दत्तोनेही संभाजीस मिळून आपला बचाव करण्याचे ठरविले. संभाजीने त्या दोघांस पन्हाळ्यावर पक्क्या बंदोबस्ताने कैदेंत ठेविले रायगडावरील संभाजीविरुद्धच्या उपक्रमांत आण्णाजी दत्तो पुढारी असल्याचे संभाजीस कळले होते. त्याच्या पायांत त्याने जड बेड्या ठोकल्या. मग सैन्य घेऊन संभाजी रायगडास जाण्यास निघाला. पाचाड येथे असलेलें सैन्य संभाजीस मिळाल्यावर संभाजीने रायगड आपल्या ताब्यांत घेतला आणि राजाराम व सोयराबाई यास त्याने कैद केले [ कुगॅपृ. ३७२, ३७३; आर्मं. पृ. १२१; NHM I पृ. २९३, २९४; उपसंपृ. २०, २२, २३ ]. संभाजीची धडाडी, सोयराबाईचा दुबळेपणा व अष्टप्रधानांची धरसोड या सगळ्या गोष्टींचा फायदा संभाजीस मिळाला.

तत्कालीन साधनांच्या दैनंदिन तपशिलाकडे पहाणे मनोरंजक होईल. शके १६०२ रौद्र संवत्सर, वैशाख शु॥ ३, एप्रिल २१ या दिवशी कटाचा पुढारी आण्णाजी दत्तो सुरनीस याने रायगडावर राजारामाचें मंचकारोहण घडवून आणलें व शिवाजीचा वारस म्हणून तो जाहीर झाला. यापुढे संभाजीस पक्की कैद करण्याच्या हेतूने मोरोपंत व अण्णाजी दत्तो सैन्य घेऊन पन्हाळ्यावर चालून गेले [ शिचप्रपृ. ३०; संपसासंपृ. १०१]. ता. २७ एप्रिल, १६८० पूर्वीच संभाजीने राजा ही पदवी घेतली व त्याने सैन्य जमविण्यास प्रारंभ केला. सुभेदार, हवालदार इत्यादि अधिकाऱ्यांना त्याने आपणाकडे बोलावून घेतले. कित्येकास त्याने कैद केले; कित्येकास कामावरून दूर केलें [पसासं २२५१, HS पृ. २१७]. मेच्या ३ तारखेपूर्वी संभाजी राजा झाल्याचे सर्वत्र जाहीर झाले. या वेळी, मोरोपंत व आण्णाजी दत्तो त्याचे हुकूम स्वीकारण्यासाठी पन्हाळगडावर गेले. राजाराम रायगडावरच होता. रायगडावरील सर्व अधिकारी यावेळी कामावर रुजू झाले. या वेळेपर्यंत अधिकारीवर्गांत कोणताही बदल झाला नाही [ त्रै. व ९ अं. १ पृ. १४; संपसासं पृ. १०२: पसासं २२५६; HS पृ. २१७ ].

---

१. शिचप्रपृ. ५३ वरील शिवापूरकरदप्तर यादींत मंचकारोहणाची मिती वैशाख व॥ ३ दिली आहे, ती चूक; कारण, राजारामास कारभार करण्यासाठी तत्काल राजा बनविणे जरूर होते. संभाजीने राजत्व जाहीर केल्यानंतर राजारामाच्या मंचकारोहणास अर्थच नव्हता! सं. बखर पृ. ४ ( आवृत्ति १९१५ ) वर हीच चूक; राखं १५ ले. ३०१ मध्ये हीच चूक. पहा– पसासं २२५१.

शके १६०२ वैशाख व॥ १३, १६ मे १६८० रोजी संभाजीचे वतीने रायगडावर धराधर सुरूं झाली [ शिवप्रपृ. ५३; भाइसंत्रैवाइश. १८३६ ]. याचा स्पष्ट अर्थ की सोयराबाईचा पक्ष सर्वांनी सोडला व संभाजीचे राजा म्हणून स्वागत केलें. ३ जून १६८० रोजी मुंबईहून सुरतेस गेलेले पत्र सांगतें, संभाजीला बापाच्या सर्वस्वाचा ताबा मिळाला. त्याने नवे सुभेदार व अंमलदार नेमले. राजाराम सुरक्षित असून त्याला संभाजी दयाशील वृत्तीने वागवील, असें म्हणतात. त्याने आण्णाजी दत्तोचा शिरच्छेद केला.[१] त्याची मोरोपंतावर खप्पा मर्जी नाही; पण त्यास त्याने विश्वासातही घेतले नाही [ पसासं २२६१ ].

आषाढ शु॥ २, शुक्रवार ता. १८ जून १६८० रोजी संभाजी रायगडास आला. त्याने राजारामास केवळ नजरकैदेत ठेवले व राज्यकारभार करण्यास सुरुवात केली [ शिवप्रपृ. ३०, ५३; कासंपया. पृ. ३८४; संबखर पृ. ५; HS. पृ. २२३ ]. २६ जूनच्या राजापूरहून सुरतेस गेलेल्या इंग्रजी पत्रांतही संभाजी रायगडावर गेल्याचा निर्देश आहे [ पसासं २२६५ ]. ऑमर्स् म्हणतो की रायगडावर येत असता संभाजीजवळ फक्त पाच हजार घोडेस्वार होते. त्याची व राजारामाची गडावर भेट झाली; त्या भेटींत द्वेष नसून प्रेम होतें [ पृ. १२१ ]. ' शिवाजी महाराज वारल्यावरी राजारामसाहेब यांचे राजकारण जाले. संभाजी महाराज पन्हाळ्याहून रायगडास आले. तेव्हा कैद करून बेडी घातली ' [ भाइसंमं. अश. १८३४ पृ. २१५].

वर दिलेल्या आधारांतून मजकुराचा जसा एकसूत्रीपणा आहे, तसा तपशिलांत फरक आहे. पण याचा अर्थ असा की संभाजी रायगडावर आला व त्यास प्रतिकार न होता राजपद प्राप्त झालें. सोयराबाईचा पक्ष अगदी निष्प्रभ ठरला

शिवाजीच्या प्रधानांमध्ये कोणाला राजा करावे, याबद्दल मतभेद होता. आण्णाजी पंडित धाकट्याच्या बाजूचा होता; मोरोपंत ज्येष्ठ पुत्र संभाजी ह्याचा पुरस्कार करित होता. संभाजी महाराजा झाला. [ पसासं. २३०७; फ्रायर भाग ३ पृ. १६६-१६९ ]. संभाजीला या प्रसंगी सैन्याच्या जोरावर राजपद मिळवावयाचें असल्याने त्याने सैन्याला दोन महिन्याचा पगार आगाऊ दिला. ३० जूनच्या सुमारास त्याच्या विरुद्ध उठलेलें काहूर शमून राज्यांत स्थिरस्थावर होऊ लागलें. जुलै १२ चें मुंबईहून सुरतला गेलेलें पत्र म्हणतें, ' संभाजी रायगडास आहे. तो राजारामाशी दयाबुद्धीने वागत आहे. आण्णाजी पंडित जिवंत असून त्यास बेड्या घालून संभाजीने त्याचे हाल चालविले आहेत. संभाजी राजा झाला असून त्याचे जवळ वीस हजार सैन्य आहे. तो मेहनती आणि सावध आहे [ HS. पृ. २१७,२१८; पसासं २२६५;

१ ही बातमी पुढे खोटी ठरली.

ऐ. व ९ अं. १ पृ. १५; संपसासं पृ. १०३, १०४ ]. यावेळी सोयराबाईसही राजारामाप्रमाणे कैद झाली होती [ उप्रसं. पृ. २३ ]. मोरोपंत आण्णाजी दत्तोप्रमाणे कैदेंतच होता. ' त्याचे प्रधानकीचें कामकाज संभाजीने उधो योगदेव यास सांगितलें. शिक्का चाल्ला. संभाजीराजे यास राज्याभिषेक जाला, तेव्हा बेडी तोडली. मोरोपंत बरीच होते [ भाइसंमं. अश. पृ. २१५ ].

२० जुलै १६८०, श्रावण शु॥ ५ म्हणजे नागपंचमी या दिवशी[१] संभाजीने सिंहासनारोहण केलें. मराठी लेखकांनी या प्रकारास मंचकारोहण म्हटलें आहे [ शिचप्रपृ. ३०; ५३; कासंपया. पृ. ४७५; संबखर पृ. ५; उप्रसं. पृ. २४; संप्रसासं. पृ. १०४, HS पृ. २२३; NHM I पृ. २९४ ]. त्याने राज्यकारभारास सुरुवात केली. आपणास राजा होणें सुलभ झाल्याचें पाहून त्याचें मन प्रसन्न झालें. ज्या प्रतापगडाच्या भवानीमुळे हें घडून आलें, तिला दरवर्षी दहा हजार होन देणगी दिल्याचें शिक्कामोर्तबाचें पत्र त्याने करून दिलें. सदर पत्र २३ आगस्ट १६८० चें असून अजून अप्रसिद्ध आहे.

ऑगस्ट महिन्यांत संभाजीने आपल्या कारकुनांस गडावरील संपत्तीच्या याद्या आपणापुढे ठेवण्यास सांगितलें. साहित्य तपासून घेण्याचें काम इतरांवर न सोपवता त्याने स्वतः जामदारखान्याची तपासणी केली. संपूर्ण यादी देणे शक्य नाही; थोडा नमुना पहा—

सोनें ९ खंडी, होन ५ लक्ष, तांबें ३ खंडी, शिसें ४५० खंडी, लोखंड २० खंडी, जस्त व शिसें यांची मिश्र धातु ४०० खंडी, चांदी ५॥ खंडी, ब्राँझ २७२ खंडी, निरनिराळ्या अधिकाऱ्यांजवळ ३ लक्ष होन खरेदीस दिले होते ते. शिवाय, निरनिराळ्या किल्ल्यांवर ३० लक्ष होनांची सम्पत्ति ठेविली होती. मसाल्याचे पदार्थ, सुगंधी पदार्थ प्रचंड प्रमाणांत होते. भात १७ हजार खंडी होतें. तेल ७० हजार खंडी, २७० खंडी सैंधव, २०० खंडी जिरें, २०० खंडी गोपीचंदन व २०० खंडी गंधक होतें [ H.S. पृ. १८७ ते १९४ ] वेरिंगच्या आधारें कुलाबा गॅझेटियरकर्ते लिहितात की यावेळी गडावर कापडाचीं चार हजार पांढरी ठाणे, तीन हजार हलक्या किंमतीच्या कापडाचे कपडे, एक हजार ठाणे बऱ्हाणपुरी कापड, पैठणी कापडाचे चार हजार तागे, अहमदाबाद-जाल्ना पेठांचे कापड, एक लक्ष तागे हलकें कापड गडावर होतें. धान्य, डाळी, तंबाखू, साखर व आणखी कितीतरी वस्तु फार मोठ्या प्रमाणांत होत्या [ Marathas by Warings पृ. २१५, २२३ इ. स.

१. कासंपया. पृ. ४५५ वर शके १६०२ श्रावण शु॥ १५ हा काल दिला आहे; तो चूक.

१८१० ची आवृत्ति; कुर्गेपृ. ३७३, ३७४]. नऊ कोट रुपयांची सोन्याची नाणीं, ५१ हजार तोळे सोनें, २०० तोळे माणकें, एक हजार तोळे मोत्यें, ५०० तोळे हिरे, चाळीस हजार डर्कस्, ३० हजार तलवारी, ४० हजार भाले, ६० हजार लॉंग डर्कस्, ५० हजार दुधारी तलवारी, ६० हजार ढाली, ४० हजार धनुष्यें, १८ लक्ष बाण इत्यादि संपत्ति शिवनिधनसमयी रायगडावर होती [कुर्गेपृ. ३७३, ३७४ टीप].

इ. स. १६८० चा पावसाळा संभाजीने गडावर काढला. या काळांत महाराष्ट्राचें फार मोठें नुकसान झालें. ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यांत रायगडावर मोरोपंत पिंगळे यांचें देहावसान झालें. [शिचप्रपृ. ३०; त्रै. व ९ अंक १ पृ. १५; उप्रसंपृ. २४; NHM I पृ. २९४]. त्याचे जागी संभाजीने निळोपंतास पेशवेपद दिलें.

संभाजीचें राज्यारोहण शके १६०२ रौद्र संवत्सर माघ शु॥ ७, इ. स. १६८१ फेब्रुवारी १६ या दिवशी रायगडावर विधिपूर्वक झालें. या प्रसंगीं त्याने पुरंदरशांति, विनायकशांति इत्यादि विधि करून १२ तुला केल्या [संबखर पृ. ७८; शिचप्रपृ. ३१, ५३; राखं १५[1] ले. ३०१; उप्रसंपृ. २०, २४. NHM I पृ. २९४; भाइसंमंवाइश. १८३६ पृ. २४]. संभाजीने याप्रसंगी कैदेत ठेवलेली माणसें सोडून दिली. हिरोजी फर्जंद व आण्णाजी दत्तो यांस त्याने आपल्या पूर्वीच्या पदावर रुजू करून घेतलें [उप्रसंपृ. २४].

इ. स. १६८१ जूनच्या आरंभीं औरंगजेबाचा मुलगा शहाजादा अकबर व राजपूत सरदार ठाकूर दुर्गादास महाराष्ट्रांत आले. आपल्या बापाविरुद्ध अकबराचें मन अगदी विटलेलें होतें व त्यास पदच्युत करून आपण गादीवर बसावें अशी शहाजादा अकबराची तीव्र तळमळ होती. मराठयांच्या मदतीने आपण बादशाही मिळवावी, असा त्याचा हेतु होता. या संधीचा फायदा शिवाजीने घेतला असता व आपल्या राज्याचें साम्राज्यांत रूपांतर करून बादशाही सत्ता दक्षिण भारतांतून तरी नष्ट केली असती. पण शिवाजीची भावना आणि वृत्ति यांचा संभाजीमध्ये संपूर्ण अभाव होता. रायगड ताब्यांत आल्यावर संभाजीची पहिली तडफ ओसरून त्याची विलासी वृत्ति जागी झाली.

जूनच्या १ ल्या तारखेस शहाजादा अकबर रायगडपासून सुमारे २५ मैलांवर पाली येथे आला. त्याच्या आगमनाची व हेतूची वार्ता संभाजीस कळली असल्यामुळे, संभाजीने नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद यांस शहाजाद्याचे स्वागतास

---

१. राखं १५ ले. ३०१ वर राज्यारोहणाची मिति शु॥ १० दिली आहे. सदर लेख उत्तरकालीन असल्याने मिति प्रमाण मानता येत नाही.

व दिमतीस धाडले व त्यास पालीजवळ राहण्यास जागा दिली. हिरोजी एकटाच रायगडावर आला व नेताजी शहाजाद्याची योग्य व्यवस्था लावण्यास मागे राहिला [ NHM I पृ. २९६, २९९ ]. संभाजीच्या माणसांनी शहाजाद्यास काही कमी पडू दिलें नाही व संभाजीचे वतीने त्यांनी एक हजार मोहरांचा नजराणा शहाजाद्यास दिला [ आर्मे पृ. १३३ ].

शहाजाद्याच्या रूपाने मराठयांस कोणती संधी चालून आली आहे, याची कल्पना हिरोजी फर्जंद यास स्पष्ट आली होती. हिरोजी हा शहाजीचा अनौरस पुत्र आणि शिवाजीचा भाऊ होता. शिवाजीबरोबरच त्याचें आयुष्य गेल्यामुळे शिवाजीच्या धोरणी दृष्टीची त्यास चांगली कल्पना होती. हिरोजी शहाजाद्याची भेट घेऊन रायगडावर परत गेला, तेव्हा त्याची पूर्ण खात्री झाली की दिल्लीच्या बादशहाची अमर्याद सत्ता पूर्ण खिळखिळी करण्याची नामी संधी मराठयांस आली आहे; पण संभाजींत त्या संधीचा फायदा उठविण्याचें कसब नाही. व्यसनी व लहरी राजाचे हातून राष्ट्रसंरक्षणही होणे जर शक्य नाही, तर तो या संधीचा फायदा तरी कसला साधतो, अशी भावना त्याचे मनांत उत्पन्न झाली. रायगडावरील पुष्कळ जाणत्या माणसांची अशीच तीव्र भावना झाली होती. हिरोजी रायगडावर परतल्यावर सोयराबाई, अनाजीपंत वगैरे मंडळींशी त्याचा विचारविनिमय झाला असला पाहिजे. पहिले १–२ महिने संभाजी व शहाजादा यांनी निष्क्रियतेत काढले; हे पाहून रायगडवरील मंडळींनी एक गुप्त कट उभारला.

पण कटाची ही बातमी शहाजाद्याने संभाजीच्या कानावर घालून त्यास सावध केले. इ. स. १६८१ च्या ऑगस्ट महिन्यांत रायगडावर संभाजीला अन्नातून विषप्रयोग करण्याचा प्रयत्न झाला; विषप्रयोग होणार, असें संभाजीस अगाऊ कळले होते ! त्याने तें अन्न कुत्र्यास व एका नोकरास घातलें व ते दोन्ही प्राणी अल्पावकाशांतच मरण पावले. हे पाहून संभाजीचा क्रोध अनावर झाला व त्याची चित्तवृत्ति विलक्षण सशंक झाली. त्याने लगेच प्रमुख मंडळींस पकडून बेड्या घातल्या. आण्णाजी दत्तो, त्याचा भाऊ सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी, श्यामजी नाईक पुंडे, महादेव अनंत व आणखी तीन इसमांस त्याने प्रथम कैद केले. यांपैकी आण्णाजी व सोमाजी दत्तो, हिरोजी व बाळाजी यांस त्याने परळीखाली ठार केले. श्यामजी नाईक यावेळी कर्नाटकांत होता, त्यास कैद झाली. बाकीच्या चौघांस त्याने हत्तीच्या पायीं दिले [ उप्रेसंपृ. २८, २९, ३०; आर्मे पृ. १३३, १३४; कुगॅपृ. ३७३; HS पृ. २२३; NHM I पृ. २९९ ]. या कटांत केशव पुरोहित, प्रल्हाद निराजी, मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत, रावजी सोमनाथ

हींही माणसें संभाजीनें पकडलीं व कैदेंत ठेवलीं. त्यांची सुटका संभाजीचे मृत्यूनंतर झाली [ उप्रसंपृ. ३१ ].

संभाजीचा मुख्य रोष आपली सावत्र आई सोयराबाई इजवर झाला. तिनेच हा सर्व व्यूह रचिला अशी त्याची खात्री झाली. शिवाजीस विषप्रयोग करून त्या ठार मारिलें, असा आरोप त्याने तिजवर केला आणि तिला मृत्यूची शिक्षा फर्माविली. कोणी म्हणतात की तिला विष देऊन ठार मारलें; कोणी लिहितात की तिला उपाशी ठेऊन हाल करून मारिले; भिंतीत विटांनी चिणून ठार केले असाही प्रवाद होता. सोयराबाई ही शिर्के घराण्यातील होती. त्यांजवरही संभाजीची वक्रदृष्टी झाली. त्यामुळे शिर्के मंडळींनी मराठ्यांचा पक्ष सोडला व ते मोंगलास जाऊन मिळाले. हा प्रकार १६८१ च्या ऑगस्टपासून पुढे तीन महिनेपर्यंत रायगडावर चालू होता. याशिवाय आणखी २१ माणसें संभाजीच्या क्रोधसत्रांत प्राणास मुकलीं, असा इंग्रज लेखकांचा आशय आहे. [ उप्रसंपृ. ३०, आर्म पृ. १३३-३४; NHM I पृ. २५७, २९३; कुगॅपृ. ३७३ ].

वर दिलेल्या मजकुराबाबत आपणास थोडें मितिवार लिहिता येतें. इ. स. १६८१ ऑक्टो. १२ पूर्वी संभाजी रायगडावर आला आणि त्याने विषप्रयोगाच्या कटाची चौकशी केली. २७ ऑक्टोबर रोजी सोयराबाईचा मृत्यु ओढवला [ त्रै. व. ९ अ. १ पृ १७; संपसासंपृ. १०९; NHM I पृ. २९९; ].

या प्रकारांमुळे संभाजीने ठाकूर दुर्गादास व शहाजादा अकबर यांची बराच कालपर्यंत भेट घेतली नाही. कार्तिक शु॥ ११, रविवार ता. १३ नोव्हें. १६८१ या दिवशी संभाजी प्रथम पालीस गेला व त्याने शहाजादा व ठाकूर दुर्गादास यांचा सन्मान केला [ उप्रसंपृ. २८ ]. या भेटीनंतर त्याने शहाजाद्यास रायगडावर नेले.

१६८१ डिसें. ७ च्या सुमारास संभाजी शहाजाद्यासह रायगडावरून उतरला व शहाजादा पालीकडे वळल्यावर संभाजी जंजिरेकरांच्या पारिपत्त्यासाठी २० हजार सैन्यासह जंजिऱ्याकडे वळला [ आर्म पृ. १३९-१४० ]. शहाजादा व संभाजी यांचे-विरुद्ध रान उठविण्याच्या दृष्टीने औरंगजेबाने जंजिऱ्याच्या शिद्दीस युद्धास प्रवृत्त केलें होतें व शिद्दीने रायगडच्या पायथ्यापर्यंतचा मुलुख मारून ताराज केला होता. संभाजीने जंजिऱ्यास वेढा घालून व शेजारच्या टेकडीवरून सतत तीस दिवस तोफा डागून शिद्दीची खात्री पटविली की रायगडचा संभाजी रणांत उतरल्यावर त्याची बुद्धि शत्रूस गुंगवून टाकण्यास समर्थ आहे [ NHM I पृ. ३०६; आर्म पृ. १३९–१४० ].

---

१. ऑर्मस्ने या हकीकतीचा काल १६८१ सप्टें. दिला आहे; तो ' नोव्हें. १३ नंतर ' असा पाहिजे [ पृ. १३४ ].

# १३ रायगडावर शाक्तांचा वरचष्मा

शिवचरित्रलेखकांत परमानंद कवीस फार महत्त्व आहे. प्रवरा नदीच्या तीरावर नेवासें येथे गोविंद नावाचा एक ब्राह्मण रहात होता; त्याच्या पुत्राचें नाव परमानंद, शिवकालांत त्यास कवींद्र हा किताब प्राप्त झाला. इ. स. १६६९ मध्ये परमानंद रायगडजवळ पोलादपूर येथे राहिले. ते विद्वान् व साधुवृत्तीचे असल्यामुळे त्यांनी पोलादपूर येथे अध्ययन व अध्यापनांत, शांतपणे जीवित व्यतीत करण्याचें ठरविलें. इ. स. १६७२–७३ मध्ये एकदा महाराज रायगडावरून उतरले; त्यांनी पाचाडच्या अंबाबाईचें दर्शन घेतलें व ते पौलस्त्यनगर म्हणजे पोलादपूर येथे आले. त्यांनी स्वामींचें दर्शन घेतलें व त्यांचा आशीर्वाद मस्तकी धारण केला [ जयराम पिंडे पर्णाल पर्वतग्रहणाख्यान अ. ४ था; ऐसंनि. खं. ४ था– द. वा. पोतदार ].

इ. स. १६७४ त अगर त्या सुमारास परमानंद कवीस शिवचरित्रावर एक काव्य लिहिण्याची सूचना देण्यांत आली असावी. त्यांनी अनुपुराण ऊर्फ सूर्यवंशम् अगर शिवभारत हें शंभर अध्यायांचें काव्य लिहिण्याचा संकल्प केला व त्या काव्याचे ३१ अध्याय पूर्ण व ३२ व्यांतील नऊ श्लोक इतका भाग लिहून संपविला. त्यांत इ. स. १६६२ पर्यंतचें शिवचरित्र आलें. हा भाग प्रसृत झाल्यामुळे त्याच्या अनेक हस्तलिखित प्रती आढळतात.

याच कवींद्र परमानंदाच्या नावावर मोडणारीं काही काव्यें परमानंदकाव्यम् या पुस्तकांत एकत्र प्रसिद्ध करण्यात आली आहेत. भोसलकुलप्रशस्ति, शिवाजीचें राज्याभिषेकानंतरचें चरित्र, राजारामास गादीवर बसविण्याचा व्यूह, संभाजीचें राज्यारोहण व अंशावतरण म्हणजे शाहूचा जन्म या पाच विषयांवरचीं काव्यें या ग्रंथांत काव्यरूपाने वाचावयास मिळतात.

भोसलप्रशस्ति हें काव्य कोणी लिहिलें हें निश्चित सांगता येत नाही. संभाजीच्या कालांत, त्याच्या एखाद्या आश्रित कवीने तें लिहिलें असावें. त्यांत शहाजी, शिवाजी व संभाजी यांची प्रशस्ति गायिली आहे. इ. स. १६८७ मध्ये शहाजादा अकबर इराणास गेला; तेथपर्यंतचे संभाजीचें चरित्र त्यांत थोडक्यांत आलें आहे. रियासतकार व सरकार मानीत असले, तरी या काव्याचा परमानंदांशी संबंध नाही; कारण हें वेगळ्या लेखनशैलींतील असून त्यांत परकीय शब्दांची योजना आहे.

दुसरा काव्यविषय — राज्याभिषेकोत्तर शिवचरित्र हा होय. शिवाजीचा राज्याभिषेक वैदिक पद्धतीने झाल्याचें नमूद आहे. तो धर्माने राज्य करू लागल्यामुळे कलि रागावला. ' कलियुगांत ' असें घडतें याबद्दल त्याने शंकराकडे तक्रार केली. शंकराने सांगितलें की शिवाजीच्या अवतारसमाप्तीचा काल जवळ आला आहे.; नंतर तुझेंच राज्य ! कलीच्या प्रेरणेने शिवाजीचे मंत्री मोह-मत्सरग्रस्त झाले. शिवाजीसही द्रव्यलोभ सुटला. तो राणी सोयराबाईच्या तंत्राने वागू लागला. संभाजी सर्वगुणसंपन्न असूनहि त्यास बाजूस सारून राजारामास महाराष्ट्रराज्य देण्याचें त्याने ठरविलें, इत्यादि हकीकत त्यांत आली आहे. हें काव्य परमानंदांचें असावें, असें संपादकास वाटतें; भाषासरणीहि थोडी परमानंदपद्धतीची आहे. पण विरक्त होऊन मठांत रहात असलेल्या परमानंदाने तें लिहिल्याची शक्यता श्री. फफे मानीत नाहीत, तें परमानंदाचा मुलगा अगर शिष्य यांचें असावें.

राजारामास गादीवर बसविण्याचा व्यूह दिग्दर्शित करणारें वर्णन दीड अध्यायांत आलें आहे. हें अपूर्ण काव्य परमानंदाचें नव्हे, असें संपादक व श्री. फफे एकमताने सांगतात.

संभाजीचें राज्यारोहण या चवथ्या काव्यांत पुढील हकीकत अनुस्यूत झाली आहे— संभाजीने पन्हाळ्यावर शिवाजीचं उत्तरकार्य केलें. प्रल्हाद निराजी व हंबीरराव मोहिते त्यास अनुकूल झाले व तो रायगडास आला. त्याने राज्याभिषेक करून घेतला. संपादक मानतात की हें काव्य परमानंदलिखित होय. पण या काव्यांत दिग्दर्शित झालेलें अनेकविध अज्ञान पहाता, हें काव्य दुसऱ्या कोणाचें तरी असावें, असें श्री. फफे यांचें मत आहे.

पाचवें काव्य अंशावतरणम् , याचे बारा अध्याय असून ते गोविंद कवीने लिहिलें आहे. यांत कलुशाचा शाक्तपंथ, तांत्रिक पद्धति, जारणमारण प्रयोग, संभाजीची कलुशाबद्दल आपुलकी, शिवयोगी, गणेशभट्ट जांभेकर, पुत्रप्राप्तीसाठी आतुर झालेला संभाजी इत्यादि हकीकती आल्या आहेत. श्री. फफे यांचे मतें हें सर्व काव्य काल्पनिक आहे.

पण या सर्व समकालीन काव्यांना इतिहासाचे दृष्टीने नसले, तरी एका वेगळ्या दृष्टीने महत्त्व आहे. त्यायोगे छत्रपतींचे अखेरचे दिवस कसे गेले असतील याची कल्पना येते; संभाजीच्या हालचालींचा अंदाज येतो आणि मुख्यतः महाराष्ट्राच्या समाजकारणावर त्यायोगे प्रकाश पडतो संभाजीच्या कालांतील धार्मिक परिस्थिति समजण्यास ते एक महत्त्वाचे साधन आहे.

गागाभट्ट, मोरोपंत पिंगळे, स्वतः शिवाजी, जिजाबाई इत्यादि सर्व शिवकालीन प्रमुख माणसें शैव किंवा वैष्णव होतीं. शिवकालांत या दोन पंथांचें महाराष्ट्रांत दृढ बीजारोपण झाले होते. शिवछत्रपतींच्या पहिल्या राज्याभिषेकापर्यंत ही परिस्थिति कायम होती. पण निश्चलपुरी गोसावी तंत्रविद्यानिपुण म्हणजे शाक्त होता. त्याने शिवछत्रपतींना दुसरा राज्याभिषेक करविला, यांतच तांत्रिकांच्या उदयाचीं बीजें आहेत.

महाराष्ट्रीय शाक्तपंथाचें शिक्षण बनारस व बंगालमध्ये मिळालें. संभाजीचा शाक्तपंथीय गुरु शिवयोगी याने तेथे जाऊन शिक्षण घेतलें व तो महाराष्ट्रांत परत आला. प्रारंभी हा पंथ समाजाच्या खालच्या थरांतील लोकांत थोडाफार पसरला; पण त्याला मोठेपणा मिळाला नाही. बंगाल व गोवा या प्रांतातील गौड व सारस्वत ब्राह्मणांनी शक्तीची पूजा स्वीकारल्यानंतर मात्र, तो समाजाच्या वरच्या थरात मान्यता पावू लागला.

अन्य पंथीयांप्रमाणेच शाक्तांनी श्रेष्ठ तत्त्वज्ञान निर्माण करण्याचें ध्येय ठरविलें होतें. स्वतःच्या मनावर व देहावर पूर्ण स्वामित्व मिळविणें, अज्ञात शक्तींस आपले दूत अगर दास बनविणे व अंतीं मोक्षसाधन करणे, हेंच त्यांचेंही उद्दिष्ट अगर ध्येय होतें. वशीकरणादि प्रकारांस तेही सामान्य गोष्टीच मानीत; पण पंथप्रचाराकरिता ते या गोष्टी अवलंबीत.

शाक्त तत्त्वज्ञानी शिवयोगी याने शृंगारपूर येथे आपली मठी स्थापून शाक्तपंथाच्या प्रचारास प्रारंभ केला. त्याची कीर्ति प्रसृत होऊन गणेश अनंत जांभेकर व केशवभट्ट उपाध्याय हे दोन कऱ्हाडे ब्राह्मण त्याचे शिष्य झाले व त्यांनी शाक्तपंथाचा अभ्यास केला.

निश्चलपुरीकृत शिवराज्याभिषेक हा महाराष्ट्रांतील शाक्तपंथाचा पहिला ठळक विजय होय. संभाजीच्या कारकीर्दीत शाक्तांना दुसरा महत्त्वाचा विजय मिळाला. शिवाजीच्या अष्टप्रधानांतील ब्राह्मण वैदिक पंथाचे होते व त्यांनीच संभाजीविरुद्ध जाऊन राजारामाचे मंचकारोहण घडविले होते. संभाजीच्या आगमनानंतर त्यांचे राजकीय महत्त्व नष्ट होऊन तंत्रविद्येचा उत्तरेकडील जाणता अनुयायी कवि कलश

याने एकट्याने त्यांपैकी अनेकांच्या जागा व्यापिल्या. त्यामुळे शाक्तपंथ राजसत्तेशी पूर्ण निगडित झाला. कवि कलश अष्टपैलु विद्वान् होता. तो उत्कृष्ट काव्य करी. अगोदर नसेल, तर शिवराज्याभिषेकाच्या वेळीं तो महाराष्ट्रांत आला असावा. एका जुन्या ग्रंथांत केशवभट्ट कबजीचा उल्लेख आला आहे; त्यावरून त्याचें नांव केशवभट्ट असावें; त्यालाच पुढे संभाजीने छंदोगामात्य हा किताब बहाल केला. शिवचरित्रप्रदीप पृष्ठ ३२, ३३ वर म्हटले आहे की पोर्तुगीझांवरील साष्टबार्देशाची स्वारी संपवून संभाजी रायगडास आला व त्याने कवि कलश यास कुल् अखत्यार दिला. यावरून त्याच्या पूर्वोदयाचा काल इ. स. १६८३ चा प्रारंभ हा निश्चित होतो. मुंबईकरांनी इ. स. १६८२ नोव्हें. २८ रोजी सुरतेस लिहिलेल्या पत्राचा व पोर्तुगीझ साधनांचा, या विधानाशी चांगला मेळ बसतो. या कवि कलशाने संभाजी व शिवयोगी यांचा दृढसंबंध घडवून आणला होता.

गादी मिळविल्यानंतर संभाजीस वाटू लागलें की आपणामागे वारस पुत्र पाहिजे. वैदिक ब्राह्मणांनी सांगितलेल्या व्रतवैकल्याचे योगाने आपणास पुत्रप्राप्ती होईल, असें त्यास वाटेना ! तेव्हा शिवयोगीने सल्ला दिला की संभाजीने कालीची पूजा बांधावी. योगायोग असा की हा पूजेचा विधि झाल्यानंतर मे १६८२ मध्ये शाहूचा जन्म झाला व संभाजीच्या छत्रपतित्वास वारस उत्पन्न झाला. यायोगे तांत्रिकांचें महत्त्व रायगडवरच्या दरबारांत कळसास पोहोचलें.

तांत्रिकांच्या अंधारातील पूजेच्या क्रिया, मांसाशन, मांससन्तर्पण, मद्यप्राशन इत्यादि प्रकारांमुळे महाराष्ट्राने या विद्येची मोठी धास्ती घेतली होती; तरीही राजसत्तेच्या आश्रयामुळे शाक्तपंथास महत्त्व प्राप्त झालें.

संभाजी व कवि कलश महाराष्ट्रास अप्रिय कां झाले होते, याचा अजमास, आपणास, या प्रकारामुळे लागतो.

परमानन्दकाव्यम् या ग्रंथामुळे आपणास पुढील गोष्टी नव्याने कळतात. ( १ ) संभाजीचा राज्याभिषेक रायगडावर शके १६०२ रौद्र, माघ शु।। ७ रोजी झाला [ इ. स. १६-१-१६८१ ]. [ पृ. ९ श्लो. ६३ ]. या गोष्टीस जेधे शकावलीचाही आधार आहे ( २ ) सोयराबाई ही शिर्के घराण्यांतील नसून मोहिते घराण्यांतील होय [ पृ. ८,२९,४५,५२, श्लोक ५४,१०७,४५,१६ ]. ( ३ ) संभाजीचा कलशाभिषेक शके १६०० कालयुक्त, चैत्र शु।। ११ [ इ.स. २३-३-१६७८ ] रोजी झाला [ पृ. ९ श्लोक ६२ ]. ( ४ ) शिवाजीच्या मृत्युपूर्वी रघुनाथ पंडितराय क्षयाने वारले [ पृ. १५२ श्लो. १२ ]. ( ५ ) राहुजी सोमनाथ हा पहिला ‘ प्रति-

निधि ' होय. यास, कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्यापूर्वी शिवाजीने राजप्रतिनिधि नेमलें [ पृ. ६८ श्लो. १,२,३ ].[१]

संभाजीच्या कारकीर्दीत रायगडावरून न्यायनिवाडे करण्याचे काम प्रामुख्याने कवि कलश यानेच केले. त्याचे न्यायनिवाडे व संभाजीने स्वतंत्रबुद्धीने दिलेले निकाल अजून उपलब्ध आहेत; त्यांतील काही नमुने पहाणे बोधप्रद होईल.

( १ ) नाडोली हा गाव मल्हार गोसावी सदावर्ती यास शिवपूर्वकाळी अग्रहार होता. आपल्या राज्यांत अग्रहार देण्याची रीत नाही, अशा सबबीवर शिवाजीने तो गाव अनामत ठेवला. इ. स. १६८० च्या जूनमध्ये संभाजीने तो गाव सदावर्ती याजकडे चालविण्याची आज्ञा देशाधिकाऱ्यास दिली. [ संपसासं. पृ. १०२,१०३ ले. २; सनदापत्रें पृ १३५ ].

( २ ) केशवभट्ट दामोदरभट्ट पुरोहित संगमेश्वर तालुक्यांत पुन्यें येथे रहात. शिवाजीराजासंन्निध राहून त्यानी रायगडावर दानाध्यक्षाचें काम केलें. शिवाजीने त्यांचे मुखें रामायण श्रवण केलें. समाप्तीचे वेळी श्रवणाची सांगता म्हणून महाराजानी त्यास भूमिदान केलें. शिवाजीनंतर संभाजीसही त्यानी श्रीरामायण प्रयोगरूपे सांगितले; म्हणून संभाजीने त्यास धारादत्त दान पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने दिलें [ सनदापत्रें पृ. १५७ ले. ४४; संपसासं. पृ. १३०; पेद. ३१ ले. ५३ ]. केशवभट्टाने संभाजी व राजाराम याचे वेळीही दानाध्यक्षाची जागा भूषित केली इ. स. १६९० जानेवारी ४ रोजी त्याने आपला राजारामचरितम् हा ऐतिहासिक ग्रंथ पुरा केला [ स्थिर. राजाराम पृ. २७ ].

( ३ ) कसबे मसूर येथील महादजी पाटील व सटवोजी भोसले यांमध्ये उत्पन्न झालेल्या वादाचा निर्णय लागावा, म्हणून महादजीने रायगडावर फिर्याद आणिली; तेव्हा कवि कलश व सरकारकून यानी हाजीरमजालसी भरवून मुनसुफी केली [ राखं. १५ ले. १० पृ. ३३, ३४ ].

( ४ ) इ. स. १६८४ मध्ये चौल येथील बाळाजी ताऊजी देसाई व त्याचा भाऊ आप्पाजी ताऊजी देसाई यांत देसाईपणा व वाटणीविषयक वाद उत्पन्न झाला.

---

१. येथवर लिहिलेल्या या प्रकरणांस सरदेसाईसंपादित ' परमानंदकाव्यम् ' ग्रंथास जोडलेला श्री. सरकारांचा पुरस्कार, सरदेसायांनी दिलेला सारांश, पुस्तकांतील काव्य, HS पृ. ३१४, ३१८, ३२० NHMI पृ. ३०१, ३०१ यांचा आधार आहे. श्री. य. गो. फफे यांचा ' सह्याद्रि ' खंड ३७ अंक ४ - एप्रिल १९५३ पृ. १९५ ते १९९ वरील लेखाचा आम्हास फार उपयोग झाला.

कवि कलश याने सदर वाद तोडण्यासाठी त्यांस रायगडावर बोलावले व वादाची भूमिका समजून घेतली [ शिचसा. खंड ९ ले. ९७ ].

( ५ ) कवि कलश याची परधर्मांत गेलेल्यांच्या शुद्धीकरणाबाबत कोणती भूमिका होती, हे सांगणारा एक महत्त्वाचा लेख उपलब्ध आहे. इ. स. १६८६ मध्ये हरसूल येथील एक ब्राह्मण गंगाधर रंगनाथ कुळकर्णी यास मोंगलांनी बलात्काराने बाटविले. तशा स्थितींत त्याच्या आयुष्याची ५। वर्षे गेलीं. पण या कालात त्याने मुसलमानाशी अन्नोदकसंसर्ग ठेविला नाही. झाल्या कर्माचा त्यास पश्चात्ताप होत होता. त्याने छत्रपतींकडे प्रायश्चित्तपूर्वक शुद्धीकरणाची खटपट रायगडावर सतत एक वर्ष चालवली होती. सरकारकून, न्यायाधीश, उपाध्ये दानाध्यक्ष, भले ब्राह्मण गृहस्थ यांस तो शरण गेला. शेवटी छन्दोगामात्य यांनी त्याचे वतीने छत्रपतींशी बोलणें केलें व त्यास प्रायश्चित्तपूर्वक शुद्ध करून घेण्याचा निर्णय देऊन त्र्यंबकेश्वरास त्याचें शुद्धीकरण करून घेतलें. मग छन्दोगामात्यांनी त्यास आपले पंक्तीस भोजनास बोलावून त्यास शुद्धीपत्र दिलें. या पत्रावर पंडित, अष्टप्रधान यांनी त्यास हिंदुत्व प्राप्त झाल्याबद्दल साक्षी घातल्या [ राखं. ८ ले ४०. ]

( ६ )बेरड नाईकाचें भांडण तोडण्यासाठी संभाजीने खंडई पानवडीकर, येसाजी सुपेकर, इत्यादि अनेक बेरड नाइकांस बोलावून त्यांचा वतनसंबंधी तंटा तोडला [ ऐसंसा. खंड ५ पृ. २०।२१ ].

या उताऱ्यांवरून आपणांस संभाजीच्या कारकीर्दीतील सामाजिक व धार्मिक व्यवस्थेबद्दलची कल्पना होते आणि असे म्हणण्यास हरकत दिसत नाही, की संभाजीचें धार्मिक धोरण स्पष्ट, सुबोध आणि प्रगत होतें. राजनैतिक अंदाधुंदी माजली असता धार्मिक व सामाजिक धोरण विचारपूर्वक चालविण्याचें काम कवि कलश व संभाजी यांनी केल्याचें पाहून त्यांचेबद्दल मनाचा थोडा अनुकूल ग्रह होतो.

संभाजीच्या काळांत रायगडावरील व्यवस्था कशी असेल व तेथे कोणते अधिकारी रहात असतील, व कोणती कामगिरी करीत असतील याबद्दलही काही पुरावा आपणास उपलब्ध आहे.

( १ ) राजगृहीचीं कामें या कालांत, रघुनाथभट पंडितराय नवहस्त हे दिवाकर गोसावी याचे वतीने करीत असत [ श्री. सां. ले. ५१; संपसासं. ६१ ]. ( २ ) इ. स. १६८० ते १६८९ या नऊ वर्षांच्या कालांत राघो स्वानंद बापोजी दिवाकर चिमणगांवकर हे रायगडावर दप्तरदार म्हणून काम करीत होते [ सनदापत्रें पृ. ५९।६० संपसासं. २८ ]. ( ३ ) रायगडावरील इमारतींची डागडुजी व व्यवस्था पहाणारा अधिकारी म्हणून हिरोजी इंदलकर ' सुभेदार इमारती किल्ले रायगड ' काम पहात

होता. त्याजबाबत संशय घाटून संभाजीने त्यास इ. स. १६८७ च्या सुमारास कैद केलें; त्याचे कागदपत्रांची झडती घेतली; असा स्पष्ट उल्लेख आढळतो [ राखं. १८ पृ. ८२-८३, ले. ५७ ].

( ४ ) इ. स. १६८९ च्या फेब्रुवारीत संभाजीस पकडल्यानंतर सुद्धा रायगड-वर सर्व बाबतींत कसें व्यवस्थित चाललें होतें, याचा प्रत्यय आपणास येतो. रायगडवर या काळांत बहीरजी नाईक घाटगे हा रत्नशाळेवरील अधिकारी होता. त्यास राजा-रामाने आज्ञा केली की नारोपंत अमात्य संगमेश्वराहून येत असतां त्यांची चीजवस्तू लुटली गेली होती. आता त्या वस्तू सापडल्या असून त्यांच्या त्यांस परत द्याव्यात; फक्त त्यांचें सोन्याचें कलमदान रायगडच्या रत्नशाळेंत ठेऊन त्याचे मोबदला रत्नशाळे-तील सोनें त्याची किंमत म्हणून द्यावें; राहुजी सोमनाथ यासहि तशा अर्थाचं आज्ञापत्र राजारामाने धाडलें [ शिवसाखं. १० ले. १६ ].

या उल्लेखांवरून एक तर्क बांधण्यास हरकत नाही, की शिवाजीचे पश्चात् रायगडावरील राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने संभाजीने सर्व काही सुरळीत चालविलें. औरंगजेबाची स्वारी झाली नसती, तर फारसा उणेपणा दिसला नसता. मग बिघडलें होतें कुठें ? कमीपणा आला तो एका महत्त्वाच्या बाबतीत. मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्तो, सेनापति व स्वतः शिवछत्रपति हीं माणसें एकाचवेळी अनेक ठिकाणी सेनापति म्हणून कामें करीत व चारीहि दिशांस एकाच वेळी शिवराज्याचा विस्तार होई. त्यामुळे मराठ्यांच्या लढाऊ सामर्थ्याचा जो प्रत्यय येत होता, तो एक-दम कमी झाला, हा तो उणेपणा होय. संभाजीच्या कारकीर्दीत आरंभी संभाजी व हंबीरराव हे दोनच सेनानायक उरले हंबीररावाच्या पश्चात् संभाजी हाच राजा व सेनापति ही भूमिका झाल्याने रायगडापर्यंत शत्रू येऊन पोहोचला. या प्रत्यक्ष परि-स्थितीचा विचार पुढील प्रकरणांत करणार आहोत.



# १४ संभाजीच्या रायगडवरून स्वाऱ्या

औरंगजेब आणि संभाजी यामध्ये युद्धप्रसंग घडून येण्यास दोन ठळक कारणें घडलीं. शिवाजीने निर्माण केलेल्या राज्याची सखरांगोळी करणे व दक्षिणेकडील मुसलमानी शिया पंथाचीं राज्यें जिंकून संपूर्ण हिंदुस्थानभर सुन्नी साम्राज्य प्रसृत करणे, हें बादशहाचें ध्येय होतें. शिवाजीच्या काळांत तें शक्य झाले नाहीं; पण बादशहाने आपलें ध्येय सोडलें नव्हतें. तेव्हा, शिवाजीच्या मृत्यूने निर्माण झालेली अस्वस्थतेची परिस्थिति आपल्या ध्येयसिद्धीस अनुकूल; ती साधायची, हा बादशहाचा एक विचार. दुसरें, आपला बंडखोर मुलगा अकबर यास ताब्यांत आणणे, हें स्वारीचें तत्कालिक कारण. यामुळे इ. स. १६८१ च्या मध्यांतच बादशाही स्वारीस मूलतः प्रारंभ झाला.

जंजिऱ्याचा सिद्दी हा बादशहाचा अंकित व मराठ्यांचा शत्रू असल्याने स्वारीचा प्रारंभ शिद्दीकडून झाला. १६८१ मध्ये त्याचा उपद्रव मराठी राज्यास होऊ लागला, म्हणून संभाजीने चार हजार सैन्य रायगडावर तयार केले. नागोठण्याच्या बंदरांत त्याने २२ गलबतें आरमारी स्वारीसाठी सिद्ध केलीं. सप्टेंबर १६८१ मध्ये संभाजीचें आरमार व सैन्य उंदेरीजवळ जाऊन पाऊस कमी होण्याची वाट पहात राहिले [ ऑर्मे पृ. १२७ ]. बेलवडीच्या युद्धांत प्रसिद्धीस आलेला महाडचा दादाजी रघुनाथ प्रभु देशपांडे या स्वारीवर मुख्य होता त्याचा विजय झाला असता, तर त्यास अष्टप्रधानांत जागा मिळावयाची होती. पण सिद्दीने त्याचा पराभव करून महाडपर्यंत पाठलाग केला; महाडचें त्याचें घर मारलें व त्याच्या माणसांस पळवून नेलें ! [ उपर्स.

पृ. ३९।४० ]. अशा तऱ्हेने राजपुरीजवळचें युद्ध महाडपर्यंत येऊन पोहोचलें व संभाजीस सतत लढावेंच लागणार अशी परिस्थिति इ. स १६८२ च्या आरंभी निर्माण झाली. पुढील दोन वर्षे शिद्दी व पोर्तुगीज यांनी संभाजीस युद्धांत पूर्ण गुंतवून ठेवलें. त्यामुळे त्याचेकडून शहाजादा अकबर यास अपेक्षित मदत होईना व बादशहास भरपूर सवड मिळून तो दक्षिणेस आपला सेनासागर घेऊन उतरू शकला. संभाजीचें राज्य हीच रणभूमि झाली. युद्धशास्त्राचा पहिला नियम हा आहे की, युद्ध करावयाचें, तें शत्रूच्या प्रदेशांत करावयाचें असतें. त्यायोगे आक्रमकांचे बळ वाढतें व आक्रमितांचें द्रव्य, मानसिक धैर्य यांचा धुव्वा उडतो, धावत्या हालचाली सुलभ होतात व शत्रूचें जास्तीत जास्त नुकसान करता येतें. संभाजीस हें करता आलें नाहीं; शत्रूस आरंभींच त्याच्या प्रदेशांतील रायगड या राजधानीपर्यंतच्या वाटा मोकळ्या झाल्या.

इ. स. १६८४ च्या सप्टेंबरमध्ये औरंगजेबाने रायगडच्या मोहिमेस सुरुवात केली. ता २१ रोजी शहाबुद्दीनखान यास चाळीस हजार सैन्यासह बादशहाने रायगडच्या पायथ्याशी धाडले. इ. स. १६८५ जाने० १५ च्या सुमारास शहाबुद्दीनने रायगडच्या पायथ्याशी असलेल्या एका गावास आग लावली. सदर गाव 'पाचाड' असावें. शहाबुद्दीनने तेथे लुटालूट, कत्तल इत्यादि सर्व प्रकार केले. या 'विजयाबद्दल' बादशहाने त्यास फिरूझजंग हा किताब व अनेक बक्षिसें दिलीं. पण रायगडावर प्रत्यक्ष हल्ला न करता शहाबुद्दीन इ. स. १६८५ च्या मार्चमध्ये परतला व ता. २६ रोजी बादशहाजवळ येऊन पोहोचला. यावेळी बादशहाने संभाजी व रायगड यांवरील मोहीम अर्धवट सोडून दिली व तो विजापूरकरांच्या समाचारास वळला [ Aur Vol. IV पृ. २९७ ते २९९ ].

संभाजीचे डोळे खाडकन् उघडले! युद्धभूमि बादशाही प्रदेशांत निर्माण करण्याच्या प्रयत्नास तो लागला. इ. स. १६८५ च्या जानेवारींत त्याने आपल्या सैन्याच्या चार तुकडया केल्या व चार सरदारांच्या हातीं देऊन बादशाही मुलुखात धाडल्या. त्यांनी बऱ्हाणपूर ( Brampore ) पर्यंत जाऊन मुसलमानी प्रदेश लुटला. या मराठी घोडेस्वारांवर औरंगजेबाने बहादुरखानास धाडलें; पण त्याची व मराठयांची गाठही पडली नाही व मराठयांनी बऱ्हाणपूरमधील एकही घर लुटावयाचे बाकी ठेवले नाही! हाच प्रकार त्याने आक्टोबरमध्ये केला. रायगडवरून सहा हजार मराठे घोडदळ निघालें. त्याने भडोच शहरावर धाड घातली; तट फोडला व तेथे शहाजादा अकबराच्या नावाने द्वाही फिरविली [ ऑर्म पृ. १८१, १९४ ].

शिद्दी हें औरंगजेबाच्या हातचें हुकमी प्यादें होतें. संभाजीच्या बादशाही प्रदेशांतील स्वाऱ्या थांबविण्यास व युद्धक्षेत्र मर्यादित करण्यास बादशहानें त्याचा पुन्हा एकदा उपयोग इ. स. १६८६ मध्ये करून घेतला व संभाजी व शिद्दी यांचें युद्ध पुन्हा सुरू झालें. या युद्धाची चमत्कारिक हकीकत अशी की, कै. शिवाजी राजे यांस काही व्यथा होती. पिलाजी तबीब महाले चौलकर याने केलेल्या उपचारामुळे गुण येऊन शिवाजी बरा झाला. शिवाजीने पिलाजीस पालखी देऊन त्याची चौल येथे रवानगी केली व चौलकडील मनसुबी व काजकारभार पिलाजीचे सल्ल्याने करावा, असा तेथील सुभेदारास हुकूम केला. संभाजीच्या कारकीर्दीत पिलाजीचा मुलगा बजाजी रायगडवर पत्रव्यवहार करी. रायगडवर संभाजीच्या भेटीस आलेल्या बजाजीने एक दिवस संभाजीस म्हटले की शिद्दीची उंदेरी मी घेऊन देतो. महाले रायगडवरून उंदेरीस आला. त्याने माय नाईक भंडारी याचे मदतीने उंदेरीच्या तटास शिड्या लावल्या; पण तेवढ्यांत किल्लेदार सावध झाला व त्याने मराठ्यांचा मोड केला. बजाजी हा कटाचा सूत्रधार आहे व चौल येथे रहातो, हे शिद्दीस कळल्यावर उंदेरकरांनी चौलवर हल्ला केला; चौल मारलें व बजाजीस बायकामुलांसह कैद करून बाटविलें ! [ राम. ऐति. का. पत्रें सर ४ था मांणे ९ आ. ले. ६३, ६६ ].

इ. स. १६८८ मध्ये संभाजीने रायगडवर राहाणे सोडून दिले आणि तो पन्हाळा आणि विशालगड यांचे दरम्यान राहू लागला [ कुगंपृ. ३७४ ]. औरंगजेबाने त्याचे भोवतीं सतत युद्धजन्य परिस्थिति कायम ठेविली. व त्यास रायगडवर स्वस्थ रहाणें अशक्य करून सोडलें. ' कवि कलश दिवाण व संभाजी हे संगमवाडा व बाग होता तेथे जाऊन राहिले ' [ कासंपया. पृ. २६ ]' असा एक निर्देश आहे.

कार्तिकांत, म्हणजे इ. स. १६८८ च्या आक्टोबरनोव्हेंबरमध्ये कवि कलश व शिर्के यांचे युद्ध झाले; त्यांत कलशाचा पराभव झाल्यांमुळे कलश खेळण्यास पळाला. त्याचे मदतीस संभाजी रायगडवरून निघाला, तो पुन्हा रायगडवर परत आला नाही. त्याने शिर्क्यांचा पराभव केला व तो खेळण्यास कलश याचे भेटीस गेला [ शिचप्र. पृ. ३४ ]. जाण्यापूर्वी प्रल्हाद निराजी व कित्येक प्रमुख मंडळी शिर्क्यांस सामील आहेत, असा संशय आल्यावरून संभाजीने त्या सर्वांस रायगडावर कैदेंत टाकलें. खेळण्यावर कवि कलशाची गांठ घेऊन त्याने सामानाची भरती केली

१. कासंपया. पृ. २६ वर साबान १८ असा काल दिला आहे. त्याची निश्चित तारीख इ. स. १६८८ जून ७ येते; पहा; शिचप्र. ३४, ३५ ( जेधे शकावली ),

व तो पुन्हा रायगडकडे येण्याचे उद्देशाने निघाला [ उप्रसं. पृ. ९५, ९६ ]. विशाळगडाकडून रायगडास यावयाचे, म्हणजे त्यास आंबाघाटांतून यावयास पाहिजे होते. त्यामुळे त्याने संगमेश्वर येथे मुक्काम केला [ NHM I पृ. ३१४ ]. १६८९ च्या जानेवारीअखेर त्याचा मुक्काम संगमेश्वराजवळ अलकनंदा व वरुणा या नद्यांचे संगमाजवळ नावडी येथे असल्याची बातमी औरंगजेबाचा सरदार शेख निजाम यास लागली. माघ वा।। ७ शुक्रवार १ फे. १६८९ या दिवशी शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान याने त्यास गाठले व पकडले. संभाजीस पकडतेवेळीं चकमक उडाली; तींत शिवकालीन सरदार म्हलोजी घोरपडे ठार झाला. त्याचे तीन पुत्र संताजी, बहिरजी व मालोजी युद्धांत हजर होते. बाप ठार झाल्याचें पहातांच, लढण्यांत अर्थ उरला नाहीं असें पाहून तीनही घोरपडे रणांतून निघाले व रायगडच्या वाटेस लागले. [ कासंपया. पृ. ३८५; शिचप्र. पृ. ३४, ३५; कासंपया ३; ]; शेख निजाम याने संभाजी व कवि कलश यांस पकडले; प्रतिकार मोडून काढला व औरंगजेबाकडे तुळापूर येथे नेले.

ही बातमी रायगडावर पोहोचताच ९ फेब्रु. १६८९ रोजीं राजाराम अटकेत होता, त्याची सुटका होऊन त्याचें मंचकारोहण झालें. रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर याने कैदेंत असलेल्या मानाजी मोरे व इतर माणसांना कैदेंतून सोडविलें. यसजी व सिदोजी फर्जंद यांचा त्याने कडेलोट केला [ शिचप्र. पृ. ३४, ३५, ४८ ].

संभाजीची कैद आणि वध ही मराठी सत्तेच्या सर्वविध क्रांतीची सुरुवात ठरली.

# १५ रायगडचें वैभव ओसरलें

संभाजीस पकडलें त्यावेळी रायगडचा मुख्य अधिकारी शिवाजीचा सुप्रसिद्ध सरदार येसाजी कंक होता. किल्लेदार चांगोजी काटकर याने त्याच्या सांगण्यावरून राजारामाची सुटका केली. त्यास मराठ्यांचा राजा म्हणून जाहीर करण्यात आलें. प्रल्हाद निराजी, मानसिंग मोरे इत्यादींस पूर्वींचीं पदें देण्यांत आलीं. स्वतः संभाजीने राजारामास कधी कडकपणाने वागविलें नाही. संभाजीची बायको येसूबाई व राजाराम यांचे सख्य होतें व राजारामास शाहूबद्दल जिव्हाळा होता. येसूबाईच्या सल्ल्यावरूनच असें ठरलें की राजप्रतिनिधि म्हणून राजारामाने राज्यकारभार पहावा. यावेळी शाहू केवळ सात वर्षांचा होता व राज्यकारभाराचे ओझें उचलण्यास तो पूर्ण असमर्थ असल्याने एकमते आखलेला बेत शहाणपणा व दूरदर्शीपणाचा होता.

रायगडवरच्या या हकीकती कळताच, औरंगजेबाने हें बंड मुळांतच उखडून काढण्याचे ठरविलें. त्याने आपला वजीर आसदखान याचा मुलगा इतिकादखान यास सैन्य देऊन रायगड घेण्यास पाठविलें. बादशहास मराठ्यांची राजधानी व नवा राजा या दोघांसही आपल्या ताब्यांत आणावयाचें होतें [ NHM I पृ. ३१९; कुर्ग. पृ. ३७४ ]. शके १६१० विभव संवत्सर, फाल्गुन शु॥ ३ म्हणजे १२ फेब्रुवारी १६८९ या दिवसापासून रायगडावर राजारामाची कारकीर्द सुरू झाली आणि २५ मार्च १६८९ रोजी इतिकादखान ऊर्फ झुल्फिकारखान याने रायगडच्या परिसरांत येऊन मराठ्यांच्या राजधानीस वेढा घातला [ शिचप्र. पृ. ३४, ३५, व ४८ ].

या अपेक्षित पण आकस्मिक प्रसंगाने गडावर गडबड उडाली. पण येसूबाई फार शहाणी व दूरदर्शी बाई होती. तिने स्पष्ट सांगितले की रायगड मजबूत आहे. पण आपण सर्वांनी एकत्र रहाणे मात्र धोक्याचें आहे; कारण, त्यायोगे चौफेर देखरेख राहून प्रतिकार करता येणार नाही. राजाराम व त्याच्या बायकांनी गडावरून जावें; मी व शाहू येथे राहू. आम्हांस रहाण्यास योग्य जागा या गडाखेरीज दुसरी

नाही. तुम्ही बाहेर पडल्यास शत्रु तुमचे आंगावर येईल व आम्हास मोकळीक मिळेल. सरदारांनीही बाहेर पडावे. आम्ही किल्ला शक्य तेवढा लढवू. बाहेर पडलेल्यांनी मोगली सैन्यास उपद्रव देऊन वेढ्याचा ताण कमी करावा. तुमचा सर्वांचा जमाव एका ठिकाणी पोख्त झाला म्हणजे आम्हांस काढून न्यावे [ NHM I पृ. ३१९-३२०; स्थिरा पृ. १७, १८ ]. येसूबाईचे हें दूरदर्शीपणाचे सांगणे सर्वांस मानवलें. सर्वांनी प्रामाणिकपणाच्या शपथा घेतल्या व देश पुन्हा स्वतंत्र करण्याचा दृढनिश्चय केला. ता. ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम रायगडावरून निसटून प्रतापगडास गेला. त्याच्या दोन्ही भार्यांस त्याने रांगणा-विशालगडाकडे धाडून दिले. रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण सचिव हेही रायगडावरून निसटले. या तिघांनी ठरविलें की आता मोगली सैन्याची अप्रतिहत लूट व जाळपोळ करावयाची व बादशाही सैन्यास त्रस्त करावयाचें [ शिचप्र. पृ. ३५; NHM I पृ. ३२०; Aur. भाग ४ था पृ. ४०२ ]. संभाजीस पकडल्याची बातमी रायगडावर सांगत आलेला संताजी घोरपडेही याच मंडळीबरोबर किंवा थोडा अगोदर निसटला असावा.

ठरल्याप्रमाणे राजारामाचे तरुण साथीदार संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी बादशाही फौजेस सतावण्यास सुरुवात केली. त्यांनी मोगली सैन्यावर धावते हल्ले करण्यास प्रारंभ केला, तेव्हा इतिकादखानास रायगडचा वेढा चालविण्यात अडथळे येऊ लागले; त्याला मदत पोहोचेनाशी झाली. एक दिवस संताजी घोरपडे व विठोजी चव्हाण यांनी कोरेगाव येथील बादशाही छावणीवर हल्ला केला आणि बादशहाच्या तंबूचे सोन्याचे कळस आणि कनाता कापून आणल्या. तंबूंतील अनेक लोकांस त्यांनी ठार केलें. बादशहा ठार झाला अशीही प्रथम लोकांची चुकीची समजूत झाली. ही लूट त्यांनी प्रतापगडावर राजारामापुढे आणून ठेविली. रायगडच्या वेढ्यास ढिलेपणा यावा, म्हणून रामचंद्रपंताने संताजी व धनाजी यांस भरपूर उत्तेजन दिले. त्यांनी ठिकठिकाणाहून चालून येणाऱ्या मोगल सरदारावरही छापे घातले. एकदा तर, रायगडास वेढा घालणाऱ्या इतिकादखानाच्या लोकांवरच संताजीने हल्ला चढविला व पाच हत्ती व बरीच संपत्ति लुटून राजारामापुढें पन्हाळ्यास हजर केली [ NHM I पृ. ३२०, ३२१; स्थिरा पृ. १९, २० ].

२५ मार्च १६८९ पासून ३ नोव्हें० १६८९ पर्यंत म्हणजे सुमारे सव्वासात महिने रायगडचा वेढा चालला, असें सर्व ग्रंथकार सांगतात व ते आकड्यांत बरोबरही आहे. पण या वेढ्यासंबंधी एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे की रायगडच्या खोऱ्यांत १५ जूनपासून सप्टेंबरच्या आरंभापर्यंत इतका पाऊस पडतो की तेथे जाणेही अवघड होतें; मग या काळांत वेढा कसा चालविणार? वेढा असलाच, तर तो नाम-

मात्र असणार ! तेव्हां, सव्वासात महिन्याच्या मुदतींतून हा जोरदार पावसाचा काळ वजा केला पाहिजे. वेढा जास्तीत जास्त साडेचार महिने चालला असेल. रायगड ज्यांनी पाहिला असेल, त्यांच्या ध्यानांत येईल की रायगडला संपूर्ण वेढा घालणे अशक्य आहे ! तेव्हा झुल्फिकारखानाच्या या वेढ्याची मोठीशी मातब्बरी मानण्याचें प्रयोजन नाही.

या वेढ्यासंबंधी भाष्य करताना सरदेसाई यांनी मौजच केली आहे ! ते लिहितात, 'मराठ्यांनी जे किल्ले बांधले, त्यांत अत्यंत दुर्गम व अजिंक्य असा रायगड होता. मराठ्यांस तो अनेक वर्षे निकराने लढविता आला असता. एका पठारावरील हा किल्ला असा आहे, की तेथे गुरेढोरें राहू शकतात व मोठ्या शिबंदीस पुरेल इतकें धान्य पैदा होऊ शकतें. पण फितुरीपुढे हद्द आहे ! फितुरीमुळे ३ नोव्हें. १६८९ रोजी रायगड पडला. वेढा आठ महिने चालला होता. वाईच्या सूर्याजी पिसाळास देशमुखी पाहिजे होती व तिच्या लोभाने किल्ल्याचा दरवाजा खानास सताड उघडा झाला' [ NHM I पृष्ठ ३२१-२२ ]. अन्यत्र ते लिहितात, 'वेढा घालून आठ महिने झाले, तथापि इतिकादखानाचें पाऊल यत्किंचित् पुढे पडेना. तेव्हा खानाने कपटाविद्येचा प्रयोग केला. सूर्याजी पिसाळ हा एक हुशार गृहस्थ वर किल्ल्याचे बचावास होता. त्याला वाईची देशमुखी देण्याचे आमिष दाखवून खानाने त्यास फितुर केले. किल्ल्याचे दरवाजे उघडून सूर्याजीने मार्ग शु॥ २ रविवार ता. ३ नोव्हें. १६८९ रोजी मोगलांचा आंत प्रवेश करून दिला. त्यावेळी येसूबाईची काय अवस्था झाली असेल, याची कल्पनाच केलेली बरी. जिवास अपाय करणार नाही, अशी खानाकडून शपथ घेववून ती मुलांमंडळीसह खानाच्या स्वाधीन झाली' [ स्थिरा पृ. २०; २१ ]. कुलाबा गॅझेटियरकार लिहितात, 'वाईच्या देशमुखीच्या वतनाच्या लोभाने सूर्याजी पिसाळाने मावळ्यानिशी खानास मदत दिली. त्याच्या प्रयत्नांनी गडावरील शिबंदी खानास शरण आली' [NHM I पृ. ३७४; ऐसंसाखं. ५ पृ. २९ ].

वाईच्या या पिसाळ देशमुखाची रायगडबद्दलची फितुरी इतकी जाहीर झाली आहे की त्याबद्दल जास्त लिहिण्याची जरुरी नाही. त्याचे देशमुखी मिळविण्याचे प्रयत्न व फितुरी यांबद्दलची पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत [ उदा. ऐसंसा. खं. ५ पृ. २५, २७, २८; पेद. ३१ ले. ८५ ]. पण त्याचेव्यतिरिक्त आणखी फितूर होतेच. 'छत्रपति ( राजाराम ) रायगडाहून कर्नाटकांत गेले. रायगड व इतर किल्ले गनिमाने घेतले. त्यावेळी जेथे देशमुख गनिमास सामील झाले' [ राखं. १५ ले. २८१ पृ. २९०, २९१ ]. असें राजवाड्यांनी आपल्या संशोधनांत प्रसिद्ध केलें

आहे. पण या पत्राला ते टीप देतात की पत्र विश्वसनीय दिसत नाही ! आम्हांस असें वाटतें की त्यावेळी, झाली असल्यास, 'न भूतो न भविष्यति' अशा स्वरूपाची फितुरी झाली आहे ! आणखी एक उतारा पहा– 'राजाराम छत्रपतीने चंदीहून आज्ञा केली की संभाजी नरसोजी गायकवाड देशमूख तपे भिरवाडी याचा बाप नरसोजी गायकवाड हा रायगडावर होता. त्याने इतिकादखान गनीम रायगडास येऊन बिलगला असता त्यास भेटून गडावरील हावपालत सांगितली. त्यावरून त्याची देशमुखी जप्त झाली. नरसोजी गायकवाडाचा हा गुन्हा माफ करण्यातला नव्हे ! पण संभाजी गायकवाडाने जी इमानेइतबारे चाकरी केली, ती ध्यानीं घेऊन '२०० पातशाही होन खंड घेऊन देशमुखी दुमाला केली आहे.' [ शिचसा. खं. १० ले. २४ ].

याबाबत सर जदुनाथ सरकार यांची विचारसरणी महत्त्वाची आहे. ते लिहितात की, '१६८८ च्या डिसेंबरमध्ये वजीर असदखान याचा मुलगा इतिकादखान यास सैन्य देऊन औरंगजेबाने रायगड काबीज करण्यास पाठविलें. १६८९ ऑक्टो. १९ रोजी त्याने रायगड घेतला. त्याने शिवाजीच्या राण्या, येसूबाई, शाहू, संभाजीच्या व राजारामाच्या मुलांस व नायकांस कैद केले. चिटणीसांची बखर व ईश्वरदास यांचें सयुक्तिक म्हणणें असें की येसूबाई आणि तिचे सल्लागार यांनी बहुधा असें ठरविलें असावे की, संभाजीचा मृत्यु व राजारामाचे महाराष्ट्राबाहेर जाणे या गोष्टी ध्यानीं घेता व महत्त्वाचीं बरींच माणसें महाराष्ट्राबाहेर गेलीं आहेत, अशा वेळी रायगडावर असलेल्या सामान्य बिनलढाऊ माणसांचा प्रतिकाराचा यत्न फुकट आहे; शांतपणे शरण जाण्यांतच शाहूचे व सर्वांचे कल्याण आहे' [ Aru. भाग ४ था. पृ. १०६ ]. आम्हांसही हीच विचारसरणी तत्कालीन परिस्थिति ध्यानांत घेता पटते. निदान रायगडावर शरण जावे असे म्हणणारा फार मोठा पक्ष त्यावेळी उत्पन्न झाला असावा. मराठ्यांनी किल्ल्यांबाबत हीच विचारसरणी पुढे अवलंबिली आहे, हें इतिहासाचे वाचक जाणतात. शक्य तेवढा प्रतिकार अशक्य झाल्यास कमीत कमी नुकसान सोसून किल्ला स्वाधीन करणे हेंच धोरण मराठ्यांनी, औरंगजेबाच्या स्वारीचा जोर ओसरेपर्यंत स्वीकारलें नाही काय ! तेंच धोरण रायगडाबाबत येसूबाईने अंमलांत आणलें असें आम्हास वाटतें.

याबाबत जेधे शकावलींतील नोंद मोठी सूचक आहे. 'कार्तिक महिन्यात रायगड झुल्फिकारखानाच्या स्वाधीन करण्याचे ठरले व तो या दिवशी [ शके १६११ मार्ग. शु. १ रविवार ता० ३ नोव्हें. १६८९ ] त्याच्या स्वाधीन करण्यात आला. शाहूस गडावरून तुळापुरास औरंगजेबाकडे नेण्यात आले. बादशहाने त्यास

सप्तहजारी केलें व शाहूराजे असें नाव ठेविलें व त्यास आपल्या जवळ 'जाळी' मध्ये ठेविलें [ शिचप्र. पृ. ३५, ४८ ].

झुल्फिकारखानास रायगडावर खूप द्रव्य सापडलें [ कासंपया. पृ. २६ ]. शाहूबरोबर रायगडावर कित्येक मराठा सरदारांचीं कुटुंबें झुल्फिकारखानाने कैद केलीं; त्यांत प्रतापराव गुजराचे कुटुंब होते. औरंगजेबाच्या बंदीवासांत प्रतापरावाचा मुलगा खंडेराव याजवर धर्मांतराचा प्रसंग आला. धर्मांतरानंतरही त्याने नामांतर केले नाही. खंडेराव बंदींतून सुटल्यावर दक्षिणेंत आला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचें वृंदावन कसबे परळी येथें बांधलें [ ऐसंसाखं. ४ पृ. ४१ ]. शाहूबरोबर कैद झालेल्या मडळींतील काही स्त्रिया व मुलें यांना दौलताबादच्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. त्यांत, खाफीखानाने संभाजीच्या मुलींचा उल्लेख केला आहे [ ईलिडॉ भाग ७ पृ ३४१ ]. शिवाजीची जी भार्या शाहूबरोबर कैद झाली, तिला एका स्वतंत्र मोठया तंबूत बादशहाने नजरकैदेत ठेविलें. शाहूस[1] त्याने सप्तहजारी मनसब, सात हजार स्वार, नगारा, निशाण दिलें [ बुसा. पृ. ७२२ ]. विठ्ठल विश्वनाथ पैसास याने रायगडावर स्वामीसन्निध राहून एकनिष्ठपणे सेवा केली. गलगले व ब्रह्मपुरी येथे तो शाहू बरोबर कैदेंत होता. नर्मदातीरींही तो शाहूबरोबरच होता व शाहूबराबरच तो स्वराज्यांत परत आला [ पेद. ३१ ले ९५ ]. ज्योत्याजी केसकर, उद्धव योगदेव वगैरे कित्येक विश्वासु नोकर येसूबाई बरोबर होते [ स्थिरा. पृ. १०३ ]. मोरोपंत सबनीस, राजाज्ञा, कारभारी, कारकून, शागीर्द-पेशा सेवेचे लोक, कारखानदार इत्यादि हजार पांचशे लोक कैद केले [ थोशाम. पृ. २ ]. गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि रायगडचे वेढ्यांत शाहूबरोबर मोगलांकडे हस्तगत होऊन त्याच्याच बरोबर त्याची सुटका झाली. पुढे शाहूने त्यास आपला प्रतिनिधि नेमिले. औरंगजेबाचे कैदेंत तो शाहूची सेवा करीत होता [ पेद. ४४ पृ. ८२ ]. शाहूचे भाऊ मदनसिंग व माधवसिंग यांस आपल्या आयांबरोबर रहाण्याची परवानगी दिली. या सर्वांच्या खर्चाची बादशहाने व्यवस्था लावून दिली [ Aur भाग ४ पृ. ४०६ ]. इतिकादखानाने सिंहासन फोडलें. हस्तगत झालेली दौलत व दौलतींतील कैद केलेलीं माणसें यांस त्याने कोरेगाव येथे बादशहापुढे रुजू केले. बादशहाने संतुष्ट होऊन त्यास झुल्फिकारखान हा किताब दिला. सूर्याजी

---

१. येथें संदर्भग्रंथांत 'संभा' असे छापले आहे, तें चूक. वर ठिकठिकाणीं जे संदर्भग्रंथ सांगितले, त्यांतूनही रायगडच्या पाडावाची भरपूर हकीकत आली आहे. प्रत्येक ग्रंथाचे विशेष विधान तेवढें संदर्भाने सूचित केले आहे. शिवाय, राखं. १५ ले. ३०१; राखं. २० पृ. ५०; शिचसाखं. ६ पृ. ६९ वर या प्रकरणीं हकीकत पहावी.

पिलाळास वाईची देशमुखी दिली. या कैद्यांपैकी माधवसिंग १०-९-१६९८ रोजी मरण पावला. प्रतापराव गुजराचा दुसरा मुलगा जगजीवन हाही या कैद्यांत होता [ स्थिरा पृ. २१, १०२, १३३ ].

औरंगजेबाने, कैदेंत असताना शाहूचे लग्न केले; तेव्हा रायगडचा पाडाव करून आणिलेली शिवाजीची भवानी तलवार त्याने शाहूस बक्षीस दिली [ स्थिरा. पृ. १३५ ].

रायगडच्या इतिहासाचें महत्त्वाचें पर्व हें असें शोकरसप्रधान आहे !

---

# १६ रायगडचें पहिलें पारतंत्र्य

रायगड झुल्फिकारखानाचे हातीं पडला व स्वातंत्र्य आणि लक्ष्मी यांचें अपहरण झालें. रायगडवरील दप्तरखान्याचा त्याने नाश केला. त्यामुळे जुने कागद, तहनामे इत्यादि शिवकालीन पत्रव्यवहार नष्ट झाला व मराठी रियासतीचें राजनैतिक स्वरूप समजण्याचीं अव्वल दर्जाचीं साधनें नष्ट झालीं [ पेद. ४२ पृ. २२५ ].

रायगड पडल्यानंतर मोगलांचा अंमल कायम झाल्यासारखा झाला. पण इ. स. १६९० पासूनच मराठ्यांनी पुन्हा डोकें वर काढण्यास सुरुवात केली. या वर्षीचे ऑक्टो. ५ चे पत्र म्हणतें, ‘ हाली ईशकृपेने आपल्या राज्यांत मामला थाटत चालला, ’ [ शिचसाखं. ६ ले. ११८; राखं. १६ ले. २८ पृ. ४३; राखं. १७ ले २१ पृ. ३८ ]. इ. स. १६९० डिसेंबरमध्ये शंकराजी नारायण सचिव लिहितो की, ‘ स्वामींनी कृपाळू होऊन रायेगडापासून कोकणपट्टीही स्वाधीन केली. रामचंद्रपंतांस मजमूचा कार्यभाग सांगून त्यांच्या स्वाधीन कऱ्हाडपासून पलीकडे वरघाट, रायेगडापासून आलीकडे कोंकण × × × गोकर्णपावेतो केली, धनाजी जाधव आमच्याकडे, संताजी घोरपडे रामचंद्रपंतांकडे असावेत, असा तह केला ’ [ ऐसंसा. खं. १ ले. ७६ पृ. ६६ ]. यावरून छत्रपति राजारामाचे, गेलेला रायगड व एकूण प्रांत मिळविण्याचे हेतु व प्रयत्न आपणास समजतात. इ. स. १६९१ जून ४ रोजी राजारामाने हणमंतराव घोरपडे व त्याचा नातलग कृष्णाजी यांस सरंजाम ठरवून दिला. त्यावेळी राजाराम लिहितो, ‘ महाराष्ट्रधर्म पूर्ण रक्षावा हा तुमचा संकल्प जाणून उभयतांस जातीस व फौजखर्चास सहा लक्ष होनांची नेमणूक चालविण्याचा निश्चय करून दिधली असे. पैकी रायगड प्रांत........ काबीज केल्यावर पाऊण लक्ष होन द्यावयाचा निश्चय केला असे ’ [ त्रै. वर्ष १६–१; शिचसाखं. ५ ले. ६; स्थिरा. पृ. ४७ ].

इ. स. १६९२ मे १३ या दिवशी राजारामाने मावळांतील लोकांस एक पत्र लिहिलें; त्यांत म्हटलें आहे, ‘ सांप्रत रायगड हस्तगत करून घेणे हें कार्य बहुतच थोर आहे, हें रामचंद्रपंताने तुम्हांस सांगितलें आहे. तुम्ही गड घेण्याच्या यत्नात आहा.

सध्यां आम्ही आबाजी सोनदेव यास पाठविले असून त्यास रायगड हस्तगत करण्याची आज्ञा केली आहे. ते करावयाचें राजकारण करितील. तुम्ही त्यांस अनुकूल होऊन रायगडची ‘ हारी ’ करावी. स्थल हस्तगत करून फत्तेचें वर्तमान कळवा; तुमचे विशेष उर्जित करू ’ [ राखं. ८ ले. ४३ पृ. ४६ ]. पण किल्ला मराठ्यांचे हातीं आल्याचें दिसत नाही.

यावेळीं रायगड कोणाच्या ताब्यांत होता, याची हकीकत आता नवीन साधनां-मुळे आपणास प्रथमच समजून येत आहे. खंडो बल्लाळच्या घराण्याची एक शाखा महाडजवळ पोलादपूर येथे चित्रे आडनावाने नांदत आहे. त्याजकडील साधनांच्या आधारे ती येथे देतो.

मोगलाई झाली. परगणे महाड मौजे लाडवली येथे इतकादखानाच्या सैन्याचा तळ पडला. रायगड घेतल्यावर त्याने राजा सूरसिंग यास किल्लेदार नेमून गडावर ठेविले. बेदरहून खैर्यतखान यास आणून वाडी येथे ठेविले. फत्तेजंगखान फौजसुद्धा पाचाड येथे येऊन राहिला. रयतेस कौल दिल्यावर पाचाडकडील जमीदार व वतन-दार फत्तेजंगखानास रुजु झाले व तेथील कारभार सुरळीत चालू झाला. वाडीकडील भागाचा अंमल खैर्यतखान चालवू लागला. तो जंजिऱ्याच्या शिद्दींपैकीं महत्त्वाचा अधिकारी असल्यामुळे रायगडच्या परिसरांत मोगल व शिद्दी यांचा दुतर्फा अंमल सुरू झाला.

पण, लवकरच फत्तेजंगखान मरण पावल्यावर अबदुल रजाखान हा पाचाड-कडील प्रदेशावरील अधिकारी झाला. त्याच सुमारास रायगडचा किल्लेदार राजा सूरसिंग मरण पावला. तो मोगली अधिकारी असल्याने, त्याचे पश्चात् रायगडचा कारभार कोणी करावा, याबद्दल बादशाही हुकूम मिळविण्यासाठी रायगडवरून दिवाण कपूरचंद बादशहाकडे रवाना झाला. बादशहाने राजा सूरसिंगाचा मुलगा राजा शिवसिंग यास रायगडची किल्लेदारी व पाचाडची फौजदारी असे दोन्ही अधिकार दिले व अबदुल रजाखान यास आपणाकडे बोलावून घेतले.

औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत रायगड व पाचाड येथील मोगली अधिकारी या नात्याने राजा शिवसिंग हाच कारभार करीत होता. इ. स. १७०७ मध्ये मोगली सैन्य मराठी प्रदेश सोडून व स्वारीचा पसारा आवरून दिल्लीकडे निघाले; त्यामुळे राजा शिवसिंग यासही आपला अधिकार सोडून दिल्लीकडे निघण्याचे ठरवावे लागले. त्याने रायगड व पाचाड येथील आपला कारभार शिद्दी याकूदखान याच्या हवाली केला. त्याच्या मदतीने तो पुण्यास येऊन मुख्य मोगली सैन्यांत दाखल

झाला. शिद्दीने त्यास पोहचविण्यास धर्म सावंत व होन सावंत सुभेदार ससैन्य दिले होते.

यानंतर जंजिऱ्याहून शिद्दी याकूदखान याचे मार्फत रायगडकडील प्रदेशाचा कारभार चालू झाला. शिद्दी जोहार हा रायगडचा किल्लेदार झाला.

पेशवे दप्तर रु. नं. ८७ मध्ये रायगडच्या व्यवस्थेसंबंधी एक अप्रसिद्ध, महत्त्वाचा कागद आहे, त्याचा सारांश येथे उद्धृत करतो. त्यायोगे, शिद्दीने रायगडच्या बंदोबस्तासाठी नेमलेलीं माणसें, त्यांचा हुद्दा व त्यांचा सरंजाम याबद्दल आणखी कल्पना येईल.

किल्ले इस्मालगड ऊर्फ रायगड-सरंजाम कलमें.

अजम सिदी जोहार किल्लेदार याचा सरंजाम- १ पालखी सरंजामसमेत, २ दरोबस्त इनाम गाव, ५ सोन्याचे ताट उत्तम प्रत, घोडा बक्षीस १.

सरनोबत याचा सरंजाम- शिद्दी अबदल्ला व हर सरनोबत यांस सरंजाम- घोडा बक्षीस १, दरोबस्त इनाम गाव ९.

सिद्दी सैद- राजहुडा सरनोबत- घोडा १, गाव दरोबस्त इनाम १, सोन्याचे ताट १, सोन्याची वाटी १.

[ सिद्दी सैदच्या ] बेट्याचा सरंजाम- घोडा १, सोन्याचे ताट १ व ५० घोड्यांचा सरंजाम.

सिदी सालीम यास रायगडच्या महादरवाजाचा सरनोबत म्हणून नेमण्यात आले. तो पाचाड येथे रहात असे व तेथेच त्याचे घर व कबिला होता.

परशराम केशव सबनीस-यास पालखी १, इनाम दोन गाव, घोडा व सोन्याचे ताट असा सरंजाम नेमिला.

त्याचा मुलगा खंडो परशराम सबनीस यास घोडा १, सोन्याचे ताट १ व २५ घोड्यांचा सरंजाम दिला.

कृष्णाजी हराजीराव येरुणकर नामजाद सुभेदार यास सरंजाम—पालखी, घोडा, इनाम गाव २, सोन्याचे ताट १.

आनंदराव कृष्णाजी येरुणकर -सरंजाम- घोडा, सोन्याचे ताट, २५ घोड्यांचा सरंजाम.

गणेश शामजी मजमदार-सरंजाम-इनाम गाव १, सोन्याचे ताट १ घोडा १.

निळो शामजी सबनीस—इनाम गाव १, सोन्याचे ताट १, घोडा १.

नाईक शामजी-दरोगा कारखाने—यासी सरंजाम-रुप्याचे ताट १.

याशिवाय, आनंदराव शिर्के, महिमाजी पालांडे इत्यादि अनेकांस रायगडवर काम करण्याबाबत सरंजाम नेमून दिल्याचा उल्लेख आहे.

या दोन अप्रसिद्ध कागदांच्या आधाराने आपणास इ. स. १६८९ ते १७०७ च्या अठरा वर्षांच्या काळांतील इतिहास कळत आहे. पुढील पंचवीस वर्षांत काय घडले, याचा पत्ताच नाही !

१. थोरले शाहू महाराज चरित्र पृ. ११३ वरील रायगडसंबंधींची चिटणिसांची माहिती मोघम व चुकीची.

# १७ रायगड शाहूनें घेतला

मराठयांवरील बादशाही आक्रमण संपलें आणि शाहूची सुटका झाली. भावी बादशहाच्या वतीने झुल्फिकारखानाने शाहूस सांगितले की शिवाजीच्या वेळचे 'स्वराज्य' तुमचे स्वाधीन केले असून तुम्ही त्याचे पूर्ण मालक आहात. तुम्ही जा व खुशाल राज्य करा.

दीड तप बादशाही नजरकैदेत घालविलेल्या शाहूस आपल्या आजाचें राज्य परत मिळणे ही गोष्टच एवढी मोठी होती की, त्याने झुल्फिकारखानाचे म्हणणे मान्य केले व तो महाराष्ट्रांत आला. ताराबाईचा विरोध मोडून काढण्यास त्याला जवळ जवळ दहा वर्षे लागली. त्यामुळे आपलें राज्य संपूर्णपणे ताब्यांत घेऊन तेथे आपल्या मनाजोगी व्यवस्था घडवून आणण्यास त्यास सवड झाली नाही. बादशहाकडून सनदा आणून आपल्या राज्याची निश्चित सरहद्द ठरविणे, ही गोष्ट होण्यास तब्बल दहा वर्षे लागली.

रायगडकडे शाहूचे चित्त इ. स. १७१७ मध्ये प्रथम वेधलें. या वर्षी शाहूने शामजी बल्लाळ देशाधिकारी यास आज्ञा केली की पिलाजी शिर्के व देवजी शिर्के हे मामले रायरीचे सरदेशमूख असून मावळचे सहा व कोकणचे सहा अशा बारा महालांची सरदेशमुखी शिर्के यांची आहे. शिर्क्यांचा मुतालिक दलपतराव पाताणे प्रभु ही सरदेशमुखी वळकावून बसला आहे. छत्रपति राजाराम यांनी पूर्वी शिर्क्यांच्या बाजूने जो निकाल दिला, तो आम्हास मान्य असून शिर्क्यांची सरदेशमुखी त्यांची त्यास द्यावी [ ऐसंसा. खं. ५ पृ. २३ ]. इ. स. १७१८ मध्ये शाहूने पुन्हा आदेश दिला की कान्होजीराव शिर्के हे मामले रायरीची सरदेशमुखी अनुभवतील [ राखं. ३ ले १४५ व १५७ पृ. १३३ व १५० ते १६३ ]. ज्यावेळी हे न्याय-

निवाडे शाहू करीत होता, त्यावेळी मामले रायरीचा तो छत्रपति असला, तरी तेथे प्रत्यक्ष सत्ता मात्र जंजिऱ्याच्या सिद्दीची होती.*

इ. स. १७१८ मध्ये बाळाजी विश्वनाथाने दिल्लीस जाऊन स्वराज्याच्या सनदा मिळवाव्यात व येसूबाईस सोडवून आणावे म्हणून शाहूने पाठविले त्यावेळी एक यादी त्यास दिली; तीत लिहिले होते की 'स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचे प्रमाणे रायगड व वरकड गड कोटदेखील करून घेणे. (२) कोकणपट्टीदेखील राजपुरी, चौथ व सरदेशमुखी, स्वराज्य व वरकड साधेल त्यांचें फर्मान पृथकाकरे करून घेणें' [ ऐपले. ६ पृ. ८; थोशामच. पृ. ५१ ].

आपलें राज्य स्थापन झालें, तरी जोपर्यंत आपली राजधानी आपल्या ताब्यांत येत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने आपण शिवछत्रपतींचे पूर्ण वारस ठरू शकत नाही, अशी शाहूची भावना होती. शिवाय, शाहूचें जन्मस्थान माणगाव तालुक्यांत गांगवली येथे नदीकाठी आहे; हे ठिकाण मूळच्या स्वराज्यांतील असून ते त्यांच्या ताब्यांत आले नव्हते. ज्या ठिकाणीं जिजाबाई रहात, ते पाचाड शत्रूच्याच ताब्यांत होते !

स्वराज्यांतील अत्यंत महत्त्वाचा भाग जंजिऱ्याच्या शिद्दीच्या ताब्यांत असून शिद्दी हा बादशहाचा ताबेदार होता. तेव्हा, शिद्दीस सांगून हा भाग बादशहाने वस्तुतः शाहूच्या ताब्यांत द्यावयास पाहिजे होता. औरंगजेब जिवंत असेपर्यंत बादशहाचा शिद्दीवर काहीतरी दाब होता. पण उत्तरेकडे बादशाहीचा अपकर्ष होत असताना केवळ बादशहा कळवितो, म्हणून हातचा प्रदेश घालवून बसण्याइतका अव्यवहारीपणा शिद्दीमध्ये नव्हता. रायगडचा किल्ला ताब्यांत राहिल्याने शिद्दींचा आणखी एक फायदा होता. ज्यावेळी मराठ्यांचा बराच प्रदेश बादशहाने शिद्दींच्या ताब्यांत दिला त्यावेळी त्याला बादशहाकडून दरसाल तीन लक्ष रुपये मिळावेत, सुरतच्या सुभेदाराने ते द्यावेत, असा करार झाला होता. ते त्याला अनेक वर्षे मिळत होते. शिवाय शिद्दीस किनाऱ्यावरील संरक्षणासाठी आरमाराबद्दल आणखी दोन लक्ष रुपये दरवर्षी मिळत [ BS ले. ५९, ६० पृ. २१६ ]. ही उत्पन्नाची बाब आपल्या हातून सुटावी असें शिद्दीस वाटणे शक्य नव्हते; म्हणून शाहू सुटून आला व स्वराज्याचा कायदेशीर मालक ठरला, तरी हा प्रदेश शिद्दीने आपल्या हातचा जाऊ दिला नाही. अनेक उद्योगांत गुंतलेल्या पेशव्यास शाहूच्या वतीने ह्या प्रदेशाकडे लक्ष देण्यास १७३३ साल उजाडलें.

* रासं. ११ लेख ७२ व शिवचासं. ३ पृ. ५१ वर शिर्क्यांच्या सरदेशमुखीबद्दल अधिक मजकूर पहा.

इ. स. १७३३ च्या फेब्रुवारीत जंजिऱ्याच्या सत्तेचा आधार शिद्दी रसूल मरण पावला त्यास अबदुल्ला नावाचा थोरला मुलगा असून शिद्दी संबुल, अंबर, रहयान याकुब, हसन असे आणखी पाच मुलगे होते. शिवाय, सिद्दी अबदुल्ला याचा रहमान नावाचा मुलगा हा आणखी एक वारस होता. यावेळी जंजिऱ्यास एक पराक्रमी सरदार होता, त्याचें नाव शेख याकूब ऊर्फ शेखजी. तो मूळचा कोळी असून हबशांच्या कारभारांत त्याचे मोठें वजन होतें. या सर्वांचें आपसांत वितुष्ट असून मुख्य अधिकारी कोणी व्हावयाचे याचा वाद रसूलचे मरणामुळे उत्पन्न झाला. शेखजीस आपल्या बाजूस वळवून घ्यावे, असे यशवंत महादेव पोतनीस याने ठरविले. पोतनसि व शेखजी यांचे कारस्थान ठरलें की शेखजीने मराठयांस सर्वतोपरी साह्य करावें आणि त्याचा मोबदला म्हणून मराठयांनी शेखजीस आरमारचें आधिपत्य, हबशाच्या सर्व मुलुखाची सुभेदारी, कित्येक किल्ले, इनाम गावें, पेणपासून कोल्हापूरपर्यंत तळकोंकणांतील सरगोंडपणाचा हक्क इतके द्यावे. शेखजीच्या भावास मराठयांनी रायगडची किल्लेदारी द्यावी [ पुशा. पृ. २१५, २१६ ]. या कारस्थानांतून जंजिरामोहिम निर्माण झाली. आंगऱ्याचें आरमार तयार झालें; बाजीराव पेशवा जंजीऱ्याच्या समोर खोकरी येथे सैन्यासह येऊन दाखल झाला व मराठयांचे बरेच सैन्य रायगडच्या बाजूस स्वारी करण्यास सिद्ध झालें. मोहिमेसाठी शाहूने स्वतः खर्च पुरविण्याचे ठरवून पत्रव्यवहार चालविला. अंबाजीपंत पुरंदरे यांनी बाजीरावास लिहिले की उदाजी चव्हाणास दोन हजार प्याद्यानिशी शाहूने मोहिमेसाठी बोलविले आहे: तेही लवकरच येतील. सैन्य महाडजवळ एकत्र होईल. यशवंतराव पोतनीसाच्या कारस्थानास अनुसरून बाजीरावानेही रायगडावर भेद करण्याची सिद्धता यावेळीं केली होती. 'रायगडावर काही पैगामही लागला आहे. सत्य मिथ्या तहकीक तह किंवा नाही कळले नाही,' असें त्यावेळचा एक पत्रलेखक लिहितो [ कासंपया. पृ. ४५ ]. २६ मे १७३३ रोजी बाजीराव अंबाजीपंत पुरंदऱ्यास लिहितो की 'रायगड हातीं यावासा आहे. तो न आला तरी तेथेही दीड-दोन हजार फौज बंद करणे लागेल' [ पुद. भाग १ ले. १०३ ]. दुसऱ्याच म्हणजे मे २७ रोजी बाजीराव कळवितो की 'खानजादा जंजिरा किल्ल्याबाहेर आहे. तो म्हणतो की मला शाहूने जंजिऱ्यात स्थापन केले, तर स्थापनेनंतर चार महिन्यांनी रायगड पेशव्यांच्या स्वाधीन करीन. जंजिऱ्यांत असलेले शिद्दी संबुल व शिद्दी अंबर यांचा रायगड देण्याचा विचार नाही; तेव्हा खानजाद्यास जंजिऱ्यांत स्थापन केले म्हणजे रायगड हातीं येईल.' [ पुद. भाग १ ले. १०६ ] बाजीरावाच्या या पत्राने त्याचे कारस्थानाचा सुगावा लागतो. बाजीरावाचे ७।८ शे सैन्य मे ३० च्या सुमारास पाचाड येथे जाऊन राहिलें होतें; त्याने तेथे आपला चौकीपहारा बसविला

होता. फत्तेसिंग भोसल्याचे सैन्यहि तेथे आले होते. अशा वेळी महाडहून प्रतिनिधी आपले सैन्य घेऊन पाचाडास गेले. त्यांनी जाहीर केले की शाहूच्या आज्ञेनें मी रायगड हस्तगत करण्यास आलो आहे [ पेद. ३ ले. ]. या योगाने बाजीरावाच्या सैन्यांत थोडी चूळबूळ झाली.

प्रतिनिधीचें महाड व पाचाड येथील आगमन इतके आकस्मिक होतें की बाजीराव व आंगरे यांस त्याची दादच नव्हती ! मे ३१ रोजी सेखोजी आंगरे बाजीरावास लिहितो की मंडणगड काबीज झाला असून आता आपण रायगड घ्याव-याचा; त्याचा विचार तुम्ही केलाच असेल [ पेद. ३३ ले. १५ ]. यावरून असे स्पष्टच वाटते की प्रतिनिधींनी आपल्या आगमनाची वार्ताच त्यास लागू दिली नाही. ता. २ जूनच्या पत्राने फत्तेसिंग भोसल्याने शाहूस कळविले की प्रतिनिधी पाचाडास आले असून आमच्याकडे रायगडावरील जें राजकारण म्हणजे फितुरीची सूत्रें आली होती, त्यांबाबत आता आम्ही त्यांसच प्रमुख केले आहे [ पेद. ३० ले. ९५ ]. याचा उघड अर्थ असा की पाचाडास आल्यावर प्रतिनिधीने दोन दिवसांत फत्तेसिंग भोसल्याचे सैन्य अनुकूल करून घेऊन आपल्या लगामी लावले व गड घेण्याच्या दृष्टीने पुढे पाऊल टाकलें. फत्तेसिंग शाहूस पुढे लिहितो की बाहात्कारे खानजाद्यास पुढे करावे, रायगड घ्यावा; रायगड जिल्हा घ्यावा; व तो तूर्त छत्रपतींचा म्हणजे हुजूरचा म्हणून ताब्यांत ठेवावा, असे आम्ही व प्रतिनिधींनी ठरविले आहे. आज अशी वेळ आहे की रायगड व रायगड जिल्हा आपल्या हातीं येतील. फत्तेसिंग शाहूजवळ तक्रार करतो की येथें जमलेले लोक मात्र म्याड आहेत. सैन्यासाठी जी रक्कम दानशे सैनिकांबरोबर तुम्ही धाडलीत, ती शिद्दीच्या पाऊणशे लोकांनी छापा घालून पळवून नेली. लोकांचे समाधान केले आहे पैसे उसने काढले आहेत; पुन्हा ऐवज पाठवा. रायगड हातीं येतो हे निश्चित समजा.

शिद्दीच्या लोकांनी पैसा पळविला हा मराठ्यांचा दुबळेपणा तर खराच; पण याचा अर्थ स्पष्टच होतो की शिद्दीच्या टोळ्यांनी आता चोरटे हल्ले रायगडच्या बाजूकडील मराठी सैन्यावर सुरू केले होते. ता. ३ जून रोजी सेखोजी आंग्र्याने बाजीरावास जें पत्र लिहिलें आहे, त्यांतही अशीच एक तक्रार लिहिली आहे. सेखोजी लिहितो, ' रायगडवरील प्रतिष्ठित लोक आले. आम्ही त्यांचे मुद्दे कबूल केले व किल्लेदाराचा कबिला, ऐवज व पालखी असा जमाव बरोबर देऊन त्यांची रवानगी केली. हें वर्तमान जंजिऱ्यास कळताच जंजिऱ्याहून चार गलबतें निघालीं. गलबतांतील लोकांनी वरील जमावास भालगाव येथे गाठले व त्यावर हल्ला करून रायगडच्या किल्लेदाराचा कबिला धरून नेला; काही लोक मारले. रायगडचें कार्य फसलें. मी

पूर्वीच सूचना दिली होती पण तुम्ही मानली नाहीत' [ पेद. ३३ ले. २० ] सारांश, रायगडचा किल्ला मराठयांच्या हातीं पडूं नये म्हणून जंजिऱ्यांत कोंडला गेलेला शिद्दी आपल्याकडून खूप प्रयत्न करीत होता, पण तो ५ जून १७३३ रोजी मराठयांनीं घेतला. ६ जून १७३३ या दिवशी रायगड घेतल्याचीं पत्रें घेऊन स्वार साताऱ्यास पोहोचले व त्यांस इनामें मिळालीं [ पेद. ३० पृ. ३७९ ]. रायगड जिंकण्याचे सर्व श्रेय प्रतिनिधींस मिळाले [ राखं. २ पृ. ६८ ब्रच. पृ. ५०; शिचसाखं. ६ ले. १२५ ]. फत्तेसिंग भोसले हा त्याचा मदतनीस असल्यामुळे श्रेयाचा काही वाटा अर्थातच त्यास दिला पाहिजे. या लढाईत नारायणजी झुंजारराव देशमुख ता. कादनखोरें मराठयांतर्फे लढत होता.

रायगड जिंकण्याची शाहूस यावेळी इतकी निकड वाटत होती की अंबाजी त्र्यंबक पुरंदरे, पिलाजी जाधवराव या सरदारांससुद्धां त्याच्या आग्रहास्तव रायगडच्या परिसरांत उतरावे लागले. ता. ७ जून रोजी पुरंदरे रायगडच्या पायथ्याशी पाचाड येथे मुक्कामास आला. त्याची व येसाजी गायकवाडाची पाचाडास भेट झाली. त्यावरून त्याचे ध्यानांत आले की रायगड तालुका मराठयाचे ताब्यांत रहाण्याच्या दृष्टीने शेखजीस प्रसन्न ठेवणे अवश्य आहे. त्याने दादोबा पुरंदऱ्यास लिहिले की शाहूने शेखजीस गोड पत्र लिहून संतुष्ट करावे. पिलाजी जाधव कोकणांत उतरला, तो मात्र चिमाजी आप्पाच्या सांगण्यावरून बाजीरावास साह्य करावें म्हणून. त्याने ८ जून रोजी आपण कोकणांत उतरल्याचे बाजीरावास कळविले व लिहिले की खोकरीचें राजकारण तुम्ही स्वतःच खेळवीत आहात तेव्हां तें साधेल; पण रायगड हातीं येऊन तुम्ही यशस्वी व्हाल यांत संशय नाही [ पेद. ३३ ले. २७ व पुद. भाग १ ले. १०७ ].

रायगड घेतल्याचे वृत्त चिमाजी आप्पास १२ जूनच्या सुमारास कळले, तें सातारहून आलेल्या पत्रावरून ! तो विचारतो की रायगडावर कोणाचे लोक चढले ? किल्ला सध्या कोणाच्या ताब्यात आहे ते कळवा [ पेद ३ ले ७ ]. रायगड मराठयांनी जिंकल्याची बातमी मुंबईस १४ जून रोजी कळली. त्यांस कळले की रायगडचा दुर्गम किल्ला फितुरीमुळे मराठयांच्या हातीं पडला [ BS ले. ४९ व ५४ पृ. २१३, २१६ ].

रायगड हातीं आल्याने शाहूस अतिशय आनंद झाला. त्याने दरबारांत उद्गार काढले की आपण स्वतः रायगडास जाणार ! नारबा मंत्री यास बाजीरावाकडे

---

१. राखं. २ पृ. ६८ वरील नोंदीच्या आधारें सरदेसाई ८ जून १७३३ ही तारीख देतात. पण ती बरोबर नाही. तेथें '६ मोहरम' ही छापण्याची चूक असावी. '३ मोहरम' पाहिजे असें आम्हांला वाटते.

राजपुरीस धाडणार!! यमाजी शिवदेव व उदाजी चव्हाण यांस अंजनवेलीस पाठवून तेहि किल्ला घेणार! अर्थात् हे त्याचे उद्‌गार आनंदाच्या उद्रेगाचे आहेत. त्याने स्वतःच्या हाताने लिहून कळविले की घेतलें स्थळ आपल्या हातीं सुरक्षित राहील, अशी खबरदारी घ्या. आम्ही स्वतः श्रावणांत रायगड व इतर जिंकलेले किल्ले पहावयास येणार आहोत. शिवाजी महाराज, आबासाहेब संभाजी महाराज व काकासाहेब राजाराम महाराज व मातुश्री ताराबाईसाहेब या कोणास जें कार्य करता आलें नाहीं, तें कार्य फत्तेसिंग बाबा, प्रतिनिधी व पंतप्रधान यांनी केले, ही कीर्ति जगत्रयीं निजामुल्मुल्क व दिल्लीच्या पातशहापावेतों झाली! हा लौकिक कायम राहिला पाहिजे [राखं. ६ ले. ८६ पृ. १९५ : पुशा. पृ. २१९, २२४]. शाहू मनाचा उदार आणि हाताचा सढळ होता. त्याने प्रतिनिधींचा व पंतप्रधानांचा गौरव करण्याचे ठरवून दोघांस बहुमानाचीं वस्त्रेंही पाठवून दिलीं.

प्रतिनिधींनी बाजीरावाशीं या प्रसंगीं सवत्या सुभ्याचें जें वर्तन केलें, त्यायोगे बाजीराव चिडला व यापुढे प्रतिनिधीस योग्य धडा शिकविण्याचें त्यानें ठरविलें. आंगरे, पिलाजी जाधव आंगऱ्यांचा दिवाण रघुनाथप्रभु, आंगऱ्यांचा नामवंत सरदार बाकाजी नाईक महाडिक हे बाजीरावास पूर्ण सामील झाले व प्रतिनिधी आता एकटा पडला. मराठ्यांत पडलेली ही फट शिद्दीच्या पथ्यावर पडली. शिद्दीसरदार अति चाणाक्ष म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहेत. बाजीरावाशी शिद्दीचें संगनमत सुरूं झालें. आंगऱ्यांनीं तर बाजीरावास पत्रें लिहून सुचविण्यास सुरुवात केली की, शाहूने स्वतःच या जंजिरा मोहिमेबाबत तीन सूचना केल्या आहेत. तुम्ही ही मोहीम सर्वस्वी आपल्या आंगावर घ्या. तुम्हीआम्ही हे काम करू व शिद्दीचा मुलुख वाटून घेऊं. रायगड ही तख्ताची जागा असल्यामुळे त्याखालीं असलेला प्रदेश व प्रत्यक्ष रायगड छत्रपतींच्या ताब्यांत रहावा. शाहूने प्रतिनिधीस आता अंजनवेल घेण्यास धाडले आहे. रायगडचें राजकारण आपण केलें व तो जिंकण्याचें श्रेय प्रतिनिधीने घेतलें. आता अंजनवेलबाबत तसें होऊ देऊ नका. एकटा प्रतिनिधी काहीच जिंकू शकत नाही व ताब्यांतही ठेऊ शकत नाही [पेद. ३३ ले. ४२, ४८; पेद. ३ ले. ४३].

जंजिरामोहिमेच्या दृष्टीने इ. स. १७३३ हें वर्ष मराठ्यांस अतिशय अनुकूल गेलें. इ. स. १७३३ च्या जुलै ७ रोजी शाहूने उमाबाई दाभाडे हीस पत्र लिहून कळविले की 'जंजिऱ्याच्या शिद्दीने अमर्यादेने वागून कोकणांत उत्पात आरंभिला; म्हणून फत्तेसिंग भोसले, प्रतिनिधी व पंतप्रधान यांस पाठवून आम्ही मोहीम आरंभिली. रायगड आदि करून कोकणांतील गडकोट हबशाकडून घेतले मुलुख काबीज केला. जंजिरा व दोनचार स्थळें फक्त राहिली आहेत [शा. रो. पृ. २१, २२ कलम

५८ ]. यावरून मराठयांच्या आरंभीच्या धडाडी आणि पराक्रमाचा प्रत्यय येतो; असेच चालू रहाते, तर चारदोन महिन्यांत मराठयांनी भारताच्या नकाशावरून शिद्दीच्या सत्तेच्या रेषा पुसून टाकल्या असत्या.

पण प्रतिनिधीच्या सवत्या सुभ्यामुळे परिस्थिति पालटली. स्वतः बाजीराव व आंगरे शिद्दीस राखावे असे म्हणू लागले व पाताळयंत्री इंग्रजही शिद्दीस अनुकूल होऊन त्यास जीवदान मिळालें. शिद्दी सात आरंभापासूनच जंजिऱ्याबाहेर मोकळा राहून दक्षिणकोकणांत ठिकठिकाणी प्रतिकार करीत लढत होता. आता शिद्दी अंबर अफवानी जंजिऱ्यातून निसटला व तोही शेर झाला. आंगऱ्यास गुंतविण्यासाठी इंग्रजी आरमार व सैन्य शिद्दीच्या बाजूने युद्धांत पडले व मराठयासच शह लागण्याचा प्रसंग घडू लागला. इ. स. १७३३ जुलै २८ पूर्वी शामलाने बाणकोट घेतला; तेथील पंतप्रधानाची चौकी मारली व गोवेले, गोरेगाव विन्हेरे, तुडिल यांवर त्याचा अंमल पुन्हा कायम झाला. महाड, पाचाड, रायगड येथून रवान्या करीत असलेल्या मराठी सैन्याचा दाब शामलवर राहिला नाही [ पेद. ३३ ले. ५१ ].

शिद्दीचे सैन्य रायगड पुन्हा ताब्यांत आणण्याच्या वाटचालीस लागलें व पूर्वीचीच परिस्थिति उत्पन्न होऊन मराठयास पराभूत होण्याचा नामुष्कीचा प्रसंग येणार, असे दिसून येताच इ. स. १७३३ डिसेंबर अखेरीस शाहूने प्रतिनिधीशी पुन्हा एकदा रायगडबद्दल चर्चा केली. त्यावेळी प्रतिनिधीने सांगितले की शाहूने दरसाल ४० हजार रुपये दिल्यास मी रायगडवर दीड हजार सैनिक ठेवून रायगड राखतो. शाहूने त्यावर म्हटले की तुम्हास स्थल द्यावयाचे व पैसेहि द्यावयाचे मग आमचे स्थल आम्हीच राखतो; तुम्ही तुमच्या तैनातीच्या प्रदेशांतून बेगमी द्या म्हणजे झाले[1] ! [ पेद. ३ ले. १३३ ]. मग शाहूने बाजीराव व चिमाजी आप्पास आज्ञापत्र धाडलें की मातबर सरदाराबरोबर फौज पाठवा. चिमाजीआप्पाने स्वतः घाटावर अगर रायगडच्या माचीस अगर रायगडच्या पायथ्याशी रहावे [ पेद. ३ ले. १३६ ]. शाहूने पेशव्यांच्या मदतीसाठी सैन्य पाठविण्याची व्यवस्था केलीच होती. तें सैन्य ता. ५ जाने. १७३४ रोजी पोलादपुरास दाखल झाले. बाजीरावाचे सैन्यही घाटाखाली उतरले.

१. पेद. ३ ले. १३३ ची संपादकीय तारीख ७-१२-१७३५ आहे; ती २९ डिसें. १७३३ पाहिजे.

२. पेद. ३ ले. १३६ ची संपादकीय तारीख १०-१२-१७३५ आहे. ती १ जाने. १७३४ पाहिजे.

हुजुरातीचे म्हणजे खुद्द शाहूचे सैन्यदेखील या सैन्यास मिळाले. बाजीरावाने पुण्याच्या वाणीवकालास सख्त ताकीद दिली की महाडमार्गे लष्करास सर्व तऱ्हेचे जिन्नस पुरविण्याची व्यवस्था करा [ पुद. भाग १ ले. १११ ] मराठी सैन्याचा जमाव रायगडच्या पायथ्याशी जमू लागला. शाहूचा सरदार बाजी भीमराव ता. ९ जाने. १७३४ रोजो छत्रनिजामपूर येथे येऊन पोहोचला. सोमवंशी बंधु, हरि मोरेश्वर पंतराजाज्ञा, कृष्णाजी पवार, विश्वनाथ पवार, उदाजी पवार व देवराव मेघश्याम, वाईचा शेखमिरा, राघो व्यंकटेश, कृष्णराव खटावकर, आनंदराव बहिराव इतक्यांच्या सैन्याचा जथा रायगडभोवती पायथ्याशी पडला. या सरदारांनी ता. १० जानेवारीस इ. स. १७३४ रोजी रायगडच्या पायथ्याशी असलेल्या वाडी गावावर चाल केली. ठिकठिकाणी नाकीं धरून शिद्दीने घोर युद्ध मांडलें. शिद्दी अंबर अफवानी युद्धाची शर्थ करीत होता. मराठयांनी आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. एकीवर बाजी भीमराव, दुसरीवर उदाजी पवार मुख्य होते. मध्यभागी हुजरातीचे सैन्य लढू लागले. सूर्योदयाचे वेळी युद्धास तोंड लागलें. मराठयांनीं प्रथम रायगडवाडी घेतली. नंतर त्याच दिवशी मराठयांनी पाचाड घेतलें. बाजी भीमरावाने चांगला पराक्रम केला पाचाडच्या व वाडीच्या लढाईत शिद्दीचे पुष्कळ लोक कामास आले. रायगडचा गडकरी ससैन्य खाली उतरून आला होता. त्यानेही युद्धांत भाग घेऊन दरवाजावरील शिद्दीचा मोर्चा जाळून काढला. शिद्दी अंबरबरोबर पाचसातशे कसलेले योद्धे होते; त्यांच्या बरोबर उदाजी पवाराने गाठ घेतली. उदाजीने त्यांचा मोड केला. खासा शिद्दी अंबर ठार झाला. त्याची पालखी मराठयांकडे पाडाव झाली. शिद्दीने मदारेवर चौकी बसविली होती, तीं उधळून लावली व मराठयांनी रायगडच्या दरवाजापर्यंत शत्रूला पिटीत नेले. त्यावेळी शिद्दीच्या उरलेल्या लोकांत पळापळ सुरू झालीं. काही लोक महाडास पळून आले. शिद्दी अंबरचे शीर मराठयांनी कापून आणले. या युद्धांत मराठयांचा नामवंत वृद्ध सरदार, शाहूचा पहिला विरोधक व नंतरचा इमानी सरदार कृष्णराव खटावकर पडला. राजगडचे लोक या युद्धासाठी आणले होते, त्यांतील काही या युद्धांत कामास आले व जखमी झाले [ पेद. ३३ ले. १४९, १५०, १६१; थोशाम.[२]

१. पुद. भाग १ ले. १११ ची संपादकीय तारीख '१७३४ डिसें. अशी आहे; ती १७३४ जानेवारी ५ नंतर अशी पाहिजे.

२. पेद. ३३ ले. १६१ ची संपादकीय दिलेली तारीख '१७३५ जाने. अशी आहे; ती इ. स. १७३६ जाने. पाहिजे. याच पत्राचे अधारे ब्रच. ले. ३०५ पृ. २८५ ची तारीख ठरविणे शक्य आहे.

पृ. ९१, ब्रच. पृ. ५४ पृ. २६२ ले. २७८ पुशा. पृ. २३४ ][1] या युद्धांत रायगडचा सरनोबत जावजी लाड शामलाचे हस्ते मारला गेला [ पेद. ३३ ले. १६८ ]. अशा तऱ्हेने १० जाने. १७३४ या दिवशी मराठ्यांनी रायगडवाडी व पाचाड ही ठिकाणें जंजिऱ्याच्या शिद्दीपासून कायमची हिसकावून घेतलीं व शिद्दीस पुन्हा एकदा धास्ती उत्पन्न केली.

विजयाची हकीकत शाहूस तातडतोब समजली. पत्राचे उत्तर म्हणून ता. १२ जाने. १७३४ रोजी शाहूने लिहिले ' वाडी येथील शिद्दीचा कोट पाडून टाकावा. तेथील आणि मदारेवरील तोफा वगैरे सामान रायगडावर चढवावे. पाचाडचा बंदोबस्त करावा. तेथील तोफा पाचाडासच राहू द्याव्यात. पण पाचाडच्या तोफा पुढे रायगडच्या मोर्चेबंदीसाठी नेण्यांत आल्या [ पेद्. ३ ले. १७३ ]. शिद्दी अंबर अफवानीचे मस्तक साताऱ्यास पाठवावें. शिद्दीकडील जे लोक सापडले असतील, त्यांची डोकी मारावीत [ पेद्. ३३ ले. १५२ ]. शिद्दी अंबर अफवानीची पालखी ता. २९ जाने. १७३४ रोजी शाहूकडे साताऱ्यास पोहोचली [ पेद ३३ ले. १५८ ]. शाहूच्या आज्ञेप्रमाणे इ. स. १७३४ च्या जानेवारी १६ रोजी वाडी येथील खैर्यतखानाचा कोट मराठ्यांनी पाडून टाकला [ शिचसाखं. १० ले. ४८; पेद ३३ ले. १५४ ]. पाचाडचा कोट यावेळी सचिवपंताचे ताब्यांत आला. तेथे सचिवातर्फे आनंदराव बहिरव आपले लोक घेऊन बंदोबस्तास राहिला त्याचे जवळ किल्ले प्रचंडगडचे लोक, खंडा मल्हार नामजाद, दुल्बाजी मरळ यांचा जमाव बंदोबस्तास राहिला [ राखं. १६ पृ. १६ ले. ३ ]. ता. १६ जानेवारी १७३४ रोजी पाचाड येथे लिंगोजी हवालदार व शेखमिरा यांचा मुक्काम असताना शिद्दीचा प्रसिद्ध सरदार शिद्दी सात चार हजार सैन्यानिशी महाडास आला. त्याने ' आपुस तळें पोटी घेऊन ' म्हणजे या तळ्याच्या आश्रयाने लकडकोट बांधून टेहळणीचीं ठिकाणें तयार केलीं. रायगड पडला तर पडो, पण बाणकोटची संपूर्ण खाडी आपल्या ताब्यांत ठेवायची, असा त्याचा इरादा स्पष्ट होता [ पेद्. ३३ ले. १५४ ]. ही बातमी कळताच शाहूने संभाजी आंगऱ्यास आज्ञा केली की आपले आरमार सिद्ध करा व रायगड प्रांतीं उतरलेल्या आमच्या सैन्याचा पाठपुरावा करा. आंगऱ्यानेहि लगेच ती गोष्ट पत्र पाठवून मान्य केली[2] [ पेद. ३ ले. १२७ ]. शिवाय, शाहूने

---

१. ब्रच. ले. २७८ पृ. २६२ चे साल १७३६ पाहिजे.

२ पेद ले. १२७ ची संपादकीय तारीख ४–१२-१७३५ आहे ती १८ जानेवारी १७३४ पाहिजे.

अंताजी शिवदेव यासही आज्ञा केली की तुम्ही पाचाड येथे जाऊन तळ द्यावा' [ पेद. ३ ले. १७२ ]. त्याने निघण्याचे मान्य करताच शाहूने बाजी भीमराव रेटरेकर यासही पत्र लिहून कळविले की रायगडच्या पायथ्याशी पाचाड येथे बुनगे ठेऊन सड्या स्वारीनिशी मतगडपर्यंत जा व लढण्यास उद्युक्त असलेल्या शिद्दीचे कबिले धरून आणा; म्हणजे शिद्दीच्या सैनिकांचें अवसान खचेल. त्यावर रेटरेकराने शाहूस नम्रपणे कळविले की 'माझा मुक्काम वाडी येथे असता महाराजांचे पत्र येते तर बरे झाले असते. आम्ही पाचाडास आलो; पण तेथें पाणी नसल्यामुळे नातें येथे आलो. पाचाड २॥ कोस मागे राहिलें असून महाड दोन कोसांवर आहे. नातें वगैरे भागांत शिद्दीने जाळपोळ केली आहे. अशा स्थितींत आम्ही महाडला शह देण्याचे ठरवीत आहोंत. मजबरोबर शेख मिरा व लिंगोजी हवालदार आहेत. स्वामीची आज्ञा मानली पाहिजे व शह देण्याचेही साधले पाहिजे, म्हणून हरी गणेश, हिंदुराव घोरपड्याचे लोक, सरलष्कर याची फौज, माणकोजी आटोळे यांचे स्वार, पवारांचे सैन्य, खंडोजी माणकर यांस मतगडकडे आपल्या पत्रानुसार धाडतो. मी स्वतः मात्र शहाचें कामीं गुंतलो असल्याने जाऊ शकत नाही. आनंदराव बहिरवही मजकडे राहातील. एकंदर चार हजार फौज मतगडकडे धाडली आहे.' [ पेद. ३ ले. ११३, ११४ ] [2] शिद्दीच्या सैनिकांचे कबिले पकडण्याची जंगी मोहिमच यावेळी शाहूने काढविली.

महाडच्या स्वारीकडे जसे शाहूचे पूर्ण लक्ष होते, तसेच रायगडच्या सुव्यवस्थेकडे आणि सुरक्षिततेकडे त्याचे मन यावेळी लागले होते. त्याने सातारा, परळी, वसंतगड, वारूगड, पांडवगड, वैराटगड, चंदन, वंदन, वर्धनगड, ताथवडा, महिमानगड, सदाशिवगड, यांवरील शिबंदींतील शेलके लोक काढून त्यास रायगडावर धाडले. धाडलेल्या पहिल्या टोळींत ६८० असामी असून त्यांत १०५ बंदूकवाले होते. या सैन्याबरोबर विठ्ठलपंत गडनिवीस याचा पुत्र धाडला. रायगडच्या प्राकारासाठी दोन हजार रुपये धाडले. बिंबाजी पवार यास गडाचा हवल्दार म्हणून पाठविले त्याचे बरोबर शामजी रुद्र हा मदतनीस दिला. त्यांस ५ शे रुपये पाठविले. नवीन भरती करण्याच्या दृष्टीने दोनअडीचशे मावळे चाकरीस ठेविले. शाहूचा

१. पेद ३ ले. १७२ ची संपादकीय ता. २-१-१७३६ आहे; पण ती २४ जाने. १७३४ पाहिजे.

२. पेद ३ ले. ११३ संपादकीय ता. जाने. १७३५ अशी आहे, ती २४ जाने. १७३४ पाहिजे तसेच पेद. ३ ले. ११४ ची संपादकीय ता. २५-१-१७३५ आहे; ती २५ जाने. १७३४ पाहिजे.

विचार होता की रायगडावर ५ हजारपर्यंत मावळे ठेवायचे आणि त्या दृष्टीने त्याची तरतूद चालू झाली [ पेद. ३३ ले. १५७, १६४ ]. नारोपंत सचिवास त्याने आज्ञा केली की मावळ प्रांतातून एक हजार माणसें रायगडच्या दिमतीसाठी आम्हास द्या [ राखं. १६ ले. ८२ पृ. ८१–८२ ]. रायगड व रायगड प्रांतातील इतर किल्ल्यांवर पोक्त बेगमी असावी, म्हणून शाहूने आज्ञा दिल्या व त्याप्रमाणे मीठ, हळद, मिरे, सुपारी इ. वस्तू रवाना होऊ लागल्या [ पेद. ३३ ले. १७५ ]. शाहू आपलेकडून सर्व तऱ्हेचे प्रयत्न करीत होता. पण सरदार मात्र बरेच सुस्त होते. शाकारणीची व्यवस्था जानेवारींत केली, तरी एप्रिल अखेरपर्यंत शाकारणीस पत्ता नव्हता; मुलखाची संचणी झाली नव्हती व प्रांतात व्हावी ती सुव्यवस्था झाली नव्हती [ ऐसंसा. खं. १ ले. १२९ पृ. १२७ ]. असो.

रायगडची मोहीम संपली, तरी जंजिरामोहीम रेंगाळत चालूच होती. शिद्दीमध्ये जास्त लढत रहाण्याचे सामर्थ्य नव्हते. हे जसे खरे तसेच धडाडीचे युद्ध करून शिद्दीचा नाश करणेही मराठयांस अवघड झाले. मराठयांचे आरमारी सामर्थ्यच प्रामुख्याने कमी पडले. आनंदराव सुमंत यांचेमार्फत शिद्दीने तहाचें बोलणें लावलें[1] [ पेद. ३ ले. १०४ ]. इ. स. १७३४ च्या डिसेंबरमध्ये शिद्दी आणि मराठे यांचा तह झाला. त्या तहाने रायगड व रायगड तालुका मराठयांकडे आला. शाहूने रायगड, महाड व त्याखालील प्रदेश आपणाकडे ठेविला [ पुशा. पृ. २२८ राखं. २ पृ. ७७. ]. आपल्या वतीने पोतनीस यास कारभारी नेमले. इच्छा असली तरी शाहू रायगडावर कधी गेला नाही, व १७७२ पर्यंत पेशव्यांनीही रायगडबाबत फारसे लक्ष दिले नाही. रायगडचे पूर्वीचे महत्त्व गेले; ते त्यास परत लाभू शकले नाही.

---

१. पेद. ३ ले. १०४ ची संपादकीय तारीख १२।१२।१७३३ आहे; ती ७।१२।१७३४ पाहिजे.

२. पुण्यश्लोक शाहु व पहिला बाजीराव पृ. २२८ वरील तहाचा सन १७३४ पाहिजे. तसेच पेद. ले. १८३ ची संपादकीय तारीख २६।४।१७३६ आहे; ती १८ मे १७३४ पाहिजे.



# १८ रायगडवर पेशव्यांची सत्ता स्थापन झाली

इ. स. १७३५ पासून सन १७७२ पर्यंत रायगड तालुका हुजूरचा प्रदेश होता. शत्रूने वक्रदृष्टी वळविल्यास, त्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी पेशव्यांची होती; पण कारभारी नेमणे, तालुक्याचे जमाखर्च पहाणें वगैरे गोष्टींबाबत पेशव्यांस अधिकार नव्हता. शाहूने या तालुक्याचा कारभार यशवंत महादेव यांस सांगितला.

यशवंत महादेव यांचे घराणे मूळचे भोरप येथील. शाहूजवळ राहून त्यांनी स्वारीची पोतनिशी बरेच दिवस सांभाळली. त्यामुळे शाहूने उरवडे हा जप्त झालेला त्यांच्याच घराण्याकडील पूर्वीचा गाव त्यांजकडे चालू केला. यशवंत महादेव छत्रपतींचे पोतनीस, खासेनिवीस होते. म्हणजे, शाहूचे अठरा कारखाने व शाहूचा खाजगी कारभार या गोष्टी त्याजकडेच होत्या. शाहूने त्यांस रायगड तालुक्याचा कारभार सांगितला [थोशाम. पृ. ७१, ८१, ८८, ८९]. त्यांस ४० हजारांचा सरंजाम शाहूने दिला होता [ राखं. २ पृ. ११६, ११७ ].

यशवंत महादेव ही मोठीच तोलाची असामी होती. त्यांजकडे इनामगाव सात, दोन गावांतील इनाम जमिनी, सरंजामासाठी प्रत्यक्ष अमलाखाली ९२ गावें व महादेवाच्या यात्रेसाठी लावून दिलेला हाशीलाचा एक गाव मिळून १०२ गावें चालत होती. नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दीत यांपैकी २४ गावांवरील त्यांचा अधिकार नष्ट झाला. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत आणखी १८ गावांवरील त्यांची सत्ता नष्ट

झाली. ब्रिटीश सरकारने त्यांचे ५२ गाव खालसा करून त्याबद्दल सालिना दोन हजार रु. वेतन ठरविले [ ऐसंसा. खं. ९ ले. ७४ ]. असो. छत्रपतींतर्फे महाड येथे राहून रायगड, लिंगाणा व महाडचा कोट हे तीन किल्ले व महाड, नातें, पाचाड, वाडी इ. महत्त्वाच्या गावांत पोतनिसांचा कारभार चालू झाला. त्यांचे पश्चात् विठ्ठल यशवंत हे अधिकारी झाले.

शाहूच्या मृत्यूनंतर राज्याचा सर्व कारभार पेशव्यांनी पहावा व छत्रपतींचे उणें पडू देऊ नये असे शाहूने मृत्यूपूर्वी स्वतःच ठरविले. त्यामुळे रायगड तालुका छत्रपतींकडे राहू देण्याचे कारण उरले नव्हते; पण नानासाहेब पेशव्याने व त्याच्या पश्चात् माधवरावानेहि इ. स. १७७२ च्या आरंभापर्यंत मूळ व्यवस्थेंत काही बदल केला नाही.

माधवरावांच्या कारकीर्दीच्या अखेरीस त्याच्या असे ध्यानीं आले की इंग्रज व त्यांचा स्नेही शिद्दी एकादे दिवशी बाणकोटच्या खाडींतून रायगडच्या खोऱ्यांत शिरून हा स्वराज्यसंस्थापनेच्या वेळचा महत्त्वाचा प्रदेश आपल्या ताब्यांत घेतील. हा प्रदेश पोतनीसांकडून काढून प्रत्यक्ष पेशवेसत्तेच्या ताब्यांत ठेवला पाहिजे, असें त्याचें मत झाले. शिवाय, नानासाहेब पेशवा व यशवंत महादेव यांचे जसे आपुलकीचे संबंध होते, तशी स्थिति माधवराव व विठ्ठल यशवंत यांची नव्हती. कुलाबा गॅझेटिअरकार लिहितो की इ. स. १७७२ त रायगडचा हवालदार मराठयांच्या विरुद्ध उठला व तो शिद्दीस मिळणार असा रंग दिसू लागला; [ पृ. ३७५ ]. पण याहून गंभीर कारण पेशवेदप्तरांतील अप्रसिद्ध कागदपत्रांत नमूद आहे, ते असे की विठ्ठल यशवंतराव यांजकडे पेशव्यांनी हिशेब मागितले असता ते त्यांनी दिले नाहीत. सर्व सत्ता जर पेशव्याने छत्रपत्रीचे प्रतिनिधी म्हणून चालवावयाची, तर पोतनीस हिशेब देत नाही म्हणतात, हे तापट पेशव्यास सहन होणारे नव्हते [ अप्र. कागद रु. नं. २ ]. माधवरावाने छत्रपतींस कळविले की रायगड तालुका आमचे ताब्यांत दिल्याबद्दलची सनद द्या.

शाहूचा वारस रामराजा याने इ. स. १७७२ आगस्ट ३० या दिवशी रायगडचा हवालदार यशवंतराव मोरे यास आज्ञा केली की विठ्ठल यशवंत यांचे निसबतीस असलेला रायगड आता पंडित प्रधान यांच्या निसबतीस दिला असल्यामुळे, रायगड ही तख्ताची जागा जकीऱ्यासुद्धा, हवालदाराने पेशव्यांच्या स्वाधीन करावी. अशाच अर्थाचे दुसरे आज्ञापत्र महाडच्या कोटाच्या अधिकाऱ्यांस छत्रपतींनी धाडून दिले व पेशव्यांची याबाबतची मागणी बिनविरोध मान्य केली [ शारो. पृ. ५२, ५३; कलम ११७ ].

छत्रपतींनी अशी आज्ञापत्रें जोवर दिली नव्हती, तोवर पोतनीस व रायगडचे हवालदार यांनी हीं ठिकाणें व प्रदेश पेशव्यांच्या ताब्यांत देण्याचे नाकारले, हे कायदेशीर होते व त्याबद्दल खुद्द पेशवाही त्यास दोष देऊ शकत नव्हता. पण आज्ञापत्रें हातीं आल्यावरही आपली सत्ता बिनतक्रार सोडण्याची पोतनिसांची व त्यांच्या हस्तकांची तयारी नव्हती.

इ. स. १७७२ मध्ये माधवराव पेशव्यांचा क्षय वैद्य-हकीमांच्या साधनसामर्थ्याच्या व मानवी उपायांच्या पलीकडे गेला. आपण ह्या आजारांतून उठत नाही, अशी माधवरावांची खात्री झाली. ते पुणें सोडून थेऊर येथे गेले. नारायणराव पेशव्याने सखाराम बापूच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली कारभार करावा, अशी त्यांनी व्यवस्था केली व राघोबादादास कैदेतून सोडवून त्याच्याशी जुळते घेण्याचा प्रयत्न चालविला. निरवानिरव करीत असलेल्या पेशव्यांना पोतनिसांची रायगड तालुक्याबाबतची नाखुषी समजून चुकली.

रियासतकार सरदेसायांनी माधवराव पेशव्यास 'निग्रही माधवराव' असे म्हटले आहे. पेशव्याने आपला हा गुण रायगड तालुक्याबाबत पूर्णपणे दाखविला. त्याने आपला सरदार आपाजी हरि यास सैन्य तयार करून महाड, रायगड, लिंगाणा इत्यादि ठिकाणें हिसकून घेण्यास फर्माविले. आपाजी हरि सैन्यासह रवाना झाला व त्याने १० जखर म्हणजे इ. स. १७७२ सप्टें. ८ या दिवशी महाडचा कोट आपल्या ताब्यांत घेतला. लढाई अशी झालीच नाही. कोटावर पेशव्यांचे निशाण चढत असताना तोफांचे १८ आवाज झाले. महाडच्या कोटाच्या दर्या बुरुजावर एक नामांकित तोफ होती. ही तोफ आपाजी हरीने रायगडच्या मोर्चेबंदीसाठी बरोबर घेतली [ अप्र. कागद रु. नं. २ ].

रायगड व लिंगाणा हे किल्ले ताब्यांत घ्यावयाचे व पोतनिसांची सत्ता नाहीशी करावयाची, हे महत्त्वाचे काम उरले. पण रायगडास वेढा घालणे अवघड होते तत्पूर्वी नातें, कोंझर, पाचाड, वाडी या ठिकांणी आपला पाय रोवणे व तळ ठोकणे आपाजी हरीस जरूर होते व त्या प्रयत्नांत तो होता. एवढयांत, १८ नोव्हे. १७७२ रोजी सकाळी माधवराव थेऊर येथे मरण पावले [ ऐलेसं. ले. १२२८, १२३० पहा. ] त्यामुळे प्रत्यक्ष युद्धाचा प्रकार थोडा नंतर, नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दीत घडून आला.

नारायणरावास पेशवेपदाची वस्त्रे मिळताच रायगडच्या मोहिमेस सुरुवात झाली. लढाईसाठी तालुके वसई, सुवर्णदुर्ग, प्रांत राजपुरी, साष्टी येथून सुमारे १५ खंडी दारू, ५ खंडी शिसें आपाजी हरीच्या सुपूर्त झाले [ अप्र. कागद रु. नं. १ ].

बिरवाडी येथे सरकारचे ८०० बैल सतत राखणीस ठेवले होते. या बैलांवरून तालुक्यांत लागणारे सगळे सरकारी सामान नेत. या बैलांची व्यवस्था नमुनेदार होती. त्यांस करड व उडदाची डाळ यांची खिचडी खुराक म्हणून चालू असे; त्यासाठी ५० खंडी भात दरवर्षी राखून ठेवलेले असे. त्यांस नाचणीच्या पिठाचे रोट खाऊ घालीत. बैलांच्या तैनातीसाठी २५ माणसें नेमलेली होतीं धान्य भरडण्यासाठी रोज पाच घरट चालू असत. अशा ह्या राखीव लमाणावरून युद्धाचे सामान रायगडच्या परिसरांत पाठविण्यात आले [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. महाडहून वेठीच्या बैलांवरूनही सामान येत होते. महादजी त्रिंबक याने युद्धासाठी डोईओझ्याने दारू पुरविण्याचे काम पत्करले व पार पाडले. सैन्यास लागणारे धान्य हातीं पडावे म्हणून पुंडलिक राम फडणीस याने रायगडचे मौजे कोकरे येथील कोठार जप्त करण्यास माणसें धाडलीं. पेशव्यांचे तोफखान्याचे प्रमुख भीवराव पानसे यांनीही रायगडचे मसलतीसाठी बैलावरून साहित्य पुरविले [ अप्र. कागद रु. नं. २ ]

मोहिमेसाठी काथ्या, लोखंडी दागिने, कुदळी, पावडीं, पहारा, कुऱ्हाडी, कोयते, चंद्रज्योती इत्यादि हरएक प्रकारचे साहित्य पुरविण्यांत आले [ पेद. २२ ले. २२२ ]. शिशाच्या गोळया बनविण्यासाठी सोनारांस शिसें पुरविण्यांत आले व रोज रात्रीं बंदुकीच्या गोळ्यांचा ढीग तयार होऊ लागला. त्यांनी शिशाच्या ५० हजार गोळ्या पाडून दिल्या [ अप्र. कागद रु. नं. २ ]. रायगडच्या मसलतीस खंडेराव बर्गे आपल्या लोकांसह आपाजी हरीच्या मदतीस आले. उंदेरी, तळें येथून लोक युद्धासाठी आपाजी हरीकडे आले व मोठे सैन्य जमा झाले.

विठ्ठल यशवंत याचे वतीने खंडेराव मोरेश्वर हा मामलतीचे काम पहात होता. त्याने युद्धाची तयारी केली. रायगडवर असलेले बंदीवान त्याने सोडून दिले. रायगडवर यशवंतराव मोरे हवालदार म्हणून काम करीत होता [ ऐसंसा. खं. ४ ले. ५९, पृ. १०० ]. त्याचे हाताखाली बालकाजीराव पालांडे हा सरदार सैन्यासह सिद्ध होता. त्यांनी रायगड झुंजविण्याची सिद्धता केली. मदारचौकी, कोंडेखळी व हिरकणी बुरुज ही रायगडवरून मारा करावयाचीं ठिकाणें होत. मदारचौकी नाणेदरवाजाखाली रायगडच्या वाटेंत आहे. तेथे नागीण, भवानी, धाकटी तोफ व लांडा कसाब या तोफांची रचना केली. कोंडेखळीच्या चौकीवर आणि हिरकणीवर एक एक तोफ सिद्ध ठेविली. पाचाड येथे पाच तोफा व ५०० गोळे आग ओतण्यास रचून ठेविले. लिंगाण्यावरही दोन तोफा व दोन जंबुरे मारा करण्यासाठी लावून ठेवले. अशा तऱ्हेने, रायगड व लिंगणा ही ठाणीं झुंजरावयाचीच, असे पोतनिसांनी ठरविले. यावेळी रायगडावर ४६ तोफा, ३२ बंदुखा ३२ जेजाला, ३ जंबुरे, ३०१४९ बंदु-

खीच्या गोळया, ३०१८ तोफांचे लहान गोळे, ७०९ जंगी गोळे, दारूची ११ पिपें एवढा पोख्त सरंजाम होता [ अप्र. कागद रु. नं. २ ]. हे आकडे युद्ध संपल्यानंतरचे आहेत. म्हणजे रायगडच्या हवालदाराने प्रत्यक्ष युद्धांत खर्च केले तें सामान वेगळेच होय.

आपाजी हरी हा सेनापति तर होताच; पण तो धोरणी व कारस्थानी मनुष्य होता. त्याने आपले सैन्य रायगडच्या पूर्वपश्चिम बाजूंनी नेले. पश्चिमेकडील बाजूस रायगड-पासून सुमारे ५ मैलांवर नातें हें गाव आहे, हें त्याने आपल्या ताब्यांत घेतले. इ. स. १७७३ च्या आरंभी आप्पाजी हरीच्या सैन्याचा उपसर्ग यां गावास पोहोचला व सबंध गाव उजाड झाला. रयत परागंदा झाली. नात्यास झालेल्या लढाईंत मर्फाची याने मर्दुमी गाजविली. तेथील प्रतिकार संपला असे पाहून सैन्य पाचाडच्या कोटा-पर्यंत येऊन पोहोचले. तेव्हा रायगडकऱ्यांनी कोट झुंजविण्याचे सोडून तो पाडून टाकिला; तेथील सामान जाळले व गड झुंजविण्याचे दृष्टीने गडकरी गडावर चढले. मार्चचे आरंभी आप्पाजी हरीच्या सैन्याचा एक गोट पाचाड येथे नाकेबंदी करून तळ देऊन राहिला. त्यामुळे पाचाड गाव ओस पडलें.

आप्पाजीचे दुसरें सैन्य त्रिरवाडीस गेले व तेथून कसबे वाडीपर्यंत जाऊन पोहोचले. त्यामुळे वाडी गावची माणसें परागंदा झाली. आप्पाजीच्या सैन्याचा उपद्रव आमडोशी या गावास विशेषच झाला, असो [ अप्र. कागद रु. नं. २ व ४ ].

रायगडच्या पायथ्याशी, येऊन पोहोचल्यावर आपाजी हरीने रायगडचे हवाल-दार यशवंतराव मोऱ्यांस कौलास येण्यास निरोप धाडला. पण त्याने नकार दिल्या-मुळे आपाजी हरीने दोन योजना आखल्या. पहिली अशी की रायगडकऱ्यांचे कबिले व भाऊबंद धरून आणण्यासाठी त्याने माणसें धाडली. हवालदार व सरनोबत यांची मुलेमाणसे वाई येथे होती. त्यांचा ठिकाणा लावला. काही कुबिले मावळांत होते; त्या सर्वांस धरून आणून आपल्या गोटांत पाचाड येथे ठेविले [ अप्र. कागद रु. नं. २ ]. रायगडच्या मोर्चेबंदीस प्रारंभ करण्यापूर्वी त्याने जत्रा केली; नंतर तोफांसाठी धमधमे रचण्याच्या जागा निश्चित केल्या. एक मोर्चा चित् दरवाजाजवळ बांधला व तें स्थान काबीज करण्यासाठी नूरमहमद जमातदाराची नेमणूक केली. एक मोर्चा कसबे वाडी येथे, एक मोर्चा घळकीच्या मेटाजवळ व चौथा मोर्चा नाचण टेपाजवळ बांधला.

मोर्चेबंदीपूर्वी आप्पाजी हरीने गोपाळ जोशी महाडकर यांस मुहूर्त पाहण्यास सांगितले. त्यांस याबद्दल त्याने १२ रु. दक्षिणा दिली. पाचाडकर जोशी यासही ६ रु. दिले. मोर्चे चालू करण्यापूर्वी मोर्चांतून लोकांस जरूर त्या वस्तू पुरविल्या

जातील अशी खबरदारी घेतली. तळें येथील सुकचंद वाणी व महाडचा व्यापारी राणोजी मांगडे यांना सामान पुरविण्याच्या सक्त सूचना दिल्या. लढाईत जखमी होणाऱ्या सैनिकांच्या जखमा बांधण्यासाठी साव म्हाली न्हावी यास मोर्चांत आणून ठेविले.

युद्ध सुरू झाले. ज्याव फिरंगी याने डुब्यावरील छपरावर गोळे लागू केले. मनमेळ प्रेम गोलंदाज उंदेरीच्या सुभ्यांतून युद्धाकरिता आणिला होता. त्याने एक महिनाभर ठाणीं टेहळून गोळे टाकण्याची शिकस्त केली. राजमाची येथील सैनिकांनी झुंज चांगले घेतले. नूर महमद बाणदाराने चित् दरवाजाशी झुंज घेऊन तो ताब्यांत आणल्यावर तेथून मदारचौकीच्या मोर्च्यावर बाण टाकले व रायगडकऱ्यांचा मोर्चा तेथून उधळून लावला. तेथील चार तोफा त्यांनी हस्तगत केल्या. अशा तऱ्हेने आप्पाजी हरीच्या सैन्यास नाणे दरवाजासमीप जाण्यास तब्बल महिनाभर झुंज घ्यावे लागले.

युद्ध महाग पडू नये व सामदामाचे उपायाने रायगड हातीं यावा म्हणून आपाजी हरीचे प्रयत्न चालू होते. धोंडबाराव दाभणे, रामाजी चव्हाण, बरवाजी कडु हीं तीन माणसें या युद्धाच्या अग्निवर्षावातूनही रायगडवर पत्रांची नेआण करीत होतीं. आपाजी हरीने यशवंतराव मोरे व बालकाजीराव पालांडे यांजबरोबर सलोख्याचे बोलणे लाविले. गडावरील माणसांना ध्यानांत येऊन चुकले होते की लढाईत मरणे अगर शरण जाऊन किल्ला स्वाधीन करणे, यांशिवाय मार्ग उरलेला नाही. पोतनीस किल्ला लढवू शकतील अशी शक्यता उरलेली नाही. यशवंतराव मोऱ्यास पाचशे रुपये उत्पन्नाचा गाव नेमून देण्याचे आपाजी हरीने मान्य केले. पालांड्यांनाही जमीन इनाम देण्याचे ठरले. हवालदार व सरदार यांनीच युद्धांतून माघार घेण्याचे ठरविल्यावर युद्ध आवरले. हवालदारास चाळीस हजार रुपये देऊन किल्ला पेशव्याने आपल्या ताब्यांत घेतला [ कुर्गेपृ. ३७५; अप्र. कागद रु. नं ८३ ]. या युद्धांत आपाजी हरीची एकशेतीन माणसें पडली व जखमी झाली. धर्मोजी महाडिक, बाजी येरंडकर व कुसाजी वानरे पडले [ चंद्र. अप्र. कागद नं. २१९६१, २१९७९ भाइसंमं. ]. हवालदार व कारकून स्वाधीन झाल्यावर आपाजी हरीने त्यास बंदोबस्ताने पुण्यास पाठवून दिले. तेथे यशवंतराव दत्ताजीराव मोरे माजी हवालदार किल्ले रायगड यास ५०० रु. उत्पन्नाचा गाव देण्याचे निश्चित झाल. तो दिला जाईपर्यंत वीस खंडी भात व १०० रु. नख्त दरसाल द्यावयाचे ठरले. चांदबाराव महामूनकर व बालकाजीराव पालांडे सरदार यांस मौजे तेटघर ता नातेंपैकी ७५० ची जमीन द्यावयाचा करार झाला [ अप्र. कागद रु. नं. ३, ८३ ]. बरेच दिवस जमीन देण्याचे राहून गेले होते. नंतर वीस काठ्यांच्या मोजणीची जमीन गावगन्ना नेमून

दिली- भातशेत इनाम बिघे ।११॥३। व नख्त ५०० रुपये दिले. आबाजी बिन चांदबाराव महामूनकर व बालकाजीराव पालांडे यांस ।॥≈॥ चावर जमीन दिली. त्यांस मिळालेल्या जमिनींचे उत्पन्न नख्त १२५ रुपये व ३१। खंडी भात इतके होते [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

लढाई थांबली. आपाजीने सर्व देवतांच्या यात्रा करविल्या. झोलाई–कसबे वाडी, सोमजाई व म्हसोबा मजरे पाचाड यांस बकरीं बळी दिली. किल्ल्याच्या मोर्चातून यात्रा केल्या. रायगडावर राजहुडा, घळकीचें मेट, मेट कालकाई येथे जत्रा झाल्या. रायगडावर लोकांस पानसुपारी झाली; तीन हजार पानें लागलीं ( दर रुपयास दोन हजार पाने ). महाडकर लोकांनी फार चांगली कामगिरी केली होती. त्यांनी बैलांवरून सामान पुरविले. जाळपोळ करणाऱ्या गडकऱ्यांच्या माणसांस पकडून आपाजीच्या स्वाधीन केले होते; म्हणून त्यांस बक्षिसें देण्यात आली. यशवंतगडावरील काननाक फलाणकर व ताननाक पांगारकर, हुजुरातींतील रामनाक सिरकोल यांस एक एक शेराचे चांदीचे कडे आपाजीने बक्षीस दिले. ज्याने रायगडवर निशाण रोवले, त्या निशाणदारास त्याने पागोटें दिलें. चौदा जणांस सोन्याचीं कडीं, वीस जणांस रुप्याचीं कडीं व दोघांस मोत्यांच्या जोड्या दिल्या [ चंद्र. अप्र. कागद नं. २११६१, २१९७९ भाइसंमं. ].

आपाजी हरि गड चढून गेला. त्याने मुख्य दैवत शिर्काई हिचे दर्शन घेतले, तेव्हा देवीपुढे दोन रुपये दक्षिणा ठेविली. छ १ सवाल, आर्बा सबैन रोजी पुण्याहून सनद सादर झाली; त्या सनदेनुसार देवीचे दागिने तयार करून रायगडावर धाडण्यात आले. रायगड फत्ते व्हावा, म्हणून शिर्काईस नवस केला होता; तो फेडण्यासाठी हे दागिने पाठविले होते [ पेद. ३२ ले. २०२ ].

इ. स. १८ मार्च १७७३ रोजी रायगड अपाजी हरीच्या हातीं आला. आपाजी, महाराज छत्रपतींच्या तख्तास मुजरा करण्यास गेला. त्याने नजर म्हणून नख्त पाच रुपये सिंहासनापुढे ठेविले. रुप्याची फुले सिंहासनावर उधळली. या प्रसंगी तख्तास पागोट्यांची झालर लाविली होती. आपाजीने दरबार भरविला; त्याप्रसंगी त्याने एक मोहोर नजर केली. भालदार व चोपदार यांस त्याने १८ रुपये बक्षीस दिले [ अप्र. कागद रु. नं. २, ३ ].

सैन्यांत असलेल्या हंसाजी खैरा यास त्याने रायगडची हवलदारी सांगितली [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. रजा-परवागीच काम त्याचे हातून घ्यावयाचे ठरले. गणेश विश्वनाथ व हंसाजी यांचे नावे दोन मोर्तब तयार झाले. शिर्काई प्रसन्न व्हावी, म्हणून आपाजीने एक बकरे देऊ केले होते; ते हंसाजी खेर याचे मार्फतीने दिले;

त्यावेळी शिर्काईची यात्रा केली [ अप्र. कागद रु. नं. २ ]. रायगडावर दगडाचे एक कानलें होतें; त्यास राणूबाई म्हणत. युद्धाचे गर्दीत आपाजीच्या एका गारद्याने ते जमिनींतून वर काढले. त्यावरून हंसाजी खेर यास दृष्टांत झाला; म्हणून ते कानले जेथील तेथे ठेऊन ब्राम्हणांकडून त्याची पूजाअर्चा करविली. कसबेवाडी येथील गावचीं कुळें परागंदा झाल्यामुळे झोलाईची यात्रा व्हावयाची राहिली होती. त्यामुळे उपद्रव होऊ लागला; सरकारांतून हंसाजी खेर याने झोलाईची यात्रा करविली.

लिंगाणा किल्ल्याच्या मसलतीसाठी आपाजी हरीने माणसे निवडली, त्यांस तिळगुळ दिला व धोंडो नारायण मोने कारकून याजबरोबर बिरवाडीस धाडलीं. तेथे सैन्याचा चार दिवस मुक्काम झाला [ इ. स. १७७३ मार्च २ ]. रायगड त्यावेळी झुंजत होता; म्हणून रायगडकऱ्यांनी शत्रुत्वाच्या बुद्धीने या सैन्याच्या तळावर येऊन जाळपोळ केली [ अप्र. कागद रु. नं. २ ]. किल्ला घेण्याबाबत प्रत्यक्ष हालचाली करण्यापूर्वीच लिंगाण्याचा हवालदार किल्ला स्वाधीन करण्यास तयार झाला होता. इ. स. १७७३ फेब्रु. २७ या दिवशीची एक सनद पुण्याहून सादर झाली होती, तिचा आशय असा—येसजी चांदलेकर हवालदार व कारकून किल्ले लिंगाणा यास सनद की संभाजी दौंड व चिमणाजी गोविंद व खंडोजी शेळके यांस लिंगाण्यावर धाडले आहे. त्यांचे स्वाधीन किल्ला सर्व साहित्यासह करावा व तुम्ही हुजूर [ पुण्यास ] यावे, म्हणजे तुमची व्यवस्था करू [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. या पत्रानेच काम झाले होते. हवालदाराने स्वतः येऊन किल्ला आपाजी हरींच्या स्वाधीन केला.

कोट महाड, रायगड, पाचाड व लिंगाणा ताब्यांत आल्यावर आपाजी हरीने तेथील वस्तूंची मोजदार केली. पुढील आकडे पहा—

| स्थान | रोख रक्कम | भात खंडी | नागली खंडी |
|---|---|---|---|
| कोठी कोट महाड | २–७–६ | ९९॥।२।.। | १८॥=॥१॥।= |
| ,, किल्ले रायगड | १४–८–० | ४४४।.॥१॥ | ५८॥ .। १॥ = |
| कोठी कोट पाचाड | – | १०॥।१। | २५८३॥= |
| ,, किले लिंगाणा | – | १२॥४ | १९॥=॥= |

[ अप्र. कागद रु. नं. २ ].

रायगड ताब्यांत घेतल्यावर आपाजी हरीने तेथे नामजाद लोक ४६५ व पोरगे ५५ इतकी माणसे बंदोबस्तास ठेविली. रायगड तालुक्यांत अन्यत्र जी माणसे नौकरीस ठेविली, त्यांची संख्या २१८ होती. रायगडावरील लोकांचा वार्षिक वेतन-खर्च नक्त ३३०४० रु. होता. यशवंतराव मोरे याचे जागी हंसाजी खेर यास हवालदार नेमिले, रायगडच्या मसलतीसाठी येसजी नाईक पवार याचेबरोबर जी माणसे

आली, त्यांतील हंसाजी खेर हा प्रमुख होय [ अप्र. कागद रु. नं. ३ व ९२ ]. रायगडच्या मोहिमेस एकूण भोजनखर्च ३३२०|||· रु. आला; लोकांनी कामगिरी बजावली, त्याप्रीत्यर्थ २५०|| रु. बक्षिसें देण्यांत खर्च झाले. बकाजी पांड्या पुजारी तख्त किले रायगड यास एक बिघा जमीन इनाम देण्यात आली. पुढील बक्षिसें वाचकांस थोडी चमत्कारिक वाटतील. ( १ ) खंडेराव बर्गे किल्ले रायगडचे मसलतीस आले. त्यांस आपाजी हरि याने कलंसी कुणबीण बक्षीस दिली. ( २ ) गणेश विश्वनाथ फडणीस तालके मजकूर यास गुणी कुणबीन बक्षीस दिली [अप्र. कागद रु. नं. २ ].

युद्धाचे वातावरण उत्पन्न झाल्यावर ठिकठिकांणी जाळपोळ आणि उपद्रव यामुळे रयतेचे फार नुकसान झाले. अनेक गावचे लोक पळून गेले. सैन्याने उडव्या उध्वस्त केल्या होत्या; कडपे व लोंब्या मरून नेल्या होत्या. उभीं शेतें तुडवलीं गेल्याने उत्पन्न साफ बुडालें होते; म्हणून नवीन सरकारने अनेक ठिकाणी सूट जाहीर केली. पाचाड या गावास ८२५||| रु. नख्त व २०७|||३| खंडी गल्ला एवढी सूट मिळाली. नातें या गावास ७११|=| रु. सूट मिळाली. अन्य गावांतूनही गाव-कऱ्यांस अशी सूट मिळाल्यामुळे रयत निर्धास्त होऊन पुन्हा गावोगाव परत आली व रायगडच्या परिसरांत पुन्हा शांतता निर्माण झाली. मराठी सैन्य परत गेले व नव्या मामल्यावर गणपतराव कृष्ण कोल्हटकर याची चार वर्षांकरिता नेमणूक झाली [ अप्र. कागद रु. नं. २,८०,८६,९१ ].

गणपतराव कृष्ण याला रायगडच्या जमाखर्चाची व्यवस्था लाऊन द्यावयाचे काम उरकावयाचे होते. रायगडचे पूर्वीचे हिशेब कायम धरून त्याने इ. स. १७७३ चे हिशेब पूर्ण करून घेतले. मराठ्यांची अन्यत्र पद्धति अशी असे की नवी राजवट सुरू झाली की नवीन हिशेब सुरू होत. यावेळी दोन वेगळे जमाखर्च केले नाहीत. [अप्र. कागद रु. नं. २]. इ. स. १७३४ मध्ये रायगड मराठ्यांच्या ताब्यांत शिद्दीने दिला; तेव्हापासूनच्या रायगडच्या हिशेबाच्या भानगडी व पडणारा फरक याचा अंतिम निर्णय यावेळीं गणपतराव कृष्ण यास करावयाचा होता. रायगड स्वराज्यांत आला, ते दिवस सामान्यपणे पर्जन्यकालचे व गर्दीचे होते. युद्धाचे गर्दीत एक ठिकाण दुसऱ्याचे ताब्यांत देताना शिल्लक मोजून ताबा देण्याचा शिरस्ता पेशवाईत होता. पण ठिकाण ताब्यांत घेणारे व देणारे सारखेच गर्दीत असत. त्यामुळे प्रत्यक्ष मोजदाद न करता अजमासे याद्या करूनच ताबा दिला जात असे व त्यांत ताब्यांत घेणाराची नेहमीच फसवणूक होई. तोच प्रकार इ. स. १७३४ मध्ये झाला. ‘ काही किरकोळ केली वजनी मोजदाद झाली. वरकड जिन्नस भात, नागली, मीठ, गजमोज-

णीने ताब्यांत घेतले. दारू वगैरे वजनी सामान अजमासाने जमा धरून मोजदादीचा जाबता अंताजी शिवदेव यांनी करून दिला,' असे वर्णन कागदोपत्रीं आढळतें. तदनंतर, वस्तूंच्या प्रत्यक्ष वापराचे वेळी जिनसांच्या मोजदादींतील फरक आढळून येऊ लागले व भगवंतराव बाजी याजकडे हवालदाराने दोनतीनदा अर्ज पाठवून मोजदाद करण्याबद्दल विनंति केली होती. मोजदाद व्हावी अशा प्रथम आज्ञा सुटल्याही; पण नंतर अधिकारीवर्गाने मोजदाद न करण्याचा निर्णय घेतला. 'रायगड सरहद्दीची जागा. मोजदाद केलियासी बेगमीचा आवाब कळतो; सबब करू नये; यामुळे राहिली. अलीकडे मोजदादीस सुभाहून कारकून आले; फड सिद्ध केला, पण मोजणी राहिली,' असे अधिक वर्णन आढळते. यांतील गांभीर्य असें की सर्व वस्तूंची मोजदाद झाली, तर ती जाहीर होऊन सर्वांस कळणार व रायगड-सारख्या ठिकाणी मराठ्यांचे एकूण साहित्य किती, हे शत्रूसही कळणार! ही गोष्ट न व्हावी, म्हणून जवळ जवळ चाळीस वर्षेपर्यंत पूर्वीचेच आकडे कायम धरून वस्तूंच्या याद्या जमेच्या बाजूस देण्याची रीति कायम राहिली. या काळांत 'नासलें, कुसलें, घुशीने खाल्लें, तेही शिल्लक म्हणून ओढत होते.' आता रायगड ताब्यांत आल्यावर आपाजी हरीने त्रिंबक बहिरव मुजुमदार यास आज्ञा करून मोजदाद करविली. तीवरून आढळून आलेला सर्वविध तोटा पेशवेदप्तरांतील कागदोपत्रीं नमूद आहे. नमुन्यादाखल काही आकडे पहा—

| | |
|---|---|
| भात ६३।।।३।१।।। | दाल हरजिनसी ०।२।- |
| नागली १६।३।।।१।।= | धणे ०१०=।। |
| उडीद ०।२।।।≡ | तुरी ०।१।।। |
| तांदूळ ००१।।।= | तूप १०१।=। |

याप्रमाणे शेकडो वस्तूंचा तोटा दिसून आला [ अप्र. कागद रु. नं. ८६ ]. त्याची शिलकेंतून वजावट करून हिशेबाला सुरळीतपणा आणण्याचे काम, गणपतराव कृष्ण कोल्हटकराने पुरे केले; पण त्यास प्रेरणा आपाजी हरि यानेच दिली.



# १९ रायगडवरील वार्षिक उत्सव

इ. स. १७७३ त पेशव्यांनी रायगड आपल्याकडे घेतल्यावर सिंहासनाबाबत काही गोष्टी आणि रिवाज कायमचे ठरवून टाकले. सिंहासनास चांदवा व गलेफ तयार केला. त्याचा हिशेब पहा--

१२७६ रुपये सनगे २३।≈ येकूण आख.

८१२।। किनखाप ७।≈

२२० ताफता ला।। ४

२२८।। गजन्या ९

१५ खार्वे ३

१२७६ रु. खर्च.

३३२।। गजवार मखमल गज १९ ये।।

१६०८।। एकुण खर्च.

हा १६ मार्च १७७३ चा सिंहासनाच्या कापडाचा खर्च आहे. सिंहासनास चार खांब होते. सिंहासनाचा बैठकीचा भाग व तलाव्याचा भाग यांस काप-डण्यासाठी हा खर्च पडला आहे. खर्चास सरकारी मंजुरी मिळाली. तदनंतर बारा वर्षांनी हा सगळा वस्त्रसंभार जीर्ण झाल्यामुळे इ. स १७८६–८७ मध्ये पुन्हा याच स्वरूपाचा खर्च झाला आहे [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. इ. स. १७९७ एप्रील १९

रोजी पुन्हा सिंहासनाचा गलेफ तयार केला. यावेळी सिंहासनाच्या खांबास लाल मखमल वापरली होती; सिंहासनाचा चांदवा किनखापी होता. त्याला ताफत्याची झालर लावली होती; म्हणजे पेशवाईत सिंहासनाच्या स्थानाची व्यवस्था चांगली ठेवीत होते. रोज संध्याकाळी सरकारी माणसे जमून सिंहासनास मुजरा करीत व तेथे दिवटी लावीत [ अप्र. कागद रु. नं. ७८ ]. रायगडावर ४ गोलंदाज, ४ सुतार, ३ कोठीवाले, २ पुजारी, २ भालदार व चोपदार, १ पोतदार, १ माहोती, ३ दिवल्ये इ. २० माणसे कायमची असत [ अप्र. कागद रु. नं. ७५ ]. याशिवाय शिबंदीची माणसेही मुजऱ्यास गंभीरतेने हजर रहात. रायगडवर दररात्री दिवटी लावावयाचीच, असा नियम म्हणून असलेली बरीच ठिकाणे होती. सदरेस व तख्ताजवळ रात्रौ सतत दिवटी असे. महादरवाजा, विवेकसभा, श्रीभवानीजवळील राजहुडा, नाणेदरवाजा, हिरकणी बुरुजावरील सदर कोंडेखळीची सदर, कचेरी, मदारावरील कोठी येथे रात्रभर दिवा जळत असावयाचा, असा शिरस्ता असे [ अप्र. कागद रु. नं. ८१, ९२ ]. तख्ताजवळ कीर्तन होई व ते करण्याचे काम बिरवाडीच्या योगी घराण्याकडे वंशपरंपरा होते. सिंहासनाच्या या सेवेबद्दल त्यास जमीन इनाम लावून दिली होती [ अप्र. कागद रु. नं. ८४ ]. जन्माष्टमीचा उत्सव महाराजांचे सिंहासनाजवळ होई. इ. स. १७७८ मध्ये त्यास १५ रु. खर्च आला. उत्सवास गोरेगावकर हरिदास बोलावीत. त्यास ५ रु. बिदागी मिळे [ अप्र. कागद रु. नं. ७९, ८४ ].

सिंहासनाच्या बरोबर समोर नगारखान्याची जागा आहे. इ. स. १७७३ मध्ये नगारखान्याच्या हिशेबांत १३००० रु. खर्ची पडले आहेत [ अप्र. कागद रु. नं. ८७ ]. या खर्चापैकी काही रकमा रायगडावरील तळोजें येथील वसुलांतून खर्च होत. इ. स. १७९६–९७ मध्ये नाना फडणीस महाडास व नंतर रायगडावर आले. त्यांनी सिंहासनासमोर नगारखाना ठेवण्याची जी खास व कायमची व्यवस्था केली, तिचे स्वरूप पुढील प्रमाणे – २ सुरणाची, १ तुतारची, २ कर्णाची, २ दमामची, १ डफगार, १ झांजवाला, २ घड्यालची, ३ नगारची व पेलेदार, १ नगारे करणार इतकी माणसे कायम नेमली. इ. स. १८०७–०८ मध्ये त्यांचे वार्षिक वेतन १२०० रुपये होते. नगाऱ्याच्या साहित्यासाठी वार्षिक १०० रु. खर्चाची मंजुरी होती. इ. स. १८०७–०८ मध्ये झालेला काही खर्च– ४।। रु. दसरा खर्च; १ रु. चौघड्यास दक्षणा; १।। रु. दसऱ्याचे बकरे एक; ४।। रु. खादी चौघड्यावर; २२।।। ~ रु. दिव्यास तेल वार्षिक; ७२।।।= रु. नगारे मढविण्यास कातडी, मसाला इ. साठी [ अप्र. कागद रु. नं. ८०, ८६, ९१, ९४ ]. दरवर्षाचे

खर्चाचे आकडे सामान्यपणे हेच आहेत. नगारा मढविण्यास लागणाऱ्या साहित्यांत कातडी, तूप, हळद, मीठ या वस्तूंची नोंद आहे [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

रायगडावरील मुख्य देवता शिर्काई होय. इ. स. १७७३ मध्ये तेथे नवचंडी होम केल्याचा उल्लेख आहे. त्याचा खर्च पहा—

कैली ०।१॥ तांदूळ सडिक कैली.
००॥· डाल हराजिनसी देवास व ब्राह्मणास.
००।= मीठ देव-ब्राह्मणास
००= धने देवाकडे

०।=॥
००॥· हळद दसरेयासी.
००॥· मिरच्या ,,
००॥· लसून ,,

०।=॥

००३ तूप वजन कचे. देवास ००॥· व ब्राह्मणास ००॥· ब्राह्मण गण जोशी राहीरकर, दररोज ००।· प्रमाणे.
००१। गूळ वजन कचे—देव, ब्राह्मणास.
००६॥ तेल वजन. पैकी ००॥· ब्राह्मणास.
बाकी नवरात्र—दिवा नव दिवस व दसरा.

शिर्काईच्या खर्चासाठी ठरीव उत्पन्न लावून दिले होते. ते पुढीलप्रमाणे—

·।=॥ भात कैलीं दरमहा नैवेद्यास दरमहा भात ०॥१॥ प्रो
००॥··तांदूळ पोते सणास नैवेद्य

·।=॥:॥·
००१॥। दारू बरकंदाजीस कार्तिक द्वादसीस

००७॥ तूप कचे मोईन दरमहा ००१ प्रो वजन पोवलें व पौतें सणास
०॥३०९ तेल वजन ॠ दिव्यास दरमहा. माजने करावयासी दरमहा; श्रावणी पौर्णिमेस, कार्तिकी द्वादसीस दिवा इ. मिळून
[ अप्र. कागद रु. नं. ७९ ].

इ. स. १७७५ आक्टो. ८ या दिवशी महाडहून दोन मुखवटे रायगडावर पाठविल्याचा उल्लेख आहे. हे शिर्काईचे मुखवटे असावेत [ अप्र. कागद रु. नं. ८ ].

नवरात्रांत घट उठल्यावर शिर्काईपुढे गोंधळ होत असे. इ. स. १७८६ चे सुमारास तो बंद झाला; त्यामुळे किल्ले मजकुरी उपद्रव सुरू झाला. त्यामुळे पुन्हा गोंधळ चालता केला. त्यावेळी दिव्यास तेल वजन पके ००१॥ लागत असे. गडावर कोणत्याही तऱ्हेचा उपद्रव सुरू झाला की, शिर्काईची यात्रा करावयाचीच, असा रिवाज असे. शिर्काईच्या गोंधळासाठी वार्षिक खर्चास नेमणूक नसे; पण खर्च मान्य

करण्याचा शिरस्ता होता. गोंधळाचे वेळी नवे निशाण उभारीत. निशाणास एक जोठाचे कापड लागे; त्यास १॥ ̸ रु. खर्च लागे. तेलांत काव मिसळून तें मिश्रण जोठास फाशीत; की झाले निशाण! तेल व काव ८ ̸ । किंमतीचे लागे [ अप्र. कागद रु. नं. ८०, ८१, ८६, ९२ ].

उत्सवाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाच्या याद्या उपलब्ध आहेत; त्यांतील काही आकडे पहा. त्यायोगे एकूण उत्सवाचीच कल्पना येणार आहे.

१०८ ̸ ̸ शिर्काईचा नैवेद्य व दिव्यांस. हा खर्च तांदुळाचा आहे. ( भात दर खंडीस १५ रु. प्रो. )

४।.।. वजनी. वजन कच्चे. ८॥७.

१८ ̸ ̸ ̸ तूप नैवेद्यास. ३८ ̸ ̸ । तेल.

९८। ̸ ̸ ̸ ॥ नवरात्राचे उत्सवास व नंदादीपास मिळून उत्सवास. ११८॥ हरिकीर्तन ९ दिवस व ललित. या रकमेंत मृदुंगाची कणिक, खोबरे, नारळ, विड्याची पाने, खारीक, सुपारी, बुक्का, गुलाल, मखरखर्च असे. २२॥·॥· शिधाखर्च आहे.

ब्राह्मणांच्या समाराधनेचा खर्च, प्रसाद, हरिदास त्रिंबक जोशी पाबळकर व त्याचे ७ असामी, घोडे, यांचा ९ दिवसांचा शिधा व दाणाखर्च यांत आहे.

शिर्काईच्या नवरात्रोत्सवास दोन नातेकर जोशी देवीचे जपास बसत. महाडहून जिनगर मखर करावयास येई. ललिताचे दिवशी ब्राह्मणभोजन होई. सरदार व प्रमुख मंडळी प्रसादास येत. पाचाडकर जोशी देवीजवळ नऊ दिवस सप्तशतीचा जप करी. हरिदासास ९ दिवसांच्या कथेबद्दल १८ रु. बिदागी असे. २७। ̸ नंदादीपाचा वर्षभराचा खर्च होई. त्यासाठी दर दिवशी अर्धा शेर तेल लागे. नवरात्रांत ९ दिवस देवीस ओवाळीत. ओवाळणीचा खर्च २८ ̸ ̸ होई. गोंधळाचा खर्च ९॥ ̸ होई. महाडकर गोंधळी गोंधळ घालीत; त्यांची बिदागी रोजी १ रु. असे. अष्टमीचे दिवशी कसबे नातें येथील मांग गोंधळी गोंधळ घालीत; त्यासाठी खर्च २॥ ̸ रु. होई.

श्रावणी पौर्णिमेस श्री. शिर्काईचे पौत्यास सूत वगैरेचा खर्च ·।· असे. जन्माष्टमीचा उत्सव सालाबाद होई; त्यास १५ रु. खर्ची पडत. गणेशचतुर्थीस श्री. गणेशपूजन, रंग, दक्षिणा यांकरिता ·।· खर्ची पडत. दिवाळीचे ओवाळणीसाठी मौजे वाडी येथिल परीट व गडावरील कुणबीण यांचेसाठी ·॥· खर्च होई. कार्तिकी द्वादशीस तुळशीचे लग्न गडावर होई; त्यास ·।· खर्च होई. संक्रांतफलश्रवण, दक्षणा, तिळगूळ यांसाठी २॥। ̸ लागत. हुताशनी पौर्णिमेच्या पूजेची दक्षिणा ·॥· होती. वर्षप्रतिपदेस गडावर पंचांगश्रवण होई; त्यावेळी ·॥· दक्षिणा देत. श्री. शंभु

महादेवाची काठी कसबे नातें येथे येई व तेथून किल्ल्यावर येई. त्यावेळी १ रु. खर्च होई.

गडावरील देवतांच्या उत्सवानिमित्त भोजनखर्च होई. खुद्द दसऱ्याचे दिवशी देवळांतून जादा तेल ००४॥ ( साडेचार ) शेर तेल लागे व तें जमाखर्चात नोंदले जाई [ अप्र. कागद रु. ८१, ९१, ९४ ].

गडावरील दुसरे महत्त्वाचे मंदिर श्रीवाडेश्वर महादेवाचे होय. सध्या आपण त्यास, शिलालेखांतील शब्दांचे आधारे जगदीश्वराचा प्रासाद असे म्हणतो. वाडेश्वरास 'श्रावणमासांत अभिषेक होई. इ. स. १८१५-१६ मध्ये मासाभिषेक खर्च १०॥⩘॥ झाला; पैकी ब्राह्मणास दक्षणेच्या रूपाने ७॥ रु. प्राप्ती झाली [ अप्र. कागद रु. नं. ८५ ]. पण खर्चाची नेमणूक फक्त ४॥ रु. होती. श्रावणांत गडावर पर्जन्य जोरदार असल्याने आलेल्या ब्राह्मणास गडावरच रहावे लागे. नेमणूक कमी; म्हणून ती वाढवून घेण्याचा प्रयत्न इ. स. १७९८-९९ मध्ये केलेला आढळतो [ अप्र. कागद. रु. नं. ८० ].

इ. स. १७८२ जून १५ ची पुढील नोंद महत्त्वाची वाटते- 'श्रीवाडेश्वर महादेव किले रायगड येथे बहुता दिवसी देवालय शालकेयुक्त होते, ते गैरनिगेमुले जाया जाहले त्याची दागदोजी सालमजकुरी करून देवस्थापनेस खर्च मामलेदार याणी पदरचा लाऊन देवाची स्थापना केली. नैवेद्यास इहत् छ ३ जवल तागायत छ ३ रजब येकमाही कैली ०।.॥ तांदूल सडीक व ००१ दाल तुरीची लागली. ००।६ तूप नैवेद्यास; ००॥९ तेल दिव्यास' लागले [ अप्र. कागद रु नं ९२ ]. देवालयांत झालेली ही अर्चाशुद्धी आहे. देवळांचा जीर्णोद्धार इ. स. १७८७-८८ मध्ये झाला. त्यावेळी ७५॥ रु. नख्त व ०४॥।.॥⩘ इतका गल्ला खर्ची पडला [ अप्र. कागद रु. नं. ८३ ].

श्रीवाडेश्वराची वार्षिक नेमणूक २४॥⩘ होती. या रकमेंत नक्त व ऐनजिनसीची नेमणूक या दोन्ही गोष्टी अंतर्भूत आहेत. यापैकी ७॥ रु. श्रावणमासाभिषेकाप्रीत्यर्थ खर्च होत. त्रिपुरी पौर्णिमेस त्रिपुरासाठी ·॥⩘ चे तेल ( दरमणी ६ रु. प्रमाणे ) लागे. माघमासी शिवरात्रीचे दिवशी ·।· खर्च होई. एकादशीस एकादशिनी करीत. ·।⩘ चें चंदनाचे खोड दरवर्षी श्रावणांत गंधासाठीं खर्ची पडे. नैवेद्य, दिव्यास तेल, तूप इत्यादि सगळ्याचा खर्च सरकारतर्फे १६॥।⩘ होते असे. हा वार्षिक खर्च आहे [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

रायगडावरील भवानीचा उल्लेख जुन्या कागदपत्रांतून 'श्रीदेवी भवानी राजहुडा' असा येतो. हुडा म्हणजे बुरूज. पण येथे बुरूज नाही. देवीस वार्षिक

नेमणूक होती. दिवाबत्तीस तेल वजन कचे ०८ खर्ची पडे. दसरा व नवरात्र यांप्रीत्यर्थ ०।।१०= इतका ऐनजिनसी खर्च होत असून तेलतूप ०१।।८।। इतके दरसाल लागे [ अप्र. कागद रु. नं. ७८, ७९ ].

गडावरील हनुमंताचीही अशीच व्यवस्था होती. मारुतीजन्मापूर्वी तेल व शेंदूर यांसाठी खर्च होई, तेव्हा तेल ००=।। लागे. त्या दिवशी नैवेद्य होई [ अप्र. कागद रु. नं. ७९ ].

गडावरील राणूबाईसाठी स्वतंत्र वार्षिक नेमणूक नव्हती [ अप्र. कागद रु. नं. ८८ ].

पेशवे उत्तरकालांत रायगडवर पीर मदारसाहेबाचा दर्गा होता. याचा उत्सव दरसाल जमादिलावल १७ या रोजी होई. इ. स. १७७३ या वर्षी पीर मदारास गलेफ केला. गलेफ साध्या शेल्याचे असत. इ. स. १७९७–९८ मध्ये नवीन गलेफ तयार करून चढविला. पीर मदारचा उरूस भरे. इ. स. १७७८–७९ मधल्या उरुसास १९ रु. खर्च झाला. गलेफ चढवतेवेळी तोफेचा बार होई [ अप्र. कागद रु. नं. ८३, ९१, ९२ ]. उरुसाचे वेळी कंदोरी करीत; तिचा खर्च ७।। रु. होई. उरुसास एक खंडी भात, ।= चे अर्धा मण मीठ लागे. तोफेच्या बाराचा खर्च १०– रु. होई. पीर मदाराशी दिवा लावीत; त्यास ६ शेर तेल खर्च होई. मदारशहाच्या खिजमतीस मुजावर किल्ल्यावर येई; त्यास दरसाल ५ मण भाताची मोईन असे. काझी राईरकर वास्तव्य कसबे लोणशी ता। निजामपूर हा इदीस खुदबा वाचण्यास गडावर येई; त्याबद्दल त्यास ४ रु. तश्रीफ होती. रमजान ईद व मदारशहाचा उरूस या दोहोंसही सरकारी खर्च असे. इ. स. १८१३–१४ मध्ये हा खर्च ३५।।।≈ रु. झाला. दर्गा पीर मदार यास नातें येथे एक बिघा व मजरे पाचाड येथे दीड बिघा जमीन इनाम होती [ अप्र. कागद रु. नं. ८१, ८३ ].

रायगडच्या अगदी लगत्याची गावे मजरे पाचाड व वाडी ही होत. यांतील देव–झोलाई, सोमजाई, महादेव, गणपति इ. सर्वांस सरकारांतून वार्षिक नेमणुका होत्या. या देवता किल्ल्याचे रक्षण करितात असे मानले जाई. इ. स. १७७७ मध्ये या गिर्दनवाहीचे देवांस सरकारांतून तेलाची नेमणूक करून दिली; तदनुसार कसबे वाडी येथील झोलाई व पाचाड येथील सोमजाई यांस प्रत्येकी, वार्षिक ०० तेल सरकारी कोठींतून देण्याची व्यवस्था झाली व ती इ. स. १७८७ मध्ये कायम झाली. पाचाड येथील महादेवास इ. स. १७८१–८२ मध्ये दीपास ००२ तेलाची नेमणूक झाली. महादेवास श्रावणमासाभिषेक होई. पाचाडच्या सोमजाईस सालिना खर्चासाठी रोख १।। रु. व ७।। मण भाताची मोईन होती. इ. स. १८०५–०६ मध्ये

पाचाडची ८।।।३।।। बिघे इतकी जमीन या मंदिराकडे लाऊन देण्यात आली. पाचाड येथील गणपतीस मौजे नांदगाव येथील २ बिघे जमीन इनाम, ४ रु. रोख व एक खंडी भात सरकारातून असे. इ. स. १८१३–१४ पासून, या मंदिरास दरमहा एक शेर तेल मिळण्याची व्यवस्था झाली. हा खर्च रायगडच्या जमाखर्चातून होत असे. रायगडावरील शिर्काबाईचे जसे उत्सव असत, त्याचप्रमाणे या देवांचे होत. या देवांच्या नवरात्रोत्सवास ४७८॥ रु. नेमणूक होती. यावेळीं ब्राह्मणांकडून ९ दिवस जप चाले. शमीपूजन होई. रायगडावरील शिर्काबाईस साडी व खण यांसाठी २॥ रु. खर्च होई. यांपैकी साडी २८ व खण ।- चा असे. सोमजाई व झोलाई यांसही वार्षिक साडी खण अनुक्रमें १॥। रु. व ।-॥ या किंमतीची सरकारांतून नेमून दिली होती [ अप्र. कागद रु. नं. ८६, ९२, ८०, ८१, ८७, ७८ ].

लिंगाण्याच्या गिर्दनवाहीचे देव श्रीजननी व सोमजाई हे होत. या देवस्थानांचा नवरात्राचा उत्सव होत असे. त्यावेळी देवीस १।- रु. चें पातळ व ८ रु. चोळी प्रत्येकी, अशीं वस्त्रें सरकारातून अर्पण होत. निशाणास १। रु. व उपसाहित्यास १।- रु. खर्च होई. कोळी भगत कडु याजकडे या देवतांचे भगतपण होते. लिंगाण्यावर उपद्रव सुरू झाल्यास या देवतांच्या यात्रा होत व त्यांस संतुष्ट करण्याचा प्रयत्न होई. वाळणकोंडी येथील देवही, क्वचित् , लिंगाण्यावरील उपद्रवास कारण समजला जाई व त्यासाठी त्याची यात्रा करीत. इ. स. १७७४ मध्ये लिंगाण्यावर काही उपद्रव झाला; म्हणून वाळणकोंडी येथील देवाची यात्रा केली. त्यास ८ नारळ– ४; ८– शेंदुर, ८–॥ पंचखाने व देवास पानसुपारी मिळून ।-॥ रु. सरकारी खर्च झाला आहे [ अप्र. कागद रु. नं. ६, ७८, ८१ ]

दर महिन्याच्या शुद्ध द्वितीयेस रायगडावर चंद्रदर्शन झाल्यावर तोफेचा बार काढीत; नंतर लोकांस पानसुपारी वाटीत. या समारंभाचा वार्षिक खर्च ७॥ रु. होता. दसऱ्याचे दिवशी सीमोल्लंघनानंतर जमलेल्या लोकांस पानसुपारी देत; त्याचा खर्च सुमारे २॥ रु. होई. या प्रसंगी १ रु. ची पाव मण सुपारी व १॥ रु. ची ४५०० पानें लागत. दसऱ्याच्या दिवशी १० बकरी रायगडावर बळी पडत. दर बकऱ्यास १। रु. किंमत पडे. शिर्काबाई, सोमजाई, झोलाई, महादरवाजा, सिंहासन, पाचाडचा म्हसोबा, रायगडची कोठी, रायगडावरील लांडा कसाब, भवानी इ. तीन तोफा यांस प्रत्येकी एक बकरे बळी देण्याचा रिवाज होता. दर तीन वर्षांनी रायगडावर एक टोणगा बळी देत. त्याची किंमत सामान्यतः १० रु. असे. इ. स. १७८१ मध्ये टोणग्याची किंमत २० रु. होती. टोणग्यास १० आण्याची दारु पाजीत. दसऱ्याचे दिवशी सुभेदाराच्या पालखीचीही इतर पूजनीय

वस्तूंबरोबर पूजा होई. दर चैत्रीपौर्णिमेस रायगडवर एक टोणगा बळी देत; या प्रकारास कागदोपत्री पांजीहाल असा शब्द वापरलेला दिसतो. म्हणजे दरवर्षी एक व दर तिसऱ्या वर्षी दोन असे टोणगे बळी दिले जात असत. दसऱ्याचे विडे वाटण्याच्या वेळी दिवटी पेटवीत; त्यावेळी ०८०॥ तेल लागे. दसऱ्याच्या दिवशीं गडावर कोंबडीं जमा होत. त्यांस दुरोजा दाणा व भात यांचा खर्च ०८१॥। ( पावणे दोन शेर ) होत असे. सीमोल्लंघनाचे वेळी तोफा व जेजालांचे बार होत; त्यांत ०१०॥· दारू खर्च होई. म्हसोबास कोंबडे बळी देत; त्याची किंमत इ. स. १८१३-१४ मध्ये ०–॥। होती. लिंगाण्यावर पांजीसाठी दर तिसऱ्या वर्षी बकरें बळी देत. इ. स. १७८७-८८ मध्ये तेथे टोणगा बळी दिल्याचा उल्लेख आढळतो. लिंगाण्याच्या देवस्थानांस म्हणजे सोमजाई व श्रीजननी यांस व दरवाज्यास दरसाल प्रत्येकी एक बकरें बळी देत. पाचाडच्या महादेवाची यात्रा चैत्रपौर्णिमेस भरे; तेव्हा देवास एक बकरें बळी देत. या यात्रेस केळी भात ·।३॥ लागे [अप्र. कागद रु. नं. ८१, ७८, ९२, ७९, ८३, ८६].

रायगडवर वर्षप्रतिपदा साजरी होई. त्यावेळी कडुलिंब व गूळ वाटीत. गूळ वजन ०८०॥ इतका लागे. संक्रांतीचा तिळगुळाचा समारंभ गडावर होई. त्यास ०॥।· तीळ व गूळ वजन ०॥।७॥ इतका लागे. दसऱ्याचा रेडा बळी देण्याचे प्रकारास रेडेजत्रा असे कागदोपत्रीं लिहिलेले आढळते. रेडेजत्रेप्रमाणेच दुसरी एक जत्रा दरसाल रायगडावर होई, तीस शाकारजत्रा म्हणत. गडावरील अनेक इमारतींची पावसाळ्यापूर्वी शाकारणी करावी लागे. ती सुरू करण्यापूर्वी ही शाकारजत्रा होई. जत्रांस तांदूळ, तूप, तेल, मीठ इ. वस्तूंचा खर्च गडावरून होई व त्याचे तपशील भरपूर उपलब्ध आहेत [ अप्र. कागद रु. नं. ७९, ८१ ]. लिंगाण्यावरही अशी शाकारजत्रा होत असे. लिंगाण्यावर दसरा व चंद्रदर्शनप्रसंगी पानसुपारी वाटण्याचा प्रघात होता.

रायगडावर बागा लावण्याचा किंवा वृक्षारोपणाचा उल्लेख आढळत नाही. रायगडचा माथा उंच; गडावर वारा जोराचा व जमीन खडकाळ. त्यामुळे काही मोजक्या जागी झाडी आहे; तेव्हा बागा लावण्याचा प्रयत्न कोणी केला नाही हे परिस्थित्यनुरूपच आहे. पण इ. स. १८१५ एप्रिल २८ रोजी दुसऱ्या बाजीरावाने रायगडचा अधिकारी मकाजी जाधव यास कळविले की गडावरील शिबंदीचा खर्च कमी करा. जी रकम वाचेल, ती धोंडो विश्वनाथ जोशी यास देऊन त्याचे करवी, गडावर नारळाची झाडें लावा. ' नारळीची झाडें अक्षय्य राहून उतम नामी चांगली होत ', अशा जाग्यावर लावावयाचे काम त्याजकडे सोपविण्यात आले, अशा स्वरूपाची आज्ञा दुसऱ्या कोणी दिल्याचे, लाखो कागदपत्र पाहूनही आढळांत येत नाही ! [ अप्र. कागद रु. नं. ८७ ].

# २० रायगडची दुरुस्ती, शाकारणी, राखण व गस्त

इ. स. १७७३ च्या स्वारीमुळे रायगडची तटबंदी बऱ्याच जागी ढासळली. तालुक्याचा अधिकारी गणपतराव कृष्ण कोल्हटकर याने ८२९॥≈॥ रु. खर्च करून दुरुस्तीचे काम करून घेतले. इ. स. १७७५–७६ मध्ये नाणेदरवाजाचे दुरुस्तीचे काम केले; त्यावेळी. १९० वेळां सुरुंग लाऊन तेथील खडक फोडला. त्यासाठी पाथरवटांस ८४॥≡ रु. इतका रोजमुरा द्यावा लागला. याचवेळी हिरकणी व टकमक टोक यांवर पहाऱ्याच्या जागा बांधल्या, त्यांकरिता ३॥⌐॥ रु. खर्च झाले.

दुरुस्तीसाठी लागणारे लाकूड सरकारी जंगलांतून विनामूल्य आणले जाई. सरकारी माणसेच लाकडे तोडण्यास जात. त्यांचे वेतन अन्यत्र खर्च पडलेले असे. त्यांचा अन्नखर्च सरकारी कोठींतून होई. त्यामुळे रोख खर्च किरकोळ भासतो. इ. स. १७७७-७८ पासूनची रायगडची जी अंदाजपत्रकें आहेत, त्यांत दरसाल एक हजार रुपये रायगडचे दुरुस्तीसाठी दाखविले आहेत. इ. स. १७७९-८० मध्ये नाणेदरवाजाची उरलेली दुरुस्ती व किल्ल्याच्या पायऱ्या बांधून काढण्यासाठी एक हजाराची रकम अंदाजपत्रकांत खर्चाकडे टाकली आहे. पण मदारकोठी, नाणेदरवाजाचा पहारा व टकमक टोकाजवळील पहाऱ्याच्या जागांचे बांधकाम १७१०≡॥ रु. तच दुरुस्त झाले इ. स. १७८०-८१ मध्ये मदारचौकीवरील जुनी कोठी मुसळधार पावसाने कोसळली. तिचे दुरुस्तीसाठी रोख ८०७॥≈ रु. खर्च झाला. लोकांची अडिसेरी व कोठीची शाकारणी यांस २३५।≈ रु. लागले. याच वर्षी नाणेदरवाजाचा बुरूज कोसळला; तो बांधून काढण्यास ३८९०।· रु. लागले. नाणेदरवाजाचे दक्षिणेकडील तट चिखलधोंड्याचा होता. १९०१। हात तटाचे बांधकाम ४८०॥।·॥ रु. खर्चून करण्यात आले. कुशावर्त तलावाची मूस नवी बांधली व गाळ उपसून तळे स्वच्छ केले; त्यास ५१।⌐॥ रु. लागले. या वर्षी सखारामबापु बोकील यांस रायगडवर अटकेंत

ठेवले. त्यांचेकरिता हवालदार रहात असलेले सरकारी घर मोकळे केले, दुरुस्त केले व सभोवती भिंत बांधली; त्यासाठी १८७।।-। रु. खर्च झाला. सारांश, इ. स. १७८०-८१ मध्ये रायगडच्या दुरुस्तीचा आकडा २१५२८-। रु. झाला आहे [ अप्र. कागद रु. नं. ८, ७९, ८७ ९२ ].

इ. स. १७८८ मध्ये रायगड तालुक्याचा अधिकारी सदाशिव रघुनाथ गद्रे याने पेशव्यास कळविले की खूबलढा बुरुजाची जागा नाक्याची आहे. तेथील बांधकाम तीन वर्षांपूर्वी कोसळले; त्याची बंदिस्ती केली पाहिजे. त्यावर तोफा, जेजाला ठेवल्या पाहिजेत. नाणेदरवाजा व त्याच्या कोसळलेल्या पायऱ्यांची दुरुस्ती झाली पाहिजे. हे काम मजुरीने करण्यास ६।७ हजार रु. लागतील. पेशव्यांनी आज्ञा केली की- नाणेदरवाजाचे, बुरुजाचे व तटबंदीचे काम किल्ल्याचे लोकांकडून पूर्ण करून घ्यावे; त्यासाठी चार हजार रु. पर्यंत खर्च करावा. काम पक्के करावे; मोजणीचा जाबता व इमारतीचा हिशेब तपशीलवार हुजूर कळवावा [ अप्र. कागद रु. नं. ९१ ९२ ]. सरकारी आज्ञेनुसार सदाशिव रघुनाथ याने खूबलढा बुरुजाचे, चितदरवाजानजिक पश्चिमेकडील बुरूजभागाचे सगळेच काम नवे केले. तळ चुन्यांत बांधला व वरच्या कामास चिखल वापरला. पाथरवट व मजूर मिळून ४१ माणसें खपत होतीं व २४८०।।-। रु. खर्च झाला [ अप्र. कागद रु. नं. ८६, ९२ ]. इ. स. १७९६ त नाना फडणिसाने रायगड दुरुस्त करून घेतला [ कुर्ांप्र. ३७५ ]. तेव्हा तटबंदीचे कामासाठी ६४०।।।≈।। रु. लागले [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. इ. स. १८०८-०९ मध्येही अंदाजपत्रकांत एक हजार रुपये खर्चाकडे दाखविले असून पुढील वर्षी नाणेदरवाजा दुरुस्त केला आहे [ अप्र. कागद रु. नं. ८०, ८४ ].

इ. स. १७७३-७४ त महादरवाजाची आगळ मोडली; ती बसविण्यास एक सुतार ५ दिवस काम करीत होता; त्याची मजुरी दहा आणे झाली. याच वर्षी राजवाड्याचा पश्चिमेकडील दरवाजा नवा बसविला. गंगासागराचा सच्छिद्र खडक पाझरू लागून तळे कोरडे पडूं लागले तेव्हा फटीतून लोखंड भरले व शिशाचा रस ओतून झिरपणे बंद केले. तसेच पहाऱ्याचीं घरे बांधिली [ अप्र. कागद रु. नं. ६, ७५, ८६ ].

मदारचौकीजवळ खडकांत अंधारी नावाची एक जागा होती. तिचे चुनेगची भिंताड नादुरुस्त झालें; ते नवे बांधण्यास १३।· रु. खर्च झाला [ अप्र. कागद रु. नं. ६; ८ ]. या जागेंत पावसाळ्यास लागणारे भात साठवून ठेवीत. जोरदार पावसामुळे कड्याची उपळ होऊन भात भिजू लागले; त्यासाठीं ताबडतोब

दुरुस्ती करणे जरूर होते. राजवाड्याचा सोपा जायबंदी झाला, त्याची डागडुजी केली [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. इ. स. १७७५–७६ त राजवाड्याची तात्पुरती डागडुजी १३०॥ रु. खर्चून केली [ अप्र. कागद रु. नं. ८ ]. इ. स. १७८८ मध्ये राजवाड्याचा उत्तरेकडील सोपा जुना झाला होता, त्यास नवे वासे घालून मोहटी बसविली; त्यास २६।।।०।। रु. लागले [ अप्र. कागद रु. नं. ८६ ]. १७८२–८३ मध्ये कुशावर्तावरील जीवरखी दुरुस्त केली व हत्तीमहालाची कोठी बांधण्यास लाकडे तोडवून गडावर आणली. बांधकाम अडीच महिने चालू होते. त्यासाठी तीन सुतार व दोन मजूर यांस ८७।~।।। रु. द्यावे लागले. इमारतीसाठी चुना, लोखंड वापरले, त्यास १४९।।~। रु. लागले. महत्त्वाचे बांधकाम इ. स. १७८३–८४ त झाले; त्यास ६०१०॥ रु. खर्च झाले. इ. स. १७८५–८६ त हत्तीमहालास चारही बाजूंनी पडव्या काढल्या; त्यांसाठी ७०८०= रु. खर्च झाला. एकूण, तीन वर्षांत हप्त्याहप्त्यांनी हत्तीमहालाचे काम पूर्ण झाले. बाणकोटच्या कोळ्यांकडून कालवे खरेदी करून भट्टी लावून चुना करविला व तो बांधकामास वापरला [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. इ. स. १७८६ ते ८८ या काळात राजांचा वाडा दुरुस्त केला. सुतार वेठीने आणले होते. दुरुस्तीस ६८।।॥। रु. खर्च झाले [ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

इ. स. १७८७ मध्ये रायगडवर मुसळधार पाऊस पडून महादरवाजावरील हौद रात्रीचे वेळी फुटला व पाण्याचा लोंढा दरवाजावरून वाहू लागला. दरवाजा उघडून पाण्यास वाट करून देणे अशक्य झाले. मोऱ्या ठेविल्या होत्या, त्या तुंबल्या व पाणी जाईना. तेव्हा शिर्काईस बोकड बळी देण्याचा नवस केला. थोड्या वेळाने मोऱ्यांतून पाणी जाऊ लागले व दरवाजा कोसळण्याचा प्रसंग टळला. इ. स. १७९७ मध्ये विवेकसभेची मोहटी नवीन घातली व इमारत दुरुस्त केली. इ. स. १८०९ मध्ये राजवाड्याची चौसोपी, बंगला व महादेवाच्या देवळाची दुरुस्ती केली [ अप्र. कागद रु. नं. ८४, ८६, ९२ ].

इ. स. १८११ मध्ये रायगडवर बरीच मोठी दुरुस्ती झाली आहे. राजवाड्याचे वासे व साठ कुजून वाडा नादुरुस्त झाला व हवालदाराचे घरही नादुरुस्त झाले. या कामासाठी १५ सुतार तीन महिने कामावर होते. प्रत्येक सुतारास दरमहा ८ रु. वेतन होते. रानांतून सागाची झाडे तोडून गडावर आणण्यास ३६ मजूर होते. इमारतीसाठी काथ्या, सुंभ, लोखंडी खिळे, पट्ट्या, कोयंडे वगैरे बरेच सामान लागले. दुरुस्तीचा खर्च १००५०=।। रु. झाला [ अप्र. कागद रु. नं. ८८ ]. पेशवेकालांत रायगडच्या दुरुस्तीसाठी किती खर्च होत असेल व गडावरील तटबंदी, इमारती

यांची डागडुजी कशी राखली जात असेल, याची कल्पना येण्यापुरते हे उल्लेख केले आहेत.

लिंगाणा किल्ला रायगडचा पूरक होता. त्याच्या दुरुस्ती-डागडुजीचे काम रायगडबरोबरच चालू असे. इ. स. १७७३ मध्ये लिंगाण्याच्या माचीस बांधलेली कोठी ३०८ रु. खर्च करुन दुरुस्त केली; पहाऱ्याचा बुरूज पर्जन्यकाली कोसळला; त्याची दुरुस्ती केली व दरवाजे नवे केले. दरवाजाजवळील टप्प्याचा बुरूज थोडा कोसळला होता तोही दुरुस्त केला. इ. स. १७७४ मध्ये लिंगाण्यावर एक नवा बुरूज बांधला. इ. स. १७७५ मध्ये पावसाळयांत लिंगाण्याच्या वाटेवर कडा कोसळून प्रचंड दगड वाटेवर येऊन पडला. तो फोडवून वाट मोकळी केली व बेगारी व पाथरवट यांचे मार्फतीने लिंगाण्याच्या हौदाजवळ बुरूज उभारण्याचे काम पुरे केले [अप्र. कागद रु. नं. ३ ; ८६, ८७, ७५, ८, ९१]. इ. स. १७७७ मध्ये लिंगाण्यावर राजबंदी ठेवण्यास नवी कोठी बांधली; किल्लयाचे माचीस धान्य ठेवण्यास नवे कोठार बांधले; दरवाजाखाली पहाऱ्याची जागा बांधली; किल्ल्यावर जाण्याची वाट दुरुस्त केली. इ. स. १७८० मध्ये किल्लयाची सदर मोडकळीस आली म्हणून नवी बांधली. इ. स. १७८५ मध्ये किल्लयाचे माचीस नवी कोठी ३२।॥ रु. खर्चून बांधली. इ. स. १७८६ मध्ये हणमंत बुरूज कोसळला; तो नव्याने बांधला [ अप्र. कागद रु. नं. ९१, ९२, ८३ ]. लिंगाणा किल्ला कैदी ठेवण्याचे ठिकाण होते.

पाचाड व वाडी ही रायगडच्या मार्गावरील नाक्याची ठिकाणें होत. वाडी येथे रायगडच्या धान्याच्या कोठारांशिवाय महत्त्वाच्या इमारती नव्हत्या. इ. स. १७७४ मध्ये वाडी येथे नवे कोठार बांधले. वाडी येथील जुना फड नादुरुस्त झाला होता; तो इ. स. १७८६ मध्ये ३८८।। रु. खर्चून नवा बांधला [ अप्र. कागद रु. नं. ६, ९१, ९२ ]. इ. स. १७७२ मध्ये पाचाड येथे विठ्ठल यशवंत खास-निवीस एक घर बांधीत होते. ते काम इ. स. १७७३ मध्ये गणपतराव कृष्ण कोल्हटकरांनी पूर्ण करून घेतले. त्याच्या वास्तुशांतीस ३५॥।॥· रु. खर्च लागला [ अप्र. कागद रु. नं. २, ८ ]. पाचाडचा कोट हाती आल्यावर कोटाचा हवाला पेशव्यांनी कंक याजकडे दिला [ ऐसंसा. खं. ४, ले. ६४ पृ. १०४ ]. पण पाचाडचे महत्त्व इ. स. १७७३ पासून नष्ट झाले.

रायगड, पाचाड व वाडी येथे दरसाल शाकारणी करून घेण्याचे काम जिकिरीचे पण महत्त्वाचे होते. राजवाड्यावर कौलें होती; बाकीच्या सर्व इमारती पेंढे, गवताने शाकारीत; सायलीच्या पानांचाही उपयोग करीत. इ. स. १७७३-७४ मध्ये राजवाड्यावर वीस हजार नवी कौलें घातली [ अप्र. कागद रु. नं. ७५ ]. इ.

स. १७८६-८७ मध्ये ३७८।।। रु. ची नवी कौले गडावरील इमारतीसाठी सदाशिव रघुनाथ गद्रे यांनी खरेदी केली [ अप्र. कागद रु. नं. ८३ ] इ. स. १८१३-१४ मध्ये १४७०० कौले राजवाड्यावर टाकण्यासाठी नवी खरेदी केली. कौलाचा दर ३।।। रुपयास हजार असा होता. कोने खरेदी केले; त्यांचा भाव १ रु. शेकडा होता. कौले नळीची अगर खपरेल असत. नातें येथील ४५ असामी व बिरवाडीचे दहा कुंभार दरसाल शाकारणीस यावयाचे, असा शिरस्ता होता. काम एक महिना नऊ दिवस चाले. शाकारणीपूर्वी शाकारजत्रा भरे.

शाकारासाठी ३८० रुपयाचे सायलीच्या पानांचे भारे व ताटया लागत. मल्हारनाक वाडकर याजकडे पानें खरेदीचे काम असे. ५७०० पानभारे व २९४०० जुडी गवत लागे. तें आणण्यास इ. स. १८१३-१४ मध्ये ३९। रु. खर्च आला. शिवाय, गडावर वेठीच्या गवताच्या जुडी गोळा होत, त्यांचा आकडा ५६२५ होता [ अप्र. कागद रु. नं. ८१ ]. इ. स. १७७९ व ८१ मध्ये रायगडचा शाकारणीचा खर्च ३७७ रु. इतका झाला; त्यावेळी किल्ले लिंगाण्याचा खर्च फक्त १।।। रु. आहे ! इ. स. १७८७ मध्ये शाकारणीचा खर्च फक्त १७२।।।≈।।। रु. झाला. इ. स. १८१४ मध्ये हा खर्च ४७७।।′ रु. झाला [ अप्र. कागद रु. नं. ८३, ८१, ९२ ].

पुढील गावांतून रायगडवर शाकारणीसाठी गवताच्या जुडी येत— १. आंबरलें २. पनालघर ३. खडकोली ४. वांघोवलें. ५. मांगरूण ६. भाणदरें ७. कविलवाहाळ. ८. हतलोली. ९, १०. पळसगाव खुर्द व बुद्रुक ११. ताम्हणें. प्रत्येक गावावर ५० जुड्यांची वेठ होती, ती गावचे महार आणीत. त्यांस प्रत्येकी दरवर्षी सवामण भात व चार आणे देण्याचा शिरस्ता होता. याच गावांतून रायगडवर जळणासाठी ओंडे पुरविले जात असत [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

किल्ले लिंगाण्यावरील शाकाराचीं ठिकाणें पुढीलप्रमाणे होतीं :-

१ श्रीजननीचे देवालय. २ सदर. ३ सरकारवाडा. ४ हवालदार याचे घर. ५ हणमंत बुरूज. ६ जिभीचा पहारा. ७ निगडीचा पहारा. [ अप्र. कागद रु. नं. ७८ ].

पहाऱ्याची व शाकाराची ठिकाणें— रायगड, पाचाड व वाडी.

| ठिकाण | पेंढे | गवत व जुडया |
|---|---|---|
| चौकी फडाची | ४०० | ३०० |
| कोठीनजीकचे मेट | १०० | २०० |
| चिते दरवाजा | ३०० | ५०० |
| कोठ्या फड वाडीच्या २ | ४५००० | ५५०० |

| | | |
|---|---|---|
| धोंडीचा पहारा | १२५ | ३०० |
| टपा चिते दरवाजा | १०० | ३०० |
| श्रीझोलाईचे देऊळ | ५०० | १००० |
| कारखानिसाचे घर | २००० | २००० |
| सरकारी घर ब्राह्मण वगैरेस रहावयास | ५०० | ३०० |
| चुन्याचे घर | — | — |
| आत्माराम बाबूरावचे घर | १००० | १००० |
| कोठी शेठ कोठीवाला | २०० | ० |
| गिर्दनवाई | १०४७५ | १३९९० |
| नागेबागांतील चौकी | ४०० | २०० |
| म्हशाचे मेट | १०० | ० |
| वाघदऱ्याखालील पहारा | १०० | ० |
| धारवीडचा पहारा | १०० | ० |
| राजहुडयाचे खिंडीतील पहारा | — | — |
| कळकीचा पहारा | १०० | ० |
| निवल्या पहारा | १०० | ० |
| कालकाईचे खिंडीतील पहारा | २०० | ० |
| आंब्याचा पहारा | १०० | ० |
| उंबरखीडचा पहारा | १०० | ० |
| गणेश पहारा | १२५ | २५० |
| जांभळीचा पहारा | १२५ | २५० |
| कोठी मदारच्या झड्यांस | ४०० | १५०० |
| सदर घळकी | १५० | ३०० |
| नाणेदरवाजा | १५०० | ३००० |
| टपा नाणेदरवाजा | १०० | २०० |
| खूबलढ्याचा बुरूज | ४०० | ७०० |
| सदर पाचाड | ४१०० | ५००० |
| देऊळ गणपति | १५० | ३०० |
| देऊळ सोमजाई | ४०० | ३०० |
| देऊळ हणमंताचे | १०० | २०० |
| चोखडीचे मेट | १०० | ० |

| | | |
|---|---|---|
| चाहुटीचे मेट | १०० | ० |
| जांभळीचे मेट | १२५ | ० |
| निसणीचे मेट | १०० | ० |
| सावताचे मेट | १०० | ० |
| आंब्याचे मेट | १०० | ० |
| तोफेचे मेट | १०० | ० |
| बांधणीच्या चौक्या यो २ | २५० | ० |
| नेरावच्या चौक्या यो २ | २०० | ० |
| चौकी कावला घाट | १०० | ० |

[ अप्र. कागद रु. नं. ७८ ].

ही यादी एवढ्याकरिता दिली की रायगडच्या परिसरांतील पहाऱ्याच्या व शाकाराच्या ठिकाणांचा अजमास समजावा. यांशिवाय रायगडच्या परिसरांतील आणखी पहाऱ्यांची ठिकाणे कागदोपत्री आढळतात ती– १ उंबराची सदर, २ नाडालीचा पहारा, ३ तळचा पहारा, ४ उडाणचा पहारा, ५ टोकाचा पहारा, ६ देवीचा पहारा, ७ माथ्यावरील सदरेचा पहारा, ८ बाराटाकीचा पहारा, ९ धामणदऱ्याचा पहारा, १० घोगीचा पहारा, ११ हेडलीचा पहारा, १२ कोंडिखळीचा पहारा, १३ नांदगिरीचा पहारा, ( हे दोन पहारे होते ). १४ केळीचा पहारा, १५ अगडबंब पहारा, १६ वळणाचा पहारा, १७ तटबंदी हिरकणीची सदर, १८ लिंगाचा पहारा, १९ टप्प्याचा पहारा, २० रंगवाडीचा पहारा, २१ चौबुर्जीचा पहारा, २२ गोलंदाजाचा पहारा, २३ चिलखताचा पहारा, २४ निवडुंगाचा पहारा, २५ टकमकीचा पहारा, २६ डुब्याचे मेट, इतकी यादी खुद्द रायगडच्या पहाऱ्यांची आहे [ अप्र कागद रु. नं. ८३ ]. पहाऱ्यांच्या ठिकाणी रात्री जागरूकता असे. रात्रीची गस्त राजवाड्याच्या सदरेपासून निघे, ती किल्ल्याच्या माथ्यावर फिरे. महादरवाज्यापासून तटबंदीभर एक गस्त जाई. कोंडेखळींतून एक गस्त निघे. गिर्दनवाईच्या घेऱ्यांतून एक गस्त सुरू होई. रात्री गस्तवाला सदरेपासून निघाला की बंदीवानाचे खबरदारीस जाई. पावसाळ्यांत या गस्तीस रोज वीस जुडी गवत लागे; उन्हाळ्यात पंधरा जुडी पुरत. गस्तीस वर्षाच्या एकंदर ४५०० गवताच्या जुडी लागत, त्यांची किंमत १०० रु. होई [ अप्र. कागद रु. नं. ८१, ८३, ९१ ].

इ. स. १८०५–०६ मध्ये मातुश्री यशोदाबाई पेशवे गडावर असल्याने हा जुडींचा खर्च वाढला. रात्रीच्या किती घटका झाल्या याची खबर देण्यासाठी गस्तवाल्याने नगारखान्यावरील घड्यालचीकडे यावयाचे व मग मातुश्रींकडे जावयाचे असा शिरस्ता होता [अप्र. कागद रु. नं. ७८]. पावसाळ्यांत गस्त घालणे मोठेच कष्टाचे असे,

किल्ला पोतनिसांकडे वहिवाटीस होता, तोपर्यंत गस्तवाल्यास दरसाल एक कांबळे देण्याचा रिवाज त्यांनी ठेवला. इ. स. १७७४ त कांबळे दिले नाही. पण अनुभवाने असे ठरले की दरसाल एका कांबळयाची जरूर आहे. मग तशी प्रथा चालू झाली. गस्त घालणाऱ्या २० माणसांस २० कांबळी लागत. दर रुपयास एक कांबळे मिळे. कांबळयांची वाटणी– १ कारकून निसबत मामलेदार, १ कारखानीस, १ राखणदार, ७ सदर बारगीर आसामी सात, ८ नौबती असामी आठ, २ दरवाजेकरी दोन, [अप्र. कागद रु. नं. ७९, ८१ ]. महादरवाज्यावर दोन बर्कंदाजांचा दिवसरात्र खडा पहारा असून त्यांच्या दोन्ही बंदुका सतत भरलेल्या असत. पण हवेने बंदुकांतील दारू सर्द होत असल्यामुळे दर आठवे दिवशी ते बार उडवून टाकीत. वर्षाचे असे ९६ बार फुकट जात; त्यांत पक्के वजन ८८५।६ इतकी दारू फुकट जाई व तेवढी हिशेबांत खर्ची पडे. दरमहा बीजेच्या चंद्रदर्शनास तोफेचा एक बार काढीत. दारूचा भाव इ. स. १८१३-१४ त आठ रु. मण होता. तोफांस बुचे म्हणून ताग वापरीत. लिंगाण्यावरूनही त्यावेळी तोफ डागली जाई [ अप्र. कागद रु. नं. ८१, ८६, ९१ ९२ ].

रायगडवरील तोफा व जेजाला गंजू नयेत, म्हणून त्याही मधून मधून उडवून पहात व नंतर कलाली दारूने धूत. कलाली दारूचा भाव १ रु. स मण असा सामान्यपणे असे. दोन मण दारू लागे. पावसाळयांत तोफांस डांबर लावीत. १७॥ रु. चे डांबर लागे. शिवाय तेल, चंद्रस लावीत; गडावरील जेजालांस तेल व मेण लावीत. इ. स. १८१३-१४ मध्ये रायगडवर पुढील तोफा होत्या — १ तोफ गंगासागर, २ तोफ मुलना, ३ तोफ पेरुजंगी, ४ तोफ भुजंग, ५ तोफ रामचंगी, ६ तोफ पद्मीण, ७ तोफ फतेलष्कर, ८ तोफ फतेजंग, ९ तोफ सुंदर, १० तोफ रेकम, ११ तोफ मुंगसी, १२ तोफ शिवप्रसाद, १३ तोफ गणेश, १४ तोफ लांडा कसाब, १५ तोफ चांदणी, १६ तोफ भवानी, १७ तोफ नागीण.

लिंगाण्यावर पर्जन्यकालीं दरवाजास मेण लावित; त्याचा खर्च १ रु. होई. तेथे पर्जन्यकालीं एक मनुष्य गस्त घाली. रायगडच्या महादरवाजास तेल व मेण लावीत. मेणाचा भाव १० रु. मण असे. अर्धा मण मेण लागे. तेलाचा भाव ५ रु. मण असता, ४॥ रु. चे तेल एका दरवाजास लागे [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

# २१ रायगडवरील कैदी

पेशव्यांना रायगडचा उपयोग झाला, तो उत्कृष्ट तुरुंग म्हणून. जगांत काही तुरुंगांना कीर्ति प्राप्त झाली आहे. इंग्लंडच्या इतिहासांत Tower of London किंवा फ्रान्सच्या इतिहासांत बॅस्टाइलच्या तुरुंगास जें महत्त्व, तेच रायगडास उत्तर-पेशवाईत प्राप्त झाले. या बंदीगृहांत ( १ ) राजबंदी ( २ ) दरवडेखोर ( ३ ) अनैतिक गुन्हे करणारे असे बंदी कैद भोगून सुटले अगर कायमचे मुक्त झाले.

पेशवाईंतील साडेतीन शहाण्यांतील प्रसिद्ध सखारामबापू याचे व नाना फडणिसाचे इ. स. १७७९ मध्ये बिनसले. बापूंचा राघोबादादाकडे कल दिसू लागला; म्हणून नाना, हरिपंत व महादजी यांनी एकदिल होऊन पुरंदरास सखारामबापूस कैद केले [ पुअ. भाग १ ला - पृ. १०२; कासंपया. पृ. ४७१ ]. ‘बाळाजीपंत पटवर्धन यांनी पाहिले की नानांच्या मनांत बापूंविषयी विशुद्ध भाव नाही.’ मग त्यांनी शिंद्यास ५।७ लाख रुपये आणि अशेरीचा किल्ला देऊन अनुकूल करून घेतले व बापूस कैद केले [ पुअ. भाग १ ला. पृ. २४७-२४८ ]. ‘सखारामबापूस कोशकीटकाप्रमाणे कैद झाल्यानंतर राहिलेल्या त्यांच्या स्नेह्यांची आब गेली; त्यांचा इतबार राहिला नाही. सखाराम भगवंत याजला श्रम बहुत आहेत. त्यांचे द्रव्य म्हातार-पणचे २० लक्ष साहुकारियांतून आणि घरांतून सोने व मोहरा ३० ( लाखांचे ) निघाले.’ त्यांचे सर्व धन सरकारजमा केले. प्रथम बापू सिंहगडावर कैदेत होते; नंतर त्यांस प्रतापगडावर एक वर्ष ठेविले. प्रतापगडावरून २० सफर रोजी ( इ. स. १७८१ ) ते रायगडावर येऊन पोहोचले. त्यावेळी रायगडावर बाळाजीपंत पटवर्धन यांचा शालक रघुनाथराव गद्रे अधिकारी होता. “ रायगडावर कैद केल्यास सत्वरच स्वर्गास मनुष्य जातो. स्वर्गाचा मार्ग ते स्थळ जाणून व सखारामपंतांनी कैदेत श्रम किती दिवस अनुभवावे, याकरिता रायगडावर कैदेत ठेविले. पायांत बेडी अहोरात्र व कोठिडीस कुलफ असे. सेवेस दोन माणसे. येक शूद्र आंधळा व बहिरा व येक ब्राह्मण मुका. सीतळोदकेकरून स्नान व भक्षावयास जखीऱ्याचे मोठे तांदूळ, याप्रमाणे सरं-

जाम नेमून दिधला होता. दिवसेदिवस क्षीण प्रकृति होती." हे वर्णन नाना फडणि-साच्या कोणातरी हितशत्रूने निजामाकडे लिहून धाडले असून ते अगदी विपर्यस्त व द्वेषमूलक आहे [ पेद. ३६ ले. ३८५; पुअ. भाग १ ला. पृ. २४७, २४८ ]. सखारामबापू तीन महिने वीस दिवस रायगडावर कैदेत होते. सखारामबापू खेळ्या म्हणजे महान् राजकारणी मनुष्य. त्यास शिधा उत्तम प्रतीचा द्यावा, म्हणून दर-बारच्या आज्ञा सुटल्या. त्यांच्याजवळ चाकरीस एक आचारी व बाहेरच्या कामा-साठी एक मराठा मनुष्य गडावर नेमण्यात आला [ अप्र. कागद रु. नं. ९१, ९२]. आचाऱ्यास मध्यम प्रतीचा शिधा देण्याची आज्ञा सुटली. बापूंस नेसण्यासाठी व पांघरण्यासाठी दोन धोतरजोडे दिल्याचा उल्लेख आढळतो. गडावर ४४१ गाडदी रखवालीस होते; नाकी पाहून आणखी पहारे बसविण्यात आले. टकमकीवर दोन पहारे, असननळीचा पहारा, रामदराचा पहारा, लक्षणदराचा पहारा, एडक्याचा पहारा, हिरकणीच्या टोकाचा पहारा, उंबराचा पहारा, म्हसोबाचे मेट, घोडधारेचा पहारा, किल्ल्यावर राजवाड्यांत एक पहारा, हवालदा-राचे घराभोवती पहारा, चौदिवाळीनजीक मिळून सहा पहारे, सात महालांपुढे पहारा, असे १९ पहारे नवे बसविले. बंदोबस्तासाठी नवीन २५६ लोक ठेविले. त्यांचा खर्च ६१८००॥ रु. झाला. हीं सर्व माणसें गडावरील आपाजीराव महामूनकर याच्या देख-रेखीखाली काम करीत होती [अप्र. कागद रु. नं. ८३]. इ. स. १७८१ जून ३० चे पत्रात पुढील मजकूर आहे— 'सखारामबापू यांचे पायांत बेडी आहे. रायरीचे किल्ल्यांत कैदेंत आहेत. त्या किल्ल्याची हवा फार वाईट. फार दिवस त्या किल्ल्यास मणुश राहिल्यास वाचत नाही. त्यास बापू बहुत श्रमी आहेत. पाय वगैरे सुजले आहेत. अवस्था कठीन यैसे वर्तमान आहे' [ पुअ. भाग १ ला पृ. १५३ ]. इ. स. १७८१ च्या श्रावण शु॥ १३ गुरुवार छ साबान ११ या दिवशी 'सखारामपंत परलोकास प्रस्थान करून, शरीरत्याग रायगडचे किल्यावर केला म्हणून वर्तमान आले' [ पुअ. भाग १ ला पृ. २४७, २४८, २४९ ]. अप्रसिद्ध कागदपत्रांतूनही हाच मृत्युदिन दिला आहे. ते व त्यांचेसाठी नेमलेले दोन नोकर यांचा या कालांतील नख्त खर्च ६७०॥ रु. झाला. सखारामबापूंस तूप, तेल, हिंग, जिरे, मिरी, हळद, तांदूळ बारीक, तांदूळ जाडे, तुरीची डाळ, मीठ, हरभऱ्याची डाळ, कापूस, आंबसोल, साखर, गूळ, सुंठ, काथा, तंबाखू या वस्तू पुरविल्याची यादी आहे [ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

बापू वारल्यावर त्यांच्या सर्व वस्तूंची यादी करण्यात आली. २ लेप; पैकी एक पश्मी बुटेदार, एक ब्राह्मणपुरी पिवळा, एक सफेद घोंगडी, एक गवाळे

घोंगडीचे, तांब्याच्या वस्तु तेरा, पितळेच्या वस्तु चार, स्फटिकाची १०६ मण्याची माळ, रुद्राक्षांच्या माळा १०१ मण्यांच्या ८, संबळ वेताची, सोन्याचे मढीव टोपण असलेला शंख, शाळिग्राम, नर्मदी बाण, नर्मदी गणपति, सूर्यकांत, सुवर्णमुखी चक्रामित सोन्याचे मढीव सांखळीसुद्धा, रुप्याचा १६।।। तोळे वजनाचा संपुट, शालजोड्यांची गोधडी इत्यादि [ अप्र. कागद रु. नं. ९१, समापेरो. भाग १ कलम २९८, पृ. २५५ ]. ही दिलेली यादी संपूर्ण नव्हे. बापूंच्या सर्व वस्तू गोविंद विश्वनाथ नावाच्या कारकुनाबरोबर पुण्यास रवाना झाल्या व बापूंच्या घरी पोहोचल्या करून राघो सदाशिव याने पावती घेतली आहे [ समापेरो. भाग १, कलम २९८, पृ. २५५ ]. स्थानबद्ध करून ठेवणारास पेशवाईत कसे वागवीत, याचा नमुना म्हणून ही बापूंची हकीकत पहाण्यासारखी आहे. बापूंच्या बंदोबस्तासाठी १३ माणसे नेमली होती; त्यासाठी ४६२८ रु. खर्च पडला आहे. पेशव्यांचे हिशेबतपासनीस किती जागरुक असत, याचे एक गमक सखारामबापूंबद्दलच आढळून आले; ते असे. जयराम कृष्ण यांनी प्रतापगडाहून बापूंस रायगडावर पाठविले, त्यावेळी त्यांच्या पायांत बेडी होती. प्रतापगडच्या यादीत ही बेडी रायगडकडे दाखविण्यात आली; पण रायगडकऱ्याने ती आपल्या यादीत जमा दाखविली नव्हती. हिशेबतपासनिसाने तो फरक दाखविला! रुजुवात करून एक लोखंडी बेडी रायगडकडे जमेस मांडण्यात आली [ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

बापूंप्रमाणे दुसरा मुत्सद्दी मोरोबादादा फडणीस, यासही रायगडवर ठेवण्याचे दोन वेळा घाटत होते; प्रथम इ. स. १७८१ च्या सप्टेंबरमध्ये [ पुअ. भाग २ रा पृ. ११ ] व नंतर इ. स. १७९७ मध्ये त्यांस रायगडावर ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे भरपूर उल्लेख साधनग्रंथांतून आले आहेत. "गद्रे, बजाबा शिराळेकर नगरास मोरोबादादास आणण्यास गेले. मोरोबादादांनी सांगितले की मला रायगडावर नेऊ नये. तेथे पूर्वी सखारामबापू बोकील यांनी कैलासवास केला. तेथे जबरदस्तीने नेऊ लागलात, तर प्राणत्याग करीन. मग जानवें तोडून, भगवी वस्त्रें परिधान करून त्वरित् संन्यासहि घेतला." एवढे झाल्यामुळे नाना फडणिसाने मोरोबास रायगडावर ठेवण्याचा बेत रहित केला [ ऐलेसं. भाग १० ले. ४००३, ४०३२, ४०४६ ].

( २ ) नारायणराव पेशव्याच्या वधानंतर राघोबादादांनी पेशवाईची वस्त्रें मिळवण्याचा प्रयत्न चालविला. त्यांचा एक हस्तक निंबाजी विठ्ठल कारकून साताऱ्यास पत्रें घेऊन रवाना झाला होता; त्यास नाना फडणिसाने पकडले व पक्क्या बंदोबस्ताने, पायांत बेडी घालून, रायगडावर इ. स. १७७४ एप्रील १८ रोजी पुण्याहून पाठविले.

त्यास ब्राह्मणशिरस्त्याप्रमाणे शेर देण्याची व्यवस्था करून ठेविला होता. सप्टेंबर २ पर्यंत तो रायगडवर होता [ अप्र. कागद रु. नं. ५, ७५, ८६, ९१; समापेरो. भाग १, कलम १२४ पृ. १२५ ].

( ३ ) सदाशिव धोंडदेव नातु राघोबादादांच्या पक्षातील एक मनुष्य इ. स. १७७४ एप्रिल २ रोजी रायगडावर कैदेत ठेविला होता. त्यास मध्यम प्रतीचा शिधा देत. त्याचा ३२〃 रु. रायगडच्या हिशेबांत खर्च पडला आहे. हा गृहस्थ व त्याचेबरोबर एक पोर्गा असे दोघे एक महिना २७ दिवस रायगडावर कैदेत होते. [ अप्र. कागद रु. नं. ५, ७५, ७९, ८६, ९१, ९२ ].

( ४ ) नारायणराव पेशव्याच्या वधाच्या कटाचा पुढारी शिवाजी कान्हो खळदकर याची बायको, सून, कुणबीण व एक ब्राह्मण अशा चौघांची इ. स. १७७४ मार्च १८ रोजी रायगडवर रवानगी केली. पैकी तीन ब्राह्मण माणसांस मध्यमप्रतीचा शिधा व कुणबिणीस डाळ, पीठ इ. शिधा पुण्याहून मंजूर झाला. या माणसांनी कळविले की आम्हास रायगडची डोंगरी हवा मानवत नाही. त्यावर पुण्याहून मामलेदारास सूचना मिळाली की, त्यांनी तक्रार केली की महाडच्या कोर्टात, तक्रार संपली की रायगडवर अशी त्यांची थारेपालट करून बंदोबस्ताने ठेवावे. ही चार माणसे अनेक महिने रायगडावर कैदेत होती [ अप्र. कागद रु. नं. ५, ७५, ८६ ].

( ५ ) इ. स. १७७४ मध्ये राघोबादादाचा बारभाईनी पाठलाग केला. त्यांत दादाकडील सदाशिव रामचंद्र, काणे, शिंडे, आबाजी महादेव नातु इ. माणसे मुलांमाणसांसह बारभाईच्या हाती लागली. सदाशिव रामचन्द्र यांची माणसे व कुणबिणी मिळून बारा जणांची रायगडवर पक्क्या बंदोबस्तांत रवानगी झाली. त्यांची दोन गुरेही रायगडावर ‘ कैदेत ’ होती ! या माणसांप्रीत्यर्थ २१६〃॥ रु. खर्च रायगडच्या हिशेबांत दाखविला आहे. ही माणसे परत पाठवून दिली; तेव्हा दोन पालख्या, बरोबर सरकारचे प्यादे अशा सरंजामासह धाडून देण्यांत आले [ अप्र. कागद रु. नं. ७९, ८६, ९२; पेद. ३५ ले. ६५, १८०; पेद. ३६ ले. ७६ अ. ].

( ६ ) इ. स. १७७९ च्या ऑगस्टमध्ये राघोबादादास जाऊन मिळण्याच्या विचारात असलेल्या बापूजी जनार्दन यास बारभाईनी कैद केले. पुण्यास लोक जमा करून बखेडा माजवावयाचा प्रयत्न त्याने चालविला, असा त्याजवर आरोप होता. हा मनुष्य ९ महिने एक दिवस रायगडावर पक्कया बंदोबस्तात होता; पायांत बेड्या घालून ठेविले होते [अप्र. कागद रु. नं. ९२; समापेरो. भाग १, कलम १५८, पृ. १४४ ].

( ७ ) इ. स. १७८० मध्ये राघोबादादाच्या वतीने काही मंडळींनी फितूर चालवेला होता; त्यांतील वासुदेव भट कर्वे कैद झाले. ३ फेब्रु. १७८१ रोजी वासु-

देवभट कर्वे रायगडावर कैदेंत मृत्यू पावले; ते आठ महिने नऊ दिवस कैदेत होते [ अप्र. कागद रु. नं. ९२; पुअ. भाग १, पृ. २४७-२४८ ]. बाळ दीक्षित हेही रायगडावर कैदेंत मृत्यू पावल्याची हकीकत पुणे अखबारच्या पहिल्या भागांत आली आहे.

( ८ ) वेंकाजी लक्ष्मण नगरकर राजकारणाचा बखेडा करीत असल्याचे स्पष्ट झाल्यावरून इ. स. १७९२ मध्ये रायगडावर काही दिवस कैदेंत होता. [ अप्र. कागद रु. नं. ९१ ].

( ९ ) इ. स. १७८०-८१ मध्ये सखाराम घोंडदेव रायगडावर अटकेंत होता.

( १० ) इ. स. १७८१-८२ मध्ये जंजिऱ्याच्या शिद्दीचा मोड करण्याकरिता रायगडवरून मराठी सैन्याची एक टोळी नांदवी पुरारपर्यंत चाल करून गेली. पुरार येथे मराठी सैन्याने नवलनाक बिन फकीरनाक या माणसास पकडले व काही दिवस रायगडावर कैदेंत ठेविले. नांदवी येथील जंजीरकरांच्या हवालदाराच्या भावाबरोबर हा निरपराध मनुष्य पकडला गेला. बारा गांवच्या लोकांनी तो अपराधी नसल्याचे सांगितल्यावरून त्याची ४० रु. खंड घेऊन सुटका केली.

( ११ ) इ. स. १७८८ मध्ये जंजीरकरांपैकी तीन माणसें रायगडावर कैदेंत होती; त्यांपैकी दोघे नांदवीपुरारच्या शिद्दीच्या हवालदाराचे भाऊ होते. सुटकेच्या वेळी त्यांस वस्त्रें देऊन त्यांची रवानगी केली [ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

( १२ ) सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत शिद्दी बाळूमिया यास सचीन संस्थान देऊन जंजिरा संस्थान आपल्या ताब्यांत घेण्याचे राजकारण शिजत होते. त्यावेळी बाळूमियाचा भाऊ छोटेमिया, शिद्दी इसुफ व त्याचे बरोबरची सात मिळून नऊ माणसे रायगडावर अटकेंत ठेविली होती. त्यांची गडावर चांगली बरदास्त ठेविली होती [ समापेरो. भाग १, कलम ३७४ पृ. ३१७; ऐसंसा. खं. ६ वा - पृ. ७५-७६; अप्र. कागद रु. नं. ९१ ].

( १३ ) सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर चिमाजीआप्पास बळजबरीने दत्तक देऊन त्यास पेशवेपद द्यावे असे राजकारण परशरामभाऊ पटवर्धन याने घडवून आणले. या प्रकरणांत बहिरो रघुनाथ मेहेंदळे याचा हात होता; म्हणून बाजीराव पेशव्याने त्यास इ. स. १७९६ त पकडून त्याची रायगडावर रवानगी केली. तेथे बहिरोपंत मेहेंदळे मरण पावले ( इ. स. १७९७ ऑगस्ट २० ). त्यांच्या अस्थी त्यांचे भाऊ अन्याबा मेहेंदळे याजकडे धाडण्यांत आल्या [ अप्र. कागद रु. नं. ९१; ऐसंसा. भाग १० पत्र नं. ४०५९; पूना रे. कॉ. खं. ६ पत्र २० ].

( १४ ) इ. स. १७७५-७६ मध्ये प्रभजोशी व त्याची बायको अशा दोघांस रायगडावर दीडदोन वर्षे कैदेत ठेविले होते. त्यांच्या धोतरजोडा, लुगडी इत्यादि वस्त्रांचा खर्च रायगडच्या हिशेबी दाखल झाला आहे.

( १५ ) इ. स. १७८० मध्ये अंबादास किशोरदास यास रायगडावर आठ महिने सत्तावीस दिवस अटकेत ठेविले होते [ अप्र. कागद रु. नं. ७९, ९१, ९२ ].

( १६ ) इ. स. १७७८-७९ मध्ये शिद्दीकडील जी माणसे रायगडखोऱ्यांत चोऱ्या करून उपद्रव देत होती, त्यांतील एक चोरटा रायगडावर बंदीत होता. त्यास पावसाळ्यांत, सरकारी खर्चाने एक कांबळे घेऊन दिल्याचा उल्लेख आहे. कांबळ्याची किंमत बारा आणे हिशेबी दाखल आहे [ अप्र. कागद रु. नं. ८३ ].

( १७ ) सदाशिव विश्वनाथ कोल्हटकर हा राजबंदी इ. स. १७७८ च्या मार्चमध्ये तोतयाप्रकरणी रायगडावर होता. हा सौ. पार्वतीबाई पेशव्यांच्या बंधूंपैकी असावा. खर्चवेच भरून घेऊन सुटका होण्यासाठी त्याची मार्च २६ रोजी रायगडावरून पुण्यास रवानगी झाली [ अप्र. कागद रु. नं. ९१ ].

( १८ ) राघोबादादाच्या अनुयायांपैकी मल्हारी गात व त्याची बायको यांचीही काही काल, इ. स. १७७४-७५ मध्ये रायगडावर रवानगी झाली होती [ पेद. ५ ले. ७१ ].

( १९ ) इ. स. १७७२-७३ मध्ये आपाजी हरि यांनी रायगड व त्याच्या परिसरांत जी स्वारी केली, त्यावेळी विठोजी लांबी कोळी जुन्नरकर हा रायगडकऱ्यांस मदत करीत असलेला मनुष्य पकडून रायगडावरच आपाजी हरीने चार महिने कैदेत ठेविला होता. याच प्रकरणी भिकाजी चव्हाण कोळी रायगडवर दहा महिने कैद अनुभवीत होता. रायगडवरील बातमी कळावी म्हणून पोतनिसांमार्फतीची माणसें रायगडच्या परिसरात हिंडत. त्यांतील कोंडा महाद कोळी भीमाशंकरकर हा रायगडवर शृंखलाबद्ध स्थितींत बराच काल होता. पुण्याहून पत्रे घेऊन आलेले रायगडकऱ्यांचे सहाय्यक गोविंदराव शिंदे व सूर्याजीराव शिंदे रायगडावरील पाहुणचार अनुभवीत बराच काळ राहिले. त्यांचे मदतनीस गुणाजी कळमकर व मोरे यांसही तीच शिक्षा अनुभवावी लागली. या लढाईत पकडलेले अबदल्ला ढालाईत, खंडोजी म्हसके, बाबाजी चव्हाण यांनाही युद्ध पूर्ण होईपर्यंत गडावर कैदी म्हणून रहावे लागले. हे युद्धांतील बंदी होत. चिमी शिंदी नावाची एक बाई इ. स. १७७२-७३ च्या कालांत रायगडवर सश्रम कारावास अनुभवीत होती. तिला दारू वाटण्याचे काम देण्यात आले होते [ अप्र. कागद रु. नं. २]

(२०) बाबूराव साळेकर व सुरबाराव बुरूणकर असे दोन कैदी पक्कया बंदोबस्तांत रायगडावर कैदेत होते. इ. स. १७९८ मध्ये गोपाळशेट सोनार गुहागरकर नावाचा खुनाचा आरोपी रायगडवर शिक्षा भोगीत होता. न्यायनिवाडा होऊन त्याचा उजवा हात तोडण्याची शिक्षा झाली; ती अमलांत आणल्यावर त्यास सोडून देण्यात आले. तसेच इ. स. १७८१–८२ मध्ये रायाजी उतरेकर नावाचा कैदी बराच काळ रायगडावर अटकेत होता.

(२१) इ. स. १७८२ मध्ये वेंक्या महार टोळी करून दरवडे घालीत होता. त्यास पकडून अटकेत ठेविला असताहि तो पळून गेला. त्याचे साथीदार बोद्या वल्द बिसनाक महार, चिमा महार, चतरा महार यांस रायगडवर बंदोबस्ताने ठेविले होते. त्यांना धरून आणताना ठोकलेल्या बेड्या रायगडच्या कोठीकडे हिशेबी जमा आहेत [ अप्र. कागद रु. नं. ९१, ९२ ].

(२२) इ. स १७९७ च्या नोव्हेंबरमध्ये चिंतो रामचंद्र लिमये, बाळाजी विष्णु, जयरामपंत जोशी ही नाना फडणिसांच्या पक्षांतील तीन माणसे रायगडवर कैदेत ठेवण्यासाठी रवाना झाली. चिंतोपंताची मातुश्री नुकतीच वारली होती; हे त्यास कळू न देता त्याची उचलबांगडी झाली होती [ ऐलेसं. भा. १० ले. ४१०३, ४१०४ ].

इ. स. १७७३ ते इ. स. १८०० पर्यंत किल्ले लिंगाण्यावरही अनेक कैदी ठेवीत. त्यांच्या याद्या व माहिती उपलब्ध असून ती जरूर तेवढ्याच प्रमाणांत येथे सादर करतो.

(१) इ. स. १७७५–७६ मध्ये गोपाळशेट सोनार यास लिंगाण्यावर कैदेत ठेविले त्याचेसाठी ।१॥१।~ इतके भात भोजनार्थ खर्च झाले.

(२) इ. स. १७८३ मध्ये मानसिंग खलाटे यास लिंगाण्यावर अटकेत ठेविले. त्याने काशी पत्नारीण नावाच्या स्त्रीचा पति बाणाजी बंडगर याचा वध करून तिला आपल्या घरात घालण्याचा गुन्हा केला होता. मातबर मनुष्य असल्यामुळे त्याच्या तैनातीस सरकारी खर्चाने एक मनुष्य दरमहा ४॥ रु. वेतन देऊन ठेविला होता.

(३) इ. स. १७७९ ते १७८१ इतका दीर्घकालपर्यंत मोरोबादादाचे पक्षपाती गणेशभट परांजपे लिंगाण्यावर कैदेत होते. त्यांस मध्यम प्रतीचा शिधा दिला जाई. जामीन घेऊन नानांनी त्याची मुक्तता केली [ अप्र. कागद रु. नं. ९१, ९२ ].

(४) इ. स. १७८५ मध्ये मोरोजी नाईक संकपाळ हा रायगडवरील एक नोकर चाकरीत चुकला; त्यास सुमारे सवादोन महिने लिंगाण्यावर कैदेत पडावे लागले [ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

(५) मेस्तर जमा फरासिसीण नावाची बाई लिंगाण्यावर मोठया बंदोबस्तात कैदेत होती. तिने प्रचलित सरकारचा इ. स. १७९२ मध्ये काही अपराध केला होता [ अप्र. कागद रु. नं. ९१; समापेरो. भाग २ रा कलम ५५५ पृ. ८६ ]. ठकी कोंढूर-करीण नावाची एक बाई सुमारे पावणेदहा महिने, इ.स. १७९५-९६ मध्ये, लिंगाण्यावर कैदेत होती. इ. स. १७९८ मध्ये आनंदराव रामचंद्र अभ्यंकर लिंगाण्यावर अटकेत होता [ अप्र. कागद रु. नं. ९१ ].

रायगडवरील कैदी गंभीर स्वरूपाचे बंदी असून लिंगाण्यावरील कैदी बरेच सामान्य आहेत. रायगडवरील कैद्यांत राजकारणी मुत्सद्दी, युद्धात हाती आलेले बंदी, दरवडेखोर व गंभीर स्वरूपाचे गुन्हे अगर मनुष्यवध करणारे गुन्हेगार होते. रायगडच्या तुरुंगाची नमुनेदार व्यवस्था होती. कैद्यांस कपडे दरसाल सरकारांतून मिळत. प्रकृतिमानं अगर समाजातील दर्जा पाहून त्यांना अन्नोदक मिळे. सखाराम-बापूंसारख्या कैद्यांसाठी नोकरचाकर पुरविले जात व त्यांचा खर्च सरकार करी. कैद्यास एका ठिकाणावरून दुसरीकडे नेताना जरूर तर घोडेही सरकारांतून पुरवीत. उदाहरणार्थ, बापूजी जनार्दन यास रायगडवर कैदेत ठेवण्यासाठी रवाना केले, तेव्हा सरकारी पागेतून घोडे बसावयास दिले. गणेशभट परांजपे यास लिंगाण्यावर नेताना पागेतील घोडे बसावयास दिले होते. रायगड तालुक्याची घोड्यांची "पागा" बहुधा ४।५ घोड्याचीच असावी ! तींतील दोन घोडीं फडणिसांचे निसबतीस व मामलेदारांचे निसबतीस एक घोडें असे. इ. स. १७७९ मध्ये तर फक्त तीनच घोडीं होतीं. घोड्यांस उडदाची चंदी देत [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. कैद्यांना, गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणे साधी कैद अगर सश्रम करावास अनुभवावा लागे.

कैद्यांस मुदतीच्या शिक्षा झालेल्या दिसत नाहीत. विशेष प्रसंगी कैद्यांची शिक्षा रद्द होई. उदाहरणार्थ, पुरंदरावर सवाई माधवरावाचा जन्म झाल्यामुळे मराठी राज्यात जो आनंदीआनंद झाला, त्याप्रीत्यर्थ बरेच कैदी सुटले. रायगडावर काय झाले, हे समजावे म्हणून पुढील मजकूर पहा—

'मातुश्री गंगाबाई यांसी पुत्र जाहाला म्हणौन साकर वाटणे व किल्ल्याची सरबत्ती करणे म्हणौन सरकारच्या सनदा व पत्रें गेलीं. सबब साखर व सरबत्ती खर्च-साखर चिनी वजन कचे ८३, दरमणी ५॥ प्रमाणे १६॥ रुपये. सरकारचे पत्र घेऊन गेले आसामी २, त्यांस १॥ रु. पुरंदराहून सौ. मातुश्री पार्वतीबाईकडून पत्रें घेऊन गेले आसामी १, त्यास ३ रु गणपतराव याची कैरे पत्रें घेऊन गेलै आसामी ३, त्यांस ७॥ॐ येकूण २८॥ॐ रु.'

'पुरंदरावर गंगाबाईस पुत्र झाला. त्या आनंदाप्रीत्यर्थ रायगडावर जे बंदीवान आहेत, त्यांपैकी दादासाहेब यांजकडील प्रकरणीचे असतील व नवीन असतील ते तर सोडावयाचे नाहीत. दुसरे जे कोणी पूर्वी घातले असतील, त्यांतील थोर अन्यायाचे असतील ते अटकेत ठेवून थोडक्या अन्यायाचे असतील ते सोडून द्यावे,' म्हणून पार्वतीबाईचे सनद धाडली [ अप्र. कागद रु. नं. ५,७५,७१; समोपेरो. भाग १ ला, कलम ८४ पृ. ७४ ].

गडावरील लोकांस धर्मपरिपाल्नास मोकळीक होती. सखारामबापूसारख्या मनुष्यास लागणारा तंबाखु पुरवल्याचे दिसते. गुरेंढोरे कैद केल्याचा प्रकार दिलाच आहे. कैद्यांस माणुसकीने वागविण्याची प्रवृत्ति पेशवे सरकारबद्दल होती.

फितुरी बंदीवानांस रायगडवर चौकशी होईपर्यंत ठेऊन गुन्हेगार ठरल्यामुळे तोफेच्या तोंडी दिल्याचे उल्लेख आहेत. इ. स. १८०८ मे ४ या दिवशी बुळाजी पानवेकर व भिवजी चांदळेकर यांस नऊ दिवसांच्या कैदेनंतर रायगडवर तोफेच्या तोंडी दिले [ अप्र. कागद रु. नं. ८४ ]. पेशवेकालांत फांशीची शिक्षा फारशी प्रचारांत नसावी.

# ११ रायगडवरील शिबंदी व तिचें कामकाज

इ. स. १७७३ मध्ये पेशव्यांनी रायगड आपल्या ताब्यांत घेतला व संरक्षणासाठी लोक ठेवले. पेशव्यांनी गणपतराव कृष्ण ताळुके रायगड यास सनद धाडली की 'जास्ती लोक ठेविले ते दूर करणे' [ समापेरो. भाग १ कलम २ पृ. २, ३ ]. या वर्षी रायगडवर एकूण ६०० लोकांची शिबंदी होती [ समापेरो. भा. २ पृ. २००-२०१ ]. पुढे एक तक्ता देतो; त्यायोगे रायगडवरील सालोसालची शिबंदी किती ते कळेल.

| इ. सन | रायगड | पाचाड | लिंगाणा |
|---|---|---|---|
| १७७४-७५ | ६०० | — | — |
| १७७५-७६ | ५५० | १०५ | ६१ |
| १७७८-७९ | २९६ | — | — |
| १७८०-८१ | ४ | — | ७३ |
| १७८३-८४ | ५५४ | | ४२ |
| १७९५-९६ | ११४ | — | — |
| १८०८-०९ | ४७६ | — | ६ |
| १८१०-११ | ६३३ | — | — |
| १८१३-१४ | २०० | — | — |

[ अप्र. कागद रु. नं. ८१, ८४, ९१, ७९, ८६, ८३, ९२, ८७ ].

इतक्या शिबंदीस सरकार काय काम देत होते याचा विचार येथे करावयाचा आहे.

इ. स. १७७४-७५, मध्ये रायगडावरील २५० लोक साष्टी येथे व १५० लोक ताळुके मुल्हेर येथे नौकरीस रवाना झाले. पेशवाईत एका ठिकाणची शिबंदी दुसरीकडे नौकरीस धाडीत; पण तिच्या खर्च शिबंदीच्या मूळ ठिकाणी खर्ची पडे. जेव्हा एखादा राजकारणी प्रसंग निर्माण होई, तेव्हा शिबंदी धाडण्याचा प्रकार आवश्यक असे.

शिबंदी शेतसनदी असे. त्यांना आपली शेते लावण्यास सुटी मिळे. दरवेळी सामान्य-पणे १०० माणसांस शेतकामासाठी रजा मिळे व ते लोक परत आले की दुसरी १०० जणांची टोळी रजेवर जाई. त्यांस वेठबेगार व सादिलवारपट्टी माफ होती. नौकरी हा महत्त्वाचा व्यवसाय; पण त्यांना हंगामी शेतीचा जोडधंदा अस-ल्यामुळे शिबंदीस लोक मिळणे अवघड पडत नसे [ समापेरो. भा. २ क. ६९३ पृ. २००-२०१ ]. इ. स. १७७६-७७ मध्ये रायगडची मामलत गणपतराव कृष्ण यांजकडून काढून रघुनाथ सदाशिव गद्रे यांस सांगितली, तेव्हा त्यांनी रायगडवर आपल्या वर्गाची नवी शिबंदी ठेविली व जुनीस रजा दिली [ अप्र. कागद रु. नं. ८६ ]. इ. स. १७८० च्या एप्रिलमध्ये रायगडवरील १०० लोक उंदे-रीच्या शिबंदीस मदत करण्यास रवाना झाले [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. बाणकोट घेण्यासाठी इ. स. १७७५ मध्ये महाडची १०० माणसे मोरो बापुजी फडके यांकडे धाडली [ अप्र. कागद रु. नं. ६ ]. इ. स. १७८३ च्या जुलैमध्ये इंग्रजांच्या बंदोबस्ता-साठी ९६ रायगडकरी विजयदुर्ग तालुक्यांत धाडले [ समापेरो. भा. २ क. ६८३ पृ. १९० ]. इ. स. १७९८-९९ मध्ये किल्ले बहिरवगड ता अंजनवेल येथे शाम-लाच्या पारिपत्यासाठी रायगडवरील ५० लोक धाडले व आनंदराव राम याचे मद-तीस १०० लोक साष्टीस धाडले [ अप्र. कागद रु. नं. ९१ ].

इ. स. १७९० च्या ऑगस्टमध्ये कर्नाटकांतील मसलतीसाठी रायगडवरून १०० चांगले बर्कंदाज कर्नाटकात रवाना झाले [ समापेरो. भा. १ क. ३१ पृ. २४ ]. पुण्यास दरसाल श्रावण महिन्यात रमणा भरे, तेव्हा व्यवस्थेसाठी शिबंदीची जरूरी भासे. इ. स. १७९२ मध्ये रायगडचे ६३ आसामी बंदोबस्तासाठी रवाना झाले. काम संपल्यावर प्रत्येकास २ आणे पोस्त मिळे [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. इ. स १७९५ मध्ये याच कामासाठी रायगडचे २०० लोक पुण्यास रवाना झाले. इ. स. १७९८, १७९९, १८०० या तीन वर्षी रांगेने, श्रावणमासात रायगडची २०० ते २५० इतकी शिबंदी पुण्यास रवाना झाली. उलट, इ. स. १८०८ ते ०९ मध्ये रेवदंडचे १०० व उंदेरीचे ९८ लोक रायगडवर, जरूर जाणून नौकरीस आणले [ अप्र. कागद रु. नं. ९१, ८१ ].

इ. स. १७७३ ते १८०५ या काळात रायगडच्या शिबंदीस लढण्याचे व रखवालीचे काम अनेकदा करावे लागले. पेशव्यांस राघोबादादाच्या अनुयायांचा बंदोबस्त, शिद्दीच्या चोरहल्ल्यांचा प्रतिकार, तोतयाचे उच्चाटन, इंग्रजांच्या घातुक हालचालीस पायबंद घालणे, प्रतिनिधीचे दंगधोपे थांबविणे या गोष्टी रायगड तालुक्यात, या ३२ वर्षांत कराव्या लागल्या.

( १ ) इ. स. १७७४ च्या एप्रिलमध्ये रायगडच्या शिबंदीस कांगोरी ऊर्फ मंगलगडवर स्वारी करावी लागली. रायगडवर ५२१ लोकांची शिबंदी होती; तींत स्वारीच्या निमित्ताने ५० लोकांची भर घातली. शिवाय, आपाजी हरीने वसई, साष्टी, राजपुरी, अवचितगड या तालुक्यांतून सैन्याची भरती केली [ अप्र. कागद रु. नं. ७९ ]. स्वारीचे कारण असे की तर्फ बिरवाडी येथील निमे अंमल रायगडचा व निमे अंमल प्रतिनिधीचा होता. कांगोरी ऊर्फ मंगलगड किल्ला प्रतिनिधींच्या ताब्यांत असून तर्फ बिरवाडीचे उत्पन्न या किल्ल्याच्या सरंजामाकडे लावून दिले होते. या वर्षी पेशव्यांनी प्रतिनिधींचा अंमल जप्त केल्यामुळे कांगोरकर रागावले व त्यांनी मुलुखात दंगा करून रायगडवर चाकरी करणाऱ्यांचे कबिले धरून नेले व रायगडच्या परिसरांत उपद्रव चालू ठेवला. यावेळी बारभाईंतर्फे सखारामबापू हा प्रमुख कारभारी असल्यामुळे त्याने कळविले की ' कांगोरकर गैरवाजवी दंगा करीत आहेत; त्यांचे पारिपत्य करावे. ' कांगोरकरांतर्फे चिमणाजी कृष्ण याने दंग्यांत पुढाकार घेतला होता व आपाजी हरीच्या स्वारीचा रोख मुख्यतः त्याचेवर होता. लढाईसाठी रायगडवरून सैन्याबरोबर तीन जेजाला नेल्या होत्या. कांगोरकरांशी दोनतीन चकमकी झडल्या व हा दंगा मिटला. यांत पेशव्यांना ४४९॥।~॥ रु. स्वारीचा खर्च सोसावा लागला. कोकणच्या सरसुभ्यावरील अधिकाऱ्यानेही या स्वारीसाठी शिबंदी रवाना केली होती [ अप्र. कागद रु. नं. ७५, ८६, ९१ ].

इ. स. १७७४-७५ मध्ये राघोबादादा इंग्रजांच्या बळावर पेशवेपद मिळवू पहात होता. सगळीकडून रान उठवून बारभाईंस हतबुद्ध करण्यासाठी इंग्रजांनी आपला दोस्त शिद्दी यासही उठविले. शिद्दी व इंग्रज यांनी रायगडच्या परिसरांत उपद्रव देण्याचा मनसुबा ठरविला. तेव्हा मोरो बापुजी फडके याने रायगडच्या व बाणकोटच्या खाडीच्या संरक्षणासाठी बाणकोटचा किल्ला आपल्या ताब्यात घेण्याचा बेत आखला. इ. स. १७५६ च्या इंग्रज-पेशवे तहाने महाडजवळच्या दासगाव, बाणकोट, कुंबळे इत्यादि ५।६ गावांवर, म्हणजेच पर्यायाने बाणकोट खाडीवर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली होती. बाणकोटखाडी हे रायगडचे नाक आहे. जोवर पेशवे व इंग्रज यांचा सलोखा, तोवरच रायगड सुरक्षित अशी परिस्थिति होती. फडक्यांनी यावेळी दोन गोष्टी करण्याचे योजिले. ( १ ) इंग्रजांचे बाणकोटच्या खाडीतील गाव जप्त करणे व ( २ ) बाणकोट येथील हिंमतगडचा किल्ला ताब्यांत घेऊन खाडीवरचा त्यांचा अंमल नष्ट करून रायगड व त्याचा परिसर इंग्रज व शिद्दीपासून सुरक्षित करणे. बाराभाईंनी २७ डिसें. १७७४ रोजी रायगड तालुक्याच्या अधिकाऱ्यांना कळविले की फडक्यांच्या मदतीस रायगडपैकी १०० चांगले बरकंदाज

मर्द घालेत व दासगाव जप्त करावे [ अप्र. कागद रु. नं. ९१, ६; समापेरो. भाग २. क. ४४० पृ. १७ ]. मोरो बापुजी फडके हा हरिपंत फडक्यांचा जवळचा नातलग असून तालुके सुवर्णदुर्गचा मामलेदार होता. त्याला बारभाईंनी ९ मार्च १७७५ रोजी कळविले की तुम्ही इंग्रजांचे बाणकोटकडील गावांची जप्ती कलीत, गाफील असलेली इंग्रजांची माणसे कैद केलीत, एक इंग्लिश कॅप्टन धरलात हे फार उत्तम केलेत. गावांचा वसूल होणारा ऐवज तुम्ही खर्च करा व बाणकोट घ्या. रायगड तालुक्याचा अधिकारी गणपतराव कृष्ण ( कोल्हटकर ) यास त्यांनी लिहिले की 'मुंबईकर इंग्रजाने सरकारच्या तहात अंतर करून गैरराहा गोष्ट केली आहे. तालुक्यातील जे लोक मुंबई, बाणकोट, सुरत वगैरे जागी इंग्रजांकडे चाकरीस गेले असतील, त्यांच्या घरांची मालमत्तेसह जप्ती करा. त्यांच्या माणसांस निकड लावून ते नौकऱ्या सोडून घरी परततील असे करा ' [ समापेरो. भाग २, क. ४४३ पृ. १८ ].

शिद्दीचे लोक खाडीतून दासगाव, बाणकोट येथे जमा झाले. तेव्हा, रायगडचा नीट बंदोबस्त झाला पाहिजे; म्हणून भरतीसाठी पुण्याहून लोक रवाना केले. या शिबंदीबरोबर महादाजी बल्लाळ कारकून शिलेदार यास धाडले. त्यास रायगडच्या लोकांची हजेरी घेणे, तटबंदीचे रक्षण करणे, शिल्लक तपासणे, जरूर त्या वस्तू खरेदी करणे, तोफा लावून त्यांचे शेजारी गोळे ठेवणे इत्यादि अनेक गोष्टी करण्याचा आदेश देण्यात आला. त्याचेबरोबर काम करण्यास गणेश विश्वनाथ नावाचा एक मनुष्य देण्यात आला. अशा तऱ्हेने इ. स. १७७५ मध्ये रायगडच्या शिबंदीस सतत संरक्षणात्मक काम करावे लागले [ अप्र. कागद रु. नं. ७, ९१; समापेरो. भाग २ क. ४४८ पृ. २२–२३ ].

इ. स. १७७६ च्या आक्टोबरमध्ये बारभाईस बातमी आली की वरंधा घाटाखाली तोतयाचे सुमारे दीड हजार माणूस जमले असून रायरेश्वराच्या डोंगरावर येऊन राहाणार. तेव्हा घाटांचा बंदोबस्त ठेऊन किल्ल्याचा बंदोबस्त करण्याची नवी गरज उत्पन्न झाली [ न. चिं. केळकर–भाइसंमं. अहवाल शके १८३४ पृ. ११५ ]. रायगडच्या आसपास तोतयाने फार मोठ्या प्रमाणांत फितूर केला. रायगडावरील एक चाकर गंगाजी धिंडले तोतयास अनुकूल झाला. मोहोपरे, बिरवाडी, दादली, महाड, नाते, कोंढवी इत्यादि अनेक गावीं शेकडो लोक तोतयास मिळाले. त्यामुळे रायगडच्या बंदोबस्तासाठी हुजुरून आणखी शिबंदीची रवानगी झाली. तोतयाचे बंड एवढे वाढले की तो किडीचा तक्षक होणार असे दिसून येताच, पेशव्यांनी तुकोजी होळकरास सैन्यासह रायगड तालुक्यात धाडले. पोलादपूर येथील

रघुनाथ रंगाजी देशपांडे यांनी व तुकोजीने बंदोबस्त केला; त्यामुळे तोतयाचे बळ रायगड तालुक्यात पूर्णपणे मोडले. इ. स. १७७५–७६ त तोतयास वश झालेल्या लोकांकडून खंडणी वसूल करण्यास प्रारंभ होऊन एकाच वर्षात २०९५३। रु. वसुली झाली. यावेळी रायगडचे सैन्य व पेशव्यांचे सैन्य यांनी रायगड तालुक्याचा बंदोबस्त चांगला राखला. मराठ्यांचे सैन्य कोठेही गेले, तरी लुटालूट करण्याचा व प्रजेस उपद्रव देण्याचा त्याचा शिरस्ता यावेळी रायगडच्या परिसरांत चांगला भोवला. त्याने उभी पिकें लुटली व तुडविली. त्यामुळे पहाणी करून सूट देण्याची व्यवस्था मुलकी अधिकाऱ्यांस करावी लागली [ अप्र. कागद रु. नं. ७९, ८३, ९१ ].

इ. स. १७७५–७६ मध्ये कांगोरी येथे चोरट्यांचा उपद्रव झाला; त्यांचा बंदोबस्त रायगडच्या शिबंदीने केला. साष्टी येथे इंग्रज हल्ला करणार, हे जाणून रायगडची काही शिबंदी साष्टीस धाडली. याच वर्षी कोळ्यांचा दंगा मोडण्यास सरसुभेदार विसाजी केशव याने रायगडच्या शिबंदीचा उपयोग केला; असे रायगडच्या जमाखर्चावरून दिसते; त्यांबाबत ५ हजार रुपये खर्ची पडले आहेत [ अप्र. कागद रु. नं. ९१ ].

शामल जंजीरकर याच्या बंदोबस्ताचे काम रायगडच्या शिबंदीस पडले नाही, असे बहुधा एकही वर्ष नसेल ! इ. स. १७७७–७८ मध्ये शामलाचा दंगा रायगड तालुक्यात झाला; काही गावची रयत परागंदा झाली व वरपट्टीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात तुटले [ अप्र. कागद रु. नं. ८३ ]. इ. स. १७७९ मध्ये शामलाने रायगड तालुक्यांत दंगे आरंभिले. त्याचा बंदोबस्त करण्याचे काम रघुनाथ सदाशिव याने केले. दंगा रायगडपासून ५।६ कोसांवर चालू होता; तो मोडण्यास रायगडच्या शिबंदीस मदत म्हणून मंगलगडचे लोक आणावे लागले. इ. स. १७७९–८० मध्ये शामलाचे दंग्यास तोंड देण्यासाठी २०० लोक रायगड तालुक्यात जास्त ठेविले व खुद्द रायगडवर १००. लोकांचा भरणा केला. दारुगोळा ८०० रु. चा नवा खरेदी केला [ समापेरो. भाग १ क. ३६२ पृ. ३११; अप्र. कागद रु. नं. ७९, ८३ ]. आदल्या वर्षीही २४० रुपयांची दारू, २६० रु. च्या गोळ्या व ३०० रु. इतर जिनसासाठी खर्च झालाच होता ! या तीन वर्षांच्या दंग्यात शामलाने रयतेची घरे जाळली. त्यातच, गणपतराव कृष्ण सुभेदार याने लोकांस अरब दाखवून शिबंदीच्या जोरावर मक्ते वसूल केल्याने रयत परागंदा झाली. सरकारी चाकरही नौकरी सोडून जाऊ लागले. ही गोष्ट कारभाऱ्यांच्या कानावर गेल्यामुळे पहाणीदार येऊन मुलुखाची पहाणी झाली [ अप्र. कागद रु. नं. ७९ ]. इ. स. १७८१–८२ मध्ये मंगलगडकरी

यांशी बिरवाडीकडील वसुलीवरून पुन्हा एकदा वाद व चकमक झाली. या वर्षी नाण-कोटच्या खाडीने शामलाकडील अनेक चोरटे महाप्रळ येथे आले. त्यांच्या व राय-गडकरी यांच्या चकमकी झाल्या महाप्रळ येथे पराभूत झालेला जंजीरकर बिरवाडीस वेढून बसल्यामुळे १२५ रायगडकरी यांनी गावोगाव जाऊन त्यांचा बंदोबस्त केला. [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. या वर्षापासून शामलाने ब्राह्मण धरून नेण्याचे धोरण आरंभिल्याने रायगड तालुक्याच्या अधिकाऱ्यास जास्त कडक धोरण स्वीकारावे लागले. त्याने शिद्दीच्या नांदवी–पुरार या ठाण्यास जाऊन तेथील हवालदार व त्याचे भाऊ पकडून आणले. बंदुका असलेल्या शिबंदीने भरपूर मारगिरी केली व शिद्दीचे हल्ले २।३ वर्षे बंद पाडले [ अप्र. कागद रु. नं. ८६ ]. इ. स. १७८६ ते १७८८ या काळांत शामलाकडील चोरट्यांचा पुन्हा उपद्रव सुरू झाला. त्यामुळे रायगडच्या शिबंदीस स्वारीशिकारीचे काम करावे लागले [ अप्र. कागद रु. नं. ८३, ८६ ]. इ. स. १७९२ च्या जूनमध्ये शामलाचा दंगा पुन्हा रायगडखोऱ्यात झाल्यामुळे ४० माणसे नवीन ठेवली [ समापेरो. भाग १ क. ३७५ पृ. ३१८; अप्र. कागद रु. नं. ९१ ]. इ. स. १७९६ च्या मार्चमध्ये रायगड तालु-क्यात शामलाचा पुनः दंगा झाला. तेव्हा प्रथम १२५ व नंतर आणखी २०० माणसे शिबंदीत भरती केली व रायगडवर दोन नव्या गरनाळा व ५०० गोळे यांची तर्तूद केली [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. इ. स. १७९८–९९ मध्येही शिद्दीची दंगल रायगडपासून ५।६ कोसांवर चालू होती. त्यामुळे नवीन १०० लोकांची गडावर आणि तालुक्यांत बंदोबस्तासाठी भरती केली [ अप्र. कागद रु. ८६, ९१ ]. इ. स. १८०१–०२ मध्येही चोर, दरवडेखोर व शामल यांचा उपद्रव रायगड तालुक्यास होत होता. त्यांच्या बंदोबस्तासाठी खंडेराव नीलकंठ नि।। सरसुभा प्रांत कोकण यास पेशव्यांनी आज्ञा केली. खंडेराव रास्ते यांनी १८०२ च्या एप्रिलमध्ये हबशाचा पराभव करून त्याच्या पाच तोफा पाडाव करून आणल्या; पण उपद्रव कमी न होता वाढला ! [ अप्र. कागद रु. नं. ९१; ऐलेसं. भा. १३ ले. ६३३१ ]. याच कालांत बाजीराव रायगड–महाड येथे आला व वसईस इंग्रजांकडे गेला [ पेद. ४४ पृ. ५३ ].

इ. स. १८०४ च्या नोव्हेंबरमध्ये परशराम त्र्यंबक प्रतिनिधीने कोकणात उतरून दंगा करण्याचे ठरविले. हा दंगा मोडण्याची कामगिरी बाळाजी राम मामले-दार तालुके रत्नागिरी याजवर सोपविली होती; त्यास मदत करण्याची आज्ञा पेशव्यांनी नारो गोविंद मामलेदार तालुके रायगड यास केली [ दुआपेरो. पृ. ७२, ७३ ] व रायगडच्या शिबंदीस काम पडले. तसेच, इ. स. १८०५ च्या डिसेंबरमध्ये इंग्रजांच्या मुलुखात राहून शिद्दीकडील चोरटे मौजे दासगावकडून रायगड तालुक्यांत येऊन

उपद्रव देऊ लागले. या चोरट्यांनी घरे लुटलीं; अडचणीच्या जागीं गाठून गावकऱ्यांना लुटले, वाण्यांच्या गाड्या लुटल्या, माणसांची तोडातोड चालविली. रायगडच्या शिबंदीने त्यांस पकडले. आरोप शाबीत झाल्यावर त्यांस डोकी मारण्याची शिक्षा देण्यात आली [ अप्र. कागद रु. नं. ७८ ].

या सर्व हकीकतींवरून रायगडवरील शिबंदीचे कामकाज वाचकांच्या ध्यानांत येईल. किल्ला हे राजकीय सत्तेचे आश्रयस्थान व गाव हे लोकांचे निवासस्थान. लोकांचे संरक्षण किल्ल्याने करावयाचे. या दृष्टीने, इ. स. १८१८ पर्यंत रायगड तालुक्यांतील प्रजेचे रक्षण रायगडवरील शिबंदी करीत होती; हेच तिचे मुख्य कामकाज !

# २३ रायगडची व्यवस्था व आयव्यय

ज्यास आपण महाड तालुका म्हणतो, त्यास मराठी अमलांत रायगड तालुका म्हणत. या तालुक्यात पेशवेकाळात जे मामलतदार होते, त्यांच्या कारकीर्दीचा काळ नावनिशीसह पुढे देतो—

| काळ | अधिकारी ( मामलेदार ) |
|---|---|
| इ. स. १७७३ ते ७६ | गणपतराव कृष्ण ( कोल्हटकर ) [ अप्रकारुनं. ८१, ८६, ८७, ९१; ऐसंसा. खं. ४ ले. ६१ पृ. १०१ ]. |
| इ. स. १७७७ ते ८५ | रघुनाथ सदाशिव गद्रे [ अप्रकारुनं. ७६, ७९, ८०, ८१, ८३, ८६, ९२ ]. |
| इ. स. १७८५ ते ९८ | सदाशिव रघुनाथ गद्रे [ अप्रकारुनं. ८०, ८१, ८३, ८६, ९१, ९२ ]. |
| इ. स. १७९८ | बाळोजी कुंजीर [ अप्रकारुनं. ८६, ९१ ]. |
| इ. स. १७९८ ते १७९९ जून | बाळाजी रघुनाथ [ अप्रकारुनं. ८०, ८६, ८७, ९१ ]. |
| इ. स. १७९९ जुलैपासून पुढे | गोपाळ बल्लाळ [ अप्रकारुनं. ८७ ]. |
| इ. स. १८०२ जून | बाळाजी माणकेश्वर निा कुंजीर [ऐलेसं. भा. १४ ले. ६३९३; राखं. १० पृ. ४७० ले. ६३४ ]. |

| | |
|---|---|
| इ. स. १८०३ ते १८०४ | नारो गोविंद (आवटी) [ अप्रकारुनं. ८१, ८७, ९१ ]. |
| इ. स. १८०५ | रामचंद्र भिकाजी [ अप्रकारुनं. ८१ ]. |
| इ. स. १८०५ | मकाजी जाधव [ अप्रकारुनं. ७८ ]. |
| इ. स. १८०६ ते १८०९ | नारो गोविंद ( आवटी ) [ अप्रकारुनं. ७८, ८०, ८१, ८४ ]. |
| इ. स. १८१० ते १८१४ | परशराम केशव ( ओक ) [ अप्रकारुनं. ८०, ८८; डुबापेरो. पृ. २६७–६८ ]. |
| इ. स. १८१५ सप्टेंबर | नारो गोविंद ( आवटी ) [ शादवे. प. ८३ पृ. १५२ ]. |
| इ. स. १८१५ ते १८१६ | मकाजी जाधव [ अप्रकारुनं. ८५ ]. |
| इ. स. १८१६ ते १८१७ | रामचंद्र भिकाजी [ अप्रकारुनं. ८१; ऐसंसाखं. ५ पृ. ६१ ]. |

ही यादी कालोल्लेखाचे दृष्टीने ढोबळ आहे. मामलतदार हा लष्करी अधिकारी नव्हे. तो बहुधा महाडास राही. पण रायगड, लिंगाणा व कोट महाड यांवर त्याचा अधिकार चाले. वसुलीचे व तज्जन्य व्यवस्था ठेवण्याचे काम प्रामुख्याने त्याचे होते. त्याची नेमणूक पेशवा करी व नेमणुकीची पत्रे रायगड, लिंगाणा व महाड येथे रवाना होत. या पत्रांच्या थोडे तपशिलात शिरू. इ. स. १७७७ फेब्रुवारी ११ या दिवशी पेशव्यांनी रायगडची मामलत रघुनाथ सदाशिव गद्रे यांस सांगितली आणि माजी मामलेदार गणपतराव कृष्ण कोल्हटकर यांस कळविले की ' तुम्ही त्यांस रायगड, लिंगाणा, कोट महाड यांचा संपूर्ण ताबा द्यावा व आपले लोक गडावरून उतरून न्यावेत ' [ अप्र. कागद रु. नं. ८६ ]. इ. स. १७८५ एप्रिल ९ या दिवशी पेशव्यांनी कळविले की तालुके रायगडचे मामलेदार रघुनाथ सदाशिव गद्रे मृत्यू पावले; सबब त्यांचे पुत्र सदाशिव रघुनाथ यांस सालमजकुरी मामलत सांगितली. त्यांस रुजू होऊन अंमल सुरळीत चालू देणे [ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

मामलेदाराची नेमणूक सनदेने होई. कारभार सांगताना त्यास वस्त्रे देत. इ. स. १७८६ एप्रिल ७ या दिवशी रायगड तालुक्याचा कारभार सागतांना सदाशिव रघुनाथ यास वस्त्रे दिली—

५१ रु. तिवट १, १४५ रु. शेला जाफरखानी १ — एकूण १९६ रु. या वस्त्रांसाठीं खर्च झाला [अप्र. कागद रु. नं. ९२]. इ. स. १७९८ मार्च १८ रोजी सदाशिव

रघुनाथ गद्रे याजकडील मामलत काढून बाळोजी कुंजीर यास दिली; तेव्हा सदरेस वस्त्रें दिली ती– ६० रु. तिवट पौ १;१२१ रु. जाफरखानी शेला १ – एकूण १८१ रु. खर्च झाला [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. मामलत नेमून दिल्यावर त्यास हुजूरपागेकडील घोडें देत. घोड्याची चंदी, रतीब, वैरण यांच्या खर्चाची व्यवस्था सरकारांतून होत असे. त्यास नौकर व पोरगे यांची तैनात नेमून देत [ ऐसंसाखं. ५, पृ. ६१ ].

मामलतदार मोठ्या पगाराचा अधिकारी असे. रघुनाथ सदाशिव गद्रे मामलतदार यास साल्िना ६ हजार रुपये तैनात होती. नारो गोविंद आवटी यास वार्षिक वेतन ३४०० रु असून त्यास अफ्तागिरीचा मान होता. या मानाप्रीत्यर्थ सरकारातून ५२।।ॅ रु. चा खर्च साल्िना होई. त्याजबरोबर सरकारी शागीर्द पोरगे तीन असत; त्यांचा १६५ रु. वार्षिक पगार होता.

मामलेदाराच्या हातखालच्या दुय्यम अधिकाऱ्यास दिवाण म्हणत. नारो गोविंद आवटी याचे वेळी त्रिंबक आत्याजी दिवाणगिरीवर होता. त्यास साल्िना वेतन ५५० रु. होते. इ. स. १८०१ मध्ये त्याचे जागी हरि पुरुषोत्तम यास त्याच वेतनावर दिवाण नेमले. इ. स. १७९५-९६ मध्ये रायगडचा मजमदार विनायक हरि असून त्याचे वार्षिक वेतन ३०० रु. होते. पेशवेकालात अधिकाऱ्यांचे वेतन वार्षिक ठरविण्यात येई. रायगडावरील चिटणीस विठ्ठल विश्वनाथ यास ३५० रु. वेतन होते. फडणीस शिवाजी बल्लाळ असून त्यास २५० रु. व निळो गणेश हशमनीस याचे वेतन २९५ रु. होते [ अप्र. कागद. रु. नं. ९१,९२ ].

इ. स. १७७३ मध्ये आपाजी हरीच्या सैन्यांत हंसाजी खैरा नावाचा एक कर्तबगार मनुष्य होता. तो खिजमतगार म्हणून त्याचे आरंभीचे वेतन दरमहा ८ रु. होते. पण त्यास रायगडची हवालदारी सांगितल्यावर त्याची वेतनश्रेणी एकदम बदलली. तो इ. स. १७७५ त रायगडावर मरण पावला; त्याचे जागी हणमंतराव साळवी याची नेमणूक झाली [ अप्र. कागद. रु. नं. ९१ ]. त्याची नेमणूक नक्त ४०६ रु. असे. पैकी ३०० रुपये त्याचे स्वतःचे वेतन असून ६० रु. पोरगा व दिवट्या यांचे वेतन होते. अफ्तागिऱ्याचे वेतन ४० रु. होते व दिवटीच्या मानाबद्दल ६ रु. वार्षिक मिळत. शिवाय, मोईन म्हणून त्यास १६१ रु. मिळत. हणमंतराव हा रायगडचा अनेक वर्षे हवालदार होता. इ. स. १७८५-८६ मध्ये यशवंतराव मोरे एक वर्ष हवालदार म्हणून काम करताना दिसतो. मोरे याचे वेतन नक्त १२६।ॅ रु. व मुशाहिरा ४२८।ॅ रु. आहे. इ. स. १७८७ ऑगस्ट २९ या दिवशी रायगडच्या हवालदारीचे काम पुन्हा हणमंतरावास देण्यात आले. त्यावेळी ९ रु. तिवट १, व ४० रु.

जाफरखानी शेला १, अशी ४९ रु. किंमतीची वस्त्रे त्यास रायगडच्या जामदारखान्यातून दिल्याची नोद आहे [ अप्र. कागद रु. नं. ७९ ८३, ९२ ]. रायगडचा सबनीस हा एक महत्त्वाचा अधिकारी आहे. आपाजी हरि रायगडचा पहिला सबनीस होय. त्याचे वार्षिक वेतन ४५० रु. होते. याच वर्षी रायगडच्या कारखानिसांचा फडणीस म्हणून आवजी शंकर काम करी. त्याचे वेतन २०० रु. होते [ अप्र. कागद रु. नं. ५ ].

रायगडवरील सर्व अधिकारी मंडळींच्या वेतनाची कल्पना येण्याचे दृष्टीने व त्यांचे हुद्दे समजण्याचे दृष्टीने इ. स. १७८१-८२ मधला तक्ता येथे सादर करितो

| | | |
|---|---|---|
| भिकाजी नारायण कारकून नि॥ मामलेदार | ३८३ | रुपये |
| आपाजी हरि सबनीस–वतीने बाबाजी राम भिडे यांचे पुतणे | ४५० | ,, |
| मोरो रामचंद्र फडणिशीकडील आ॥२ | ३३३ | ,, |
| आनंदराव परशराम कारखानीस | ३३५०≡ | ,, |
| रावजी नीलकंठ दप्तरदार सबनिसीकडील | ११६०≡ | ,, |
| बाळाजी कृष्ण | ८९।= | ,, |
| पांडुरंग बावजी | ११६०≡ | ,, |
| धोंडो गणेश | ९८।– | ,, |
| महादजी हरि दप्तरदार कोठीकडील | १०० ॰ | ,, |
| रामचंद्र गोपाळ गिर्दनवाई | ८९।– | ,, |
| कृष्णाजी बलाल फडणीस नि॥ कारखानिशी | १७८॥। | ,, |
| गडावरील हशम ( पायदळ ) असामी एकूण वेतन | २७८३१॥ | ,, |
| जदीद ( नवे ) लोक सखाराम भगवंत यांसी किलेमारी प्रतापगडाहून ठेवावयासी सालगु॥ पाठविले. त्यांचे बंदोबस्तास लोक ठेवले, त्यांचे वेतन | ७६१२॥। | ,, |
| बंदोबस्तास लोक ठेविले त्यांचा आकार | ४९७॥≡ | ,, |
| | ३८२३१। रु. एकूण | |

या तक्त्यामध्ये रायगडचा पगारापोटी झालेला एक वर्षाचा रोख खर्च तेवढा दिला आहे.

गडावरील गोलंदाज, [illegible]काले इत्यादि कामगारांचे पगार समजण्यासाठी आणखी एक तक्ता देतो; तो याच सुमाराचा ( इ. स. १७८२–८३ ) आहे.

**बाजे हाशम ( पायदळ ) नख्त रुपये.**

| | | |
|---|---|---|
| शेख शाबुदीन गोलंदाज. | ८४ | रु. |
| शेख अमद गोलंदाज. | ८० | ,, |
| सेख याकुब गोलंदाज. | ५३।- | ,, |
| परमोल रेकद गोलंदाज. | १४९ | ,, |
| कासीसेठ खातु कोठीवाला. | ४८ | ,, |
| येससेठ पाथरा कोठीवाला. | ४८ | ,, |
| अबदल करीम भालदार. | ४८ | ,, |
| शेख अमद दिवटया. | २८ | ,, |
| बापुजी गुरव तख्तपुजारी. | ४८ | ,, |
| खंडशेट पोतदार. | ३६ | ,, |
| नंदोजी धनवडा नोबती. | ६० | ,, |
| | ६८२।- | रु. एकूण |

हा आकडा पूर्वीच्याच वर्षीच्या खर्चाच्या आकड्यात मिळविण्यास हरकत नाही; कारण ही गडावरची कायम असलेली माणसे मागील यादीत नाहीत [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. १७८२-८३ चा रायगडचा एकूण वेतनखर्च ३४४७३।. रु. आहे. इ. स. १७८३-८४ मधील खर्च-

| | | |
|---|---|---|
| किल्ले रायगड असामी ५७६ ( ऐन ५५४ +पोर्गे २२ ) | ३१२२६।. | रु. |
| किल्ले लिंगाणा असामी ४२ | २०८४८-॥ | ,, |
| कसबे पाचाड असामी ३५ | २०७१॥।≤ | ,, |
| (सुभ्याचे ठिकाण) महाड असामी १५५ (ऐन १५३ व पोर्गे २) | ९२१५॥≡। | ,, |
| | ४४९९७॥।≡॥। | ,, |

[ अप्र. कागद रु. नं. ९२ ].

सारांश, तालुके रायगडचा शेकडा ७० इतका खर्च एकट्या रायगडवर होई.

रायगडप्रमाणे लिंगाण्यावरील अधिकारी व शिबंदीच्या खर्चाचा विचार केला पाहिजे. इ. स. १७८१-८२ मधील नोकर व त्यांचे वेतन पुढीलप्रमाणे होते-

| | | |
|---|---|---|
| रंभाजी दौंडकर हवालदार | १५० | रु. |
| गोपाळ मोरेश्वर सबनीस | १५० | रु. |
| हशम असामीपैकी ऐन ४८ व पोर्गा १ एकूण ४९ | २५३३ | रु. |
| वार्षिक खर्च किरकोळ | २३८≈ | रु. |
| लिंगाण्यावर नवी सदर बांधिली तिचा खर्च | १२॥ | रु. |
| | २८६८॥≈ | रु. एकूण |

[ अप्र. कागद रु. नं. ७९, ९२ ].

पेशव्यांनी इ. स. १७७३ मध्ये लिंगाणा आपल्या ताब्यात घेतला, तेव्हा देवजी गोपाळ यास १५० रु. वेतन ठरवून तेथील सबनिशी सांगितली. कोल्हटकरांच्या कारकीर्दीत ती चालली; पण पुढे खंड पडला. त्याने केलेला अर्ज लक्षांत घेऊन त्याचे १५० रु. वेतन पुन्हा चालू झाले. बाळकृष्ण पांडुरंग हे हवालदार होते. त्यांच्या मृत्यूनंतर हबाजीराव राणे इ. स. १७९५ मध्ये हवालदार म्हणून काम करीत होते [ अप्र. कागद रु. नं. ९२,८६ ]. इ. स. १८१३-१४ मध्ये लिंगाण्याचा नख्त खर्च ३१५०॥ रु. झाला. सरकारी कारकून लिहिण्याचे काम करी. त्यास दिवटीस तेल सरकारी खर्चाने मिळे. तेथे एक हशम माणूस नेमलेला असे; त्याचे वेतन ५५ रु. होते [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

गोलंदाज व शिबंदीचे लोक गडावर रहात. पण काही अधिकारी गडावर रहात नसत. रायगडचा सबनीस आपाजी हरि किंवा त्याचा प्रतिनिधी पाचाडास राही. रायगडचा फडणीस मोरो रामचंद्र व कारखानिशीकडील फडणीस कृष्णाजी बल्लाळ हे पाचाडास रहात. भिकाजी नारायण कारकून निसबत मामलेदार व बाबाजी सावंत देसाई दिमत सरदार हे रायगडावर रहात. रायगडचा कारखानीस वाडी येथे राही; कारण रायगडचे अठरा कारखाने वाडी येथे असत [ अप्र. कागद रु. नं. ८३ ]. जामदारखान्याचा अधिकारी रायगडावर राही. हवालदार रायगडावरच रहात असे. एखाद्या माणसास रजेवर जावयाचे असल्यास त्याने आपला जवळचा नातलग बदली द्यावयाचा व अर्ज करावयाचा असा रिवाज होता इ. स १७७९ ऑक्टो. २१ या दिवशी हवालदार हणमंतराव साळवी लग्नाकरिता रजेवर गेला; त्याने आपला भाऊ उमाजीराव यास बदली दिला. बदलीस सरकारी परवानगी मिळे [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. बदलीबाबत, इ. स. १७८७-८८ मधला सरकारी नियम असा होता की कारकुनाने स्वतः किंवा भाऊ, पुतण्या, चुलता यांनी काम करावयास हरकत नाही; अन्य कोणी बदली देऊ नये. दरखदाराने स्वतः चाकरी करावी [ अप्र. कागद रु. नं. ८६ ].

पाचाड येथे सरकारी घर असे. तेथे चौकीस नेहमी लोक ठेवीत. तेथे दिव्याचा बारमाही खर्च सरकारांतून होई. कोट पाचाड येथील इ. स. १७८१-८२ चा खर्च—

| | |
|---|---|
| १२५८≈ | आबाजी रामचंद्र कारकून असामी १ |
| १९३८॥। | हशम असामी ३६ पैकी ऐन ३५ व १ पोरगा. |
| २०६३॥।≈ | रु. एकूण खर्च [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. |

यावरून पाचाड येथील शिबंदी व सरकारी नोकरांच्या संख्येचा अंदाज लागतो. इ. स. १७९५-९६ मधील खर्चाचे पुढील आकडे पहा.

| | |
|---|---|
| किल्ले रायगड | ४१७९५८ रु. |
| कोट पाचाड | १२५८ रु. |
| किल्ले लिंगाणा | ३४२०८ रु. |
| | ४५३४०॥ रु. एकूण |

[ अप्र. कागद रु. नं. ९१ ].

निरनिराळ्या काळांत रायगड, लिंगाण्यावर निरनिराळे हवालदार व अधिकारी होऊन गेले आहेत; काही उल्लेख पुढे देतो.

इ. स. १७७३-७४ मध्ये बालोजी बिन धोंडजी ढमढेरे हा सरनौबत म्हणून रायगडवर काम करीत होता. इ. स. १८०८-०९ मध्ये भगवंतराव कुंजीर रायगडचा हवालदार होता. इ. स. १७९५-९६ मध्येही तोच रायगडवर असल्याचे उल्लेख आहेत. इ. स. १७९८-९९ मध्ये त्या कामावर बालोजी नाईक दिवेकर नेमलेला होता इ. स. १८०१-०२ मध्ये आपाजीराव माणकर हा सरदार हवाल्याच्या कामावर होता [ अप्र. कागद रु. ७९, ८०, ८१, ९१ ].

लिंगाण्यावरील काही अधिकारी पहा— इ. स. १७७३-७४ मध्ये संताजी बिन नागोजी शेलार हा सरनौबत होता. इ. स. १७८०-८१ मध्ये येसजी नाईक चांदळेकर हवालदार असून गणोजी नाईक सरनौबत होता. महादाजी निळाजी व रामाजी नारायण हे सबनिशीच्या जागेवर होते. इ. स. १७८६-८७ मध्ये रंभाजी दौंड हवालदार असून त्याचे हातून कामात काही चूक झाल्यामुळे त्याला कैद करून बाळकृष्ण पांडुरंग याची त्याचे जागी नेमणूक करण्यात आली. या नव्या हवालदारास सालिना मोईन रु. १०० व दिवटीस तेलाची नेमणूक होती. इ. स. १८०८-०९ मध्ये दौलतराव कुंजीर हवालदार होता [ अप्र. कागद रु. नं. ७९, ८०, ८३ ].

इ. स. १७५५ मध्ये नानासाहेब पेशव्याने किल्ल्यांवरील व्यवस्थेबद्दल नियम घालून दिले होते; तेच रायगड, लिंगाणा ताब्यांत आल्यावर तेथेही पाळले जात होते; म्हणून त्यांचा सारांश थोडक्यात देतो— सरदार, दिवाण, मजमदार, फडणीस, सबनीस यांनी लोकांची हजेरी महिन्यातून एकदोन वेळा घ्यावी. हजेरी घेणे व लिहिणे हे काम सबनिसाचे आहे. रोखापत्र व हरएक लिहिणे फडणिसाने लिहावे मजमदाराने निशाण करावे. कागद फडणिसाजवळ ठेवावेत. फडणिसांनी अडिसेरी देणे, चंदीचा दाणा इत्यादि व्यवस्था पहावी. सरदार, मजमदार, दिवाण यांची त्यावर देखरेख

असावी. लोकांकडून पावती फडणिसानी घ्यावी व त्यावर मजमदाराची निशाणी असावी.

लोकांचा तैनातजाबता, रावता, हुजुरून करार करून घेणे, रदबदल करणे हे काम दिवाण, मजमदार अगर सबनीस यांनी करावे, हुजूरच्या मखलाशीनंतर कागद फडनिसास द्यावा.

तोफखान्याकडील हजेरी सबनिसांनी घ्यावी; आकारवाटणी करावी. देणे देताना सरदार व सबनीस हजर असावेत. नावनिशी सबनिसांनी वाचून रुकार लिहावा. खर्च फडणिसानी खर्चकीर्दीस लिहावा. तैनातजाबता सबनीसानी लिहावा. त्यावर हुजुरांनी ( पेशव्यांनी ) करार लिहावा. तेरीख फडणिसानी करावी. रजा व रुजू होण्याबद्दलचे लिहिणे सबनिसानी कीर्दीस करावे. मोर्च्यास नेमणूक करणे, चाकरी देणे सबनिसानी व सरदारानी एकविचारे करावे. मोर्चात हजेरी सबनिसानी घ्यावी. लोकांचे मागे उभे राहून कामकाज घेणे सबनीसानी करावे. बक्षीस देण्यारी यादी सबनीसानी करावी व त्याबद्दल रदबदली सरदाराने करावी [ बाबापेरो. भा. १, क्र. २८०, २८१, पृ. १८०, १८१ ].

मामलतदार आपली कामे योग्य रीतीने बजावीत आहे की नाही, हे पहाण्यास आणि तपासण्यास नेमलेला सर्वोच्च गृहस्थ सरसुभेदार होय. त्याचे मार्फतीने तपासणीस लोक येत; अगर स्वतः सरसुभेदार प्रदेशास भेट देई. इ. स. १७७३–७४ मध्ये आत्माराम कृष्ण तालुके रायगडची पहाणी करून गेले. या अधिकाऱ्यांच्या बदल्या होत असत. इ. स. १७७४ जून १५ या दिवशी कोकणचा सरसुभेदार त्रिंबक विनायक पार्वेकडून काम काढून विसाजी केशव याची नेमणूक झाली [ अप्रकाश. नं. ८६, ११ ]. अनेक तक्रारींचा निरास सरसुभेदार करी. इ. स. १७७६ आगस्ट ६ या दिवशी रायगड तालुक्यातील प्रभु मंडळींची एक महत्त्वाची तक्रार दूर झाली. ‘कोकणप्रांती ब्राह्मणांची व प्रभूंची घरें आहेत. ब्राह्मणांपासून उंबरेपट्टी न घेता प्रभूंपासून मात्र ती घेतली जाई. प्रभूंपासून उंबरेपट्टी मागू नये व जी घेतली असेल ती माघारी द्यावी, अशी सनद रायगड तालुक्याचा अधिकारी गणपतराव कृष्ण यास सादर झाली’ [ समापेरो. भा. २ क्र. ७८३ पृ. २९८ ]. तक्रारी दूर करणारे सर्वात मोठे स्थान पेशवे व त्यांचे कारभारी हे होते; तदनुसार ही गोष्ट घडली आहे. इ. स. १७७९ जुलै २८ या दिवशी तालुके रायगडची पहाणी व चौकशी करण्यास सर्वोत्तम शंकर याची रवानगी झाली. निरुपयोगी नोकर दूर करण्याचे काम सरसुभ्यातर्फे आलेला अधिकारी करीत असे. त्यानेच नवीन लोक नेमावयाचे. किल्ल्यावरील गोलंदाजांची नेमणूक करणे अगर मंजुरी देण्याचे काम त्याचेच असे. तो दारुगोळ्याची

तपासणी करी; लढाऊ व बिगरलढाऊ शिल्लक सामानाची पहाणी करी. नवे सामान पाहिजे असल्यास ते खरेदी करण्यास मंजुरी देई. सरकारी गलबतांची डागडुजी त्याचे मंजुरीने होई. गलबतांतील सामानाची सिद्धता तोच करून देई. लोकांच्या रोजमऱ्यांत बाधा उत्पन्न झाल्यास तोच मिटवी. नवे वेतन ठरवण्याचे काम त्याचेच होते. सरदारांच्या बदल्या तोच करी. तोफांचे गाडे तयार करणे, दुरुस्त करणे, दारू खरेदी करणे, तोफांचे काने भरणे यांबाबत तोच निर्णय देई. हत्यारबंद लोक ठेवणे, त्यांचे जामीन घेणे हे काम त्याचेच होते. सर्व प्रकारचे कागदपत्र तोच पाही. अर्थात् हे तपासणीचे सूक्ष्म काम बरेच दिवस चाले. इ. स. १७८०–८१ मध्येही सर्वोत्तम शंकर अशी रायगड तालुक्यांची पहाणी करून गेल्याची नोंद आहे [ अप्र. कागद रु. नं. ९२, ८६; समापेरो. भा. ३, क. ८३८, ८३९ पृ. १४, १५ ]. सरसुभा-प्रांत कोकण याचेकडे दरोबस्त कोकणपट्टीचे इनसाफ होत. जे फिर्यादी येत त्यांचे न्याय-निवाडे तो करी. सुरसुभ्याजवळ मुतालिकी शिक्का असे. सनदा देण्याचे काम तोच करी [ पेद. ४५ पृ. १२५ ]. सरसुभा हा राज्यशासनातील अत्यंत महत्त्वाचा दुवा होय. इ. स. १८०४ सप्टें. १५ या दिवशीचा पुढील मजकूर पहा- ' किल्ले रायगड व लिंगाणा येथील आनंदराव बलवंतरावास सनद की खमस तिसैनपासून या किल्ल्यांनी कारखानिशी तुमच्याकडे होती. तेवढ्या काळात किल्ल्यावरील कोठीतून शिल्लक गल्ला व वजनी व जंगी सामान वगैरेसुद्धा आर्बा मयातेन आलफपर्यंत जो काही खर्चवेच झाला, त्याचा तपसीलवार झाडा तयार करून सरकारकडे पाठवून द्यावा ' [ दुबापेरो. पृ. १९१ ]. यावरून पेशव्यांचे लक्षसुद्धा रायगडसारख्या महत्त्वाच्या किल्ल्याकडे किती असे, याचा प्रत्यय येतो.

इ. स. १७७८–७९ मध्ये रायगड तालुक्यात एकूण २४४ गाव मोडत असत. पैकी दासगाव, कुंबळे हे इंग्रजांच्या ताब्यांत होत; ते इ. स. १७७४ त पेशव्यांनी जप्त करून तात्पुरते परत घेतले. दोन गाव वैराण होते. तालुक्याचे व्यवस्थेच्या दृष्टीने परगणे कोंढवी, परगणे महाड, तर्फ बिरवाडी, तर्फ तुडील, तर्फ विन्हेरे, तर्फ वाळणखोरे असे ६ भाग केले होते. परगणे कोंढवीपैकी उमरठ, ढवळे, खोपडी व दांदके ही चार गावे पंतप्रतिनिधीच्या ताब्यांत असून ती त्याने चंद्रगडच्या व्यवस्थेकडे लावून दिली होती. मजरे गोलदरा हा गाव ओसाड होता. तर्फ बिरवाडीची सहा गावे पंतप्रतिनिधीच्या ताब्यांत असून ती कांगोरी ऊर्फ मंगलगडच्या सरंजामास लावून दिली होती. इंग्रजांच्याकडील जप्त केलेले दोन गाव केव्हातरी परत देणे होतेच. म्हणजे एकंदर तेरा गावांवर तालुके रायगडच्या मामलेदाराची हुकमत नव्हती; त्याच्या ताब्यांत २३१ गाव होते. परगणे कोंढवी येथील ५०, परगणे महाड ७०, तर्फ वाळणखोरे ६, तर्फ

बिरवाडी ७५, तर्फ तुडील २५, तर्फ विन्हेरे १८ एकूण २४४ गावांचा हा हिशेब झाला. पैकी २३१ गावांचे उत्पन्न हे रायगड तालुक्याचे उत्पन्न होय. शेतीवरील दस्त मोहतर्फा, घरपट्टी, झाडदस्त व जकात या उत्पन्नाच्या बाबी होत. शेतीवरील दस्त हीच फार मोठी उत्पन्नाची बाब होती. इ. स. १७७८-७९ मध्ये १३३२ खंडी धान्य गल्ला वसूल झाला [ अप्र. कागद रु. नं. ८१,८३ ]. इतर बाबतींची जमा १५७१०।।।⁄ रु. होती. दस्त ऐनजिनसी वसूल करीत असल्यामुळे उत्पन्नाचा आकडा दरवर्षी बदले. इ. स. १८१३-१४ मध्ये ऐन दस्त फक्त ९१६।।४।।।⁄। खंडी वसूल झाला. त्यातील ११४।। खंडी वाळणखोऱ्यातून जमा झाला. या सर्व उत्पन्नाचा अंदाज वर्गवारीसह यावा, म्हणून इ. स. १८०८-०९ चा पुढील तक्ता पहा—

| तालुके रायगड—ऐनजिनसी उत्पन्न | वजनी |
|---|---|
| ४४२४।।। १।०।।⁄ भात | १०३०४।। तूप |
| ३०४०४०।⁄ नागली | १।।०४०६ हळद |
| २०३०१। १।।। वरी | ०३। ५ तेल |
| १३।।।२।। १।।⁄ हरिक | २१२।।।४।।७।। गूळ |
| २०१०२।⁄ तीळ | ०४।।।१।।।९ ताग |
| ५। १।।। १।।⁄ उडीद | |
| ३।। ४।।। १।।। मूग | |
| ६।।। ४।। २।।।⁄ तुरी | |
| ०।।० ।००।। हरबरे | |
| १।।० ।।।⁄ आवरे | |
| ५०७९०३।०।।⁄ एकूण धान्य | |
| ७४।।३।।। यंदा जास्त आले | |

ऐनजिनसीप्रमाणे इतर करांपासून आलेले नक्त— २१९३४०⁄। रुपये घरपट्टी, मोहतर्फा, चिठ्ठीमसाला, लग्न व पाटदाम, धनगरटका, पोतदारी इत्यादि मिळून होत. [ अप्र. कागद रु. नं. ८४ ].

रायगड तालुक्यात उतरावयाचे तीन घाट प्रसिद्ध होते— कावला घाट, कोलंबा व कुंभार्ली. या तीनही घाटांत जकातीची नाकी असत. इ. स. १७८०-८१ मध्ये कावले घाटांत गणेश गोपाळ हा नाकेदार होता; त्याचे सालीना वेतन ८० रु. होते. इ. स. १७८६-८७ मध्ये कोलंबा व कुंभार्ली या घाटातील जकातीचे उत्पन्न १०१० रु. झाले [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. रायगड तालुक्यात महाड हे एकच

बंदर होते. या बंदरातून मुंबई, सुरत व दक्षिण कोकणात व्यापार चाले. मुख्यतः लाकूड व तांदूळ रवाना होई व कापड, मीठ या वस्तू प्रमुखत्वे आयात होत. त्यांतून रायगडला मालाचा व मिठाचा पुरवठा होई. दर गलबतामागे ३ शेर मीठ जकातदार जकातीव्यतिरिक्त वसूल करी [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

किल्ले रायगडच्या घेऱ्यात पुढील १९ गावे मोडत १. मौजे वाळसुरे, २. वाघोली, ३. वाडी, ४. वाघेरी, ५. वारंगी, ६. छत्रनिजामपूर, ७. कावले, ८. सांदोशी, ९. आमडोशी, १०. कावले, ११. करमर, १२. खर्डी, १३. पुनाडे, १४. सावरट, १५. नेराव, १६. मजरे पाचाड, १७. मजरे कोंझर, १८. मांगरूण, १९. ढेवघर. तसेच, किल्ले लिंगाण्याच्या घेऱ्यातील गावे पुढील होत– १. वाळणकुंडे, २. पणदरी, ३. दापोली, ४. पाने [ अप्र. कागद रु. नं. ७८ ]. घेरा कांगोरीकडे परगणे कोंढवीपैकी १. मौजे बोरावळे, २. गोवले, ३. कोडज व आणखी चार, मिळून सात गावे लावून दिली होती [ अप्र. कागद रु. नं. ८२ ]. वाळण बुद्रुक हा दुतर्फा गाव असून त्याचे अर्धे उत्पन्न रायगड तालुक्याकडे असे [ अप्र. कागद रु. नं. ८१ ].

रायगड उंचावर असल्यामुळे तेथे बेगमी करणे बरेच अवघड काम असे; म्हणून जरूर तेवढ्या वस्तू रायगडच्या पायथ्याशी वाडी व पाचाड येथे ठेवीत; जरूर तेव्हा गडावर नेत. पाचाड येथे दास्तानांचे संरक्षण– देखरेखीसाठी कारखानि-साचा कारकून रहात असे. तो वस्तु वर पुरवी [ अप्र. कागद रु. नं. ८१ ]. रायगडचे एक दास्तान पाले येथे असे. या ठिकाणांहून गडावर साहित्य नेण्यासाठी भाडे पडे. इ. स. १७७५–७६ मध्ये भाड्याचा अजमास २२३७ रु. केला होता. एक खंडी धान्य पाचाड अगर वाडी येथून गडावर चढविण्याचा दर ३ रु. होता. यावर्षी रायगडवर ५३१ खंडी गल्ला चढवावयाचा होता. शिवाय, तटबंदीच्या कामा-साठी २१० खंडी गल्ला स्वतंत्र चढवावयाचा होता. पाचाड हा गाव रायगडच्या निम्म्या उंचीवर आहे. तेथे गल्ला चढवावयाचा दर कमी असे. इ. स. १७७८-७९ त गडावर गल्ला चढविण्याचा एकूण खर्च ९८८। रु. झाला. रायगडावर दरसाल आठ खंडी मीठ लागे. इ. स. १७७५-७६ त रायगड तालुक्यात इंग्रजांनी केलेल्या गड-बडीमुळे व पेशव्यांनी केलेल्या खाडीतील व्यापाराच्या बंदीमुळे मिठाचा दर वाढत वाढत २५ रु. खंडी झाला [ अप्र. कागद रु. नं. ७९,८३, ८४ ]. इ. स. १७७७-७८ त वाडीच्या फडावर भाताची रास असताना अकस्मात पाऊस पडल्याने भात भिजले [ अप्र. कागद रु. नं. ९१ ]. असे नुकसान बरेच वेळा होई.

महाड येथे अनेक दुकानदारांनी मालाची पेठ व दुकाने थाटली होती. महाडचे भाईचंद गुजर, नानचंद दाणी व अंबारजी गुजर रायगडच्या लोकांस वस्तूंचा पुरवठा करीत. पाचाड येथेही वाणी व गुजर यांची दुकाने होती व तेही गडास माल पुरवीत [ अप्र. कागद रु. नं. ८८ ]. ही व्यापाऱ्यांची यादी इ. स. १८१०-११ सालची आहे. रायगडवरील पेठेची भरभराट एकदा शिवकालात झाली; नंतर तिला पूर्वीचे वैभव लाभले नाही. रायगडवरील लोकांना जळाऊ लाकडे लागत; त्यांचा पुरवठा सांदोशी, सावरट, वावले, निजामपूर, वारंगी व आमडोशी या गावांतून होई. लाकडांचे ओंडे व भारे महार मंडळी गडावर वाहून नेत [अप्र. कागद रु. नं. ७७].

रायगडच्या संरक्षणासाठी दारूगोळा खरेदी करावा लागे; इ. स. १७८०-८१ मध्ये पुण्यास बंदुकीच्या दारूची रायगडसाठी खरेदी झाली. दोन खंडी दारू व एक खंडी शिसे ३० बैलांच्या लमाणावरून रवाना झाले. महाडच्या वाणी, भुसाऱ्यानी या वस्तू गडावर पोहोंचविल्या. त्यांचा आणण्याचा खर्च ७५ रु. झाला. शिलकी दारू निकामी होई. इ. स. १७८२-८३ ची एक नोंद अशी आहे की रायगड येथे राजवाड्याच्या माडीवर बहुत दिवसांची दारू शिल्लक होती. ती मातीसारखी झाली. तिचे वजन १०४०६॥१२ इतके झाले. तींत नवे जिन्नस १०।४।६ इतक्या वजनाचे ४४॥।~ रु. किंमतीचे मिसळून पुन्हा तिची दारू बनविली [ अप्र. कागद रु. नं. ९२]. इ. स. १८०८-९ मध्ये सामानाची मोजदाद केली, तेव्हा रायगडवर ३॥ खंडी दारू व ४ मण शिसे, १॥। मण लोखंड या वस्तु शिल्लक होत्या; बंदुकीच्या गोळया शिल्लक होत्या. दरवर्षी शिलकी लढाऊ साहित्य रायगडवर असे [ अप्र. कागद रु. नं. ८१ ]. इ. स. १७९३ त दोन बिडी तोफा ११५० रु. स रायगडसाठी खरेदी केल्या. त्या रोहे बंदरातून आणून रायगडवर पोहोचविण्याचा खर्च ३९३ रु. झाला. इ. स. १७९४ च्या जूनमध्ये रायगडसाठी वसईच्या किल्लयातील ४० जेजाला रवाना केल्या. इ. स. १७८० च्या सप्टेंबरमध्ये रायगडवरील १० जेजाला पुण्यास रवाना केल्या. इ. स. १७८१-८२ मध्ये रायगडवर दोन गोलंदाज नवे चाकरीस ठेवले. इ. स १७९३ च्या जानेवारीत १०।.। खंडी दारू पुण्यास तयार करून रायगडवर धाडली व तोफांचे १६७ गोळे रायगडवर धाडले. रायगडच्या दारूगोळ्यासाठी या वर्षी एकूण ( तोफांसह ) १७४३०~॥ रु. इतका खर्च झाला. फुटलेल्या तोफांचे तुकडे करून लोखंड इतर कामासाठी वापरीत [ अप्र. कागद रु. नं ९१, ९२ ].

शिबंदीस लष्करी स्वरूपाचे काम करावे लागे, त्याबद्दल बक्षिसे देऊन गौरव करण्याचा रिवाज होता. इ. स. १७७८-७९ त ९६॥। रु. बक्षिसे वाटण्यात खर्च झाले. ही रक्कम मसलतखर्च म्हणून नोंदली जाई. इ. स. १७८२-८३ त पुढील

उल्लेख जमाखर्चात आला आहे- ' इसने समानीभात मर्दुमी करून शामलाचे मुलुखांत जाऊन नांदवीपुरार येथील चौकीवर छापा घालून, नांदवीचे हवालदाराचे भाऊ वगैरे ५ असामी रायगडच्या शिबंदीने धरून आणले. त्यावेळी तिने मेहनत चांगली केली; सबब तीस १०० रु. बक्षिस दिले. शामलाचा या प्रसंगी मोड व्हावा म्हणून शिर्काईस नवस केला होता. हा नवस फेडण्यासाठी ४ रु., एकूण १०४ रु. बक्षिस-खर्च झाला. बक्षिसांदाखल पागोटी, कडी, मोहनमाळा, वगैरे अशासारख्या वस्तू देत. ' [ अप्र. कागद रु. नं. ८३, ९२ ].

जमाखर्च व पत्रलेखन यांसाठी कागदाची दरसाल खरेदी होई. इ. स. १७९५–९६ त ७० रु. दप्तरखर्च झाला इ. स. १८१३-१४ मध्ये दप्तरखर्च ५० रुपये झाला. दप्तरखर्चात मुख्यतः कागद असे. रायगडावर दरसाल सुमारे ८ गड्ड्या कागद लागे. त्याशिवाय खादीचे रुमाल, डिंक, सूत, शाई इत्यादि वस्तूंची खरेदी दप्तरखर्चात होई. इ. स. १८१३-१४ मध्ये ८ गड्ड्यांस ४५ रु. पडले व बाकीचा खर्च ५ रुपये झाला [ अप्र. कागद रु. ८१, ९१ ].

रायगडवर बालपरवेसी असत. ज्या सरकारी नोकरांचा लढाईत मृत्यू होई, त्यांच्या लहान मुलांस बालपरवेसी म्हणून सरकारी खर्चाने वयांत येईपर्यंत सांभाळीत. इ. स. १७७६–७७ मध्ये रेवदंड्यास शत्रूचा वेढा पडला असता रायगडकरी मद-तीस गेले होते; त्यांतील दोन माणसें ठार झाली. त्यांतील संभाजी जागड याची आई व धाकटा भाऊ यांस बालपरवेसी म्हणून २० रुपयांची नेमणूक सरकारांतून झाली. अबदुल रहिमान त्याच वेढ्यात कामास आल्यामुळे त्याची आई व भाऊ यांस बालपरवेसी म्हणून २० रु. दरसाल मंजूर झाले. [ समापेरो. भा. २ क. ६२९ पृ. १४१ ते १४३ ]. ही माणसे गडावर न रहाता आपल्या गावी आपल्या घरी रहात असत. ज्यांना हे अशक्य असे, ते गडावर रहात. इ. स. १७७७–७८ त रायगडावर तीस बालपरवेसी होते [ अप्र. कागद रु. नं. ७९ ].

गडावरील कुणबिणी मरेपर्यंत असत. इ. स. १७७८–७९ त रायगडावर सात कुणबिणी होत्या. त्यांचा अन्नखर्च सरकारांतून होई. त्या कोठीवर काम करीत. त्यांस लुगडी, चोळ्या सरकारी खर्चाने मिळत. या वर्षी त्यांच्यासाठी कापडखर्च २७॥। रु. झाला. इ. स. १७८२–८३ त त्यांचा कापडखर्च २६ रु. होता. इ. स. १७८०–८१ त दोन कुणबिणी आजाराने गडावर मरण पावल्या. इ. स. १७८२ फेब्रुवारी १४ रोजी एक कुणबीण वृद्धापकाळाने गडावर वारली. तिचा दहनखर्च हिशेबी दाखविला नाही; याचा अर्थ, दहन झाले पण क्रियाकर्मांतर झाले नाही. इ. स. १८१३-१४ त रायगडवर तीन कुणबिणी होत्या [ अप्र. कागद रु. नं. ८१,८३,९२ ].

रायगडावर एक ब्राह्मण अनेक वर्षे रहात होता. वेदशास्त्रसंपन्न बालकृष्ण गोपाल भातखंडे नागावकर स्नानसंध्या करून श्रीवाडेश्वर महादेवाजवळ पुराण सांगत व आल्यागेल्या ब्राह्मणास भोजन घालून अयाचक वृत्तीने रहात. इ. स. १७९७ मार्च १७ या दिवशी बाजीराव पेशव्याने त्यांजवर प्रसन्न होऊन महाड येथे चांभारखिंडीजवळ १० बिघे जमीन इनाम दिली; भातखंडे नागावकर वृद्धापकाली महाडास राहू लागले [ अप्र. कागद रु. नं. ८९ ].

रायगडच्या अधिकाऱ्यास काही वेळा सावकारांकडून कर्ज काढण्याचा प्रसंग येई. महाडच्या महादाजी गणेश कुंटे या सावकाराकडून कर्ज काढल्याच्या नोंदी नमूद आहेत [ अप्र. कागद रु. नं. ३ ].

रायगडच्या अनेक वर्षांच्या कागदपत्रांतून व हिशेबांतून एक गोष्ट लिहिलेली आढळते की, रायगडावर १५ तोळे सोनें व १५०॥ तोळे रुपें सतत शिलकेस ठेवलेले असे [ अप्र. कागद रु. नं. ९२ ]. ते कमी अगर जास्त का नाही, हा प्रश्न अनेकदा मनांत उत्पन्न होतो !



# २४ नाना फडणीस व रायगड

सवाई माधवरावानंतर दुसरा बाजीराव पेशवा झाला, ही गोष्ट नाना फडणिसांच्या इच्छेविरुद्ध झाली. तो नालायक आहे असेच त्यांचे मत होते. बाजीरावासही नानांची अडगळ होत होती. जोवर नाना कारभार करतात, तोवर आपले पंतप्रधानपद नाममात्र, हे त्यास समजत होते. त्यामुळे दोघांचेही मनोमन चांगले नव्हते. आपणास कैदेत पडावे लागणार अगर सुरक्षिततेसाठी पलायन करावे लागणार, हे नाना ओळखून होते. इ. स. १७९६ च्या मार्चपासून नानांनी पलायनाची व रायगड–महाडचा आश्रय घेण्याची तयारी चालविली. इ. स. १७९६ मार्च २४ चे पत्र सांगते की नानांची भार्या रायगडास गेली. तिचेबरोबर दादा गद्रे रवाना झाले. दादा गद्रे रायगड तालुक्याचे सुभेदार व नानांचे स्नेही होते; तेव्हा, रायगड हे स्थान आपणास सुरक्षित अशी नानांची भावना होती. मार्च २७ च्या पत्रांत मजकूर आला आहे की नाना फडणीस रायगडास जाण्याच्या विचारात आहेत. रायगडावर गल्ला, दारू, अमीरी सामान व जकीरा चढविला आहे [ ऐलेसं. भा. ९, ले. ३७२७, ३७३२ ]. ४ जून रोजी रात्री नाना वाईहून रायगडास गेले. त्यांचे स्नेही विसाजीपंत वाडदेकर व चिंतोपंत लिमये वाईस असून त्यांसही नानांनी आपला बेत कळू दिला नाही, इतकी गुप्तता यावेळी राखली होती. नानांनी रायगडच्या बंदोबस्ताची चांगली खबरदारी घेतली होती [ ऐलेसं. भा. ९, ले. ३७९९; राखं. ७ पृ. ४ ] १३ जून १७९६ रोजी नाना महाडास होते. त्यांच्याजवळ तीन साडे-

तीन हजार फौज होती; पण पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे एवढ्या फौजेची जरूरी नाही, असे पाहून फक्त ५।७ शे लोक ठेऊन त्यांनी बाकीच्या लोकांस रजा दिली. यावेळी नानांस पकडण्यासाठी शिंद्यांची फौज, पलटणे व पेशव्यांचे सैन्य पाठविण्याचे ठरून चार पलटणे रायगडकडे रवाना झाली; पण त्यांनी घाटमाथ्यावरच थांबावे असा हुकूम सुटला होता [ ऐलेसं. भा. ९, ले. ३८०५, ३८०६ ].

महाड-रायगड येथून नाना फडणिसांनी एक जंगी कारस्थान रचिले, त्यास कै. खरेशास्त्री यांनी महाडचे कारस्थान असे नाव दिले आहे. १३ जून १७९६ ची बाजारी वार्ता की नाना फडणिसांचा कारकून महाडहून टिपूकडे गेला. ता. १७ जून पासून नानांनी इंग्रजांशी बोलणे करण्यास प्रारंभ केला व मुंबईकरास कळविले मजसाठी साष्टी हे ठिकाण रहाण्यास द्या. त्यावर इंग्रजांचे म्हणणे होते की आम्हास श्रीमंत कै. दादासाहेबांपायी ५७ लक्ष रु. कर्ज झाले; ते द्यावे. आम्ही १५ पलटणांनिशी तुम्हास मदत करतो. या मदतीचा मोबदला म्हणून खर्च व विजयदुर्गाचा किल्ला द्यावा. [ ऐलेसं. भा. ९, ले. ३८०६, ३८१४, ३८१६ ].

वाटाघाटी चालू असताना नानांचा रायगडावर रहाण्याचा इरादा होता. सुभेदार गद्रे यांनी तशी व्यवस्थाही केली; पण दौलतराव शिंद्यांच्या मार्फतीने दादा गद्रे यांच्या बायकोकडे एक कारस्थान खेळू लागले व तिने नानांस रायगडावर राहू न देण्याचा मनसुबा रचला. नानांसारख्या धोरणी माणसास हे कळले. मग दादा गद्र्यांनी गडावर जाऊन बंदोबस्त केला, बायकोस किल्ल्यावरून खाली उतरविले व नंतर नाना गडावर गेले. नानांबरोबर हरिपंत फडक्यांचा मुलगा अप्पाबा फडके, बाबोपंत गोडबोले, आबा शेलूकर, बजाबा शिरोळकर ही त्यावेळची कारभारातील जाणती मंडळी होती. रायगडचे सर्द हवामान नानांस मानवण्यासारखे नसल्याने नाना अल्पकालच राय-गडावर नांदले. नंतरच्या काळात त्यांचा मुक्काम महाड, पाचाड येथे असे. [ ऐलेसं. भा. ९, ले. ३८१४; ३८०९; ऐसंसा. खं. ५ पृ. ५७ ].

कोकणच्या पावसाने नानांबरोबरचे शेदीडशे घोडे, चाळीसपन्नास उंट मरण पावले. माणसांसही पावसाची झड सोसेना; म्हणून नानांनी घाटातील सर्व वाटा अवघड करून टाकल्या व पुण्याच्या फौजा आपणावर चालून येऊ नयेत, म्हणून बंदोबस्त केला व बऱ्याच फौजेस रजा दिली; पण जूनच्या अखेरीस पुण्याहून पाच पलटणे कोकणकडे रवाना झाली. जुलैमध्ये पायदळाने महाडकडे कूच केले. तेव्हा, नानांच्या सांगण्यावरून दादा गद्रे सुभेदार यांनी ५।६ हजार मावळ्यांचे पायदळ ठेवण्यास प्रारंभ केला व जंजीऱ्याच्या शिद्दीबरोबरही मदतीसाठी कारस्थान केले [ ऐलेसं. भा. ९, ले. ३८१३, ३८२०, ३८२३ ].

इंग्रज, शिद्दी, या दोघांबरोबरच कारस्थाने करून नाना थांबले नाहीत! कै. महादजी शिंद्यांची केशरी नावाची एक रक्षा उज्जयिनीस रहात होती; तिचे मार्फत त्यांनी दौलतराव शिंद्यांबरोबरच कारस्थानाचे सूत्र लावून बाजीरावास गप्प बसविले! नाना व शिंदे एक झाल्यावर बाजीरावाचा जोर संपला व नानांसही पळून जाण्याचे कारण यापुढे उरले नाही [ ऐलेसं. भा. ९, ले. ३८२५ ]. इ. स. १७९७ मध्ये नाना परत पुण्यास गेले [ राखं. १०, पृ. ३५१ ले. ४३१ ].

नानांचा मुक्काम रायगडावर बराच काल होणार, अशा कल्पनेने त्यांचे बरेच सामान पुण्याहून रायगडवर हलविण्यात आले होते. गद्रे यांचे कारकून बाबूराव कृष्ण गोरे व भिकाजी बल्लाळ साने यांनी रायगडवरील विवेकसभेच्या जामदारखान्यात ते ठेविले होते. इ. स. १७९८ मध्ये ते सामान बाळोजी कुंजीराच्या वतीने निळो गणेश याने आपल्या ताब्यात घेतले व पुण्यास नानांकडे रवाना केले. या सामानाच्या याद्या करण्याचे काम रायगडवर २४ दिवस चालले होते! [ अप्र. कागद रु. नं. ८६, ९१ ].

नानांनी केलेले कारस्थान इंग्रज, नागपूरकर भोसले, निजाम, जंजीरकर शिद्दी, कोल्हापूरकर या सर्व सत्तांस व्यापून टाकणारे आहे. पण या कारस्थानाचा उपक्रम, उपसंहार प्रामुख्याने महाड येथून झाला असून रायगडचा संदर्भ राखून जरूर तेवढाच मजकूर येथे दिला आहे.

# २५

# पारतंत्र्याच्या अंधाराचीं चोरपावलें

१३ मार्च १८०० या दिवशी नाना फडणिसांचा मृत्यू ओढवला. त्यांनी शिंदे, होळकर, पटवर्धन, रास्ते, भोसले या सर्वांचा एकोपा बाह्यतः तरी टिकवला व इंग्रज, शिद्दी व निजाम या शत्रूंस दूर ठेविले. त्यांच्या मृत्यूमुळे शिंदे-होळकरांतील वैमनस्य पराकोटीला गेले व बाजीरावास स्वैर वागण्यास आडकाठी उरली नाही.

२५ जून इ. स. १८०० रोजी मध्यरात्री बाजीरावाने नारोपंत चक्रदेव, बजाबा शिराळेकर, राघोपंत गोडबोले व आणखी दोघे अशा पाच जणांस रायगड व प्रतापगडकडे प्रतिबंधांत ठेवण्यासाठी पाठवून दिले. बाळाजीपंत पटवर्धन आपली एक व बाळोजी कुंजीराची एक अशा दोन पागा घेऊन हे कैदी पोहोचविण्यास गेले होते. या कैद्यांचा अपराध कोणता, तर ती नानांचे पक्षाची मंडळी होती व त्यांचा पेशव्यांच्या स्वैराचारास अडथळा होणार होता! [ ऐलेसं. भा. १२ ले. ५६१७ ]. प्रसिद्ध सरदार माधवराव रास्ते यांचेवर हा प्रसंग १० ऑक्टोबर १८०१ रोजी ओढवला. रास्ते यांची सुटका व्हावी, अशी कारभाऱ्यांची इच्छा होती. पण ती पेशव्यांनी मानली नाही. रास्ते यांस रायगडावर कैदेत ठेवण्यात आले [ ऐलेसं. भा. १३ ले. ६१६६, ६१६८ ] व त्यांची व्यवस्था चांगली ठेवण्यात आली. चाकरीस ब्राह्मण व आचारी दिला. रहाण्यास निवाऱ्याचे घर दिले. पोटास शिधा उत्तम प्रतीचा देवविला. त्यांची हजामत योग्य दिवशी करण्यासाठी न्हावी देवविला व त्यांच्या शरीरप्रकृतीबाबत काळजी घेण्याच्या सूचना देवविल्या [ दुबापेरो. पृ. १०० ]. रास्त्यांची मुले कोरीगड येथे कैदेत होती. १५ नोव्हेंबर १८०१ च्या सुमारास त्यांनी आपली सुटका करून घेतली. त्यामुळे पेशव्याची धावाधाव झाली. त्याने हुकूम सोडले की त्यांस बंदोबस्ताने पकडून ठेवण्याची व्यवस्था अधिकाऱ्यांनी ताबडतोब करावी. बाळोजी कुंजीर रायगड तालुक्याचा अधिकारी होता; त्यासही पेशव्याचे वरील मजकुराचे पत्र रवाना झाले [ दुबापेरो. पृ. ९८, ९९; अप्र. कागद रु. नं.

९१ ]. जुन्या माणसांस व अनुभवी मुत्सद्यांस पकडून बंदीत टाकणे हा बाजीरावाचा नित्य कार्यक्रमच होऊन बसला. १२ जुलै १८०२ रोजी बाजीरावाने पकडलेली ११ मंडळी झोळीतून, पुलावरून, पुण्याहून, कुवारी, पाल व रायगड येथील बंदीखान्यात डांबण्यासाठी रवाना झाली. कैद झालेल्यात हरिपंत फडक्यांचे चार मुलगे, मोरोबा-दादा फडणीस, माधवराव रास्त्यांचा कारकून आठवले, बापू फणसळकर यांचा समावेश होता [ ऐलेसं. भा. १४ ले. ६४०२ ]. याचा स्पष्ट अर्थ असा की बाजीरावाचे कारकी-र्दीत रायगडचा उपयोग एक बंदीखाना एवढाच उरला होता ! वर सांगितलेली माणसे कैदेत पडणे ही भविष्यकालीन प्रलयात्मक इतिहासाची नांदीच होती ! दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर यांचे या कालात जास्तीत जास्त बिनसले होते. शिंदे व बाजीराव यांची अभेद्य जूट झाली होती व होळकराचा शक्य तेवढा शक्तिक्षय करण्याचा प्रयत्न पेशवे-शिंदे ही दुकल करीत होती. पण यशवंतराव होळकर हा एवढा कर्तृत्ववान् होता की तो या दोघांसही पुरून उरला. २७ सप्टेंबर १८०२ या दिवशी बाजीरावास समजले की यशवंतराव होळकर आपल्या घोडदळ-पायदळासह पुण्यास येत आहे. पेशव्याने होळकराचे अनेक घोर अपराध केले असल्यामुळे होळ-कराच्या गरुडभरारीची बातमी ऐकताच जीव वाचविण्यासाठी पळ काढण्याच्या विचाराने पेशव्याने तयारी केली. पेशव्यास रायगडवर पळून जावयाचे होते. त्याने स्वार व गारदी यांची डाक बसविली. आपले कुटुंब व सवाई माधवराव पेशव्यांची दुर्दैवी भार्या यशोदाबाई यांस घेऊन जाण्याची त्याची तयारी पूर्ण झाली. पुणे गड-बडले व लहानमोठी माणसे पुणे सोडून बाहेर पडली. ८ ऑक्टोबर १८०२ रोजी बाजीरावाने मातुश्री यशोदाबाई, आपली भार्या, चिमाजीअप्पाची बायको यांची रायगडवर रवानगी केली. पाठोपाठ बाळोजी कुंजीरानेही आपले कुटुंब रायगडवर धाडून दिले; कारण यशवंतराव होळकर येणार हे नक्की झाले होते ! [ ऐलेसं. भा. १४ ले. ६४४६, ६४५५, ६४६० ]

इ. स. १८०२ चे दिवाळीचे दिवस यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे यांच्या पुण्याजवळील लढाईमुळे मराठ्यांच्या इतिहासात केवळ अविस्मरणीय झाले आहेत. त्यावेळचा यशवंतरावाचा निर्णायक विजय, शिंद्यांच्या पलटणांचा कमकुवत-पणा, बाजीरावाचा पळपुटेपणा यांचा प्रपंच न करता रायगडच्या संदर्भातच पुढे लिहिले पाहिजे. २७ ऑक्टोबर १८०२ या दिवशी बाजीराव व चिमाजीअप्पा सिंहगडावरून रायगडच्या रोखाने पळाले. त्यांचे पाठोपाठ दोनतीन हजार फौज गेली. ही हकीकत यशवंतराव होळकरास कळल्यावर त्याने २८ ऑक्टोबर रोजी आपली फौज बाजीरावाचे पाठीवर धाडली [ ऐलेसं. भा. १४ ले. ६४७१ ]. होळ-

कराने पाठविलेली फौज १२-१५ हजार असावी. बाजीरावाबरोबर ज्या मंड-ळींनी पुण्यातून पळ काढला, त्यांत बाळोजी कुंजीर, निंबाजी भास्कर, दाबी-पंत देशमुख, यशवंतराव व भीवराव पानशे तोफखानेवाले, बिनीवाले, रूपराम चौधरी, मनोहरगीर गोसावी, खंडेराव रास्ते, बळवंतराव नागनाथ ही माणसे प्रमुख होती [ऐलेसं. भा. १४ ले. ६४६८, ६४७०, ६४७३, ६४७४, ६५११]. ही सर्व मंडळी सिंहगडावरून मढेघाटाने अवचितगडावरून महाडास आली व रायगडावर गेली. शिवाजीच्या काळात शिवाजीच्या राण्या, दरबारी मंडळी, मोरोपंत पिंगळे अण्णाजी दत्तो वगैरे माणसांचे रायगडावर एकत्र येणे व बाजीरावाचे हे येणे यातील महदंतर वाचकांनी जरूर ध्यानांत घ्यावे. वस्तुतः यशवंतराव होळकर हा उदार आणि विशाल अंतःकरणाचा, अत्यंत स्वामिनिष्ठ व मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या आणि घोडदळाच्या युद्धपद्धतींत एकमेव मानावा, असा सेनापति होता. मराठेशाही वाचावी, पेशवाईचा कारभार सुयंत्र चालावा, मराठ्यांचे स्वातंत्र्य अप्रतिहत नांदावे अशी तीव्र तळमळ यशवंतरावास लागली होती. पण या मंडळींनी यशवंतरावाच्या हेतूंचा हेतुतः विपर्यास केला व त्याला आपला शत्रु मानले !

या सर्व मंडळीस पुण्यास आणण्यासाठी यशवंतरावाने जे सैन्य धाडले, त्यांत प्रसिद्ध मुत्सद्दी पाराजीपंत, बाबीराव बर्वे, अन्याबा अभ्यंकर ही नामवंत माणसे होती.

नोव्हेंबरचे आरंभीचे काही दिवस बाजीराव महाडजवळ बिरवाडी येथे होता; जवळ दोनतीन हजार फौज असल्यामुळे त्यास बराच निर्धास्तपणा वाटत असावा. यशोदाबाई रायगडावर बंदोबस्तात होती व बाजीराव-चिमाजींची कुटुंबे किल्ले सुवर्णदुर्ग येथे होती. बाजीरावाचा मुक्काम वेदशास्त्रसंपन्न गोविंद जोशी यांच्या चौसोपी वाड्यात होता. बरोबर असलेल्या सैन्याने गल्ल्यासाठी बिरवाडीची घरें साफ लुटली. शेतात भातें उभी होतीं; ती कापून आणली. त्यामुळे गावांत आकांत झाला. तेथून सुवर्ण-दुर्गास, जावे की विजयदुर्गास, याचा बेत बाजीराव आखीत होता. त्यास परत पुण्यास आणण्याची यशवंतरावाची फार इच्छा असल्यामुळे त्याने सिंहगडाखाली ४ पल्टणे जमा केली. रायगड, कुवारी, पुरंदर येथे बाजीरावाने ज्यांस कैदेत ठेविले होते, त्यांनी आपल्या सुटकेसाठी त्याचेकडे सूत्रें लावली. माधवराव रास्ते कैदेदाखल असले, तरी पेशव्याने त्यांचेकडून रायगडचा बंदोबस्त करविला व यशोदाबाई रायगडावर सुखरूप व आनंदांत असल्याची बातमी बाहेर पसरविली [ऐलेसं. भा. १४ ले. ६४७५, ६४८१ ६४८२ ६४८६ ]. याच गोंधळाच्या परिस्थितीत रायगडावर नोव्हें १३ पूर्वी ४।१ दिवस यशोदाबाईला कोणीतरी मारेकरी घातल्याचे उघडकीस आले. रायगडचा हवाल-

दार व माधवराव रास्ते यांनी कसून शोध केला, तेव्हा बाळोजी कुंजीराच्या एका कारकुनाचे या प्रकरणी आंग असल्याचे आढळून आले. त्यास लागलीच कैद करण्यात आले व हवालदाराला बाजूला करून माधवराव रास्ते यांनी गडाच्या बंदोबस्ताचे जबाबदारीचे काम आपल्याकडे घेतले [ ऐलेसं. भा. १४ ले. ६४९०]. यामुळे माधवराव रास्ते कैदेतून पुरे सुटल्यासारखे झाले व मग पेशव्यांनीही त्यांची पद्धतशीर सुटका केली. ता. २१ नोव्हेंबर रोजी रास्ते लिहितात की, पेशव्यांनी मला महाडास आणले असून मजबरोबर बलवंतराव नागनाथ आहेत. बाजीरावाने रास्त्यांची सुटका कोणत्या अटींवर केली, हे समजत नाही; पण होळकरापासून रास्त्यांनी आपला बचाव करावा अशी पेशव्यांची रास्त अपेक्षा असावी. ता. २२ नोव्हेंबरच्या एका पत्रांत असा उल्लेख आलेला आहे की माधवराव रास्ते, बाळाजीपंत पटवर्धन व गोखले या तीन सरदारांच्या फौजा बाजीरावाच्या संरक्षणासाठी एक होणार. भोसले, निजाम, शिंदे त्यांचे मदतीस येणार. महाडास इंग्रजी पलटण आली असून त्यांचे साहाय्य बाजीरावास आहे. अमृतराव पेशवा बाजीरावाकडे महाडास येऊन मिळणार असून छत्रपती बाजीरावास अनुकूल आहे. ज्याच्यावर बाजीरावाचा दृढ विश्वास, तो बाळोजी कुंजीर महाडासच आहे [ ऐलेसं. भा. १४ ले. ६५१९; पुअ. भाग २ रा, पृ. १२८]. नाना फडणीसाने महाडास राहून कारस्थान केले, त्याचप्रमाणे बाजीरावानेही महाडासच होळकराच्या विरुद्ध एक फार मोठा बनाव घडवून आणला. नानांस इंग्रज, भोसले, निजाम जसे अनुकूल झाले, तसेच बाजीरावाने त्यांनाच अनुकूल करून घेतले ! इतिहासाची ही पुनरावृत्ति अवघ्या सात साडेसात वर्षांत घडून आली; पण ती स्वातंत्र्याचे दृष्टीने महाराष्ट्रास खडतर साडेसाती ठरली.

होळकरास पुण्यास स्थिरस्थावर करावयाची असल्यामुळे बाजीरावाच्या पाठलागास त्यास विलंब लागला. त्याचा सरदार हरिपंत भावे सुमारे एक हजार गारदी व फौज यांसह रायगडच्या परिसरांत २२ नोव्हें. १८०२ रोजी येऊन पोहोचला; त्यावेळी बाजीराव आपल्या पूर्वोल्लेखित कुंजर, पटवर्धनादींसह रायगडास गेला होता [ ऐलेसं. भा. १४ ले. ६५०३] व होळकराच्या फौजेत फितुरी करण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता. ता. २२ नंतर होळकराने कोकणकडील चार घाटांतून चार टोळ्या रायगडकडे रवाना केल्या. कावल्याच्या खिंडीत त्याच्या फौजेपुढे बाजीरावाच्या सैन्याने माघार घेतली. त्यायोगे होळकराचे सैन्य निष्प्रतिबंध होऊन चारही घाटांतून उतरू लागल्याची बातमी महाडास आली. त्याचवेळी पेशव्यास कळले की रायगडवर होळकरातर्फे फितूर झाला आहे. तेव्हा बाळोजी कुंजीर, देशमुख वगैरे सल्लागारांनी पेशव्यास सांगितले की, आता मुंबईकर इंग्रजांकडे जावे. यावेळी बाजीराव आणि अमृत-

राव पेशवा यांचा पत्रव्यवहार चालू होता, तो पेशव्यास सारखे कळवीत होता की पेशव्याने पुण्यास परतावे. बरोबर असलेल्या चिमाजीनेही त्यास सांगितले की इंग्रजांकडे न जाता अमृतरावाकडे पुण्यास जावे. भावनेच्या आहारी जाऊन इंग्रजांकडे जाण्याची सल्ला देणाऱ्या बाळोजी कुंजीर वगैरेंस कैद करून पेशव्याने रायगडावर पाठवून दिले. माधवराव रास्ते यांचा बहुमान करून त्यांस पुन्हा सरदारीची वस्त्रे दिली व त्यास वाईप्रांती जाऊन सैन्य तयार ठेवण्यास सांगितले.

पण पेशव्याच्या कोणत्याच विचारात ठामपणा नव्हता. त्यास पक्की बातमी लागली की होळकराचा सरदार मीरखान पठाण चार हजार फौजेसह, अमृतराव पेशव्याकडील आबाजी शिंदे व बळवंतराव दोघेनी हजार स्वार, हजार गारदी व पठाण यांसह रायगडकडे रवाना झाले आहेत व ते घाटमाथ्यावर येऊन पोहोचले आहेत. ही बातमी कळताच बाजीरावाने आपल्या बरोबरच्या लोकांस सोडले व कोठेही सुरक्षितपणे निघून जाण्यास परवानगी दिली; मग आपण, बाळोजी कुंजीर, बाळाजीपंत पटवर्धन, चिमाजीआप्पा यांसह हर्णैस गेला. बाजीरावाबरोबर पागेची ८०० घोडी, विंचूरकर, माने, खाजगीवाले, यांचा लवाजमा व सैन्य गेले होते. ते सर्व व माधवराव रास्ते पारघाटाने वाईस परतले. गोपाळ कुंजीर व नारोबा नाना आवटी ४ शे लोकांसह रायगडावर बंदोबस्ताने राहिले [ ऐलेसंभा. १४ ले. ६५०९, ६५१०, ६५१२ ]. सुवर्णदुर्गाहून बाजीराव वसईस ७ डिसेंबरच्या सुमारास जाऊन पोहोचला [ ऐलेसंभा. १४ ले. ६५१६ ].

होळकराची मोठी निराशा झाली. पेशव्यास आणून गादीवर बसवण्याचा त्याचा हेतु फसला. यशोदाबाई रायगडावर होती, तिला आपल्या ताब्यांत आणण्यासाठी व रायगड हस्तगत करण्यासाठी होळकर व अमृतराव यांनी संधान लावले. होळकराच्या फौजेने यावेळी रायगडभागास भरपूर उपद्रव दिला [ ऐलेसंभा. १४ ले. ६५१०, ६५१४, ६५१६, ६५२४ ]. एक पत्रलेखक लिहितो की परशुरामक्षेत्रापर्यंतचे सर्व कोंकण यावेळी उध्वस्त झाले [ ऐलेसंभा. १४ ले. ६५२२ ].

यशवंतराव होळकराने मढा, शेवता व वरंधा या घाटांचा बंदोबस्त करून रायगड व प्रतापगड यांस १८०३ च्या आरंभी शह दिला. बिरवाडी हा गाव यावेळी रायगडकरी यांनी जाळून उध्वस्त केला. होळकराची पाच पलटणे रायगडच्या पायथ्याशी जमा झाली. होळकराने आता ठरविले की शक्य तर यशोदाबाईस रायगडावरून पुण्यास आणावे [ ऐलेसंभा. १४ ले. ६५४५ ]. एका रात्रीत रायगडकऱ्यांनी बाळा-

१. ऐलेसंभा. १४ ले. ६५०८, ६५०९, ६५१०, ६५३८. ऐलेसंभा. १४ ले. ६५३८ ची तारीख २९ नोव्हें. १८०२ पाहिजे.

जीपंत पटवर्धना रायगडवर कैद झाल्याचे लिहिले आहे; ते खरे दिसत नाही. कुंजीराचा भाचा धुमाळ हा मात्र याच वेळी रायगडवर कैदेत पडला [ ऐलेसंभा. १४ ले. ६५२६ ]. तत्कालीन अस्सल पत्रात ज्याप्रमाणे बातमीबाबत उलटसुलट प्रकार झाले आहेत, त्याप्रमाणे कुलाबा गॅझेटियरमध्येही काही चुकीचा मजकूर येऊन गेला आहे. गॅझेटियरकारांचा मजकूर संकलनात्मक आहे. ते लिहितात, 'बाजीरावाच्या पाठीवर होळकर सैन्य घेऊन आला व फारसा प्रतिकार न होता रायगड त्याच्या ताब्यांत गेला; पण इ. स. १८०३ मध्ये तो त्याने पेशव्यास परत केला [ कुगॅपृ. ३४४, ३४५,३७५ ]. गॅझेटियरकाराची दोन्ही विधानें बरोबर नाहीत. त्यांनी बाजीरावाबरोबरच्या सैन्याच आकडा फार मोठा दिला आहे; तो चूक आहे. रायगड होळकराच्या हाती गेला असे लिहिण्यात त्यांची दुसरी चूक झाली आहे. रायगड होळकराच्या ताब्यांत जाता, तर यशोदाबाईस पुण्यास आणण्यात होळकर यशस्वी झाला असता व कदाचित् मराठयांच्या भावि इतिहासांत थोडा बदलही घडता.

रायगडच्या परिसरांत आल्यावर होळकराने बरीच लुटालूट केली. नातें या गावचे लोक भयभीत होऊन पळाले. वाळण या ठिकाणी होळकराचे सैन्य जमा झाले व रायगड घेण्याच्या प्रयत्नास लागले. रायगडावर मामलेदार नारोपंत आवटी व गोपाळ कुंजीर यांना चांगला बंदोबस्त ठेवला. रयतेने पळून जाऊ नये, रायगडावर रसद, दाणा, कारसाई पोहचवावी यासाठी नारोपंताने जाहीर केले की आम्ही, रयतेने साहित्य पोहोचविण्याची शर्थ केल्यास, घरदेणे माफ करू. रयतेनेही गडावर सर्वविध साहित्य पोहचविले. गडावरील शाकारणी वगैरेची कामें व्यवस्थित केली, त्यामुळे आवटी व कुंजीर यांना धीर आला. त्यांनी होळकराबरोबर झुंज घेतली.

होळकरास वेढा चालविणे व ठाणण देऊन असणे, या गोष्टींस सवडच नव्हती. त्याचे लक्ष इंग्रजांच्या व बाजीरावाच्या हालचालीकडे लागले होते. वेढा देऊन किल्ला घेण्याने होळकरास फारसे काही साधणार नव्हते. बाजीराव व चिमाजी गडावर असते, तर त्याने किल्ला वर्षभर देखील वेढून शेवटीं हाती घेतला असता. ते इंग्रजांकडे गेल्यावर किल्ला घेत बसण्यात फारसा अर्थ नव्हता. कागदपत्रांत मजकूर आहे की रायगडच्या किल्लेदाराने रायगडच्या खोऱ्यांत होळकराचा मोड केला व होळकरास फौजेसह वाटपार लाविले [ अप्र. कागद रु. नं. ७८,८४,८७ ]. यातील होळकराच्या पराभवाचे विधान अतिशयोक्त आहे. होळकर निराश मनस्थितींत किल्ला न घेता परतला हे खरे. नारोपंत आवटीस धन्य वाटले. त्याने कबूल केल्याप्रमाणे लोकांचे घरदेणे माफ केले. होळकराच्या स्वारीमुळे व बाजीरावबरोबरच्या लोकांनी उपद्रव दिल्यामुळे; कापणीचे काम योग्यवेळी न झाल्यामुळे व पाऊसपाण्याचीही ओरड

झालेली असल्यामुळे नारोपंताने वसुलीबाबतही काही मोघम सूट देऊन प्रजेस समाधान दिले [ अप्र. कागद रु. नं. ७८,८४,८७ ]. रायगडावरील होळकराची स्वारी अशा तऱ्हेने वळवाच्या धावत्या सरीसारखी झाली व संपली.

नारोबा आवटी व पांडोजी कुंजीर यांनी रायगड राखला याचा परिणाम बाजीरावावर झाला. इ. स, १८०३ जून २९ रोजी बाजीरावाने सिंहगडावर असलेली रत्नशाळा, रायगड हे सुरक्षित स्थान समजून तेथे आणली. सिंहगडावरील गोविंदराव सदाशिव यास बाजीरावाने कळविले की, दागिन्यांची ओझीं बांधावीत व हेलकरी आणि संरक्षक यांनी ती रायगडावर न्यावीत. त्याचवेळी नारो गोविंद आवटी यास बाजीरावाने कळविले की रायगडावर हे दागदागिने व जडजवाहीर सुरक्षित जागी ठेवावे. तेथे चौकीपहाऱ्याचा चांगला बंदोबस्त ठेवावा [ दुबापेरो. पृ. २५, २६ ]. बाजीरावाला रायगडसंबंधी काय वाटू लागले होते याचे हे एक गमक आहे.

यशोदाबाईची सुटका होण्याची आशा संपली. तिचा रायगडवर जो मुक्काम झाला, तो कायमचाच ठरला. १८०३ फेब्रु. ८ च्या पत्रांत उल्लेख आला आहे की ' यशोदाबाई रायगडावरच आहेत. त्यांना भोजनादि साहित्याबद्दल विपत्ति फार केली आहे ' [ ऐलेसंभा. १४ ले. ६५७५ ]. इ. स. १८०३–४ मध्ये तिचा खाजगी खर्च व शागीर्द माणसांचा तिच्यामुळे झालेला खर्च ४९६७।।-। रु. आहे. इ. स. १८०५–०६ मध्ये तिचा रायगडवरील खाजगी खर्च ५०९०।।=।।। रु. आहे. इ. स. १८०७–०८ मध्ये तिचेप्रीत्यर्थ रायगडवर ५२२३।।।-। रु. खर्ची पडले आहेत. इ. स. १८०८–०९ मध्ये यशोदाबाईप्रीत्यर्थ ५३२१।।।-।। रु. नख्त खर्च झाले. हे खर्चाचे आकडे पहाता यशोदाबाईची रायगडावर आबाळ झाली असे म्हणता येणार नाही [ अप्र. कागद रु. नं. ७८, ८४, ८७, ९१ ]. तिच्या संरक्षणार्थ रायगडावर शिबंदी व पाचाड येथे घोडेस्वार सज्ज ठेविले होते. इ. स. १८०८ व १८०९ च्या जानेवारीत बाजीराव तिला रायगडावर येऊन भेटून गेला [ ऐलेसंभा. १५ ले. ७१९१; मइसाखं. २५ ले. २२० ]. पेशव्यांचे चार हुजरे तिच्याजवळ असल्याचे इ. स. १८१० जुलै ३ चे एक पत्र आहे [ पेद. २२ ले. २७९ ].

१४ जानेवारी १८११ या दिवशी यशोदाबाई रायगडावर काही दिवसांच्या आजाराने मरण पावल्या. त्यांची क्रिया वेदमूर्ति चिंतामण दीक्षित कर्वे उपाध्ये यांनी पुण्यास केली. दहन रायगडावर झाले. अस्थि काढून पुण्यास नेल्या. अस्थि नेण्यास भास्कर दीक्षित कर्वे उपाध्ये व बाळाजी मल्हार बापट यांस पाठविले होते. दोन ब्राह्मणांनी अस्थि वाहून पुण्यास आणल्या. सातवे दिवशी अस्थींस मंत्राग्नि पुणे येथे झाला व त्या दिवसापासून पुण्यास क्रिया सुरू झाली. सबंध वर्षाचा याबाबतचा खर्च

३३०५१ रु. झाला [ पुण्यपेरो. पृ. ५४ ते ५९ ]. आलेरच्या वैभवशाली पेशव्याची दुर्दैवी भार्या अशा तऱ्हेने मराठ्यांच्या प्रसिद्ध राजधानीत नजरकैदेत मृत्यू पावली.

इ. स. १८११ च्या फेब्रुवारीत बाजीरावाने साताऱ्याच्या छत्रपतीस व राणीस दोन पत्रे लिहिली आहेत; त्यांत रायगडचा उल्लेख आहे. यावर्षी यशवंतराव होळकर जेजुरीस खंडोबाचे दर्शनास येण्याचे घाटत होते. तो आला, तर मोठाच उत्पात होण्याचा संभव आहे असे पेशव्यास वाटत होते. तो छत्रपतीस व राणीस लिहितो की 'होळकर आल्यास मी स्वतः सुवर्णदुर्गास जाईन. सातारा जागा नाजुक. पलकुसळीत सहायका-लोभी असो: राजे शिवाजी महाराज यांनी रायगडासारख्या जागा करून ठेवली केल्या. प्रसंगाने दिवसांत साताऱ्यास स्वारी रहाणे हे माझे न रु. सदाशिव माणकेश्वर यांचे विचारास येत नाही. रायगड जागा चांगली मजबूत. कोणी दुष्टोक्ती तेथे फौज पाठवून नजर आणू किंवा असेही करू, तर होणार नाही. कदाचित यशवंतराव होळकर लढाईच्या इराद्याने येऊन दगेबाजी करू लागल्यास, ते मजकूर नौबतीस जाय, तोपावेतो रायगडास महाराजांनी कुटुंबसुद्धा आनंदात असावे. मजकूर शांत झाल्यावर मग साताऱ्यास यावे. याचे मनन करून हे प्रसन्न बाहेर कोठे न फोडता आलोचना यावे' [ पेद. ले. ४१४, फडसंपदा, पृ. ४४९–४४६ ]. ही दोन पत्रे बाजीरावाचा भित्रेपणा व रायगडचा दुर्गमपणा या दोन्ही गोष्टी स्पष्ट सूचित करतात.

रायगडवर महाराष्ट्रांतील आणखी एक महान् व्यक्ति काही काळ कैद अनुभवीत होती; ती म्हणजे छत्रपतींचा चुलत भाऊ चतुरसिंग भोसले हा होय. त्याच्यासाठी झालेल्या रायगडवरील खर्चाची पुढील यादी पहा —

५३॥≈॥। भोजनखर्च असामी २ एकूण जिनसी, त्यांची किंमत.

२४≈॥।- वजन वस्तू - तूप, तेल, लसूण, मिरच्या, हळद इत्यादि.


।।≈।- औषधखर्च.

२०॥।॥ चौकीपहाऱ्यास, दिव्यास तेल— १ वर्षांचा खर्च.

१३।≈ कापड वगैरे.

यावरून अनुमान करता येईल की इ. स. १८१३–१४ मध्ये चतुरसिंग रायगडावर सुमारे एक वर्ष तरी कैदी म्हणून होता. त्याने रायगडच्या आपल्या बंदीवासांत आवणी केली; तिचा चार आणे खर्चही रायगडच्या खर्चात नोंदलेला आढळतो [ अप्र. कागद प. नं. ८१, ८५ ].

मराठ्यांच्या ऐन वैभवाच्या दिवसांत शिवछत्रपति, संभाजी राजे, मातुश्री जिजाबाई, गागाभट्ट, भूषण, प्रतापराव गुजर इत्यादि मराठ्यांच्या इतिहासांतील आदरणीय माणसें नांदलीं, तीच परंपरा इ. स. १८१८ पर्यंत रायगडावर चालू असल्याचें दिसतें. प्रथम सांगितलेली माणसें स्वराज्याच्या सूर्योदय पहात होती. नंतरची माणसें स्वातंत्र्याच्या पडत्या काळचे दिवस अनुभवीत होती. पडझड मात्र होत, तोच होता !



# २६ रायगडवरील स्वातंत्र्यसूर्य मावळला

इ. स. १८१५ पासून स्पष्ट दिसू लागले की मराठयांचा शेवटचा, निष्क्रिय, दुबळा आणि अपेशी पेशवा इंग्रजांच्या मगरमिठीतून सुटण्याची शेवटची धडपड करणार ! त्याच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवण्यासाठी इंग्रजांनी खडकी येथे एल्फिन्स्टन या मुत्सद्यास इ. स. १८११ पासून नेमले होते. ४ ऑक्टोबर रोजी तो लिहितो ' बाजीराव रायगडास रुपये व सरंजाम पाठवीत आहे. लढाईचा इरादा उघड दिसून येत नाही; अंतर्यामी मात्र त्याचा युद्धाचा हेतु आहे. तो फौज जमवीत असून दसऱ्यानंतर फौज राहिल्यास मी त्यास जाब विचारीन. सध्या, त्रिंबकजी डेंगळे व पेंढारी यांचे बंदोबस्तासाठी फौज आणली, असे त्याचे म्हणणे आहे ' [ शादवें. ले. ८७ पृ. १६२-१६३ ]. ज्या लढाया द्यावयाच्या, त्यांत रायगड शर्थीने झुंझवावयाचा, अशी बाजीरावची दृढ मनीषा होती. इ. स. १८१६ सप्टें. १२ चे पत्र म्हणते की बाजीराव त्रिंबकजी डेंगळ्यास सामील आहे, अशी इंग्रज सरकारची खात्री झाली, कारण बाजीरावाने त्र्यंबकजीस मामलतही सांगितली. त्यानंतर बाजीरावाने किल्ले पुरंदर, त्र्यंबक, सिंहगड व रायगड यांवर लढाईच्या सरंजामाची, गल्ल्याची व सैन्याची भरती केली. यामुळे त्याचे व इंग्रजांचे वैमनस्य वाढीस लागले [ राखं. ४ पृ. १२२ ]. त्रिंबकजी डेंगळयाचा व बाजीरावाचा स्नेह ही गोष्ट इंग्रजांना इतकी वावडी होती की त्यांनी इ. स. १८१७ मे ७ या दिवशी त्यास सक्त कळविले की एक महिन्यात त्रिंबकजीस आमच्या स्वाधीन करा व आम्हास तुमचा भरंवसा वाटावा, म्हणून

रायगड, सिंहगड, पुरंदर हे तीन किल्ले तात्काळ आमच्या स्वाधीन करा. तसे न केल्यास इंग्रजी सैन्य पुणे शहरास उपद्रव देईल. एल्फिन्स्टनच्या या पत्राने पेशव्यास उपाय उरला नाही. दिवाण सदाशिव माणकेश्वर याचा कारकून बाळाजीपंत या तीन किल्लयांच्या सोडचिठ्या घेऊन एल्फिन्स्टनकडे गेला व ते आपल्या ताब्यात घेण्यासाठी इंग्रजी फौजा रवाना झाल्या [ राखं. ४ पृ. १२४-१२५ ]. या चिठ्या देतानाहि बाजीरावाचा आडमुठेपणा प्रकट होत होताच ! त्या दिवशी रात्री इंग्रजी सैन्याने पुण्याची पूर्ण नाकेबंदी केली. तोफा शहराकडे रवाना केल्या. एवढा देखावा पाहिल्या-वरच बाजीरावाने या चिठ्या देवविल्या होत्या [ ऐसंसाखं. ३ पृ १४६-ले. १२९ ]. सोडचिठया दुसऱ्या दिवशी म्हणजे ८ मे १८१७ रोजी इंग्रजांच्या हाती पडल्यावर इंग्रजांनी पुण्याची नाकेबंदी उठविली. इ. स. १८१७ च्या आगस्टमध्ये पेशवा पंढरपुरास व तेथून कृष्णातीरी गेला. श्रावण महिन्यात माल्कम व पेशवा यांची भेट झाली. माल्कमने पुरंदर, रायगड व सिंहगड हे तीनही किल्ले पेशव्यास परत देवविले [ राखं. ४ पृ. ७२; मंइश. १८३५ पृ. ३९३ ].

रायगड पुन्हा पेशव्याच्या हातीं आला. तेव्हा, म्हणजे इ. स. १८१७ मध्ये नारो गोविंद आवटी हा रायगड तालुक्याचा मामलेदार होता. त्याने लोकांवर बराच जुलूम केल्याच्या हकीकतीचे कागदपत्र उपलब्ध आहेत [ अप्र. कागद रु. नं. ८७, ८९ ]. २३ एप्रिल १८१७ रोजी बाजीरावाने त्यास वाड्यात बोलावून आज्ञा केली की, ३०० पायदळ नवे ठेऊन रायगडच्या बंदोबस्तास सिद्ध व्हावे [ पेद. ४१ ले. १०० ]. सह्याद्रींतील अनेक किल्लेदारांना ताकीदपत्रे पाठवून इंग्रजांची रहदारी बंद करण्यास त्याने हुकूम सोडले. अहद मढाघाट, तहद सोनगड कोकणकडील प्रदेशाचा बंदोबस्त त्याने करविला [ राखं. २५ ले. ८९ ]. यापुढे पुणे हे ठिकाण धोक्याचे, असे जाणून त्याने आपले जडजवाहीर, पैसा व मौल्यवान चीजवस्त सिंहगड, रायगड वगैरे ठिकाणे सुरक्षित समजूत तेथे पाठवून दिली थोरली भार्या वाराणशीबाई व वाड्यांतील देव यांची रवानगी इ. स. १८१७ जून १२ या दिवशी त्याने रायगडावर केली [ राखं. ४ पृ. १३८, १३९ ].

इंग्रजांना या गोष्टींचा अर्थ कळत होता. त्यांनी इ. स. १८१७ च्या नोव्हें-बरमध्ये विसापूर व लोहगड हे किल्ले ताब्यांत घेतले; भोरकडील घाटांच्या खिंडी हालचालींच्या दृष्टीने निष्प्रतिबंध केल्या व कुवारीचा किल्ला कबजात घेऊन मावळां-तील सर्व मार्ग आणि घाटचौक्यांवर आपली सत्ता दृढ केली. मग १७ मार्च १८१८ रोजी लेफ्टनंट कर्नल प्रॉथर याने कोकणातील सर्व मजबूत किल्ले हल्ला करून घेण्याचे ठरविले [ कुगॅप्ट. ३७५ ].

इ. स. १८१७ डिसेंबर १७ व्या दिवशी बाजीरावास [illegible] की पुण्याहून येऊन इंग्रजी सैन्य रसाळगडावर गेले. त्याने लिहिले, 'रसाळगडचा [illegible] [illegible] हेच्यास; किल्ला मुंबईनाका, कोकणात [illegible] सुदृढ आहे. पण [illegible] [illegible] [illegible] असून तेथील सरंजाम पोसत आहे.' [ दिनसा. ख. ? पृ. ८ ; के. [illegible] ]. इ. स. १८१८ च्या आरंभी, मराठ्यांचे रत्नागिरी जिल्ह्यांतील किल्ले जिंकीत व दक्षिण कोकण आपल्या कबजात घेत घेत इंग्रजी सैन्य रायगडच्या रोखाने [illegible] [illegible] होते. त्यास साथ देण्यास मुंबईचे इंग्रजी सैन्य उत्तर कोकणात माणगाव [illegible] दाखल झाले. एप्रिल २० च्या सुमारास कर्नल प्रॉथर याने माणगाव [illegible] [illegible] व दक्षिणेकडील व उत्तरेकडील सैन्याचा रोख रायगड तालुक्यावर स्पष्ट दिसू लागला. रत्नागिरी जिल्ह्यांतून जे सैन्य रायगडाकडे येत होते, तीत [illegible] ८९ व्या पलटणीचा भरणा होता. ही पलटण १८१८ च्या मार्चमध्ये बाणकोट येथे आली व तिने कर्नल प्रॉथर यास रायगड घेण्यास मदत करण्याचे ठरविले.

रायगड हा अखिल भारतातील एक दुर्भेद्य किल्ला ! त्याच्या संरक्षणार्थ एक [illegible] शिबंदी रायगडावर असून तीत अरबांचा भरणा होता. [illegible] [illegible] बाजीराव ओळखत होता. त्यांच्या दुर्भेद्यतेची त्याला खात्री होती. [illegible] कडवेपणाबद्दल व त्यांच्या तिखट तलवारीबद्दल त्यास विश्वास होता. म्हणूनच त्याने [illegible] बरेच जडजवाहीर देऊन रायगडावर धाडले होते. त्यायोगे रायगड झुंजविण्याची केवढी जरूरी आहे याची जाणीव किल्लेदार व शिबंदी यांस झाली होती [ Blacker ३१० ].

रायगडावर हल्ला करण्यापूर्वी आसमंतातील लहान ठिकाणे ताब्यात घेणे जरूर होते. ती घेण्यास व रायगड वेढण्यास जरूर तेवढे सैन्य १८१८ च्या [illegible] आरंभी कर्नल प्रॉथरजवळ नव्हते; म्हणून मुंबईहून, काही सैन्य बोरघाट ओलांडून त्याचे मदतीस निघाले. इ. स. १८१८ एप्रिल १२ व्या दिवशी रायगड घेण्यासाठी वाढलेली दोन इंग्रज सैन्ये वाली येथे एक झाली. त्यांनी १४ पर्यंत तळे [illegible] [illegible] [illegible], इंदापूर, मानगड ही ठिकाणे घेतली. इंग्रजांच्या हाती पडून ८९ वी पलटण रायगडकडे निघाली. तीस गायकवाडाने घोडदळ मदत करीत होते; ते ता. २३ एप्रिल रोजी इंदापूरहून महाडकडे निघाले.

या पलटणीवर मेजर हॉल हा मुख्य अधिकारी होता. एप्रिल २३ रोजी रात्री त्याने १०० युरोपियन व तितकेच एतद्देशीय लोक यांच्या दोन टोळ्या केल्या व स्वतःच त्या टोळ्या घेऊन निघाला. ता. २४ रोजी सकाळी मेजर हॉल [illegible] पायथ्याशी येऊन पोहोचला. घोडदळ महाडकडे व स्वतः मेजर हॉल [illegible], [illegible]

[illegible] सैन्य [illegible] शिंदयांनी [illegible] [illegible] दलितराची केवळ बढाईच करावयाची होती. [illegible] संरक्षणास १०७ मराठे सैनिक सज्ज आहेत व त्यांच्यावर तावडतोब हल्ला करणे जरूर आहे, हे जाणून त्याने [illegible] पेठेवर हल्ला केला. त्यातील ६० मराठे ठार पडले, इंग्रजांकडील [illegible] ६ माणसे जखमी झाली. मराठी सैन्यास पिटाळून मेजर हॉकने पाचाड आपल्या ताब्यात घेतले, पण तळ [illegible] हत्तीने पाचाड [illegible]; कारण तेथे [illegible] पाण्याचा तुटवडा पडला होता; म्हणून ६ मैल [illegible] त्याने पाणी [illegible] ठिकाणी तळ दिला. त्याच्या तळाचे ठिकाण बहुधा कोंझर असावे. या सैनिकांस थोडे [illegible] मिळाले. त्याने मराठ्यांकडील काही उंट, घोडे व २ हत्ती पकडून आणून मेजर हॉकच्या स्वाधीन केले [ Blacker पृ. २८१; ग्रँट डफ, ३७९ ]. [illegible] [illegible] [illegible] [ ग्रँट डफ, ३७९ ]. [illegible] [ ग्रँट डफ, ३७९ ].

[illegible] [ Blacker पृ. [illegible] ग्रँट डफ, [illegible] ]. [illegible]

[illegible]

रायगडला वेढा पडल्याची बातमी कांगोरी व प्रतापगड येथे पोहोचताच तेथील मराठी सैन्य रायगडच्या मदतीस धावले. पोटल्याच्या डोंगराकडून कर्नल प्रॉथर आपला मोर्चा लागू करणार होता; त्याच्या पिछाडीस मराठी सैन्य येऊन उतरले. पण महाड येथे संरक्षणार्थ ठेवलेल्या लेफ्टनंट क्रॉस्बी याच्या तुकडीने या सैन्याचा समाचार घेतला; त्यांची मदत रायगडास पोहोचणे अशक्य झाले. लेफ्टनंट क्रॉस्बी याने या परतलेल्या सैन्याबरोबर पोलादपूर येथे एक सामना देऊन त्याचा मोड केला व रायगडच्या वेढ्याबाबतचा धोका पूर्ण नाहीसा करून टाकला [ Blacker पृ. ३१२ ].

४ मे १८१८ नंतर दोन दिवसातच वर सांगितलेल्या चकमकी सुरू झाल्या व संपल्या ! यावेळी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी बाजीरावाची भार्या सौ. वाराणशीबाई हिला निरोप पाठविला की त्यांना रायगड सोडून जावयाचे असल्यास निर्धास्तपणे जाता येईल; पण वाराणशीबाईने जाण्याचे नाकारले. मग इंग्रजांच्या तीव्र तडाख्यास प्रारंभ झाला. तसे तडाखे रायगडने प्रथमच अनुभवले असतील !

६ मे रोजी दुपारी ४ वाजता इंग्लिशांच्या तोफेतील एक आठ इंची गोळा पडून फुटला व त्यायोगे रायगडावरील वाराणशीबाईच्या निवासस्थानासच आग लागली. ही आग भडकत चालली. त्यामुळे किल्लेदाराचे असे मत पडले की इंग्रज अधिकाऱ्यांनी वाराणशीबाईस जाण्याची जी परवानगी दिली आहे, तिचा तिने पुन्हा विचार करावा. शरणागति पत्करण्याचे वाराणशीबाईने ठरविले व कलमे ठरू लागली [ Blacker पृ. ३१२ ].

ता. ७, ८ व ९ या तीन दिवसांत वाटाघाटींचे पर्व चालू असता मारा बंद ठेवणे इंग्रजांचे कर्तव्य होते. पण ८ मे सकाळ १० वाजेपर्यंत मारा चालूच राहिला. दहा वाजता किल्ल्यावरील आरबशिबंदीवरचा अधिकारी शेख अबु स्वतः तहाचे बोलणे पुरे करण्यास गडाखाली वाडी येथे आला; तरीही हा तोफांचा मारा ९ मे दुपारचे ३ वाजेपर्यंत चालूच राहिला. तहाबाबत दडपण आणण्याचा हा प्रकार होता. ३ वाजता तहाच्या अटी ठरल्या व मारगिरी पूर्ण बंद पडली. शरणगतीच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

( १ ) मराठा सैनिकांस आपली शस्त्रे व खाजगी मालमत्ता बरोबर घेऊ द्यावी. ( २ ) किल्लेदार शेख अबु व त्याचे नोकर यांस पुण्यास रहाण्याची परवानगी असावी. ( ३ ) जखमी सैनिक बरे होईपर्यंत पुण्यास रहावेत. ( ४ ) वाराणशीबाईने आपल्या नोकरांसह पुण्यास रहावे. तिला आपली खाजगी मालमत्ता बरोबर घेण्यास परवानगी असावी [ Blacker पृ. ३१२-३१३ ].

ता. १० मे १८१८ या दिवशी दुपारी कर्नल प्रॉथर रायगडावर गेला. किल्ल्यातील शिबंदी रांगेने त्याचे समोरून खाली उतरली. १०० इंग्रज शिपायांनी रायगडच्या महादरवाजाचा ताबा घेतला. किल्ल्यावर वाराणशीबाईच्या व किल्लेदाराच्या नोकरांशिवाय कोणीही राहिले नाही. किल्ल्यावरील एक घर व एक धान्याचे कोठार तेवढे इंग्रजांच्या अग्निवर्षावांतून बचावले होते. मराठा शिबंदी झोपड्यातूनच रहात होती. शिवछत्रपतींचा राजवाडा पूर्णपणे उध्वस्त झाला होता. किल्ल्यावर सर्वत्र भग्न इमारतींचे अवशेष दिसत होते. गडावरील रस्ते, हारीने असलेल्या सुंदर इमारती, मंदिरें भग्न झाली होती. शिवछत्रपतींची समाधी भग्न झाली होती; पण प्रयासाने ओळखू येण्यासारखी होती. ही पडझड जितकी इंग्रजाच्या तोफखान्यामुळे, तितकीच मराठी सत्तेने दुर्लक्ष केल्यामुळे झाली होती. प्रॉथरचे मत झाले की रायगडच्या पूर्वीच्या वैभवाचे अवशेष शोधूनच काढावयास पाहिजेत! अनेक इमारतींची अक्षरश: राखरांगोळी झालेली होती. रायगडचे समग्र वर्णन देता येण्याजोगी परिस्थिति १० मे १८१८ रोजीच उरली नव्हती! रायगडवरील दप्तरखाना जळून खाक झाला होता [भाइसंमंइवृ. शके १८३५ पृ. ४२०].

संध्याकाळी कर्नल प्रॉथर याने वाराणशीबाईची रायगडावर आदरपूर्वक भेट घेतली. त्याचेबरोबर काही इंग्लिश अधिकारी या भेटीच्या वेळी हजर होते. अग्निगोलकांच्या वर्षावाने भस्मसात् झालेल्या इमारतींच्या फुफाट्याशेजारी ती बसली होती. तिचे रहाते घर धुमसत होते. पडवीवजा भागांत आता तिचे वास्तव्य होते. पण आपल्या दर्जास शोभेशा वृत्तीनेच ती वागत होती. पुण्यास जाताना हत्ती, उंट यांचा लवाजमा तिजबरोबर देण्यात आला.

शरणागतीच्या सर्व अटी पूर्ण करण्यात आल्यावर १० मे १८१८ रोजी इंग्रजांनी रायगडचा ताबा घेतला. [कुगॅपृ. ३७६; Blacker पृ. ३१६].

१० मे १८१८ किंवा ११ मे १८१८ रोजी वाराणशीबाईची पुण्यास रवानगी झाली. तिने आपली खाजगी मालमत्ता बरोबर घेतली. तिचेबरोबर १०० संरक्षक देण्यात आले व पुण्यांतील विश्रामबागवाड्यांत ठेवण्यात आले. इंग्रजांनी रायगड आपल्या ताब्यांत घेतला, तेव्हा तेथे त्यांस ५ लाख रूपये रोख इतकी सम्पत्ती मिळाली [कुगॅपृ. ३७६; ऐसंसाखं. ३ पृ. १४९ ले.१२९]. कर्नल प्रॉथरने आपल्या ब्रिगेड ऑर्डर्समध्ये १२ मे १८१८ रोजी लिहून ठेवले आहे की, लेफ्टनंट रेमन, एन्साइन्स जॉप व ड्रॅश वूड हे माझ्या तोफखान्यावरील यांत्रिकांच्या पलटणीत रायगडच्या हल्लयात मजबरोबर काम करीत होते. मेजर बॉड याच्या हाताखाली त्यांनी शिस्तबद्ध काम केले. त्यांचा उत्साह, लायकी व वर्तन उल्लेखनीय होते, पोटल्याच्या डोंगराइतक्या

[illegible] क्रूर आणि त्याबद्दल [illegible] होता. त्या अवघड कामी घोरपडे यांची ही फौज मोठीच सोईस्कर झालेली होती.

यानंतर [illegible] पडला. रायगडच्या [illegible] केवळ इंग्रजांचे विजयी सैन्य ता. २३ मे रोजी [illegible] इंग्रज सैन्याचा [illegible] महाड येथे होता [ कुर्टे. १९३ [illegible] Blacker पृ. ३१४ ].

पाचाडकर, [illegible], वाळोदा या [illegible] [illegible] व [illegible] [illegible] [ [illegible] पृ. १७१ ते १७३ ].

रायगडासंबंधी [illegible] महाराजांचे नाव बहुतेक आले आहे. त्यामध्ये इंग्रज [illegible] इतके पुष्कळ आहेत की, त्याच्या [illegible] स्वरूपातही [illegible] नाही. [illegible] रायगडाच्या [illegible] जो [illegible] आहे, तो [illegible] आहे. [illegible] [illegible] अनेकांस उपलब्ध झाले होते. ते [illegible] आहे [illegible] [illegible] १५० वर्षांचा [illegible], [illegible] नाव [illegible] होईल, असा प्रयत्न करणे जरूर आहे.



# २७ रायगड-इतिहास:

इ. स. १८१८ पर्यंतचा रायगडचा इतिहास क्रमाने सांगितला. त्यांत ज्या हकीकतींचा अंतर्भाव झाला नाही, त्या येथे क्रमाने देत आहोत.

( १ ) इ. स. १६७१ सप्टें. १५ – शिवाजीने सातारचा किल्ला घेतला व अनर्गळ लूट रायगडावर बैलांवरून नेली [ पसासं. १५६३ ].

( २ ) इ. स. १६७० जून ११ – शिवाजी राजापूरहून रायगडाकडे गेला [ पसासं. १५५८ ].

( ३ ) इ. स. १६७१ मार्च ३१ – शिवाजीचे देशाधिकारी प्रांत जावळी यास पत्र की चाफळ येथे श्रीरामदासस्वामी यांस १२१ खंडी गल्ला राजाजीने पाठविले. यापुढे आम्हा पत्र दफ्तरासुद्धा अगर ताणमुद्रा पाहू नये, असे दिनकर गोसाव्यानी लिहिल्याचे कळले. राजांनी त्याबाबत चौकशी केली. दिनकर गोसाव्यानी कळविले की जी मिळकत आहेत, त्यातील हेच राजांची मर्जी म्हणून घेतात [ श्रीरासं. १४, पसासं. १८६४ ].

( ४ ) इ. स. १६७५ जून २१ – शिवाजी राजे रायगडावर आहेत [ पसासं. १८५४ ].

( ५ ) इ. स. १६७६ जुलै ४ – मोरोपंत पिंगळे पिंडोलच्या रक्षणार्थ चार हजार लोक देऊन रायगडास गेला [ पसासं. १८५९ ].

( ६ ) इ. स. १६७७ एप्रिल ७ – मोरोपंत पिंगळ्यांचे चौलच्या देसाई-कुलकर्ण्यास पत्र की आपणाकडे दहा चौलास येत नाहीत. आम्ही रायगडाहून पंचवीस स्वार होऊन चौकास देत आहोत [ शिवचसासं. ९ ले. ५६ ].

(७) इ. स. १६७८ जाने. १६–शिवाजी रायरी येथून वीस हजार स्वार व चाळीस हजार पायदळ घेऊन कर्नाटकात गेला. तेथे त्याला अलोट संपत्ति व प्रदेश हस्तगत झाला [ पसासं. २००७ ].

(८) इ. स. १६७८ मे ११ ते जून ९– गदग प्रांत काबीज करून शिवाजी रायगडास परतला [ शिचप्र. पृ. २९ जेधे शकावलि ].

(९) इ. स. १६७९ जाने. २८– रायगडास भूमिकंप झाला [ शिचप्रपृ. २९ ].

(१०) इ. स. १६७९ मार्च ११– रायगड येथे तरवारीतून ज्वाला निघाल्या [ शिचप्र. पृ. २९, ३० ].

(११) इ. स. १६७९ ऑक्टो. २५ ते नोव्हें. २३ – शिवाजीने जालनापूर लुटले व तेथे रणमस्तखानाशी झुंज देऊन फत्यावरून तो रायगडास परतला [ शिचप्रपृ. ३० ].

(१२) इ. स. १६८० आगस्ट २– दाभोळ येथे मोत्यांची वृष्टी झाली. ५ रोजी संभाजीने ती रायगडवर आणवून पाहिली [ शिचप्रपृ. ३१ ].

(१३) इ. स. १६८० आगस्ट ३१– संभाजी रायगडावर आहे. [ पसासं. २२७२ ].

(१४) इ. स. १६८० ऑक्टो. २५- संभाजी केळशीहून रायगडास परत आला [ शिचप्रपृ. ५३; ऐ. वर्ष ९ अं. १ पृ. ५ ].

(१५) इ. स. १६८० नोव्हें. १० – शिवाजीचे १ सैन्य रायगडावरून निघून मोगली प्रदेशांत पसरले [ HS पृ. २१८ ].

(१६) इ. स. १६८२ डिसें. – अंतकाल सन्निध जाणून समर्थांनी संभाजीस उपदेश केला [ श्रीसांले. ४३ ]

(१७) इ. स. १६८४ मे १८ – कविकलश रायगडावर आला.

(१८) इ. स. १६८४ ऑक्टो. २९ – मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत, राहुजी सोमनाथ यांस संभाजीने रायगडावर कैदेत ठेविले.

(१९) इ. स. १६८४ नोव्हें. ७– कब्जी रायगडास येतो [ शिचप्रपृ. ३३ ].

(२०) इ. स. १६८९ पूर्वी – सिलीमकर देशमूख तर्फ गुंजणमावळ यांचा आपसांत देशमुखीसंबंधी कलह उत्पन्न झाला. छत्रपति संभाजी याने त्यांस रायगडावर बोलावून घेतले. हैबतराव सिलीमकर रायगडास गेला. संभाजीने त्यास सांगितले की तुझा एक मुलगा येथे ओलीस ठेव. त्याने चंद्रराव सिलीमकर यास धाडले व स्वतः मात्र पळून मोगलाकडे जाण्याचे ठरविले. चंद्ररावची आई हैबतरावास म्हणाली की मी


मुलाकडे जाते. हैबतरावाने खोटेच सांगितले की मुलास रायगडवरून आणण्यास माणसे गेली असून तो वारंगीचे खिंडीस आला आहे. तीं दोघें वारंगीचे खिंडीस आलीं, पण तेथे चंद्रराव नाही असे पाहून त्याची आई जीभ हासडून प्राण देऊ लागली. तेव्हा हैबतरावाने सांगितले की एक लेक भोसल्याच्या दाढेस दिला. तो वाचून आला, तर त्यास निम्मे देशमुखी देईन. बायकोस घेऊन हैबतराव मोगलाईत गेला, ही गोष्ट संभाजीस रायगडावर कळली. त्याने चंद्ररावाची बेडी तोडली व तोफेच्या तोंडी देण्यास हुकूम केला. तेव्हा सभानायकांनी संभाजीस विनंती केली की आठदहा वर्षांचे ल्हान मूल; त्याचा गुन्हा काय ? त्यास तोफेच्या तोंडी दिल्याने मोगलाकडे गेलेला बाप थोडाच परत येणार ! संभाजीने त्यास पुन्हा बेडी घालून कैदेत ठेविले. तो सुटून अर्ध्या वतनाचा धनी झाला [ शिवसाखं. २ ले. २५८ पृ. २५६, २५७ ].

( २१ ) इ. स. १७५५ ? – तुळाजी आंगरे यास पत्र की रायगड, महाड, यशवंतगडास उपद्रव दिल्यास तुमचे पारिपत्य करू [ पेद. २४ ले. १४५ ].

( २२ ) १७५६–५७ – आनंदराव बहिरव रायगडास गेले होते, ते दुखणें लागून परतले [ ऐसंसाखं. १ पृ. २४ ले. १९ ].

( २३ ) इ. स. १७५९ एप्रिल २२ – राघोजी आंगऱ्याचे पेशव्यास पत्र की उंदेरीच्या मोर्चेबंदीसाठी व आवास, मांडवें, रेवस इत्यादि गावांच्या बंदोबस्तासाठी रायगडचे लोक आणले आहेत [ कासंपया. पृ. १५९ ].

( २४ ) इ. स. १८१० फेब्रु. २ – दुसऱ्या बाजीरावाचा मुक्काम रायगड येथे [ दुबापेरो. पृ. ३१८ ].



# १९ १८१८ नंतरचा रायगड

रायगडच्या जीवनकथेच्या महत्त्वपूर्ण विभागाचे दिग्दर्शन संपवून आपण उत्तरकालाकडे येत आहोत. रायगड तालुक्यात इंग्रजी अंमल बसला, त्यावेळी नारोपंत आपटे सुभेदार होता; त्यास व कंपनीने आपला अधिकारी म्हणून नेमले.

इ. स. १८४६ मध्ये रायगडजवळील डोंगराळ भागात मोत्यांचा पाऊस पडला, काही मोत्ये नारळीच्या आकाराएवढी व काही त्याहून थोडी मोठी व पोकळ होती. तसेच, १८६२ मध्ये रायगड तालुक्यात भूकंप होऊन काही गावी आकाशातून फार मोठ्या गारा पडल्या, असे दोन नोंदी नाते येथील प्रसिद्ध देशमुखदप्तरा-मधील नमूद आहेत.

इंग्रजी अंमल झाला, तरी पूर्वप्रथा बदलल्या नव्हत्या. इ. स. १८६१ मध्ये तालुक्याची प्रथमच "पैमाष" पाहणी सुरू झाली. इ. स. १८६६ मध्ये रायगड तालुक्याचे नाव बदलून 'महाड तालुका' अस्तित्वात आला.

रायगडच्या उध्वस्त किल्ला संरक्षणाच्या ताब्यात जाऊन तेथे वस्ती झाली नाही. शिवकाळात किल्ला हे सत्तेचे स्थान होते. इंग्रजी अमलात सत्ता सपाट प्रदेशात आली व किल्ल्याचे राजकीय महत्त्व नष्ट झाले. 'रायगड तालुका' हे नाव असेपर्यंत लोकांस रायगडचे स्मरण होते. पण महाड हे तालुक्याचे ठिकाण झाल्यावर चारदोन धनगरांचे निवासस्थान या पलीकडे रायगडाला महत्त्व राहिले नाही.

इ. स. १८८३ पर्यंत रायगडावर कोणी प्रवासी चढून गेल्याचे आढळत नाही; इतके विलक्षण औदासीन्य लोकांत पसरले. डग्लसने बुक ऑफ बॉम्बेमध्ये म्हटले आहे की ह्या कालपर्यंत एकाच इंग्लिश स्त्रीने रायगडचा प्रवास केला होता. मुंबईहून नागोठण्यापर्यंत बोटीने जावयाचे; तेथून टांग्याने खडखडत, चढउताराच्या रस्त्यामुळे शरिराला हिसके बसताहेत अशा स्थितीत हा प्रवास करावयाचा. नागोठण्याहून पहाटे चार वाजता प्रवासास प्रारंभ होई. मार्गांत धुके पसरले आहे, सकाळच्या हवेतील थंडावा जाणवत आहे, अशा स्थितीत प्रवास घडे (पृ. ३९८, ३९९). गड दाखविण्याचे काम पाचाडचा मुजावर सैद महमद किंवा वाडी येथील श्रीधर भगवान शेट सोनार यांपैकी कोणीतरी करी. श्रीधरशेट रायगडबद्दल व शिवाजीबद्दल अनेक असंबद्ध दंतकथा सांगे [ कुगॅप्र. ३६२ ].

इ. स. १८८५ मध्ये प्रथमच, रायगडसंबंधी तुरळक उल्लेख वर्तमानपत्रांतून येऊं लागला. जंगलखात्याचे ताब्यांत असलेली महाराजांची समाधि मोडकळीस आल्याचे जाहीर होऊ लागले. एतद्देशीय माणसें व युरोपियन अधिकारी गड व समाधि पाहून जाऊ लागली. मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल एकदा रायगड पाहून गेले; त्यांचेबरोबर रेव्हिन्यु कमिशनर क्रॉफर्ड, कॅप्टन पिट वगैरे अधिकारी मंडळी होती. यावेळी सर रिचर्ड टेंपलने रायगडच्या देखाव्याची अनेक चित्रें रेखाटून बरोबर नेलीं. समाधीची भग्नावस्था पाहून सर रिचर्ड यास खेद झाला. तिच्या दुरुस्तीसंबंधीच्या सूचना त्याने आपल्याबरोबर आलेल्या अधिकाऱ्यांस दिल्या व कुलाब्याच्या कलेक्टरलाही याबाबत पत्र लिहिले.

यामुळे समाधीची दुःस्थिति सर्वत्र जाहीर होऊन वर्तमानपत्रांत बरीच चर्चा होऊ लागली. याच सुमारास सर जेम्स डग्लस यांचे बुक ऑफ बॉंबे हें पुस्तक प्रसिद्ध झाले; त्यांत त्यांनी या विषयाचा ऊहापोह केला व कोल्हापूरकर आणि सातारकर छत्रपतींनीं समाधीकडे आजवर दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांस दोष दिला [ रारा. पृ. ९३, ९४ ].

इ. स. १८८७ मध्ये गोविंद बाबाजी वरसईकर जोशी यांनी आपले रायगड किल्ल्याचे वर्णन हें पुस्तक प्रसिद्ध केले; त्यांत महाराजांच्या समाधीची दुरुस्ती व छत्री बांधण्यास लागणाऱ्या खर्चाचा अंदाज जाहीर केला. त्यांचे मते ४५०४६ रु. वरील गोष्टींस लागणार होते. तसेच, रायगडवर जाण्याचा मार्ग व जगदीश्वराच्या प्रासादाच्या दुरुस्तीस ५५०४६ रु. खर्च लागणार होता. रायगडावरील नित्य खर्च–१ पूजासाहित्य, २ दरमहा महानैवेद्य, ३ मंदिरांत नंदादीप, ४ समाधीपुढे तुपाचा दिवा व नोकरांचा पगार यांस वार्षिक खर्च २५५० रु. असा त्यांचा एकूण अजमास होता [ राकिव.

पृ. ७१ ते ७६ ]. श्री. जोशी यांनी नेटिव्ह ओपीनियन वगैरे पत्रांतून या गोष्टीस तोंड पाडले. त्याच सुमारास लॉर्ड रे यांना छत्रपतींच्या समाधीचा जीर्णोद्धार सरकारी खर्चाने व्हावा, अशी शिफारस केल्याचे प्रसिद्ध झाले. त्यावरून, रायगडवरील समाधीच्या दुरुस्तीप्रीत्यर्थ दरसाल पाच रुपये खर्च करण्यास सरकारी मंजुरी मिळाली !

इ. स. १८९५ पर्यंत समाधीच्या दुरुस्तीचे प्रकरण रेंगाळत होते. एप्रिलमध्ये कै. लोकमान्य टिळकांनी शिवस्मारकाचा प्रश्न हाती घेऊन केसरीतून लेख लिहिण्यास प्रारंभ केला. त्यामुळे समाधीच्या दुरुस्तीसाठी वर्गणी जमविण्याच्या प्रश्नास जोर आला. महाडकर मंडळीनी ठरविले की इ. स. १८९६ मध्ये रायगडवर जाऊन शिवछत्रपतींचा उत्सव साजरा करावयाचा. त्या दृष्टीने कोणत्या सोयी केल्या पाहिजेत, याची चर्चा सुरू झाली. कै. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनी समाधीच्या व्यवस्थेकरिता सालिना शंभर रुपये उत्पन्नाची व्यवस्था करण्याचे कबूल केले.

शिवस्मारकाचा विचार करण्यासाठी ३० मे १८९५ रोजी पुण्यास हिराबागेच्या मैदानात, लोकमान्यांच्या प्रेरणेने एक विराट् सभा भरली. पंतप्रतिनिधि, सेनापति दाभाडे, चाफळचे स्वामी, बापुसाहेब कुरुंदवाडकर, डॉ. विश्राम, बॅ. गाडगीळ, उरवड्याचे पोतनीस इत्यादि त्यावेळची मोठी माणसें सभेस हजर होती. न्यायमूर्ति रानडे यांनी सभेस संमतिदर्शक तार धाडली. या सभेंत एक कमिटी व कार्यकारीमंडळ नेमण्यात आले. कमिटीत ५०।५५ गृहस्थ असून, लोकमान्य, इचलकरंजीकर, बाळासाहेब नातु व सेनापति दाभाडे यांचे कार्यकारी मंडळ नेमण्यात आले. शिवछत्रपतींचे स्मारक म्हणून पुतळा उभा करण्यास एक लाख रुपये लागतील; समाधीवरील छत्रीस २५ हजार रुपये खर्च येईल, असा अंदाज बांधण्यात आला. वर्गणी जमेल तसे कमिटीने काम करावे असे ठरले. कोल्हापूरकर छत्रपतींनीही आर्थिक जबाबदारी उचलण्यास अनुकूलता दर्शविली. कै सयाजीराव गायकवाडांनी एक हजार रुपये रोख वर्गणी म्हणून धाडून दिले. मुंबईस अशीच एक सभा भरली. श्रीमत् शंकराचार्य यांनी समाधीस दहा रुपये वर्षासन नेमून दिले.

इ. स. १८९५ हे शिवस्मारकाच्या सभांचे वर्ष होय. कै. प्रो. भानु यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली सभा, रे मार्केटच्या मैदानात कै. सुरेन्द्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखाली कै. लोकमान्यांनी घेतलेली सभा, या त्यांतील उल्लेखनीय होत. कै. सुरेंद्रनाथ बानर्जी व कै. पंडित मालवीय यांची त्या सभेत भाषणे झाली या सभांमुळे महाडच्या मंडळींचा रायगडवर पहिला महोत्सव करण्याचा निश्चय दुणावला. त्यासाठी होणारा खर्च फंड जमा करून भागविण्याचे त्यांनी ठरविले. उत्सवाची तारीख २५ एप्रिल १८९६ ही जाहीर झाली. उत्सवांत येऊ पहात असलेल्या

अडचणींचा निरास कै. लोकमान्यांच्या प्रयत्नांनी झाला व ठरीव दिवशी उत्सव पार पडला.

ता. २४ एप्रिलपासून गडावर माणसें जमू लागली. बारा मावळचे प्रतिनिधि उत्सवास आले. गडावरील महत्त्वाच्या जागी माणसांची दाटी झाली. मेळ्याची पदे, कै. विनायकशास्त्री अभ्यंकरांचे कीर्तन, कै. शिवरामपंत परांजप्यांचे भाषण, कै. टिळकांचा समारोप, गंगासागराजवळ प्रसादाचे भोजन, छबीना इत्यादि कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. मालुसरे, कंक इत्यादींच्या वंशजांस मानाचे नारळ देण्यात आले. इ. स. १८१८ पासून १८९६ पर्यंतच्या सुप्तावस्थेनंतरचा हा पहिला उत्सव होय.

या कालापर्यंत शिवस्मारकाची रक्कम सोळा हजार रुपयांपर्यंत जमली व स्मारकाचे कार्य लवकरच होईल, अशी आशा दिसू लागली. पण कै. लोकमान्यांवर १८९७ मध्ये झालेला राजद्रोहाचा खटला स्मारकास मारक ठरला व इ. स. १९०६ पर्यंत प्रयत्नांच्या दृष्टीने खंड पडला. जमलेली रक्कम बँकेमध्ये सुरक्षित राहिली.

दरम्यान, इ. स. १९०० व १९०६ या वर्षी रायगडवर दुसरा व तिसरा असे दोन उत्सव साजरे झाले. दुसऱ्या उत्सवासाठी ५।६ शे लोकांचा मेळावा गडावर जमला होता. तिसऱ्या उत्सवाचे अध्यक्ष कै. दाजी आबाजी खरे सहकुटुंब गडावर आले होते. या दोन्ही उत्सवांस लोकमान्य हजर होते. कै. खरे कायदेमंडळाचे सभासद व स्मारकमंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्या विनंतीवरून लॉर्ड लॅमिंग्टन रायगडावर येऊन समाधीची परिस्थिति पाहून गेले. त्यांच्या प्रयत्नांनी समाधीच्या दुरुस्तीस पांच हजार रुपये व इतर सामान देण्याचे सरकारने १९०७ मध्ये मान्य केले.

पण १९०८ मधल्या लोकमान्यांवरील खटल्यामुळे हे कार्य १९११ पर्यंत पुन्हा मागे पडले १९११ मध्ये कै. खरे यांनी सरकारपुढे स्मारकाचा प्रश्न पुन्हा उपस्थित केल्यावर त्यांस कळविण्यांत आले की कबूल केलेली रक्कम द्यावयास सरकार तयार आहे. पण नकाशे, अंदाजपत्रक, स्मारकाचा प्रत्यक्ष खर्च, या गोष्टी सरकारमार्फत व्हावयास पाहिजेत. सरकारी उत्तर अडचणीचे वाटल्यामुळे लोकमान्यांची मुक्तता होईपर्यंत या कार्यास स्वल्पविराम मिळाला. दरम्यान, ज्या डेक्कन बँकमध्ये जमलेली स्मारकाची रक्कम ठेवण्यात आली होती, ती बुडाल्याने आणखी घोळ उत्पन्न झाला. सुटून आल्यावर लोकमान्यांना विलायतेस जावे लागले. ते परत आल्यावर १९२० मध्ये लवकरच मरण पावल्यामुळे स्मारकाचे काम रेंगाळले. कुलाबा जिल्हा-बोर्डाने मात्र, धर्मशाळेचें थोडेफार काम आपल्या अधिकारांत उरकले.

रायगडावरील चवथा मोठा उत्सव ३ एप्रिल १९२६ रोजी झाला. महाड येथे स्मारक मंडळाने तात्पुरतें उत्सवमंडळ बनविले होते. ता. २ पासून गडावर

माणसें जमू लागलीं. कै. तात्यासाहेब केळकर, कै. राजे लक्ष्मणराव भोसले, कै. डॉ. मुंजे, कै. डॉ. सावरकर, कै. नारायणराव गुंजाळ इत्यादि मंडळी उपस्थित होती. छत्रीची दुरुस्ती अर्धवट झाली होती. राजे लक्ष्मणरावांनी दोन प्रहरी समाधीची वेदोक्त पूजा केली व समाधीस महावस्त्रें अर्पण केली. त्या दिवशी शिल्पकार फडके यांनी बनविलेला शिवछत्रपतींचा अर्धपुतळा सिंहासनशिलेवर बसविला. शिल्पकार करमरकर यांनी केलेला ब्रॉंझचा प्रतिमाफलक मांडण्यात आला. दुपारी कुलाबा जिल्हा लोकल बोर्डामार्फत गडावर बांधल्या जाणाऱ्या धर्मशाळेची कोनशिला राजे लक्ष्मणराव भोसल्यांनी बसविली. या प्रसंगी राजांनी धर्मशाळेला १५१ रु. ची देणगी दिली. कुलाब्याचे कलेक्टर व मुंबई प्रांताचे गव्हर्नर यांनीही धर्मशाळेसाठी देणग्या जाहीर केल्या.

रायगड किल्ला कुलाबा जिल्हा लोकल बोर्डाचे हद्दीत मोडतो. रायगडचे महत्त्व जाणून, गडावरील धर्मशाळा व गडापर्यंतचा रस्ता यांची सोय करण्याची जबाबदारी आपली आहे, हे बोर्डाचे ध्यानी आले. १९२२ मध्येच बोर्डाने रायगडावर धर्मशाळेकरिता दहा गुंठे जागा सरकारकडून मिळविण्याचा ठराव केला होता. १९२५ मध्ये जागा मिळविण्यात ते यशस्वी झाले पण पैसा नसल्याने रायगड-धर्मशाळा-फंड सुरू करण्यात आला. कै. पु. स. आठवले यांस प्रचारक नेमण्यात आले. त्यांनी महाराष्ट्रभर हिंडून खाजगी व्यक्ती, संस्था, जिल्हाबोर्ड यांजकडून वर्गणी जमविण्याचे प्रयत्न केले मार्च १९२८ अखेर त्यांनी १३२४८ रु. जमविले व त्यातून धर्मशाळेचे काम पुरे झाले.

प्रिय वाचक, रायगडची जीवनकथा सांगत सांगत आम्ही इ. स. १९३० अखेरपर्यंत आलो. पारतंत्र्य व स्वातंत्र्य यांच्या संधिकालात व आजही रायगडचे स्मरण जनतेला जागृति देत आहे. वर्तमानपत्रातून तत्संबंधी चर्चा होत आहे आज कालच्या त्या गोष्टीचे टिपण आताच न करता, ते भविष्यकालावर सोपवून हें इतिहास-कथन येथेच संपवितो.

---

१. 'राजधानी रायगड' या पुस्तकातील ९० ते ११० पृष्ठांवरून संकलन करून हे प्रकरण दिले आहे.

# परिशिष्ट १

## ग्रंथनामसंक्षेप

१. ऐतिहासिक पत्रव्यवहार ... ... ... ... ऐप.
२. ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ... ... ... ... ऐलेसं.
३. काव्येतिहास संग्रह ऐतिहासिक पत्रें यादी ... ... कासंपया.
४. शिवकालीन पत्रसारसंग्रह ... ... ... ... पसासं.
५. श्री महापुरुष ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर
(चरित्र व पत्रव्यवहार) ... ... ... ... ब्र. च.
६. पुरंदरे दप्तर भाग ... ... ... ... ... पुद.
७. ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड... ... ... ... ऐसंनि.
८. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ... ... ... ऐसंसाखं.
९. भारत इतिहास संशोधन मंडळ अहवाल, इतिवृत्तें ... भाइसंमंअइ.
१०. शिवचरित्रवृत्तसंग्रह ... ... ... ... ... शिचवृसं.
११. संभाजीकालीन पत्रसारसंग्रह ... ... ... ... संपसासं.
१२. शिवचरित्रप्रदीप ... ... ... ... ... शिचप्र.
१३. शिवचरित्रसाहित्य खंड ... ... ... ... शिचसाखं.
१४. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें— वि. का. राजवाडे खंड राखं.
१५. श्री छत्रपति शाहू महाराज यांची रोजनिशी ... शारो
१६. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी ... ... बाबापरो.
१७. माधवराव बल्लाळ ऊर्फ थोरले माधवराव पेशवे—भाग... मापेरो.
१८. सवाई माधवराव पेशवे भाग ... ... ... ... समापेरो.
१९. दुसरे बाजीराव पेशवे ... ... ... ... .... दुबापेरो.
२०. पेशवे दप्तर खंड ... ... ... ... ... पेदखं.
२१. शककर्ता शिवाजी ... ... ... ... ... शशि.
२२. उग्रप्रकृति संभाजी ... ... ... ... ... उप्रसं.
२३. स्थिरबुद्धि राजाराम ... ... ... ... ... स्थिरा.

२४. पुण्यश्लोक शाहू... ... ... ... ... ... पुशा.
२५. पुणें अखबार भाग ... ... ... ... ... पुअ.
२६. म. म. द. वा. पोतदार गौरवग्रंथ ... ... ... पोगौग्रं.
२७. मराठी दप्तर रुमाल ३ रा ... ... ... ... मदरु. ३
२८. अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास ... ... अष्टाक्रघइ.
२९. थोरले शाहू महाराज यांचे चरित्र ... ... ... थोशाम.
३०. शास्त्री दप्तरांतील वेंचे... ... ... ... ... शादवें.
३१. संपूर्ण भूषण ... ... ... ... ... ... संभू.
३२. हिंदुस्थानचा सागरविक्रम ... ... ... ... हिंसावि.
३३. राजधानी रायगड ... ... ... ... ... रारा.
३४. रायगड किल्ल्याचें वर्णन ... ... ... ... राकिव.
३५. कृष्णाजी अनंत सभासद बखर... ... ... ... सभासद.
36. Book of Bombay by James Douglas ... BBD.
37. Bombay and the Sidis ... ... ... BS.
38. Foreign Biographies of Shivaji ... ... FB.
39. History of Aurangzeb ... ... ... Aur.
40. House of Shivaji ... ... ... ... HS.
41. New History of the Marathas Vol. I... NHM I.
42. History of India as told by its own Historians Vol. VII-Sir H. M. Elliot & John Dowson ... ... ईलिडों.
43. Kolaba Gazetteer ... ... ... ... कुगॅ.
44. Historical Fragments by Ormes ... Ormes.
45. Memoir of the Operations of the British Army in India during the Maratha War of 1817, 1818, 1819 by Lieut. Colonel Valentine Blacker ... Blacker

## परिशिष्ट २

# संदर्भग्रंथसूचि


| ग्रंथनाम | संपादक, प्रकाशक इत्यादि |
| --- | --- |
| १. **ऐतिहासिक पत्रव्यवहार** | संपा. सरदेसाई, कुलकर्णी, काळे पुणें; स. रा. सरदेसाई, समर्थभारत, पुणें १९३३. |
| २. **ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ९ ते १२** | श्री. वासुदेव वामन खरे, मिरज; आर्यभूषण, पुणें. |
| **१३ ते १५** | श्री. यशवंत वासुदेव खरे, मिरज, सिद्धेश्वर, कोल्हापूर; प्रकाश, पुणें. |
| ३. **काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रें यादी वगैरे लेख – आवृत्ति २ री** | श्री. शं. न. जोशी, पुणें: चित्रशाळा १९३०. |
| ४. **शिवकालीन पत्रसारसंग्रह** | खंड १ ला व २ रा, संपा. केळकर, आपटे; आर्यसंस्कृति पुणें १९३० (होळकर सरकार ग्रंथमाला नं २४). खंड ३ रा संपा. जोशी, पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण, पुणें १९३७ (भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ४४). |
| ५. **मोरे बखर** | इतिहाससंग्रह वर्ष २ रें अंक ४,५, संपा. पारसनीस, मुंबई; निर्णयसागर, मुंबई १९०९. |
| ६. **श्री महापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर (चरित्र व पत्रव्यवहार)** | ल. संपा. पारसनीस, मुंबई; बाबाजी सखाराम आणि कंपनी, निर्णयसागर, मुंबई १९००. |
| ७. **पुरंदरे दप्तर** | भाग १ ला – संपा. कृ. वा. पुरंदरे; पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण, पुणें १९२९ (भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ३२). भाग २ रा संपा. कृ. वा. पुरंदरे; राजगुरु; राजगुरु पुणें १९२९, (भा. इ. सं. मं. पुरस्कृत ग्रं. क्र. १७). |

भाग ४ था संपा. कृ. वा. पुरंदरे, पुणें- भट; धुळें १९४१.
( मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २५ वा. ).

८. ऐतिहासिक संकीर्ण निबंध

खंड २ रा – संपा. चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें; आर्यभूषण, पुणें १९४७
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ६९. )
खंड ४ था – संपा. चिटणीस भा. इ. सं. मं पुणें. आर्यभूषण, पुणें १९४८
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ७२ ).
खंड ६ वा – संपा. चिटणीस, भा. इ. सं. मं. पुणें; आर्यभूषण, पुणें १९५६
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ८८ )

९. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १ ला – संपा. पोतदार, मुजुमदार; पुणें, आर्यभूषण, पुणें १९३१
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं, क्र. ३५ ).
खंड २ रा - संपा. पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण पुणें १९३४
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ४२ ).
खंड ३ रा – पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण, पुणें १९४१
( भा. इ. सं. मं स्वीय ग्रं. क्र. ५४ अ ).
खंड ४ था – मुजुमदार, कर्वे, जोशी; पुणें; आर्यभषण, पुणें १९४३
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ५६ ).
खंड ५ वा – मुजुमदार, कर्वे, जोशी; पुणें, आर्यभूषण, पुणें १९४४
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ६१ ).
खंड ६ वा – मुजुमदार, कर्वे, ओतुरकर; आर्यभूषण, पुणें १९४६
( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ६४ ).

खंड ९ वा – संपादक शं. ना. जोशी, पुणें; आर्यभूषण पुणें १९५४ ( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र ८७ ).

१०. भारत इतिहास संशोधन मंडळ अहवाल – शके १८३२ पुणें, मेहेंदळे, आर्यभूषण, पुणें १९११.

शके १८३४ पुणें; मेहेंदळे, आर्यभूषण, पुणें १९१३, (भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ४).

वार्षिक इतिवृत्त-शके १८३५-पुणें, मेहेंदळे, आर्यभूषण, शके १८३६, ( भा. इ. सं. मं. ग्रं. क्र. ७ ).

इतिवृत्त शके १८३६, पुणें, मेहेंदळे; आर्यभूषण, शके १८३७ ( भा. इ. सं. मं. ग्रं. पु. ९ वें ).

प्रथम संमेलन वृत्त–पुणें, मेहेंदळे; आर्यभूषण; शके १८३५, ( भा. इ. सं. मं. ग्रं. पु. ६ ).

११. शिवचरित्रवृत्तसंग्रह – खंड १ ला– ( कानडी विभाग ) संपा. पां भि. देसाई, पुणें; मुजुमदार, पोतदार; आर्यभूषण; १९३८ ( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ४९ ).

खंड २ रा– ( फार्शी विभाग ) संपा. ग. ह. खरे, पुणें; पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण; १९३९ (भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ५२).

खंड ३ रा– ( फार्शी विभाग ) संपा. ग. ह. खरे, पुणें; पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण, पुणें १९४१ ( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ५३ ).

१२. संभाजीकालीन पत्रसारसंग्रह– संपा. शं. ना. जोशी, पुणें; लोकसंग्रह, पुणें १९४९ ( भा. इ. सं. मं. ग्रं. क्र. ७५ ).

१३. शिवचरित्रप्रदीप– सं. स. म. दिवेकर, पुणें; श्री गणेश; पुणें, शके १८४७ ( भा. इ. सं. मं. पुरस्कृत ग्रं. क्र. ४ ).

१४. शिवचरित्रसाहित्य

खंड २ रा संपा. पोतदार, मुजुमदार; आर्य-भूषण, पुणें १९३० ( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र ३३ ).

खंड ३ रा– पुणें; संपा. जोशी, खरे; चित्र-शाळा; पुणें १९३०

( भा. इ. सं. मं पु. ग्रं. क्र. २४ ).

खंड ६ वा– संपा. ग. ह. खरे, पुणें; पोतदार, मुजुमदार; आर्यभूषण, पुणें १९३७

( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ४७ ).

खंड ८ वा - पुणें; मुजुमदार, कर्वे, जोशी; आर्यभूषण, पुणें १९४२

( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं क्र. ५५ ).

खंड ९ वा - संपा. शां. वि. आवळसकर, पुणें; मुजुमदार, कर्वे, जोशी; आर्यभूषण, पुणें १९४४

( भा. इ. सं. मं. स्वीय. ग्रं. क्र. ६२ ).

खंड १० वा – संपा. शां. वि. आवळसकर, पुणें; ओतुरकर; आर्यभूषण, पुणें १९५३

( भा. इ. सं. मं. स्वीय ग्रं. क्र. ८६ ).

१५. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

खंड २ रा. - (पेशव्यांची शकावली) वि. का. राजवाडे कोल्हापूर; वि. गो. विजापूरकर; श्रीसमर्थप्रसाद कोल्हापूर १९००.

खंड ३ रा – वि. का. राजवाडे कोल्हापूर; वि. गो. विजापूरकर श्रीसमर्थप्रसाद, कोल्हा-पूर १९०१.

खंड ४ था – वि. का. राजवाडे आवृत्ति २ री, पुणें; शं. न. जोशी; चित्रशाळा; पुणें शके १८४५.

खंड ६ वा – वि. का. राजवाडे, कोल्हापूर; वि. गो. विजापूरकर; श्रीसमर्थप्रसाद, कोल्हा-पूर, शके १८२७.

| | |
|---|---|
| | खंड ७ वा – वि. का. राजवाडे साह्य० गद्रे, घारपुरे, जोशी; नेटिव्ह ओपीनियन, मुंबई. |
| | खंड ८ वा – वि. का. राजवाडे, कोल्हापूर; वि गो. विजापूरकर; श्रीसमर्थप्रसाद, कोल्हापूर १९०३. |
| | खंड १० वा – वि. का. राजवाडे पुणें; आपटे, खाडिलकर; जगद्धितेच्छु, पुणें १९०९. |
| | खंड ११ वा - वि. का. राजवाडे पुणें; गोखले; ज्ञानप्रकाश, पुणें, शके १८३०. |
| | खंड १५ वा – वि. का. राजवाडे धुळें; देव; आत्माराम; धुळें शके १८३४. |
| | खंड १६ वा – वि. का. राजवाडे मुंबई; तुकाराम जावजी; निर्णयसागर, मुंबई १९२२. |
| | खंड १७ वा वि. का. राजवाडे मुंबई; तुकाराम जावजी; निर्णयसागर, मुंबई १९१३. |
| | खंड १८ वा – वि. का. राजवाडे मुंबई; तुकाराम जावजी; निर्णयसागर, मुंबई १९१४. |
| १६. श्री छत्रपति शाहू महाराज यांची रोजनिशी | गणेश चिमणाजी वाड सातारा; पारसनीस; सहस्रकर सातारा. |
| १७. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी - अंक १ ला – | गणेश चिमणाजी वाड; पारसनीस पुणें डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी; निर्णयसागर, मुंबई १९०७. |
| १८. माधवराव बल्ला[illegible] ...[illegible]ले माधवराव पेशवे-भाग १ला- | गणेश चिमणाजी वाड पुणें, साने; डे. व्ह ट्रा. सोसा. चित्रशाळा; पुणें १९११. |
| १९. सवाई माधवराव पेशवे – भाग १ ला – | गणेश चिमणाजी वाड पुणें, डे. व्ह. ट्रा. जगद्धितेच्छु, पुणें १९०८. |
| २०. सवाई माधवराव पेशवे ([illegible] अंक २ रा – | गणेश चिमणाजी वाड; मराठे; पुणें, डे. व्ह. ट्रा. सोसा. जगद्धितेच्छु, पुणे १९०९. |
| २१. ,, ,, अंक ३ रा – | गणेश चिमणाजी वाड, मराठे; पुणें; डे. व्ह. ट्रा. सोसा. जगद्धितेच्छु, पुणें १९११. |
| २२. दुसरे बाजीराव पेशवे – | गणेश चिमणाजी वाड, जोशी; पुणे, डे. व्ह. ट्रा. सोसा.; इंदिरा, पुणें १९०८. |

२३. पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद — Selections From Peshwa Dafter

[ या सर्व खंडांचे संपादक कै. सरदेसाई गोविंद सखाराम. ]

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अंजिव्याच्या शिहीवर शाहूची मोहीम | खंड ३ रा–मुंबई सरकार, सरकारी छापखाना मुंबई १९३०. | | | | | |
| बारभाईंचें राजकारण | खंड ५ वा– | ,, | ,, | ,, | ,, | १९३० |
| शाहू आणि संभाजी (परस्पर संबंध) | खंड ११ वा– | ,, | ,, | ,, | ,, | १९३१ |
| छत्रपति शाहू आणि पेशवे (खाजगी पत्रव्यवहार) | खंड १८ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| पेशव्यांच्या रोजनिशींतील उतारे | खंड २२ वा– | ,, | ,, | ,, | ,, | १९३२ |
| पश्चिम किनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली | खंड २४ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| शाहू व पहिले दोन पेशवे (संकीर्ण) | खंड ३० वा– | ,, | ,, | ,, | ,, | १९३३ |
| जमाव विभागांतील कागद | खंड ३१ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| उत्तरकालीन पेशवे (कौटुंबिक राहणी) | खंड ३२ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| अंजिव्याची मोहीम (पुरवणी) | खंड ३३ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| इंग्रजांचा साष्टीवर हल्ला | खंड ३५ वा– | ,, | ,, | ,, | ,, | १९३४ |
| इंग्रजमराठ्यांचें पहिलें युद्ध | खंड ३६ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| मराठी राज्याची अखेर | खंड ४१ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| राजा प्रतापसिंहाची रोजनिशी व इतर कागद | खंड ४२ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| ऐतिहासिक घराणीं | खंड ४४ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| मराठशाही कारभार | खंड ४५ वा– | ,, | ,, | ,, | ,, | ,, |

२४. परमानन्दकाव्यम् — ( गायकवाड ओरिएंटल सीरीज नं. CXX ) बडोदे, ओरिएंटल इन्स्टिट्यूट, साधना प्रेस, बडोदें १९५२.

| | |
|---|---|
| २५. शककर्ता शिवाजी | ले. गो. स. सरदेसाई, मुंबई वैभव, मुंबई १९३५. |
| २६. उग्रप्रकृति संभाजी | ले. ,, ,, ,, ,, ,, ,, ,, |
| २७. स्थिरबुद्धि राजाराम | ले. ,, ,, ,, मुंबई, ढवळे, मुंबई वैभव, १९३६. |
| २८. पुण्यश्लोक शाहू ( मस्तिका बाजीराव ) | ले. गो. स. सरदेसाई ,, ,, श्रीसमर्थसदन, १९४२. |
| २९. पुणें अखबार | भाग १ ला– मध्यवर्ती अभिलेख कार्यालय हैदराबाद सरकार; राजा त्र्यंबक रावबाहादूर हैदराबाद; हैदराबाद राज्य सरकार प्रेस १९५३. भाग २ रा ,, ,, ,, ,, १९५४. |
| ३०. म. म. द. वा. पोतदार गौरव ग्रंथ | संपा. सुरेन्द्रनाथ सेन; प्रका डी. के. साठे; समर्थभारत, पुणें १९५०. |
| ३१. मराठी दप्तर– | रुमाल ३ रा– संपा. वि. ल. भावे; ठाणें; अरुणोदय; ठाणें १९२८. |
| ३२. शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर ( मंत्री दत्ताजी त्रिमल वाकेनिवीस विरचित ) | संपा. वि. स. वाकसकर. मुंबई; अ. आ. मोरमकर; श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई १९३०. |
| ३३. मराठ्यांतील कमवंत घराण्याचा इतिहास | ले. संपा. ग. दा. टिल्लु, अलिबाग को. ए. सो. प्रिंटिंग वर्क्स; अलिबाग १९२८. |
| ३४. थोरले शाहू महाराज ह्यांचें चरित्र | ले. म. रा. टिपणीस, प्रका. का. ना. साने, आर्यभूषण, पुणें शके १८४५. |
| ३५. शाहीदप्तरांतील वेंचे ( बडोदे राज्य दप्तर ) | बडोदे, संपा. चिं. वि. जोशी, श्रीरामविजय, बडोदे १९४८. |
| ३६. संपूर्ण भूषण | संपा. रा. गो. काटे, विजय, पुणें १९३०. ( भा. इ. सं. मं. पु. ग्रंथमाला क्र. २३ ). |
| ३७. हिंदुस्थानचा सागरविक्रम | ले. मा. म. टेंबे. |
| ३८. राजधानी रायगड | ले. वि. वा. जोशी, प्रका. राजगुरु, पुणें, शके १८५१ ( भा. इ. सं मं. पु. ग्रं. क्र. २४ ). |
| ३९. रायगड किल्ल्याचें वर्णन | ले. गो. बा जोशी, वसईकर, चंद्रिका, बडोदे १८८९. |

| | |
|---|---|
| ४०. कृष्णाजी अनंत सभासद बखर ( शिव छत्रपतींचें चरित्र ) | संपा. का. ना. साने, आर्यभूषण, पुणें, १९२३. |
| ४१. श्रीरामदासींचीं ऐतिहासिक कागदपत्रें ( सर ४ था भाणि ९ वा ) | संपा. देव, आत्माराम, धुळें. |
| ४२. बुसातीनुस्सलातीन याने तारीख बादशहाने विजापूर ( हिंदी ) | पूर्ण चंद्रोदय, १८९५. |

अप्रकाशित साधनें :

| | |
|---|---|
| १. पेशवेदप्तर – | उत्तर कोंकण विभाग रुमाल नं. १ ते ८, ७५ ते ८८, ८८ अ, ८९ ते ९२ ( एकूण रुमाल २७ ). |
| २. भारत इतिहास संशोधन मंडळ – | कै. स. ग. जोशी व चंद्रचूड दप्तरांतील कागद. |
| ३. श्री. शां. वि. आवळसकर संग्रह – | ( अ ) पोलादपूर– चित्रेदप्तरांतील कागद.<br>( ब ) नातें– देशमूखशकावली.<br>( क ) संग्रहांतील इतर कागद. |
| १. *Book of Bombay.* | By James Douglas; Bombay Gazette Steam Press, 1883. |
| २. *Bombay and the Sidis* : | By D. R. Banaji; The University of Bombay; Macmillan & Co. Ltd. Bombay 1932. |
| ३. *Foreign Biographies of Shivaji* | By Surendranath Sen; Pub. Girindranath Mitra; Calcutta; The Book Company Ltd 4/4A College Square; Calcutta 1947. |

४. *History of Aurangzeb Vol. IV* : By Sir Jadunath Sarkar; M. C. Sarkar & Sons, 90/2A Harrison Road, Calcutta 1919.

५. *House of Shivaji* (Studies and Documents of Maratha History; Royal Period) By Sir Jadunath Sarkar, Second Edition; S. C. Sarkar and Sons Ltd. I. E. College Square; Calcutta 1948.

६. *New History of the Marathas : Vol. I* : By G. S. Sardesai; K. B. Dhawale Phoenix Publishers, Chira Bazar, Bombay 2, 1946.

७. *History of India as told by its own historians Vol VII* : Sir H M. Elliot & John Dowson; Turbner and Co, 57 and 59 Ludgate Hill, E. L., 1877.

८. *Kolaba Gazetteer* By James M. Campbell, 1883.

९. *Historical Fragments* By Ormes ( Reprinted from the original edition of 1782) Printed by Ashutosh Dey; Calcutta " Bangabasi " Office, 38-2 Bhawani Charan Dutt's street; 1905.

१०. *Memoir of the Operations : of the British Army in India during the Maratha war of 1817, 1818, 1819* By Lieut. Colonel Valentine Blacker; London; S. and R. Bentley Dorset street, London 1821.

---

# व्यक्तिस्थलविषयसूची.

[ किरकोळ व्यक्ती, स्थलें व प्रसंग वगळले आहेत. आकडे पृष्ठांचे. ]


अकबर ( शहाजादा ) ७९ ते ८१, ८३, ८९, ९०; पालीस आगमन ७९, ८०.

अनाजी रंगनाथ मलकरे ४५.

अन्याबा अभ्यंकर १७५.

अन्याबा फडके १७१.

अन्याबा मेहेंदळे १४४.

अफझलखान १६, २१, २२.

अबदुल रजाखान १००.

अमृतराव पेशवे १७६, १७७.

अल्लाउद्दीनशहा बहमनी १४.

अष्टमी ३५.

अष्टप्रधान मंडळ ५२; वेतन ५३.

ऑंजिअर ( प्रेसिडेंट ) ३४, ६८.

ऍंड्रयूज ( प्रेसिडेंट ) २३.

अंताजी शिवदेव ११२, १२३.

अंबाजीपंत पुरंदरे १०५, १०७.

अंबादास किशोरदास १४५.

अंबारजी गुजर १६७.

आगा हाजी याकूद इस्तंबोली १४.

आग्र्याहून सुटका; पोर्तुगीझांकडून अभिनंदन २५.

आण्णाजी दत्तो ( सुरनीस, सचिव ) २७, २९, ३४, ३७, ५२, ६७, ६८, ७३, ७५ ते ७७, ७९, ८०, ८८, १७५, १८९.

आनंदराव बहिरव ११० ते ११२, १९१.

आनंदराव शिर्के १०२.

आबा शेलूकर १७१.

आनंदराव सुमंत ११३.

आप्पाजीराव माणकर १६२.

आप्पाजी हरि ५, ११६ ते १२३, १४५, १५१, १५८, १६१.

आबाजी सोनदेव २२; रायगड बांधला २०; रायगडवर इमारती बांधतो २६, १००.

आब्राहाम लेपेकर ( डच वकील ) ३१.

आमडोशी १६७.

आवजी पंडित ६९.

आवजी शंकर ( फडणीस ) १५८.

आसदखान ९३, ९६.

आंगरे १०५, १०६, १०८, १०९.

आंबरलें १३६.

ऑर्मस् ७०, ७७.

ऑक्झेंडन हेन्री ६, १२, ३२ ते ३५; शिवाजीची पहिली भेट ३६; मुंबईकरांच्या सूचना ३४; रायगड चढतो ३६; चरित्र ३५; निराजी रावजीशीं तहाची चर्चा ३६ ते ३९; शिवाजीस नजराणा ३७; रायगडवरून परत ४०; राज्याभिषेक. वर्णन ४८, ४९; शिवाजीचें शब्दचित्र ५१, ५५, ५६.

ऑस्टिन ( सॅम्युअल ) रायगडवर वकिली ६७; शिवाजीस नजराणा ६८; इंग्रजवखारींस कौल ६८.
इटलकर ( इंदलकर ) हिरोजी ११, ८७.
इतिकादखान ( झुल्फिकारखान ) ९३ ते ९६,१००.
इब्राहिमखान ( निजामशाही अधिकारी ) १५.
इंग्रज १०९, ११५, १५० ते १५३, १५४, १७१ ते १७३; रायगड-मोहीम १८४ ते १८७.
इंदापूर १८४.
उदाजी चव्हाण १०५, १०८.
उदाजी पवार ११०.
उधो योगदेव ७८, ९७.
उरवडें ११४.
उस्टिक– शिवाजी भेट २८; रायगडवैर वकिली २८; रायगडवर गेला ३०, ३४.
उंदेरी ८९, ९१, ११७, ११९, १५०, १९१.
एल्फिन्स्टन मौंट स्टुअर्ट १८२ ते १८४, १८८; रायगड घेतला १८२.
एन्साइन जॉप १८७.
औरंगजेब २१, २४, ६७, ७४, ७९, ८१, ८८ ते ९४, ९६ ते ९८, १०४; आदिलशहाशीं तह २१, २२; रायगड ताब्यांत ९६, ९७; रायगड मोहीम ३०, ९३ ते ९५; व्यवस्था १००.
कथाकल्पतरूंतील विषय- ६१, ६२.
कपूरचंद दिवाण १००.
कर्जे १९.
कविकलश ( केशवभट्ट कब्जी ) ८४, ८५; न्यायनिवाडे ८६, ८७, ९१, १९०.
कविलवहाळ १३६.
कल्याण १९; खजिना लुटला २०, ३४, ६८, ६९.
क्लेमंट ७३.
कंक येसाजी ९३, १३५.
काटकर चांगोजी ९२, ९३.
काननाक फलाणकर १२०.
कान्होजी जेधे १५, १७, २१.
कान्होजी भांडवलकर हवालदार ७३.
कान्होजी शिर्के १०३.
कालकाईचा डोंगर ३, ११; भेट १२०.
कालाकुंड ( रायगडवरील ) १२.
कावला घाट १६५, १७६.
काशीबाई ( राजपत्नी ) ६२ ते ६४.
काळधोंडीचा मार्ग १९.
कांगोरी ( मंगलगड ) १७, १५१, १५३, १६४, १८६.
किनेसर १९.
कुंबळें १५१,१६४.
कुंभार्ली घाट १६५.
कुमर्टे १९.
कुलकर्णी गंगाधर रंगनाथ ८६.
कुशावर्त ( तलाव-रायगड ) १०, १३२, १३४.
कुसाजी वानरे ११९.
केग्विन ( गव्हर्नर ) ६८, ७०.
केनेडी १०.
केवनाळें १९.

केशवभट्ट पुरोहित ४२, ८४.
केसरकर जोत्याजी ९७.
केळशी १९०.
कोर्करें ११७.
कोरेगांव ९४, ९७.
कोलंब्या घाट १६५.
कोळी कोंडा महाद भीमाशंकरकर १४५.
,, भिकाजी चव्हाण १४५.
,, विठोजी लांघी जुन्नरकर १४५.
कोंझर ५, ११६, १८५.
कोंडाजी रवळेकर २७.
कोंडेखळी ( रायगड ) ११७.
कोंडेनळीचा घाट व मार्ग १९.
कोंढवी २१, १५२, १६४.
कृष्णराव खटावकर ११०.
कृष्ण शेणवी ६८.
कृष्णाजी बल्लाळ १६१.
कृष्णाजी पवार ११०.
क्रौस्बी १८६.
खडकोली १३६.
खवासखान मोदी ६८.
खाफीखान ७४, ९७.
खानजादा १०५, १०६.
खूबलढा बुरूज ५, ६, १८५; दुरुस्ती १३३.
खैर्यतखान २७, १००, १११.
खोकरी १०५, १०७.
खंडेराव गुजर ९७.
खंडेराव बर्गे ११७, १२२.
खंडेराव नीलकंठ ( सरसुभा ) १५४.
खंडेराव मोरेश्वर ११७.
खंडेराव रास्ते १५४, १७५.
खंडो परशराम सबनीस १०१.
खंडो बल्लाळ १००.
खंडोजी म्हसके १४५.
खंडोजी माणकर ११२.
गणपतराव कृष्ण कोल्हटकर १२२, १२३, १३२, १३५, १४९, १५०, १५२, १५३, १५७, १६१, १६३.
गणपती ( देवस्थान, पाचाड ) १२९, १३०.
गणेश अनंत जांभेकर ८४.
गणेशभट परांजपे १४६, १४७.
गणेश विश्वनाथ १२०, १२२, १५२.
गणेश शामजी मजमदार १०१.
गद्रे रघुनाथराव १४०,१४२,१५०,१५३, १५७,१५८.
गद्रे सदाशिव रघुनाथ १३३,१३६,१५७, १५८.
गागाभट्ट ( विश्वेश्वरभट्ट ) ४१ ते ४४, ४६,५२,६२,६३,६५,८४,१८१; ग्रंथकर्तृत्व ४१; काशीक्षेत्रीं कुलगुरुपद ४२, ४३.
गायकवाड नरसोजी ९६.
गायकवाड संभाजी नरसोजी ( देशमुख तपे बिरवाडी ) ९६.
गुइरीचा डोंगर ३,४.
गुणाजी कमळाकर १४५.
गेरी ( कॅप्टन ) ७०.
गोपाळ कुंजीर १७७,१७८.
गोपाळ जोशी महाडकर ११८.
गोपाळशेट सोनार गुहागरकर १४६.

गोल्दरा ( मजरे ) १६४.
गोविंदभट्ट ४१,६२,६४,८२.
गोवें २५, २७, ७०, ८४.
गोवेकरांचा वकील व संभाजी ७०; तह २५.
गंगाजी घिंडले १५२.
गंगाबाई ( पेशवे ) १४७, १४८.
गंगासागर ८, ९, १३३.
गांगवली ३५, १०४.
गोंझालो मार्टिन (पोर्तुगीझ वकील) २५.
घळकीचा पहारा १; मेट १०८, १२०.
घाटगे बहीरजी नाईक ८८.
घैसास विठ्ठल विश्वनाथ ९७.
घोरपडे संताजी ९२, ९४, ९९.
चतुरसिंग भोसले- रायगडवर कैद १८०.
चव्हाण विठोजी ९४.
चंद्रगड २१, १६४; घेऱ्यांतील गावें १६६.
चंद्रराव मोरे ६१.
चाइल्ड ३४.
चाफळ १८९.
चांदळेकर मिवजी १४८.
चांदळेकर येसजी १२१.
चांमारखिंड १६९.
चित् दरवाजा ( रायगड ) ६, ११८, ११९, १३३.
चित्रे १००.
चिमणाजी आवजी ५३.
चिमाजी आप्पा पेशवे १०७, १०९, १४४.
चिमाजी आप्पा पेशवे ( २ रा ) १७४, १७५, १७७, १७८.
चिंतामण दीक्षित कर्वे उपाध्ये १७९.
चिंतो रामचंद्र लिमये १४६, १७०.
चौल १९, २२, २३, २८, ३०, ३४, ३५, ६८, ६९, ८६, ९१, १८९; चा सुभेदार ३५.
चौलकर बजाजी ९१.
चौलकर पिलाजी तबीब महाले ९१.
छत्री निजामपुर ४, १२, ११०.
छोटेमिया १४४.
जगजीवन गुजर ९८.
जगदीश्वराचा प्रासाद ( वाडेश्वर महादेव ) ४९, ५८, १२८, १३४, १६९.
जनार्दनपंत ७५, ७६.
जयराम कृष्ण १४२, १६३.
जयरामपंत जोशी १४६.
जंजिरा ( महरुसा ) ३, १५, १०५ ते १०९, १४४; मोहीम १०५, १०८, ११३.
जाखो रुद्र १६.
जानकीबाई ( राजारामाची भार्या ) ७२.
जामदारखाना ९.
जावजी लाड ( रायगडचा सरनोबत ) १११.
जावळी सुभा १४, १६; बद्दल कलह १४, १८९; हून रायगडास प्रयाण १८.
जांभळी १७.
जॉर्ज रॉबिन्सन ३४.
ज्याव फिरंगी ११९.
जिजाबाई ५, ३४, ४९, ६२, ६५, ६६, ८४, १०४, १८१; स्मारक ५.
जेम्स डग्लस ३, १०, १९३.

जोशी धोंडो विश्वनाथ १३१.
जोर १७, १९.
झुल्फिकारखान २,९३ ते ९७,९९, १०३.
झोलाई ( कसबे वाडी ) १२०, १२१, १२९, १३०.
टकमक टोंक ३, ८, १२; दंतकथा १२, १३२.
टाकसाळ ( रायगड ) २६.
टॉमस मिचेल ३४.
टॉमस निकल्स २९.
ठाकूर दुर्गादास ७९ ते ८१.
डेंशवुड १८७.
ढवळें ( मौजे ) १९, १६४.
ढवळा घाट १९.
तळें ११७, ११९, १८४.
तळोजें १२५.
ताननाक पांगारकर १२०.
ताम्हणें १३६.
ताराबाई १०३, १०८.
तुकोजी होळकर १५२, १५३.
तुडील (तपे) १४, १०९, १६४, १६५.
तुळबाजी मरळ १११.
तुळाजी आंगरे १९१.
तुळाजी पानवेकर १४८.
तुळापूर ९२, ९६.
तेटघर ११९.
तोतया १५०, १५२, १५३.
तोफा ( रायगड ) १३९.
त्र्यंबक विनायक ( सरसुभेदार ) १६३.
त्र्यंबकजी डेंगळे इंग्रजांचा रोष १८२.
दत्ताजीपंत वाकनिवीस ४०, ५२.
दर्या बुरूज ( महाड ) ११६.
दलपतराव पाताणे १०३.
दाजीपंत देशमूख १७५.
दादली १५२.
दादा गद्रे १७० ते १७२.
दादाजी रघुनाथ देशपांडे ८९.
दादासाहेब ( पेशवे ) ११६, १४०, १४२, १४३, १४५, १५०, १५१, १७१.
दादोबा पुरंदरे १०७.
दाभोळ १५, २२, २७, ३४, ६२; मोत्यांची वृष्टी १९०.
दासगांव १५१, १५४, १६४.
दिनकर गोसावी १८९.
दिवाकर गोसावी ८७.
दिल्ली ५०, १००, १०४.
दिलेरखान २४, २७, ७१.
देवदेवता व उत्सव ( रायगड ) १२५ ते १३१.
देवजी गोपाळ सबनीस १६१.
देवजी शिर्के १०३.
देवराव मेघश्याम ११०.
दौलतराव कुंजीर १६२.
दौलतराव मोरे १६, १७.
दौलतराव शिंदे १७१, १७२, १७४.
धरणगांव ( डुमगांव ) ६७, ६८.
धनाजी जाधव ९४, ९९.
धर्म सावंत १०१.
धर्मोजी महाडीक ११९.
धोंडबाराव दाभणे ११९.

नगरकर वेंकाजी लक्ष्मण १४४.
नगारखाना १०, १२५; वरील माणसें १२५.
नवलनाक फकीरनाक १४४.
नवहस्त–रघुनाथ पंडितराय ५२, ५३, ८५, ८७.
नवी लेखनप्रशस्ती ५२.
नागोठणें २९, ३४, ३५, ७०, ८९, १९३.
नाचणटेप ( रायगड ) ११८.
नातें ( तपे ) १४, ११२, ११५, ११६, ११८, १२२, १२८, १३६, १५२, १७८, १९२; कर जोशी १२७; कर गोंधळी १२७.
नांदगांव ( मौजे ) १३०.
नांदवी-पुरार १४४, १५४, १६८.
नानचंद दाणी १६७.
नाणा दरवाजा ( रायगड ) ६, ११७, ११९, १३२, १३३; वर्णन ७; दुरुस्ती १२.
नाना फडणीस ५४, १२५, १३३, १४० ते १४२, १४६, १७० ते १७३, १७६; महाडचें कारस्थान १७१, १७२; रायगडास गेले १७० ते १७२.
नानासाहेब पेशवे ११५, १६२.
नारबा मंत्री १०७.
नारायणराव पेशवा ५, ११४, ११६, १४२, १४३; रायगड घेतला ११६ ते १२०.
नारायण शेणवी ३०, ३२ ते ३५, ४०, ४८, ६८; मुंबईकरांस निरोप ३३; मार्फतीनें शिवाजीशीं तह ३३.
नारो गोविंद आवटी १५४, १५८, १७७ ते १७९, १८३, १९२.
नारोपंत अमात्य ( सचिव ) ८८, ११३.
नावडी ९२.
निकल्सकृत रायगडवर्णन ३०; ची व संभाजीची भेट २९, ३०; शिवाजीची भेट ३०.
निजाम १४१, १७२, १७३, १७६.
निजामपूर ४, ३०, ३५, ६८, १२९, १६७.
नितळपुरी ( निश्चलपुरी ) गोसावी ४४, ५६, ६२ ते ६६, ८४; कृत राज्याभिषेक ६३, ६५, ६६.
निंबाजी भास्कर १७५.
निंबाजी विठ्ठल १४२.
निराजी रावजी ३२ ते ४१, ५२.
निळो गणेश १५८, १७२.
निळोपंत पेशवे ७९.
निळोपंडित ४८.
निळो शामजी सबनीस १०१.
नूरमहमद जमातदार ११८, ११९.
नेताजी पालकर ७९, ८०.
नेसरी ६४.
पटवर्धन बाळाजीपंत १४०, १७३, १७६ ते १७८.
पतंगराव ( राजे ) १४, १५.
पनाळघर १३६.
पन्हाळा ७५, ७६, ९१, ९४; शिवाजीनें घेतला २७.
परमानंद कवींद्र ४४, ८२, ८३; कृत मुद्राश्लोक ५१, ५६; काव्यें ८२, ८३, ८५; चरित्र ८२.

परशराम केशव सबनीस १०१.
परशराम त्रिंबक प्रतिनिधि १५४.
परशराम क्षेत्र ( भार्गवक्षेत्र ) ५४, ६२, ६४, १७७.
परळी २८, ९७, ११२.
पळसगांव खुर्द व बुद्रक १३६.
पाचाड सावंताची चौकी ५, ६, ३०, ३२, ३५, ७५, ७६, ८२, ९०, १००, १०१, १०४ ते १०७, १०९ ते ११२, ११५ ते ११८, १२० ते १२२, १६० ते १६२, १६६, १६७, १७१, १७९, १८५, १९३; मजरे १२९ ते १३१, १३५; कोट ५; पेठ ५; आंबाबाई ८२; देव १२९, १३१; कर जोशी ११८, १२७; चकमक १८५; सोमजाई १२०, १२९, १३०.
पातशाही जमाखर्चाचा जाबता ५०.
पार्वतीबाई पेशवे १४५.
पारघाट १९, १७७.
पालखी दरवाजा ( रायगड ) ९.
पाली ७९, ८१, १८४.
पार्ले १६६.
पिंगळे मोरोपंत ३७, ४०, ४८, ५२, ६७, ६८, ७३, ७५ ते ७९, ८४, ८८, १७५, १८९.
पिट ( कॅप्टन् ) १९३.
पिलाजी (-शिवाजीचा वकील ) २८, २९.
पिलाजी शिर्के १०३.
पिसाळ सूर्याजी ९५, ९७.
पीलखाना ११.
पुजारी बकाजी पांड्या ( सिंहासनाचा ) १२२.
पुंडलीक राम फडणीस ११७.
पुणें २, १००, ११०, ११६, १२०, १२१, १४३ ते १४५, १५०, १५२, १६७, १७२, १७४ ते १७७, १७९, १८३, १८७.
पुतळाबाई (शिवाजीची भार्या ) ७३, ७४.
पुरोहित केशवभट्ट दामोदरभट्ट ८६.
पुरंदर २, ४५, १४०, १४७, १४८, १७५; तह २४, १८२, १८३.
पैठण ४१, ४२, ६३.
पोटल्याचा डोंगर १८५ ते १८७.
पोतनिसांचा वाडा ( रायगडकर ) १०.
पोतनीस हकीकत – ११३ ते ११५, १३९, १४५.
पोलादपूर २१, ८२, १०९, १५२, १८६.
प्रतापगड २,६२,६४,९४,१४०,१४२, १७३, १७७; भवानी ३५, ४५, ७८.
प्रतापराव गुजर ४५, ६२, ६४, ७१, ७२, ९७, १८१.
प्रतापराव मोरे १८.
प्रतिनिधी १०६ ते १०९, १५०, १५१, १६४; रायगड घेतला १०६, १०७.
प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद ९७.

प्रधानांचे वाडे ( रायगडवर ) १०.
प्रभाकरभट्ट पुरोहित ४८.
प्रल्हाद निराजी ३५,४०,९१,९३,९४.
प्रॉथर कर्नल ८,१८३ ते १८७.
फत्हमुल्क ( रायरीचा हवालदार ) १६.
फतेजंगखान १००.
फत्तेसिंग भोसले १०६ ते १०८.
फिरूझजंग ९०.
फिलिप गिफर्ड २३.
बजाबा शिराळेकर १४२, १७१, १७३.
बरवाजी कड्ड ११९.
बहादूरखान ६७,९०.
बळवंतराव नागनाथ १७५, १७६.
बाकाजी नाईक महाडीक १०८.
बाजारपेठ ( रायगड ) ११.
बाजी भीवराव ११०, ११२; चें शाहूस पत्र ११२.
बाजी येरंडकर ११९.
बाजीराव पेशवा ( पहिला ) १०५ ते ११०; प्रतिनिधीशीं मतभेद १०८, १०९.
बाजीराव पेशवा (दुसरा) ११४, १३१, १४४, १५४, १६९, १७०, १७२ ते १८०, १८२ ते १८४, १९१; बरोबर पळालेले १७५.
बाजीराव बर्वे १७५.
बाणकोट ( हिंमतगड ) २४, २५, १०९, १११, १३४, १५० ते १५२, १५४.
बाणाजी बंडगर १४६.
बापुजी जनार्दन १४३, १४७.
बाबाजी चव्हाण १४५.
बाबूराव साळेकर १४६.
बाबुराव कृष्ण गोरे १७२.
बारभाई १५१, १५२.
बाराटाकीं ( रायगड ) ११.
बालकाजीराव पालांडे ११७, ११९, १२०.
बालेकिल्ला ( रायगड ) ९, ११.
बावले १६७.
बाळ दीक्षित १४४.
बाळकृष्णभट्ट क्रमवंत ४७.
बाळकृष्ण गोपाळ भातखंडे १६९.
बाळकृष्ण पांडुरंग १६१, १६२.
बाळंभट्ट ( प्रभाकरभट्टाचे पुत्र ) ४७, ६२.
बाळाजी ( संभाजीचा वकील ) ६९.
बाळाजी आवजी चिटणीस ४२, ४३, ५२, ५३, ७५.
बाळाजी विश्वनाथ १०४.
बाळाजी सावंत देसाई १६१.
बाळोजी धोंडजी ढमेढेरे १६२.
बाळोजी नाईक दिवेकर १६२.
बाळोजी कुंजीर १५८, १७२ ते १७७.
बिरवाडी ४, १७, ११६, ११८, १२१, १२५, १३६, १५१, १५२, १५४, १६४, १६५, १७५ ते १७७; तर्फे १४, ९६.
बिरुदावली ( छत्रपतिपदाची ) ५५.
बिंबाजी पवार ११२.
बोरघाट १८४.
ब्रह्मपुरी ९७.
ब्राह्मणतळें ( रायगड ) ११.

भगत कडू १३०.
भगवंतराव कुंजीर १६२.
भगवंतराव बाजी १२३.
भगवा ध्वज ( मराठ्यांचा ) ५१.
भट्ट घराणें ( पैठण ) ४१.
भवानी ( रायगड ) १२८; टोंक ३, १२.
भवानी तलवार ९८.
भाईचंद गुजर १६७.
भाणदेरें १३५.
भालचंद्रभट्ट ४२.
भिकाजी बल्लाळ साने १७२.
भिकाजी नारायण १६१.
भीमजी ( वकील ) ३१.
भीवराव पानशे ११७, १७५.
भूषण कवि ५६ ते ५८, १८१; कृत रायगड.वर्णन ५६ ते ६०; कृत शिवप्रशस्ती ५८ ते ६०.
भोसले परसोजी ७३.
भोसले १७३, १७६.
मकाजी जाधव १३१.
मजमदार विसो राम १८.
मदनशहा ( साधु ) ७.
मदारशहाची कबर ( रायगड ) ८, १२९; कोटी १३२; चौकी ११७, ११९, १३३.
मढेघाट १७५, १७७, १८३.
मदनसिंग ९७.
मनमेळ प्रेम गोलंदाज ११९.
मनोरे ( रायगड ) ९,१०.
मनोहरगीर गोसावी १७५.
मलिक जमरूत ( रायगडचा हवालदार ) १५.
मशीद ( रायगड ) ७; मोर्चा ७.
महरुसा ( जंजिरा पहा ).
महाडकर विठ्ठल त्रिंबक ७५.
महाड २, ३, ५, १५, २४, २५, २७,८९, ९०, १०५, १०६, १०९, ११२, ११३, ११५ ते ११७, १२५ ते १२७, १४३, १५० १५२, १५४, १५७, १६०, १६५, १६७, १६८, १७० ते १७२, १७५, १७६, १८४, १८५, १८८, १९१; आपूस तळें १११; गोंधळी १२७; परगणे १४, १००, १६४; महाराजांचा वाडा १०.
महादरवाजा ( रायगड ) ६ ते ८, १२, १३३, १३४, १३९, १८७.
महादाजी गणेश कुंटे १६९.
महादाजी बल्लाळ १५२.
महादाजी त्रिंबक ११७.
महादाजी निळाजी ( सबनीस ) १६२.
महादजी पाटील ८६.
महामूनकर आप्पाजीराव १४१.
महामूनकर चांदबाराव ११९, १२०.
महिमाजी पालांडे १०२.
मल्हारी गात १४५.
मल्हारनाक वाडकर १३६.
म्हसोबा ( रायगड ) १३१.
माणगांव ३, ४, १०४.
माधवराव पेशवे ( १ ला ) ११५, ११६.
माधवराव पेशवे ( सवाई ) १४४, १४७, १७०.
माधवसिंग ९७, ९८.
मानसिंग खलाटे १४६.

मानाची वस्त्रें देण्याबाबतचे संकेत ५३, ५४.
मानाजी मोरे ९२, ९३, ११०.
मारुती ( रायगड ) ११, १२९.
माल पाटील १७.
मावळचे देशमूख १७; जावळी प्रकरणीं शिवाजीस साह्य, त्यांचा मान ५३.
मावळ प्रांत ११३.
माया नाईक भंडारी ९१.
मार्टिन ७३, ७४.
मांगडे राणोजी ११९.
मांगरूण १३६.
माल्कम १८३; रायगड परत दिला १८३.
मीरखान पठाण ( होळकराचा सरदार ) १७७.
मुकर्बखान ( शेख निजाम ) ९२.
मुजुमदार त्रिंबक बहिरव १२३.
मुंबई २८, ३३, ३४, ३९, ४०, ६९, १०७, १६६, १८४, १८५; शिवाजीस नजराणा ३३; नाणीं ३७; [illegible] ३०, ३१; सुरतेस पत्र ७३, ७७, ८९.
मुल्ला अहमद ( कल्याणचा सुभेदार ) २०.
मुहम्मदशाहा आदिलशाहा १९.
मेस्तर जमा फरासिसीण १४७.
मेहेंदळे बहिरो रघुनाथ १४४.
मोने धोंडो नारायण १२१.
मोरोजी नाईक संकपाळ १४६.
मोरो बापूजी फडके १५० ते १५२.
मोरो रामचंद्र फडणीस १६१.
मोरोपंत सबनीस ९७.
मोहोपरें १५२.
मौलवेअर ( इंग्रज वकील ) ६८.
मॅथ्यू टेलर २३.
यमाजी शिवदेव १०८.
यशवंतराव मोरे– १६, १८, ११५, ११७ ते ११९, १२१, १५८.
यशवंतराव पानसे १७५.
यशवंत महादेव पोतनीस १०५, ११४, ११५.
यशवंतराव होळकर ( रायगडला वेढा ) १७३ ते १७८, १८०.
यशोदाबाई पेशवे ( सवाई माधवरावांची भार्या ) १३८, १७४, १७५, १७७ ते १७९; रायगडावर राहणें; मारेकरी; व्यवस्था; मृत्यू १७९, १८०.
येरुणकर कृष्णाजी हराजीराव १०१.
येरुणकर आनंदराव कृष्णाजी १०१.
येसजी नाईक चांदलेकर ( हवालदार ) १६२.
येसजी नाईक पवार १२१.
येसाजी गायकवाड १०७.
येसूबाई ९३ ते ९७, १०४.
योगी घराणें १२५.
रंगमहाल ( रायगड ) १०.
रघुनाथ रंगाजी देशपांडे १५३.
रणमस्तखान १३०.
रहीमखान ( गयरीचा हवालदार ) १५.
राईरकर ( काशी ) १२९.
राघो व्यंकटेश ११०.
राघोजी आंग्रे १९१.

राघोपंत गोडबोले १७१, १७३.
राघो सदाशिव १४२.
राजगड २, २४, ११०.
राजपुरी २७, ९०, १०४, १०८, १५१; प्रांत राजपुरी ११६.
राजवाडा १३४, १३७; दुरुस्ती १३४.
राजव्यवहारकोश ५२.
राजहुडा – १२०.
राजापूर – २२, २८, ३०, ३१, ३३ ते ३५, ३८, ३९, ७३, १८९; ऑंग्रज कैद्यांची सुटका २२, २३; गंगा ६२; वखार ७०.
राजाराम छत्रपति ६१, ६६, ७१ ते ७२, ७३, ७५, ७६, ८४, ८८, ९२ ते ९६, ९९, १०३, १०८; मुंज व लग्न ७१, ७२.
राज्याभिषेक परंपरा ( महाराष्ट्रांतील ) नष्ट ४१; विद्यापीठें नष्ट ४१.
राज्याभिषेक तयारी ४५; प्रारंभीचीं धार्मिक कार्यें - व्यवस्था - ४५; शक ५४, वर्णन ५५; दानधर्म ४४, ४६, ५५; दरबार वर्णन ४७, ४८.
राणूबाई ( रायगड ) १२१, १२९.
राज्यारोहणाचें महत्त्व ४३.
राण्यांचे महाल ( रायगड ) ९.
राम शेणवी ३०, ७०.
रामचंद्र त्रिंबक सुमंत ५२, ५३.
रामचंद्र नीळकंठ अमात्य ५२, ९४, ९९.
रामदासस्वामी ७१, १८९, १९०.
रामनाक सिरकोल १२०.
रामराव प्रभु २२.
रामराजा ( शाहूचा वारस ) ११५, ११६.
रामाजी दत्तो ४४, ७१.
रामोजी वाडकर १६.

रायगड —

नांवें – रायरी, तणस, राशिवटा, नंदादीप, १; इस्लामगड २, १७७ ते १८१; रायगिरि, राहीर, मामले रायरी १०३, १०४; अक्षांश, रेखांश, उंची ३; दर्शन ३; जाण्याचे मार्ग ४; अठरा कारखाने ४; तटबंदी ८; चढण ५ ते ७; पायऱ्या ८; निजामशाहींत रायगडचा उपयोग १; रायगड हें नामकरण २; राजधानी म्हणून पसंतीचें कारण २; कानडी ग्रंथांतील रायगडप्रशस्ती २; वरील शिलालेख ११; एक्याण्णव कलमी बखरींतील रायगडवर्णन – साधुसंत वर्णन ४४; आदिलशाही सत्ता व नियंत्रण १५, १६; व्यवस्था १२२ ते १२५, १९३; खर्चाची तरतूद १६४, १६५; सामान पुरविण्याचे मार्ग व व्यवस्था १६६, १६७; सरदेशमुखी १०३; मामलेदार– दर्जा, मानपान, नेमणूक १५६, १५७; त्यांच्या हाताखालील नोकर १५८; त्यांचें वेतन १५९; कामगारांचे पगार १६०; वरील नोकरांबद्दल जाबता १६० ते १६३; हवालदार व आधिकारी १६२; सरसुभेदाराची किल्ल्यांवरील तपासणी व व्यवस्था १६३, १६४; शिबंदी, तिचें अन्यत्र कामकाज १४९, १५०; परिसरांतील पहाऱ्याचीं ठिकाणें १३८,

१४१; वरील दिवटी लावावयाचीं ठिकाणें १२५, बकरे बळी देण्याचीं ठिकाणें १३०; वरील बालपरवेशी व कुणबिणी १६८, १६९; पायथ्याशीं युद्ध १०९ ते १११; पेशव्यानें रायगड व कोंकणांत बंदोबस्त केला १८३; पुन्हा घेण्याचे अयशस्वी प्रयत्न ९९; घेऱ्यांतील गांवें १६६; वर भूकंप १९०, १९२; वर मोत्यांची वृष्टी १९२; रायगड, पाचाड व वाडी येथील शाकारणीचीं ठिकाणें १३५ ते १३८.

रायनाक १८८.

राव (हु) जी सोमनाथ २३, ३७, ८५, ८८, १९०.

राहीरकर गण जोशी १२६.

रास्ते १७३.

माधवराव रास्ते १७४ ते १७७.

रायाजी उतरेकर १४६.

रूपराम चौधरी १७५.

रेवदंडा ३५, १५०, १६८.

रेमन् लेफ्टनंट ७, १८७.

रंभाजी दौंड (हवालदार) १६२.

रॅंडॉल्फ टेलर २२, २३.

लाडवली (मौजे) १००.

लिंगाणा ३, २४, ११५ ते ११७, १२१, १३०, १३१, १३५, १३९, १४६, १४७, १५७, १६० ते १६२, १६४, १८८; चढ ३, ४; माहिती ४; उपयोग ४; लिंगाणा घेतला १२१; दुरुस्ती १३५; वरील शाकारांचीं ठिकाणें १३६; श्रीजननी १३०, १३१; सोमजाई १३०, १३१; वरील कैदी १४६, १४७; घेऱ्यांतील गांवें १६६; वरील हवालदार व अधिकारी १६२; अधिकारी व शिबंदीचा खर्च १६०.

लिंगोजी हवालदार १११, ११२.

लुमाजी वाडकर १६,

वरंधा घाट १५२, १७७.

वसई–७०, १५१, १५४, १६७, १७७; तालुके वसई ११६.

वाई ९५, ११८, १७०, १७७.

वाघोवले १३६.

वाडी (रायगडवाडी) ४ ते ६, २९, ३०, १००, ११० ते ११२, ११५, ११६, ११८, १२०, १२१, १२७, १२९, १३५, १६६.

वाराणशीबाई (पेशवे) १८३, १८४, १८६, १८७; शब्दचित्र १८७; पुण्यास रवानगी १८८.

वारंगी १६७, १९१.

वासुदेवभट कर्वे १४३ १४४.

वाळण खोरें (तर्फ) १६४, १६५.

वाळण कुंड ४, १३०.

विजयदुर्ग १७१, १७५; तालुका १५०.

विठलपंत गडनिवीस ११२.

विठल यशवंत पोतनीस (खासनिवीस) ११५ ते ११७, ११९, १३५.

विठ्ठल विश्वनाथ १५८.

विनायक हरी मजमदार १५८.

विशाळगड ९१, ९२, ९४.

विश्वासराव पवार ११०.

बिसाजी केशव सरसुभेदार १५६, १६३
विल्किन्स ( लेफ्टनंट ) ७०.
विन्हेरें– तपे १४, १०९; तर्फ १६४, १६५.
विसाजीपंत वाडदेकर १७०.
विवेकसभा ( रायगड ) १३४, १७२.
वेरिंग ७०, ७८.
वेंक्या महार व त्याचे साथीदार १४६.
शहाबुद्दीनखान ९०
शाक्तपंथ ८४; चें तत्त्वज्ञान ८४, ८५.
शामजी २९.
शामजी आवजी ५३.
शामजी बल्लाळ देशाधिकारी १०३.
शामजी रुद्र ११२.
शाहू ८५, ९३, ९६ ते ९८, १०३ ते ११५.
शाहू दुसरा छत्रपति ५४.
शिद्दी जंजिरेकर– ६९,८१, ८९ ते ९१, १०४, १०६ ते ११३, ११५, १२२, १४४, १४५, १५०, १५१ ते १५४,१६८,१७१ ते १७३; अबदल्ला १०१ ते १०५; अिसूफ १४४; जोहार १०१; सालीम १०१; अंबर १५, १०५,१०९ ते १११; सात ( सैद ) १०१,१०९,१११; रसूल १०५; संबुल १०५; रहयान १०५; हसम १०५; रहमान अबदल्ला १०५,१६८; याकूदखान, २७,१००,१०१,१०५; बाळूमिया १४४; शिद्दीवरील मोहीम १०५; उपद्रवामुळें दौलतखान दर्यासागर कल्याणपर्यंत आरमार घेऊन जातो ६९; शिवाजीशी दांडा येथील आरमारी लढाई २७; शिद्दी आणि रायगड १०१,१०२, १५३ ते १५५.
शिद्दी जोहार ( विजापूर दरबार ) २२.
शिर्काई देवी ( रायगड ) ६४,१२०,१२१, १२६,१२७,१३०,१३४.
शिवभारत-८२.
शिवयोगी ८४,८५.
शिवसिंग ( सूरसिंगाचा मुलगा ) १००.
शिवाजी महाराज २,७ ते ९, ११, १२, १७, १९, २२ ते २४, ३३ ते ३६, ३८ ते ४९, ५२, ५८ ते ६०, ६२ ते ६९, ७१ ते ७३, ८४, ८६,८८,८९, ९१,१०३,१०८,१७५,१८०, १८१, १८९,१९०,१९३. महाराजांचा वाग ५; मोऱ्यांशीं संघर्ष १६ ते १८; मोऱ्यांच्या प्रदेशांतील वतनदारांस साह्य १७; रायगडला वेढा १८; शिवाजी व गागाभट्ट यांस मानवणारें तत्त्वज्ञान ४२; राजधानीच्या स्थानाची निवड २६, ४३; राज्याभिषेकाची इच्छा ४२; मुंज ४५; चरित्राचे समकालीन आधार ४३, ४४; सुवर्णतुला ४६; सुवर्णस्नान ४८; राजमुद्रा ५१; राज्याभिषेकापूर्वीचे अपशकुन ६२; पहिल्या राज्याभिषेकसमयींचे अपशकुन ६५; नंतरचे अपशकुन ६५; दुसरा राज्याभिषेक ६६; सुभेदार बहादूरखानाशीं युद्ध ६७; धरणगांवची लूट ६७; अंतकालीं समीप असलेले लोक ७२;

निर्याण ७२, ७३; मृत्यूबद्दल औरंगजेब व खाफीखान यांचे उद्गार ७४.
शिवाजी बल्लाळ १५८.
शेख अबु १८६.
शेख अल्ली ( रायरीचा हवालदार ) १५, १६.
शेख निजाम ( मुकर्बखान ) ९२.
शेख मिरा ( वाई ) ११० ते ११२.
शेख याकूब ( शेखजी ) १०५, १०७.
शेवता घाट १७७.
शेष घराणें ( पैठण ) ४१; शूद्राचार शिरोमणि ग्रंथ ४१, ४३.
शेळके खंडोजी १२१.
शंकराजी नारायण ( सचिव ) ९४, ९९.
शिंदे १७१, १७३, १७६.
श्रीगोंदें टोंक १०, १२.
शृंगारपूर ८४.
सकवारबाई ७३.
सखारामबापू बोकील ( सखाराम भगवंत ) ५४, ११६, १३२, १४० ते १४२, १४७, १४८, १५१; कैद १४० ते १४२.
सखाराम धोंडदेव १४४.
सखोपंत ( शिवाजीचा वकील ) २५.
सदावर्ती मल्हार गोसावी ८६.
सदाशिव माणकेश्वर १८३.
सदाशिव धोंडदेव नातू १४३.
सदाशिव विश्वनाथ कोल्हटकर १४५.
सभासद ४३, ४४, ४७; कृत गागाभट्ट प्रशस्ति ... राज्याभिषेकवर्णन, सुवर्णाचें तुलादान ४६.
सय्यद कबीर लष्करी ( रायरीचा हवालदार ) ५१.
सर्वोत्तम शंकर १६३, १६४.
सलाबतखान २३.
सातारा १०७, १११, ११२; किल्ला १८९; छत्रपति १८०; सातारा घेतला २८.
सापळखिंड १९.
साव म्हाली न्हावी ११९.
साल्हेर ४५, ६८.
सावरट १६७.
साष्टी ११६, १५०, १५१, १५३, १७१.
सिलीमकर हैबतराव १७, १८, १९०, १९१; त्याचा मुलगा चंद्रराव संभाजीच्या कैदेंत १९०, १९१.
सुकचंद वाणी ११९.
सुपेकर येसजी ८७.
सुभेदार कृष्णाजी बाबाजी १८.
सुरत २, २३, २४, ३३ ते ३५, ६८, ६९, ७३, १०४, १५२, १६६; सुरत लुटलें २६.
सुरबाराव बुरुणकर १४६.
सुवर्णदुर्ग ११६, १५२, १७५, १७७, १८०, १८४.
सूरसिंग १००.
सूर्याजीराव शिंदे १४५.
सेखोजी आंगरे १०६.
सोमगड १८३.
सोमनाथभट्ट कात्रे ४२.
सोयराबाई ४६, ७३ ते ७७, ८०, ८१, ८५; मृत्यू ८१.

सोहनी बलवंतरांय १७७.
संगमवाडा ९१.
संगमेश्वर ६२, ७०, ८६, ८८, ९२.
संताजी बिन नागोजी शेलार १६२.
संभाजी छत्रपति २९, ३४, ३६, ४८, ६५, ६९ ते ७१, ७४ ते ८०, ८२ ते ९३, ९६, १०८, १९०, १९१; विषप्रयोग ८०; वधाचा कट ८०; राज्यारोहण ७८, ७९; रायगडवर धरपकड ७६, ७७; रायगडवरील व्यवस्था ८७, ८८; रायगडवरील संपत्तीची मोजदाद ७८, ७९; पन्हाळयाचा बंदोबस्त करून रायगड-वर आगमन ७५, ७६; अिंग्रज वकील व संभाजी यांची रायगडवर भेट ६९, ७०; कॅ. गेरी व लें० विल्किन्स या अिंग्लिश वॅकिलां-बरोबर तह ७०; जंजिऱ्यावर स्वारी ८१, ८९, ९१; संभाजी व कलुशा यांस अटक ९२.
संभाजी जांगड १६८.
संभाजी दौंड १२१.
सांदोशी १६७.
सिंहगड २, १४०, १७५, १८२, १८३.
सिंहासन ९, ३३, १२४, १२५.
सुंदरजी ( शिवाजीचा वकील ) २८.
स्वराज्य तीन हप्त्यांत सिद्ध झालें ५२.
हणमंतराव मोरे १६, १७.
हणमंतराव साळवी १५८, १६१.
हतलोटचा घाट १९.
हतलोली १३६.
हत्ती महाल १३४; हत्ती तलाव ८.
हब्सखान ( तळकोंकणचा हवालदार ) १५.
हबाजीराव राणे १६१.
हर सरनोबत १०१.
हरसूल ८७.
हरी गणेश ११२.
हरी पुरुषोत्तम १५८.
हरिपंत फडके १५२, १७१, १७४.
हरिपंत भावे १७६.
हरि मोरेश्वर पंतराजाज्ञा ११०.
हिरकणी बुरूज ( टोंक रायगड ) ३, ७, ८, ११७, १३२; दंतकथा १२.
हिरोजी फर्जंद ७९, ८०.
हेन्री रेव्हिंग्टन ( रेसिडेंट ) २२, २३.
हैबतखान ( निजामशाही अधिकारी ) १४.
होन सावंत १००.
हंबीरराव मोहिते ४५, ५२, ७५, ७६, ८८.
हंसाजी खैरा ( खेर ) १२० ते १२२ १५८.
हॉल ( मेजर ) १८४, १८५.
क्षेत्रपाळ ( मौजे ) १९.

“ रायगडची जीवनकथा ” या पुस्तकात रायगडवर घडलेला सर्वविध इतिहास साद्यंत देण्याचा प्रयत्न केला आहे. रायगडच्या इतिहासासंबंधाने आजवर जे संशोधन झाले, ते सर्व या पुस्तकात अंतर्भूत झाले आहे ; तेवढ्यापुरते हे पुस्तक संकलनात्मक मानता येईल. पण रायगडच्या परिसरात हिंडून अनेक असंशोधित, अव्वल दर्जाचे कागद पाहून, नकलून घेऊन त्यांचा येथे प्रथमच उपयोग केला आहे. पेशवेदप्तरातून रायगडसंबंधीची बरीच माहिती येथे प्रथमच ग्रथित केली आहे. श्रीभारत इतिहास संशोधन मंडळातील स. ग. जोशी-दप्तर, चंद्रचूड-दप्तर यांतील अप्रसिद्ध माहितीचा अंतर्भाव येथे केला आहे. अशा तऱ्हेने प्रथमच पुढे येणारा मजकूर भरपूर असून त्याने या पुस्तकाची किमान दहा प्रकरणे सजविली आहेत; तेवढ्यापुरते हे पुस्तक संशोधनात्मक आहे. रायगडचा बराच अप्रसिद्ध इतिहास देऊन हे पुस्तक अद्ययावत् केले आहे. पूर्वीच्या संशोधनातून निर्माण झालेले अपसमज दूर केले आहेत व अनेक संशोधित ऐतिहासिक पत्रांची मितिशुद्धि केली आहे. यायोगे, प्रस्तुत विषयातील वाचकांच्या ज्ञानात भरपूर भर पडेल, असा विश्वास वाटतो. रायगडचा इतिहास संशोधनपूर्वक लिहिणे हे राष्ट्रीय कर्तव्य-ऋण होते व ते ऋण फेडण्याचा लेखकाचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.**

*मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १९९८*